

जी ए कुलकर्णी यांच्या १३ कथांवरील चर्चा- भाग -३




कळसूत्र ( काजळमाया)
कसाब ( काजळमाया)
कांचनमृग ( सांजशकुन)
काकणे ( पारवा)
कैरी ( पिंगळावेळ)
तुती (हिरवे रावे)
गिधाडे ( हिरवेरावे )
गीत पाखरू ( सांजशकुन)
गुंतवळ ( निळासावळा)
गुलाम ( काजळमाया)
गोरिला ( सांजशकुन)
घर (पिंगळावेळ)
चंद्रावळ (निळासावळा)

# जीए कथास्वाद
## भाग ३

# जीए कथास्वाद 3

## जी ए कुलकर्णी यांच्या कथांवरील चर्चांचे संकलन


### संकलन व संपादन- सुनीळ सामंत



### ई प्रकाशक- ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

9987737237



या पुस्तकातील सर्व लेखनाचे व चित्रांचे अधिकार त्या त्या लेखकांकडे व चित्रकारांकडे आहेत. पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी त्यांची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

# जीए कथास्वाद 3

कळसूत्र ( काजळमाया )

कसाब ( काजळमाया )

कांचनमृग ( सांजशकुन )

काकणे ( पारवा )

कैरी ( पिंगळावेळ )/ तुती (हिरवे रावे)

गिधाडे ( हिरवेरावे )

गीत पाखरू ( सांजशकुन )

गुंतवळ ( निळासावळा )

गुलाम ( काजळमाया )

गोरिला ( सांजशकुन )

घर (पिंगळावेळ)

चंद्रावळ (निळासावळा)

# प्रास्ताविक

मराठीतील सर्वोच्च कथालेखकांमध्ये ज्यांचे नांव अग्रक्रमाने घ्यावे अशा श्री जी ए कुलकर्णी यांच्या शताब्दीचे वर्ष २०२२-२०२३. या वर्षाचे सार्थक व्हावे या हेतूने जीएंच्या कथांचे प्रेमी एकत्र येऊन त्यांनी एकावेळी फक्त एक कथा घेऊन त्यावर जमेल तितकी सखोल चर्चा करून, त्या कथेतून काय मिळाले ते सांगण्याचा प्रयत्न केला. जीए यांची कथा लोलकासारखी प्रत्येकाला वेगळा प्रकाश, वेगळा रंग दाखवते. हिच्यासारखे जीएंच्या कथेला अनेक पैलू असतात आणि वेगवेगळ्या वाचकांना त्यातले वेगवेगळे पैलू दिसतात.

चौघांनी आपल्याकडचा एक एक रुपया दिला आणि त्यातून एक एक रुपया घेतला, तर पर्त्येकाकडे एकच रुपया रहातो. पण प्रत्येकाने एक एक विचार दिला तर चौघांकडे चार चार विचार जमा होतात. विचारांच्या या शिस्तबद्ध पण मुक्त देवाणघेवाणी मुळे ही चर्चा अत्यंत आनंदमय झाली. होते आहे. या चर्चेत इतरांनाही आनंद घेता यावा यासाठी हा संकलित पुस्तकप्रपंच.

- संकलक- सुनीळ सामंत (9869674820)

# चर्चेतील सहभागी व्यक्ती

सुनीळ सामंत
डॉ माधव पुराणिक
आनंद माने
यतीन गुळवणी
विलास वाघोलीकर
विशाखा आपटे
राम कुलकर्णी
अभयकुमार कुलकर्णी
प्रमोद कुलकर्णी
दिलिप बडे
महेश आफळे
Kasturi Mahesh
लक्ष्मीकांत देशपांडे
मनमोहन आंबेकर
विश्वेश्वर नांदेडकर
वैभव कुलकर्णी
अशोक पाटील

अतुल ठाकूर
उमेश तुपे
डॉ. आशा भागवत
वर्षा हळबे
राजेश उनवणे
प्रदिप कुलकर्णी
सुमन महामुनी
श्रीकांत देशमुख
नागेश कुलकर्णी
नितीन वैद्य
विशाखादत्त
स्नेहल बोकील
परमजीत सिंग
प्राची बापट
शिवाजी कुऱ्हाडे
अलका तडकलकर
मंजिरी देशमुख

# कळसूत्र-- काजळमाया

## लेखक- जी ए कुलकर्णी

कळसूत्र- जी ए कुलकर्णी- काजळमाया-

जीएंच्या उत्कृष्ट कथांपैकी एक – कळसूत्र. जीएंच्या सर्वाधिक बहरकाळातील (१९७२-७५) ही कथा.

कथेला जगापासून तुटलेल्या, आपल्याच मस्तीत आणि धार्मिक समजूतींत जगणाऱ्या एका आदिवासी जमातीची पार्श्वभूमी आहे. शिकारी प्रवृत्तीच्या, आदिम वृत्तींशी नाळ जोडून असलेल्या या जमातीत शिकार करणे, लढणे आणि वंशवृद्धी हेच आद्यकर्तव्य आहे. शेतकी जमातींना ते मागासलेल्या, खुज्या समजतात. बाहेरच्या जगात कोणाशी संपर्क नाही. दुष्काळ पडला तर धान्य खाऊन नामुष्कीने जगावे लागेल याची त्यांना काळजी.

अशा जमातीत एक उपरा माणूस योगायोगाने येतो. या जमातीतील एका मुलाचे, नायकाच्या परागंदा झालेल्या मुलाचे सोंग तो वठवतो, आणि नायक होतो. पण त्याच्यात त्या लढाऊ वृत्ती नसतात. त्यामुळे तो अत्यंत लबाडीने ’सम्राटाच्या

सूचनांची' भिती घालून त्यांच्यावर सुखाने राज्य करतो. सगळे भोग भोगतो. त्याचाही मुलगा एके दिवशी परागंदा होतो.

अखेर जेव्हा त्याच्या आयुष्याचा अंत जवळ येतो तेव्हा त्याला त्याची मनोदेवता सत्य बोलायला भाग पाडते. तो आपण परके आहोत हे तर सांगतोच. पण 'सम्राट' वगैरे सर्व अंधश्रद्धा आहेत आणि आपण कायम खोटे बोलून फसवले हेही सांगून टाकतो. पाऊस आपल्या पर्जन्य नृत्याने नाही तर नेहमीच्या ऋतूचक्रामुळे पडतो हे सांगून तो सगळ्या जमातीचा रोष पत्करतो. लोकांना ते सत्य पचत नाही. अखेर ते लोक त्याला खिळे ठोकून मारतात.

पण त्याच वेळी त्याच्या मुलाचे सोंग घेऊन एक दुसरा माणूस येतो आणि तो त्यांना पर्वतापलिकडे 'सम्राट' खरेच आहे हे पटवून देतो. (त्यासाठी त्याला कष्ट करावे लागत नाहीत, कारण त्यांना ते पटलेले असतेच.) तो त्यांना सांगतो की सम्राटाकडे जशी वीज आहे तशीच त्याच्याकडेही आहे आणि तो आपल्याजवळच्या बंदुकीने एक दूरवरचे गिधाड मारून दाखवतो. आणि त्यांचा नायक बनतो. लोक त्याला आनंदाने स्विकारतात.

तशी कथा एवढीच. पण यातली नायकाच्या मनातली घालमेल आणि त्याचे तत्वचिंतन मात्र अत्यंत मौल्यवान आहे. जी ए कधीच तत्त्वज्ञान लेखकाच्या मुखातून सांगत नाहीत. तर अनेक विरोधाभासी तत्त्वे ते त्यांच्या पात्रांकरवी सांगतात. इस्किलारसारखीच याही कथेत अनेक एकमेकांना खोडणारी पण तितकीच परिणामकारक वाक्ये आहेत. त्यांची जंत्री लवकरच देईन.

या कथेतून जीए बरेच काही सांगून जातात. पण मला वाटते ते जे सर्वात महत्वाचे सांगतात ते हे की मानवांनी जपलेली अनेक शाश्वत मानली गेलेली तत्त्वे

आणि सत्ये संदर्भ बदलताच कवडीमोल होतात. एकाचे सत्य आणि ब्रह्म हे दुसऱ्याचे असत्य आणि माया असू शकते. अगदी एकाचे आजचे सत्य उद्या मातीमोल होते. आणि हे सत्य ज्याचे त्याला समजते. ते दुसरा समजावू जाईल तर तो त्यालाच मुर्खात काढतो. जीए नेहमीच सत्य आणि शब्द यांचे उफ़राटे अर्थ अत्यंत कलात्मकतेने दाखवतात.

- सुनीळ सामंत

कथा-कळसूत्र,विवेचक - विलास वाघोलीकर

।) ही कथा ,अमेरिकेतील रेड इंडियनांच्या अनेक जमातींपैकी ,एका शिकारी जमातीवर आहे. पण आणखी विचार केला तर , निसर्ग ,त्याचे कार्य ,त्यात मानवी जमातींचे रहाणे ,त्यांच्या रूढी- समजुती, समाजव्यवस्था, गुन्हे, त्या जमातीत प्रमुखाचे स्थान ,जमातीच्या मूळ श्रध्दा ,इत्यादींवर या कथेत प्रकाशझोत टाकला आहे. येथे सर्वसाधारणपणे एका आदीम जमातीवर लिहिले असले तरी, तुलना केली तर त्यांमध्ये संघटित धर्म येतो ,भाषिक समाज येतो.गावातील गावगाडा येतो.एखादा कम्युनिझम सारखा संघटित राजकीय पक्ष येतो.अतिरेकी विचारसरणीचा नक्षली,जिहादी गट येतो. हिटलरचा संघटित देश येतो.घट्ट विचारसरणी येते. एकूण सामाजीकतेवर हे भाष्य आहे.

2) जीएंनी जमातींचे वर्णन अनेक कथांत केले आहे. उदा. कांचन मृग, अहम्, स्वप्न ,बळी.... पण या कथेत ,गरूड हे मानचिन्ह असलेल्या शिकारी जमातीचे वर्णन तेथे प्रत्यक्ष गेल्यासारखे वाटते. पर्जन्य नृत्य ,प्रार्थना, प्रमुखाचे अधिकार, गुन्हा व शिक्षा ,इतर जमातीशी संबंध ,महिलांना अर्धपोटी रहायला लागणे ,वृद्धांची

झोपड्यांत व्यवस्था, पिसांचा तुरा -निळया रंगाची पट्टी -मण्यांची माळ- गंडा -पाठीवर गरुड कोरणे... खूप सविस्तर वर्णन आहे. तसेच जमातीच्या धर्माचे स्वरूप ,डोंगरापलिकडचा सम्राट ,त्याचे 'आयातीसारखे ' आदेश फक्त प्रमुखाला येणे, उलट सुलट आदेश येणे, हे सर्व वास्तवाचे यथार्थ वर्णन आहे.तुम्ही पर्जन्य न्रुत्य केले नाही,तरी पाऊस निर्विकारपणे पडणार,हे सांगून,विश्वात माणसाचे स्थान उपरे आहे,हे दाखवले आहे.

3) कथेत, एक माणूस उपरेपणाने प्रमुख म्हणून जमातीत आला. त्याने हुकूमशाहीने सत्ता स्थापन केली. आदेश काढले. व तो ऐषारामात राहीला. हे कथानक खूप नाटयमय आहे. दुसऱ्या जमातीने पंधरा घोडे पळवले, तो प्रसंग नाट्यमय आहे. माणसे गुलामगिरी कशी स्वीकारतात हे दाखववले आहे. स्पष्टपणे सांगायचे झाले तर ,भारतात 1920 पासून असाच ' पंचशीलवाद' आला. अजून आहे. पण फाळणीच्या दंगली व 1962 च्या पराभवाने त्याला धक्का बसला आहे.

क्रुपया हा वेचा वाचताना खालील व्यापक मुद्दा, विचारात घ्यावा--मानवी समाजातील मुल्ये समाजसापेक्ष असतात, त्रिकालाबाधित नसतात,निरपेक्ष नसतात. उदाहरणार्थ, "अतिथीदेवो भव", हे मूल्य, ठराविक मर्यादेपर्यंत योग्य असते,ते मूल्य निरपेक्ष नसते."अहिंसा"सारख्या इतर मूल्यांबद्दलही हे खरे आहे.**

जी ए लिहितात -

"हे कसले भेकड, नादान आयुष्य आहे! शांतता कितीही चांगली असली , तीदेखील कठोरपणे भग्न करण्याचे प्रसंग येत असतात. मैत्री?मैत्री करायची ती मैत्रीचा हात पुढे केलेल्या वीराशी; दरोडेखोराशी नव्हे!आमच्यावर एखादी लाथ उगारली गेली, तर कमरेपासून पायच छाटला जाईल, असे आमचे व्रत, आणि आता आम्हालाच घोडे देवून सहनशीलता दाखवण्याचा निर्लज्ज उपदेश करण्यात येत

आहे!कधीतरी असहिष्णू बनण्याचे सामर्थ्य नसेल तर ,सहिष्णुतेला काही अर्थ नाही. ज्याच्या मनगटात प्रायश्चित्त देण्याचे सामर्थ्य नाही, त्याचे दया, समता असले शब्द, सशाने टाकलेल्या लेंड्यांपेक्षा जास्त महत्त्वाचे नाहीत!क्षमा हा शब्द बलिष्ठांच्याच तोंडी शोभतो. सगळ्याकडून लाथा खायच्या व तोंडाने शांतता शब्दाचा जप करायचा, यापेक्षा जास्त शरमेची गोष्ट नाही."

4) या प्रमुखावरही जमातीचे संस्कार होतात. व रात्री कवटी दिसल्यावर ,आपला मृत्यू जवळ आला आहे, याचा पगडा त्याच्यावर पडतो. तो जे गुपित सांगतो ते अस्तित्ववादाचे सार आहे. मी पुण्य करतो किंवा पाप करतो, हा माझा स्वतःचा एकाकी निर्णय असतो. पाप ही सुद्धा मी जीवनावर केलेली मुद्रा असते जीए लिहितात -

."…. त्या वातावरणात एखादे पापकृत्य करायला मात्र असामान्य सामर्थ्य लागते.. उलट दिशेने जाताना जो लागतो तो सगळा कडवेपणा यावेळी पणाला लागतो. म्हणून तर सारे धर्म पापी किंवा गुन्हेगार यांस भयंकर माननात. कारण तो त्यांच्या मायावी इंद्रजाळातून निसटलेला असतो. त्याच्या द्रोहातच त्या त्या धर्माच्या विनाशाची बीजे लपलेली असतात... या डोळस दीर्घ द्रोहावर मी माझे जीवन घडवले. स्वतःमध्ये स्वतः विषयी अहंकारी आदर निर्माण केला... पण माझे प्रत्येक पापकृत्य म्हणजे माझ्या स्वत्वाची खूण होती. मी करत आहे आणि जगत असलेला मी हा कोणीतरी स्वतंत्र आहे याची मी माझ्या अंगठीने केलेली निशाणी होती.. "

सांजशकुन मधील पातक कथेत ही हा तर्कविचार सविस्तर दाखवला आहे.

- 5) जमातीची गुलामगीरी कठोर असते. माझा धर्म सर्वश्रेष्ठ आहे. विश्वात तो सर्वश्रेष्ठ आहे. त्याचे अनुयायी मला प्रिय आहेत - इतरांचे अनुयायी कमी प्रतीचे आहेत. ( त्यामुळे त्यांची डोकी उडवणे धर्माचे कर्तव्य आहे ) हे अडाणी वाटले, तरी

जगात असे शांतीचे धर्म -the religion of peace- असून, ते सतत हिंसाचार करतात, हे आश्चर्य नाही.

- 6 ) कथेची गुंफण कौशल्याची आहे - बंदुकीचा वापर करून युरोपियनांनी रेड इंडियन्स संपवले हा इतिहास , अमेरिकेतील , ऑस्ट्रेलियातील, अनेक ठिकाणचा आहे. भारतात क्षत्रिय होते. शस्त्रे होती. म्हणून भारत टिकला.प्रमुखाचा खरा मुलगा कोठे असेल हा शेवटी प्रश्न टाकून कथा संपते. महत्वाचे प्रश्न उपस्थित करणारी ,ही जी एं ची नाट्यमय कथा आहे. धन्यवाद. - विलास वाघोलीकर

विलासजी, तुम्ही कथेचा एक अगदी वेगळा पैलू (कॅलिडोस्कोपमधून दाखवावा तसा) दाखवून कथेचा रंगच बदलला आहे. त्यासाठी आभार. ही कथा आता त्या कोनातून वाचावी लागेल. पुन्हा वाचावी लागेल.

या कथेत शांतीवादाची (तुम्ही म्हटल्याप्रमाणे पंचशील, किंवा बुद्ध, गांधी) जोरदार चिरफ़ाड एका पात्राच्या तोंडून केली आहे (रागारागाने निघून गेलेला तरूण) हे खरेच. त्याच बरोबर (कोणत्याही प्रकारच्या) श्रद्धेचे आणि त्यातून येणाऱ्या कट्टरतेचे वैय्यर्थही त्यांनी लाल गरुडाच्या तोंडून वदवले आहे. ही कथा वैश्विक आहे. यावर पुन्हा एकदा टिप्पणी करेन, किंवा तोवर अजून कोणीतरी वेगळी टिप करण्याची वाट पाहीन.

मनापासून धन्यवाद.

- सुनीळ सामंत

ही कथा वाचतानाच जाणवते की तो आयुष्य आरामात जगलेला नायक नेहरू वरून बेतलेला आसवा. आमच्या पिढीने ही कथा साधारणत: १९७७ क्या सुमारास

आम्ही सोळा वर्षाच्या आसपास असताना वाचली. पण कथा ज्या काळात प्रसिद्ध झाली त्या वेळी तरुण असणाऱ्यांनी या कथेचा संदर्भ निश्चितच भारताच्या तत्कालीन राजकारणाशी आणि एकंदरीत नेहरूंच्या भारतीय समाजमनावर आसलेल्या पकडी सोबत जोडला असणार.

तशिपण ही कथा निश्चितपणे एक ठराविक संदर्भ आणि व्यक्ती समोर ठेवून ठरवून लिहिली गेल्याचे माझे तरी मत झाले होते.

पण एकंदरीतच आहिंसा वादी आणि त्यांचे विरोधक यांचे तत्वज्ञान वेगवेगळया पात्रांच्या तोंडून आतिशय आक्रमक पाने सांगितले जाते , सशाच्या लेंड्या वगैरे. ते जी ए क्या भाषेत वाचणे एक वेगळीच अनुभूती देवून जाते. कथा वाचल्यावर नेहमी प्रमाणे मन सुन्न होवून जाते. दोन तीन दिवस कथा भारून टाकते.

- विश्वेश्वर नांदेडकर

छातीवर आडवे काळे पट्टे रंगवणाऱ्या जमातीतील लोकांनी यांचे पंधरा घोडे चोरून नेले.

हे समजताच लाल गरुडाच्या सैनिकांनी युद्धाची तयारी सुरु केली.

हे पाहून लाल गरुडाच्या छातीतच कापरे भरले.

मग त्याने शांतीचा जप सुरु केला.

" आजचा रक्तोत्सव सम्राटास मान्य नाही. रक्ताचे पाट वाहतील. प्राण जातील. त्यापेक्षा आपण ते घोडे त्यांना भेट दिले असे समजू. शांतता हे भूषण आहे. क्षमा हे वैभव आहे."

यावर जमातीतील तरुणाने दिलेले उत्तर मुळातूनच वाचण्यासारखे आहे.

- प्रमोद कुलकर्णी

*"हे कसलं भेकड, नादान आयुष्य आहे ! शांतता कितीही चांगली असली तरी ती देखील कठोरपणे भग्न करण्याचे प्रसंग येत असतात. मैत्री ? मैत्री करायची ती मैत्रीचा हात पुढे केलेल्या वीराशी; दरोडेखोराशी नव्हे ! आमच्यावर एखादी लाथ उगारली गेली तर कमरेपासून पायच छाटला जाईल, असं आमचं व्रत आणि आता आम्हांलाच घोडे देऊन सहनशीलता दाखवण्याचा निर्लज्ज उपदेश करण्यात येत आहे! कधीतरी असहिष्णू बनण्याचं सामर्थ नसेल तर सहिष्णुतेला काही अर्थ नाही. ज्याच्या मनगटात प्रायश्चित्त देण्याचं सामर्थ नाही, त्याचे दया, समता असले शब्द, सशाने टाकलेल्या लेंड्यांपेक्षा जास्त महत्त्वाचे नाहीत! क्षमा हा शब्द बलिष्ठांच्याच तोडी शोभतो! सगळ्यांकडून लाथा खायच्या व तोंडाने शांतता शब्दाचा जप करायचा यापेक्षा जास्त शरमेची गोष्ट नाही! शत्रूपुढे धुळीत लोटांगण घालायचं आणि घरच्या माणसांचे कान मात्र असल्या शेंबूडकिड्यासारख्या शब्दांनी मळवत बसायचं, यात कसला आला आहे पुरुषार्थ! आता या क्षणी मी प्रमुखाला स्वतःच्या खांद्यावरून त्या दरोडेखोर जमातीत न्यायला तयार आहे. तिथे उलगड म्हणावं तुझ्या उपदेशाची चिकट मळकी चादर. सम्राट जर असला भेकड आदेश प्रमुखाकडून देत असेल, तर प्रमुख तर सोडाच, प्रत्यक्ष सम्राटदेखील आपण बदलला पाहिजे! जगायचंच असेल तर माणसाने लखलखीत सुरीसारखं जगावं. नाहीतर आताप्रमाणे चकतीला चकती चिकटवून एखाद्या गांडुळाप्रमाणे नुसतं लांब जगण्यापेक्षा, आपणा सगळ्यांचा पूर्ण नाश झाला तरी त्यात खंत नाही! कशाला गरुडाचं कूळ सांगता*

*निर्लजपणे ? उंदीर-कोंबड्यांचे वंशज म्हणून जगा की बिळाखुराड्यात ! इथे पंधरा घोडे गेल्याची खंत नाही. मी आता रानात जाऊन तीस घोडे आणून दाखवतो. पण असले दीन, लाचार आयुष्य जगण्याची तुम्हांला काहीच शरम नाही?" त्याचे डोळे आता एकदम पिसाळल्यासारखे झाले व तो जोराने छातीवर मूठ बडवू लागला. "म्हणे शांततेची किंमत पंधरा घोड्यांपेक्षा जास्त आहे ! पंधराच का, मग शंभर घोडयांपेक्षा का जास्त नाही? मग आमच्या पंधरा, शंभर बायकांपेक्षा का जास्त नाहो ? थूः !" तो आवेशाने धुंकला व त्याने लाल गरुडाकडे पाठ वळवली. तो इतरांना उद्देशून म्हणाला, "असले भेकड आदेश मी कुत्र्यापुढे टाकतो! भेकडांचा सम्राट भेकडांना असले आदेश देतो! पण मी भेकड नाही! माझं रक्त मला सांगतं, भाला, बाण घे आणि वाऱ्यासारखा जा. हा आदेश मला पुरेसा आहे !*

*"मी आता या जमातीत पुन्हा पाऊल ठेवणार नाही. पण निदान तीन वैऱ्यांची तरी डोक्यांची केसांसकट छाटलेली कातडी तुम्हांला दाखवायला मी एकदा येईन. नाहीतर तिथेच कुठेतरी माळावर आडवा होईन. पण खबरदार माझ्या प्रेताला हात लावाल तर ! तुमच्यासारख्या शेणमाणसांचे हात लागण्यापेक्षा घारी-गिधाड यांच्या रोखठोक चोची अंगात रुतणं जास्त मानाचं आहे. म्हणे गरुडाचे वंशज!"*

मत मांडण्याचं धाडस दाखवतोय त्याबद्दल क्षमस्व, जी.ए. ची कथेवर बोलण्याइतका मी कशानेच मोठा नाही. पण तरीही आपलं काहीतरी असावं म्हणून हे थोडसं. आपण सर्वांनी समजावून घ्यावं ही विनंती.

अति दुर्गम डोंगराळ भागात दऱ्या खोऱ्यात राहणारी एक आदिवासी जमात ; आपल्या धर्माबद्दल, सम्राटाबद्दल, परंपरेबद्दल प्रचंढ अभिमान आणि आस्था

बाळगणारी अत्यंत पराक्रमी जमात ; प्रामाणिक आणि स्वच्छ मनाची ही जमात ; केवळ एका साध्या स्वार्थी भटक्या वाटसरुच्या हातचं कळसूत्र बनते. आणि तो तिला पाहिजे तसं नाचवतो. कधीतरी एक युवक त्याला विरोध करतो.. व जमात सोडून जातो. पण जमातीला त्याचं काही सोयीर सुतकं पडत नाही. त्यांचा दिनक्रम बदलत नाही. काही दिवसांनी वाटसरुचा एक मुलगा त्याला सोडून जातो आणि त्याला आपलं असं रक्ताचं कोणी उरतं नाही. आपल्या आयुष्याकडं वळून पाहिल्यावर बहूतेक कसली तरी जाणीव होते आणि मृत्यूची भिती वाटते. इतक्या दिवस आपण या साऱ्यांना फसवलं पण मृत्यूच्या अंतिम क्षणी यांना सारं खरं सांगून समाधानानं मरावं असं त्याला वाटतं. पण त्याचं सत्य ऐकण्याची आणि ती पचवण्याची त्या लोकांच्या मनाची बिलकुल तयारी नसते. कारण त्यांनी वर्षानुवर्ष गुलामीत घालवलीत. शेवटी मृत्यूक्षणी त्याला आपण सत्य सांगून मरतोय याचं समाधान असतं पण त्याच वेळेला त्याचा मुलगा परत येतो आणि तु काहीच केले नाही जे केले ते सम्राटानेच केले आणि तेच सत्य आहे असे सांगतो. तेंव्हा त्याला वाटते कळसुत्राचा धागा आपल्या हातात नव्हता तर तो कोण्या दुसऱ्याच्याच हातात होता. आणि आपण फक्त एक बाहूले होतो. नंतर त्याचा मुलगा आपण सम्राटाला भेटून आलो असून त्याने आपल्या जमातीबद्दल गौरोद्गार काढले असल्याचे सांगतो आणि ही अति शुर, पराक्रमी, जमात त्यावर विश्वास ठेवते. आणि कळसुत्राचा धागा एक प्रमुखाकडून दुसऱ्या प्रमुखाकडे जातो. हे लोक पुन्हा त्याच गुलामगिरीत खितपत पडतात. शेवटी आलेला व्यक्ती म्हणतो खरंच या प्रमुखाचा खरा मुलगा आता कोठे आणि कसा असेल.. आणि आपल्या मनात अनेक प्रश्नाचे वादळ उठवून कथा संपते.. कधी वाटते तो क्रांतीने पेटलेला व जमात सोडून गेलेला युवकच परत आला नसेल कशावरुन ?

जशी ही जमात तसाच आपला समाज, जशी त्यांना आपल्या जमातीचा प्रचंढ अभिमान तिच्या साठी जीव देण्याची तयारी तशीच आम्हाला आमचा धर्म, आमची जात. आमच्या धर्मातील, जातीतील व्यक्तिबद्दल आम्ही कधी कोणाच्या तोंडून गौरोद्गार ऐकलं तर आमचं रक्त सळसळतं. पण हे रक्त कोण सळसळवतयं.. मूठभर राजकारणातले लोक ज्यांच्या हातात कळसुत्रं आहे. ते आपल्या धर्माचं, जातीचं मग त्याचाच वापर करुन आपल्याला ते त्यांच्या तालावर नाचवतात. ते लोक फक्त आजपर्यंत बदलत आले. आम्ही मात्र आजही त्याच जमातीतील लोकांसारखे तेथेच आहोत. मग आमच्यातलाच कोणीतरी आमचा प्रमुख होतो आणि तोही त्याच वाटेवर चालतो.

कथेतील मला सर्वात जास्त आवडलेलं वाक्य

1. कधीतरी असहिष्णू बनण्याचं सामर्थ्य नसेल तर सहिष्णूतेला काही अर्थ नाही.

उमेश तुपे , नाशिक

अत्यंत सुंदर.

उमेशजी, तुम्ही विनयशीलतेने सुरुवात केली. तुमचे विवेचन वाचल्यावर ते या आधीच्या सर्व विवेचनांच्या एक पाऊल पुढे असल्याचं जाणवलं. मला दिसलेल्या एका जमातीच्या कथेत वाघोलीकर सरांना इतिहास दिसला. तुम्हाला तर हा आजवरचा इतिहासच उलगडला. आणि हे थोडेसे अधिक पुढे नेले तर अशाश्वत काळाचा पटच जाणवतो ज्यात भावनाशील जनता आणि त्यांना बहकावणारे नेते हे शाश्वत आहे. काल आज आणि उद्याही असेल. इथे मला इस्किलारमधल्या

गुलामांच्या व्यापाऱ्याने सांगितलेले सत्य आठवले. "माणूस गुलाम असतो तो मुख्यत्वेकरून आपल्या मनात’.

अतिशय सुंदर विवेचन केले आहे. आवडले.

- सुनीळ सामंत

ही कथा सामाजिक राजकीय आहे या विवेचनानंतर मी पुन्हा एकदा अजून एखादा पापुद्रा उलगडता येतो का हे पहायचा प्रयत्न केला. ्याची सुरुवात केली ती ’कळसूत्र’ या शीर्षका पासूनच. कोणाच्या हाती कळीची सूत्रं आहेत? सूत्रधार कोण? ही कथा राजकीय समाजिक अर्थाने वाचू गेलं तर लाल गरूड हाच सूत्रधार आणि जनता ही कळसूत्री बाहुली. पण या प्रमुखाच्या, नायकाच्या पलिकडे कोणी खरेच सम्राट आहे की नाही? नायकाच्या मते तसा कोणी नाही. पण जर असेल तर...? मुळात नायकाने जे जे केले ते त्याच्याकडून "त्या"नेच करवले असेल आणि तो नायक हाही कळसूत्री बाहुलाच असेल तर? जीएंच्या नियतीवादी अस्तित्ववादाच्या विचारसरणीनुसारच ते आहे.

याला पुष्टी देणारा संवाद नायकाच्या तोंडी अखेरीला आला आहे. तो मी आधी नीट समजून घेतला नव्हता. वाघोलीकरांनी जेव्हा त्यातल्या दोन ओळी उद्धृत केल्या तेव्हा तो नजरेत भरला. आणि पुन्हा पुन्हा वाचला. तुम्हीही वाचा-

*प्रत्येक जमातीच्या सद्गुणांच्या कल्पना निरनिराळ्या असतात पण त्या त्या जमातीपुरता त्या सद्गुणांवर रात्रंदिवस इतका भर दिला जातो की, बालपणापासूनच आपलं मत त्या साऱ्यांचाच आकार धारण करतं, त्याच विचारांचं गुलाम बनते. म्हणूनच त्याच्या अनुरोधाने आपल्या आवाक्यातलं एखादं सत्कृत्य करायला*

फारशी बुद्धी किंवा धैर्य लागत नाही. जिथे म्हातारी माणसं पिढ्यान् पिढ्या सदैव सत्य बोलावे आक्रोश करत असतात, त्या ठिकाणी खरं बोलायला कसली बुद्धी किंवा धाडस लागणार आहे ? ओहळात काडी टाकली की ती वहात जावी किंवा गवत दिसल की बैलाने तोंड घालावं, असल ते निषेध आचरण ! पण त्या वातावरणात एखादं पापकृत्य करायला मात्र आतापर्यंतचे सारे संस्कार नेटाने उलटावे लागतात, पिळदार मनाने स्वतःची एक मुद्रा आयुष्यावर उमटावी लागते; वेगवान प्रवाहाच्या उलट दिशेने जाताना जो लागतो, तो सगळा कडवेपणा या वेळी पणाला लागतो. म्हणून तर सारे धर्म पापी किंवा गुन्हेगार यास भयंकर मानतात, कारण तो यांच्या मायावी इंद्रजालातून निसटलेला असतो, त्याच्या द्रोहातच त्या त्या धर्माच्या विनाशाची बीजं लपलेली असतात. या ठिकाणीच पाहा. इथे शब्दांच्या पावित्र्याला महत्त्व आहे, तर मी इथे येण्यापासूनच त्यांची प्रतारणा केली. शिकारीतील, युद्धातील शौर्य मोलाचे आहे, ते मी क्षुद्र केले. स्वजातीयांविषयी स्नेहबंध पवित्र आहेत, तर मी लहरीप्रमाणे त्यांचे हातपाय छाटले. पर्जन्यनृत्य पवित्र आहे, तर त्याच्याकडे पाहून मी कुत्सिततेने हसत आलो. या डोळस, दीर्घ द्रोहावर मी माझं जीवन घडवलं, स्वतःमध्ये स्वतःविषयी अहंकारी आदर निर्माण केला. अरे, या ठिकाणी मी उपरा आलो. मला कूळ नाही की परंपरा नाही. पण या प्रत्येक पापकृत्याने मी स्वतःला जन्म दिला, स्वतःला घडवलं, स्वतःला अभिमान दिला. माझ्या एरवी रित्या, उपऱ्या जीवनात तो एकमेव माझा आधार होता. आणि आता त्या कवटीच्या माणसाप्रमाणेच तू माझ्यापुढे अनाहूत उभा राहिलास आणि माझं जीवन चिरडून टाकलंस. माझ्या हातून जी काही सत्कृत्यं घडली, ती जर सम्राटाच्या प्रेरणेने घडली असं तू मला सांगितलं असतंस, तर मला त्याचं काहीच वाटलं नसतं. तसली कृत्यं शिकवलेल्या जनावराप्रमाणे दुबळी, निर्बुद्ध माणसंदेखील करतात. पण माझं प्रत्येक

*पापकृत्य म्हणजे माझ्या स्वत्वाची खूण होती; मी जगत आहे आणि जगत असलेला मी हा कोणीतरी स्वतंत्र आहे, याची मी माझ्या अंगठीने केलेली निशाणी होती. हे सारं तू उधळून लावलंस. शेवटी मी ठरलो एक बुजगावणं-वाऱ्याच्या स्पर्शाने ज्याची लक्तरं कधीतरी फडफडली, असलं एक दरिद्री बुजगावणं! माझ्या शरीरात शिरलेला सर्वांत टोकदार खिळा शेवटी प्रत्यक्ष माझ्या पुत्राकडून यावा, ही तुझ्या त्या सम्राटाने माझ्या शेवटच्या क्षणी टाकलेली विजयी धुंकीच आहे! आता क्षुद्र माणसा, इथून चालता हो! तुझा चेहरा माझ्या डोळ्यापुढे नको, तुझा शब्द माझ्या कानांवर नको-*

- सुनीळ सामंत

# कसाब

# लेखक- जी ए कुलकर्णी

# कथा संग्रह - काजळमाया

कसाब कथा- जीए कुलकर्णी - विवेचक - व्ही एस वाघोलीकर

। ) जीएंनी लहान गावातील ,कष्टाने जगून - हातातोंडाशी गाठ असलेली माणसे व त्यांची कुटुंबे, अनेकदा दाखवले आहेत. परिस्थितीने आर्थिक- सामाजिक वातावरण निरोगी नसते. त्यात जी ए दाखवतात की माणसांत लोभ , मोह, वासना इत्यादी षडरिपूंचे वेढे असतात. त्यामुळे माणसांना विकलता भोगावी लागते. व नियतीचा कसा, कोणत्या प्रकारे प्रहार होईल हे अनाकलनीय असते.

2) कसाब कथेतही हे झाले आहे. मुख्य पात्रे - सोनू आंगुली - कष्टकरी आहे. येसू बायको ,कमळी ,दत्तू मुले आहेत.थोरली मुलगी पारू निघून गेली. केशवराव मुंबईहून येवून घरात घुसलेले खलनायकी पात्र आहे. त्याशिवाय जीव लावलेली शेळी व मेहबूब आहेत. कसाब मेहबूबला , मटण बाजारात शेळी विकायची आहे. - - - तर कसाईरूपी केशवरावाला कमळीला मुंबईला नेवून अनैतिकतेने विकायचे आहे. केशवराव खलनायक आहे. तो कमळीला चैनीची सवय लावतो. दत्तूला बिघडवतो. येसूबाईला आपल्या बाजूने फितवतो. मुंबईच्या नोकरीची भुरळ पाडतो.

सोनू अत्यंत गरीबीत वाढलेला ,पण नीती जपणारा आहे. पण जी ए दाखवतात - खऱ्याच्या डोकी सोटा बसतो. वाईटाला पेढे मिळतात. खऱ्याचा अंतिम जय होतो हा भाबडेपणा आहे ,हे जीए माणसे. अरभाट पुस्तकात सविस्तर सांगतात. येथे केशवराव कुटुंबातील इतरांना खूप फितवतो. कमळीला ,दत्तूला रात्री बाहेर पाठवतो व सोनूचा गळा पंजाएवढा आहे असे दाखवून रात्र - ताब्यात घेतो. तोही सोनूचा कसाब होतो. सोनूच्या भोवती लहानपणा पासून ( सापासारखी दोन जीभांनी बोलणारी )खोटी माणसे असतात. ती त्याचा घात करतात.चांगल्या माणसाच्या डोक्यात सोटा कसा बसतो याची कथेतील प्रसंगांची साखळी पाहून, वाचक शेवटी हतबुद्ध होतो.-

- विलास वाघोलीकर

कसाब- जी ए कुलकर्णी- काजळमाया-

जीएंच्या जवळपास एक तृतियांश कथा या सामान्यजनांच्या आयुष्यावर, त्यातल्या दुःखांवर, वेदनांवर बेतलेल्या आहेत. त्या दृष्टीने ते अनेक मोठ्या साहित्यकारांच्या मालिकेत जाऊन बसतात. ओ हेन्री, मोपासां, गॉर्की, चेकॉव्ह, टॉलस्टॉय, टागोर अशा लेखकांनी अतिसामान्य लोकांच्या काळजातील सहजासहजी न दिसणारे घाव नेमके साहित्यात आणले तसेच जीएंनीही आणले. जीएंच्या अनेक कथा दृष्टांतकथा आणि अस्तित्ववादी तत्त्वज्ञानाच्या असल्या तरीही समानय जनांच्या वेदना हेरणाऱ्या कथाही कमी नाहीत. त्यातली एक कसाब.

सोनू आंगुली च्या संवेदना इतक्या कोमल की तो आपली बकरी कसाबाला द्यायला तयार होत नाही. पण सगळे जगच जेव्हा कसाब होऊन त्याला घेरते तेव्हा मात्र तो कोलमडतो.

जीए तसे सुखवस्तू घरातले. पण हॉटेलातला पोऱ्या, मामुली पेंटर अशी कामे करणाऱ्या सोनू आंगुलीच्या शारीरभाषेचा त्यांचा अभ्यास, जाण आणि अभिव्यक्ती वाचताना, एखाद्या श्रीमंत अभिनेत्याने गरीबाचे काम बेमालूमपणे करावे तसे वाटते. त्याचे बसणे, त्याचे सुख, त्याचे विडी पिणे, त्याचे माशीशी बोलणे, गरम भात पोटात जाताच सुखावणे आणि घरचे धनी म्हणताच वितळून जाणे. साध्या माणसाची साधी सुखं आणि दुःखं जीए नेमकी शब्दांच्या चिमटीत पकडतात.

जीएंना कसाबाचा धंदा माहित असण्याची शक्यता कमीच. पण मेहबूबच्या तोंडी त्यांनी जे लिहिले आहे त्यातून त्यांची त्याही धंद्यातील माणसांच्या नीतीअनितीची कल्पना किती स्पष्ट होती ते येते.

या कथेतील कसाब नेमका कोण?

मेहबूब? त्याचा धंदाच कसाबाचा आअहे.

केशवराव? तो तर सगळया कुटुंबाचा गळा कापून आपले पोट भरायला आला आहे.

की स्वतः सोनू आंगुली?- त्याची बायकोच त्याला विचारते- “माणूस आहात की कसाब?” कदाचित व्यावहारिक जगात आपली संवेदनशीलता जपणारा, आपली तत्त्वे इतरांनीही पाळावीत असे मानणारा एखादा संतही कसाब असू शकतो का?

- सुनीळ सामंत

I ) आपण महत्वाचे मुद्दे मांडले आहेत. जी ए कुलकर्णी हे त्यांची कथा, गणितातील प्रमेयाप्रमाणे सादर करत. त्याची सुरुवात शिर्षकापासून होत असे. त्यांनी 'कसाब' हे शिर्षक देवून वाचकाला विचार करायला लावले आहे ,हे निश्चित. जी ए

कष्टकरी, सर्व गमावलेल्या ,विकल माणसांचे चित्रण करू शकले. हे शक्य आहे ,ती त्यांची प्रतिभा आहे.कसाब शब्दाला कथेतून अनेक पैलू दिले आहेत. 2 ) मेहबूबला सोनूची शेळी खाटीकखान्यासाठी हवी आहे. तो स्वतः कसाब असल्याचे मान्य करतो. व झटका पद्धतीने प्राण्याला कसे मारले जाते, हे सविस्तर सांगतो. 3 ) शेळी विकत घेवून खाटीकखान्याकडे नेण्याची पद्धत असते. तिला कळतही नाही की आपल्याला मारले जाणार आहे. 4 ) त्याप्रमाणे केशवराव घरातील व्यक्तींवर जाळे टाकतो. खर्च करतो. येसूला मुंबईच्या सिमेटच्या घराची लालूच दाखवतो. कारण त्याला कमळीला मुंबईला खाटीकखान्यात नेवून पैसा कमवायचा असतो. तो त्या धंदातलाच असतो. अनैतिकता करणारे ,दुसऱ्यांना व्यसने लावणारे लोक समाजात असतातच. 5 ) याला अडसर गरीब, पण नीतीला महत्व देणाऱ्या सोनूचा असतो. प्रसंग ,परिस्थिती अशी तयार होते की ,रात्री केशवराव सोनूला जिवंत ठेवणार नसतो. नियती त्याच्यावर झडप घालणार असते. पान 128 वर जी ए लिहितात - या साऱ्या पसाऱ्यात शिल्लक राहिले ते म्हणजे रडका चेहरा, निर्लज्ज होऊन जगलेले ते निर्जिव डोळे आणि सतत खांद्यावर बसलेल्या माकडासारखा वाटणारी ती जळजळीत कधी न भागणारी भूक. माझ्या दृष्टीने नियती ही निर्मम, अनाकलनीय आहे.ती केशवरावाच्या रूपाने सापळा करून सोनूसाठी कसाब ठरते..

टीप -वाक्ये - I ) जगण्यासाठी अन्न मिळविण्याची धडपड केली आणि ते मिळवता मिळवता जगण्यासारखे काहीच उरले नाही. 2 ) कथेत शेवटी सोनूला झोप लागते. त्या झोपेचे वर्णन शब्दकलेने विलक्षण केले आहे. आतापर्यन्त भेटलेली माणसे, प्राणी ,झोपेवेळी एकमेकांत मिसळतात. व मग झोपेचे रसायन तयार होते. त्यात नानूचे सुरी दाखल्याचे ,गळा थांबेन असे सांगितलेले शब्द त्याच्या अंतर्मनात घुसलेले असतात.ते बाहेर येतात. कदाचित तेच त्याचा भविष्यकाळ दाखवतात.

धन्यवाद.विलास वाघोलीकर

जी.ए. प्रतिकांचा फार प्रभावी आणि संवेदनशील ऊपयोग करून कथा वाचकांच्या अंर्तमनात ऊतरवतात...

कथा वाचून झाल्यावर बराच काळ शेळीचे खोकणे मनातुन जात नाही.

सर्वांचे विवेचन फार भावले.

कसाब एका वेगळ्या अँगल ने पुन्हा अनुभवली.

धन्यवाद. 🙏

- डॉ. वैभव कुलकर्णी

कसाब- जी ए कुलकर्णी- काजळमाया-

जीएंच्या कथा वाचताना त्यांच्या कथेची एक एक वैशिष्ट्ये उलगडत जात आहेत. उदा. त्यांच्या कथासंग्रहातील कथांचा क्रम सूचक असतो आणि त्या क्रमालाही एक विशिष्ट अर्थ असतो. तो शोधणं हे वाचकाचं काम. जी ए त्यांच्या कथेची शिर्षकं फ़ार विचारपूर्वक ठेवत आणि त्यांच्यातून सखोल अर्थ काढण्याचं काम ते वाचकावर सोपवत. कथेतील पात्रांची नावंही ते विचरापूर्वक ठेवतात आणि त्या नावातून निर्माण होणाऱ्या प्रतिकात्मकतेचाही ते वाचकाला सूचक (वाचकाच्या वकूबानुसार) इशारा देतात. तसेच जीएंच्या कथेचा शेवटही वैशिष्ट्यपुर्ण असतो. ते स्पष्ट रेखीव असा शेवट करत नाहीत. खरं तर समाप्ती करतच नाहीत. त्या कथेचा उत्तरार्ध ते वाचकाच्या मनात पेरतात आणि वाचकाच्या सृजनशीलतेनुसार (जसे वेगवेगळ्या मातीत आणि पाण्यात तेच बी वेगवेगळं रूप घेतं तसं) त्या उत्तरार्धाला वाचकानुसार वेगळा आकार किंवा (वाचक अगदीच कोरडा असेल तर) ती कथा तिथेच संपवण्याचं स्वातंत्र्य ते वाचकाला देऊन टाकतात.

आता कसाब या कथेचा शेवट कसा आहे पहा. येसूबाई आणि केशवराव सोनू आंगुलीच्या खुनाचा प्लान बनवत आहेत. आणि अचानक सोनू बाहेर येतो. पुढे…

*सोनू बाहेर आला त्यावेळी त्याचे अंग जास्तच* ***काकडले****. तो शेळीजवळ बसला तेव्हा ती पुन्हा भेदरून* ***काकुळतीने ओरडत पळण्याची धडपड*** *करू लागली; परंतु तिच्या कोणत्याच पायात नेट उरला नव्हता. तिच्या पाठीवर* ***कापूस-हात*** *फिरवत सोनूने तिला समजावले व हातातील गोणपाट तिच्या पाठीवर पसरले. शेळीने पाय हलवण्याचे* ***बंद केले व ती मान ताणून निपचित*** *पडून राहिली, परंतु तिचा श्वास मात्र* ***कांबळ्याचे खरखरीत तुकडे*** *बाहेर पडत असल्याप्रमाणे येत होता आणि दर श्वासाला तिची पाठ* ***पिंजऱ्याच्या तारेप्रमाणे ताठत*** *होती. तिच्यावर हात फिरवत सोनू थोडा वेळ तेथे बसला, पण आता त्याला उमज पडला होता. त्याने* ***निरोप घेत*** *असल्याप्रमाणे तिला पाठीवर थोपटले व तो* ***दडपलेल्या मनाने*** *आत आला. त्याने दार लावले,* ***प्रकाशाचा पट्टा पुन्हा आकसला*** *व सोनू आत येऊन नुसत्या चटईवर पडला. त्याने दिवा घालवताच* ***प्रकाशाची रेषा एकदम तोडून टाकल्याप्रमाणे*** *नाहीशी झाली व आता* ***वाऱ्याचे धारदार पाते*** *तेथून आत येत राहिले. सोनने गुडघे अगदी अंगाजवळ दुमडून घेतले व थोड्याच वेळात तो तोंड किंचित् उघडे टाकून* ***घरघरीत*** *घोरू लागला.*

*येसूबाई आत आली व आपल्या अंथरुणाकडे गेली. केशवराव उठला व कानोसा घेत दारापाशी थांबला. नंतर त्याने उंचावलेले हात कोपराशी दुमडत आळस झाडल्यासारखे केले व मग लगेच हात पसरून त्याने* ***उरलेली सारी रात्रच आपल्या ताब्यात घेतली.***

सुनीळ सामंत

कसाब

मी प्रथम सर्वांचे खुप खुप आभार मानतो. आपल्या सर्वांमूळे मी शब्दप्रभू जी.एं च्या एका-एका कथेचा नव्याने अस्वाद घेऊ शकतोय. खुप वेळ एकच घास चावत बसल्यानंतर येणारी जी गोडी आहे ती मला जी.एं. ची एकच कथा परत परत वाचल्याने मिळते. सायंकाळ पासून रात्रीपर्यंतच्या इतक्या छोटया अवकाशात जी.ए. प्रचंड पसारा असलेल्या कसाब सारख्या कथेचा पट उलगडतात. ही कथा वाचल्यानंतर मनात आलेले विचार शब्दबद्द करण्याचा एक छोटासा प्रयत्न.

नोटांवर तेलाचा डाग नसल्यानं समाधानी होणारा, लाल डोक्याची अन हिरव्या अंगाची माशी पाहून त्यात गमंत शोधणारा, गरमागरम उसळ पाहून मनाला झालेला मोह आवरुन फक्त चहा सांगून काटकसर करणारा, मरायला लागलेल्या शेळीचे हलाकीच्या परिस्थितीत चार रुपये मिळत असतानां केवळ कसाब तिला कसा मारेल या कल्पनेनं ते नाकारणारा, गप्प राहण्याबद्दल मिळालेला एक रुपया नाकारुन कष्टाच्या रुपयाची वाट पाहणारा असा हा सामान्य माणूस सोनू आंगली. अत्यंत बिकट परिस्थितीतही आपली तत्व, स्वाभिमान आणि कुटूंबाची इज्जत सांभाळण्याचा एकाकी प्रयत्न करतोय. परिस्थितीशी लढतोय. पण नियती त्याच्या बाजूने नाही. ती सगळं विरुध्द घडवतेयं. बायको, मुली, मुलगा, इतकेच नव्हे तर पूर्वी आई, बहिण आणि बाप या सगळयानीच तिला शरण येऊन तिच्याशी समझोता केलायं किंवा आपआपलां सोपा मार्ग निवडलाय. किंबहूना इज्जतीपेक्षा, तत्वांपेक्षा त्यांना पोटाची भूक जास्त महत्वाची असेल. या साऱ्या संघर्षानंतर आपल्याच लोकांकडून झालेल्या पराभवानंतर सोनूला वाटतं. " जगण्यासाठी अन्न

मिळविण्यासाठी धडपड केली आणि ते मिळवता मिळवता जगण्यासाठी काहीच उरले नाही. " शेवटी सामान्य माणसांतील चांगल्या गुणांचा, त्याच्या चांगुलपणाचा, त्याच्या प्रामाणिकतेचा सोनूच्या रुपाने बळी गेलाय. आणि बळी दिलाय तो आपल्याचं रक्ताच्या माणसांनी ज्यांच्या हातात नियतीने परिस्थितीचं हत्यार देवून त्यांना कसाबाच्या पिंजऱ्यात उभं केलं होतं.

पण मग एक प्रश्न मनात उभं राहतो. इतक्या हालाकीच्या परिस्थितीतही सोनू आपल्या तत्वानां चिकटून का ? काय मिळालं त्याला यातून ? कदाचित त्याला राजाभाऊने गुरासारखं पंधरा मिनटं झोडपून काढल्यानंतर जेवढं दु:ख, त्रास झाला नसेल त्यापेक्षा किती तरी आनंद, समाधान हे गप्प राहण्यास नकार देतानां झालं असेल. कदाचित लहानपणा पासून आईच्या चारित्र्यामूळे चार चौघात होणाऱ्या अपमानातून मिळणाऱ्या वेदनेपेक्षा तत्वाने वागल्यानंतर मिळणाऱ्या वेदनेंचा दाह त्याच्यासाठी कमी असेल.

- उमेश तुपे, नाशिक

उत्तम विवेचन.

तुम्ही उपस्थित केलेला प्रश्न- त्याला मिळते तरी काय?- हा खरंच फ़ार मोठा प्रश्न आहे. एकीकडे परिस्थितीला, प्रवाहाला श्रण जाऊन सुखात आयुष्य घालवायचा पर्याय नाकारून तत्त्वे, इज्जत आणि भुतदया सांभाळून त्याला मिळते तरी काय?

विचार करण्यासारखा प्रश्न जीएं नी उभा केला आहे. आणि तुम्हाला तो दिसला आणि तुम्ही तो आम्हाला दाखवला. धन्यवाद.

-सुनीळ सामंत

आपण नियतीचा योग्य मुद्दा उपस्थित केला आहे. नियती फक्त आकाशात नसते. आपल्या भोवताली कोणत्याही ,अनाकलनीय रूपात नियती येते व घाला घालते. कसाब मध्ये परिस्थिती, भूकेची समस्या तयार करते. व परिस्थितीतच अनैतिकता ,खोटेपणा भरलेले आढळतात. नियती सत्य असत्य ,जाणत नाही. तिचा सोटा कोणावरही पडतो. विदूषक कथेत हे प्रखरतेने दाखवले आहे. कसाब मध्येही तसेच दाखवले आहे, हे आपले निरिक्षण योग्य आहे. आपल्या प्रतिसादाबद्दल धन्यवाद द्यावेत तितके कमी. गुड डे.

- विलास वाघोलीकर

तरीही जीए हतबल नियतीवादी, दैववादी भूमिका घेत नाहीत, असंच वाटतं. परिस्थितीला शरण जाणाऱ्या सोनूने त्यातही जे आत्मिक समाधान मिळवलंय, ते त्याच्या आयुष्याचं श्रेयस ठरतं.

- आशा भागवत

मला नाही असे वाटत.

सोनू ची पर्सन्यालीटी बघता त्याला असले समाधान वगैरे असते किंवा नकळत तो ते मिळवतो असे वाटत नाही.

ऊलट `आहे हे असे ,आहे ही निर्लज्ज भुमिकाच तो दांभिकपणे पार पाडतोय की काय असाही संशय येत रहातो.......

किंवा त्याला कसलाच बदल नको आहे —resistance to any change or change in comfort zone !

मोह पायाखाली चिरडुन कठोरपणे पुढे गेलो ,असले शूर पण आनंदहीन समाधान नाही.....आणि कलंदरा प्रमणे आल्या क्षणाच्या ओठास ओठ लावण्याचे धैर्य नाही ( कथा गिधाडे ) या वर्णनात सोनू फिट बसतो.

असे माझे फिलींग आहे कारण अशी माणसे मी बघीतली आहेत.

जाणकारांनी अजुन मार्गदर्शन करावे......

धन्यवाद. 🙏

- वैभव कुलकर्णी

सर्वांचे विवेचन ऊत्तम 🙏

जीएंच्या कथा कोरडे पणाने वाचूच शकत नाही.

कसाब ही रूपकात्मक कथा जीएं आपल्या कडून जगवून घेतात !

शेळी ही परीस्थीतीचे प्रतिक आहे,सोनु ती बदलू शकत नाही.किंवा ती बदलणे त्यालाच झेपत नाही,झेपणारे नसते ही त्याची developemental psychology आहे.तो impulsive नाही.आहे तसे रखडतच जगण्याचे त्याचे ठरूनच गेलेले आहे,

पण बायको,मुलगी ,मुलगा यांना काहीही करून परिस्थीती बदलायची आहे.त्यासाठी नैतिकता,आब्रु ,वगैरे त्यांच्या साठी थोतांड आहेत.

फुटक्या नशिबाला लाथ घालून मना प्रमाणे जगायला ते कोणतीही किंमत द्यायला एका पायावर तयार आहेत.

सोनुचा तेव्हडा आवाका नाही.

असे अनेक सोनु आणि कुटुंबीय आपल्याला अनेकदा भेटलेले असतात.....आणि त्यामुळे कसाब ही कथा अनेक आठवणींनी ,प्रत्येक वेळा वेगळ्या पात्रां बरोबर आपण जगतो आणि अस्वस्थ होतो.

- वैभव कुलकर्णी

वैभवजी, मला तुमचे विवेचन वाचून हा ग्रुप बनवल्याचे सार्थक झाल्यासारखे वाटले.

मी जेव्हा या कथेचे सूतोवाच केले तेव्हा मला या कथेची खोली जाणवलीच नव्हती. त्यावर विलासजींनी एक पार्यरी आत नेऊन दाखवले, त्यानंतर मला पुढे अजून खोली जाणवत गेली ती मी मांडली. त्यावर विलासजींनी अजून सखोल विवेचन केले, त्यावर उमेशजी तुपेंनी ज्या सखोल मुद्द्यांचे विवेचन केले ते वाचून मला अजून सुचत गेले. आणि त्यावर तुम्ही या कथेचे वैश्विक स्वरूप ( व्यक्तीगत कथेपासून सुरू झालेले.) उलगडले. मला आता माझ्या ओळखीचे पैसे न खाणारे पोलीस आणि त्यांच्या घरातला कायम चालणारा संघर्ष दिसायला लागला. कॉपी न केल्यामुळे मागे पडणारी मुले, खाजगी शिक्षण न घेता, वशिला न लावता स्वतःच्या बळावर आयुष्य (जसे घडेल तसे) घडवणारे अनेकजण, कायम सतरंज्या उचलणारे, राजकीय ओळखींचा कसलाही वापर न करता जीव तोडून राजकारण करणारे कार्यकर्ते. सर्वांचीच ही कथा आहे. जागतिक. गल्लीबोळातली. गरीब श्रीमंत जात पात सगळं ओलांडून ही कथा वैश्विक झाली.

चर्चेत भाग घेणाऱ्या सर्वांचे मनापासून आभार आणि इतरांना चर्चेत भाग घेण्याचे मनःपुर्वक आवाहन.

- सुनीळ सामंत

नमस्कार,

मी या ग्रुपमध्ये नवी आहे. दोन दिवसांपासून आपणा सर्वांचं मनोगत, जी एं च्या कथांचं विश्लेषण वाचतेय. खूप स्तुत्य उपक्रम आहे. मला यात सहभागी केल्याबद्दल आपणा सर्वांचे धन्यवाद!

सोनू म्हणा किंवा त्याच्या घरातले सदस्य किंवा जीए.च्या कुठल्याही पात्राला जीएंनी नैतिकतेच्या चौकटीत बसवायचा प्रयत्न कधी केला नाही, हे जीएंचं मला भावलेलं वेगळेपण. सोनू सारखाच प्रत्येक माणूस त्याच्या त्याच्या आयुष्याच्या कादंबरीचा नायक किंवा नायिकाच आहे. ते जे जगले, ते तसे का जगले हे आधी समजून घेतलं तर सोनूला आणि प्रत्येक माणसाला स्वीकारायला आपल्याला जड जात नाही. त्यादृष्टीनंही जीए आपल्याला पात्राच्या लहानपणापासूनच्या जडणघडणीकडे बोट धरून नेतात.

थोडक्यात, जीएं आपल्याला आपल्या अवती भोवतीची माणसं वाचायला शिकवतात, त्यांना पटकन कुठली यशापयशाची, चांगल्या वाईटाची नैतिक लेबलं न लावता, ती जगलेली आयुष्यं समजून घ्यायला आणि पर्यायाने त्या व्यक्तींना आहे तसं स्वीकारायला शिकवतात.

मला वाटतं, जीएंच्या साहित्याचं हे एक मोठं योगदान आहे.

- डॉ. आशा भागवत

अगदी खरे 🙏

जीएंनी जिवंत केलेली पात्रे ही वाचकांची बनतात.एखादे पात्र फार फार जवळचे वाटते आणि आपण स्वतःला त्या ठिकाणी योजुन कथा जगत जतो.

नैतिकता ,अनैतिकता याना माणसांच्या क्षूद्र आयुष्यात फार मोठे स्थान असते असे जीएं मानत नसावेत.

माणूस नावाचा बेटा या कथेत जीएं त्यांची भुमिका सहज स्पष्ट करतात —— एखाद्या ग्रीक देवतेने माणसांच्या चिल्लर आयुष्यात येऊन थोडावेळ गंमत बघावी तसे........

अनेक कथां मधे आयुष्याचा फोलपणा इतका तिव्र आहे तरी जीए कधीच निराशावादी नाहीत.

.....आणि तू असाच वर जा....आणि तुला पिवळी धमक फुले येवोत.....(कथा स्वामी )

एका कथेचे आपसुकच इतर कथां मधे काहीतरी संदर्भ सापडतात......

-डॉ. वैभव कुलकर्णी

सर्वांचे ‘कसाब’ कथेवरील अभिप्राय खूप आवडले. चर्चाही मस्त......धन्यवाद. 🙏

जीएं च्या अनेक गाजलेल्या कथा आहेत. त्या गाजलेल्या कथांवर अनेकांनी लिहिलेले वाचनात आले होते. पण ‘कसाब’ वर फार कमी वाचनात आले. त्याची

पूर्तता ग्रुपवर झाली. सर्वांचे मनापासून आभार व ‘कसाब’ कथा निवडल्याबद्दल अभिनंदन. 👍 👌 🙏

'कसाब' कथा जी समजली ती शब्दबद्ध करण्याचा हा या पामराचा अल्पसा प्रयत्न.. 🙏 👇

कथेचा नायक सोनू आंगली. कष्ट करून पोट भरणे हे त्याचे जीवन. बालपण तर कठीण अवस्थेत गेलंय. सोनूच्या बालपणी अर्धांगाने पाय गेलेल्या सोनूच्या बापाला खानावळीच्या नानू कदमचा आधार. आठवडाभर नानू आला नाही तर बापाच्या आदेशाने सोनू खानावळीत जाऊन नानूची चौकशी करी. तेव्हा लोक फिदीफिदी हसताना पाहून सोनू रडवेला होई. कारण नानूचे व आईचे संबंध.

बाप वारला, आई नानू बरोबर पळून गेली. घरातील उपाशी पोटी झोपलेल्या वेडसर भाऊ व हातभर बहिणीस सोडून सोनूसुद्धा एका रात्री घर सोडतो. त्या रात्री कोणीही काहीही खाल्लेले नाही.

पण घर सोडताना **आपण काहीतरी चुकीचे करतोय याची सोनूला जाणीव आहे**. आपलं स्थिर-स्थावर झालं की त्यांना आणावं हा त्याच्या मनीचा विचार आहे. भाऊ-बहिणीस टाकून जाताना त्याच्या **पोटात खळगा पडतो**. कित्येक वर्षे घरी न परतलेला सोनूची **आतडी भाऊ-बहिणीची आठवण झाली की गोळा** होतात.

याचा अर्थ सोनू **मनाने जन्मत:च माणूसकी असलेला व जबाबदारीची जाणीव असलेला संवेदनशील वृत्तीचा आहे.**

आपल स्थिर-स्थावर झाल की त्यांना आणावं हा त्याचा मनीचा विचार. तो प्रत्यक्षात येत नाही. कित्येक वर्षांनी परत गावी आल्यावर पानपट्टी चालवणारी

बहीण, तिचे लाल ओठ, दंडात रुतलेली चोळी व पानपट्टीसमोर खिदळणारे दोन ड्रायव्हरवरून सोनूला बहिणीचे आयुष्य समजते. भावाला पहातच "इकडे का फिरकलास?" अस विचारण्याआधी ती सोनूला **पाहून पिंक टाकते. थुंकते.**

**तेव्हा जीएना खरोखर दाद द्यायला हवी. त्या एका थुंकण्यातून, शब्दातून भावाविषयीचा बहिणीच्या मनातील राग ते व्यक्त करतात.**

सोनू तेथे जास्त थांबत नाही. पण परत जाताना रात्री थंडीत चिरगुट पांघरून झोपलेली बहीण आठवत आहे व त्या आठवणीने तो व्याकूळ झालेला आहे.

असा हा सोनू. असे त्याचे बालपण. पण त्याच मन बालपणापासून चांगलं असल्याच व तो एक संवेदनशील माणूस असल्याचे जीए दाखवतात. तो एकटा जगतो. सोबतीला भूक आहे.

ती शमवण्यासाठीच्या प्रवासात राजाभाऊ, नानू भट्टीवाला, मेहबूब, केशवराव हे सगळे बाहेरच्या जगात भेटतात. कथेत प्रत्यक्ष न दिसणारा मारवाडीही वाचकास भेटून जातो. यांचेकडे गरीब, असहाय्य सोनूचे भूक सोडली तर फारसे काही मागणे वा नाही आहे. पण या सगळयांना मात्र भुकेला असलेला सोनू फक्त त्यांच्या स्वार्थासाठी हवा आहे. या कथेतील ही मंडळी सोनूच्या बाहयविश्वातील कसाब आहेत.

येसुबाई, कमळी, दत्तू, हे तर घरचेच. त्यांच्या भुकेपासूनच्या गरजा खूप कष्ट करूनही सोनू नीट भागवत नाही. त्यांचे पण सोनूपाशी प्रापंचिक स्वार्थ आहेत. ते पुरे न झाल्याने त्यांच्या मनात सोनू विषयी प्रचंड राग आहे. येसुबाईचा राग तर जीवावर उठलेला आहे. हे घरातले कसाब आहेत.

कसाब हा शेळी- कोंबडी- बकरी या असहाय्य गरीब प्राण्यांना मारत असतो कारण तो त्याचा व्यवसाय आहे. ते त्याचे उदरनिर्वाह चे साधन आहे. म्हणुनच कथेचे नाव 'कसाब' असावे असे वाटते.

सोनू मनाने चांगला आहे. गरीब आहे. भुकेला आहे. कष्टकरी आहे. पैशाचे महत्व त्याला आहे. मिसळ-पाव खायची इच्छा चहावर तो भागवतोय. ज्या शेळीने आपल्यास दूध दिले तिला मारायला त्याचे संवेदनशील मन तयार नाही. कारण तो एक अंत:करणाने चांगला मानव आहे, माणूस आहे.

आणि या कसाबांच्या दुनियेत त्याला जीएनीं सोबत दिलेली आहे ती शेळीची. तिची अवस्था ही कथेच्या नायकासारखीच आहे**. शेळीचे पात्र या कथेत समाविष्ट करणाऱ्या जीएंच्या प्रतिभेस मनापासून सलाम..!**

अशा तऱ्हेने पापभीरू, संवेदनशील माणसांचा या स्वार्थी जगात कसा केविलवाणा अंत होतो किंवा केला जातो याचे ही कथा म्हणजे एक उदाहरण आहे. असे मला वाटते.

मग माणसाने सतशील,सज्जन, सदाचारी, पापभीरू असावे की नसावे ?

किंवा

समाजातील चांगल्या वृत्तीच्या माणसांनी सोनू सारख्या लोकांच्या मदतीला जाऊन याच समाजातील कसाबी लोकांशी लढा द्यावा का ?

किंवा

त्यांचे मनपरिवर्तन करावे का? असे प्रश्न मात्र जीए वाचकावर सोडून देतात.

जीए आपण ग्रेट आहात. 🙏

जीएं सारख्या सिद्धहस्त लेखकाच्या कथेवर प्रथमच असे माझ्याकडून लिहिले गेले आहे. याच खरं कारण हा ग्रुप. या ग्रुपमधील जीएंच्या कथेवरील रसिक वाचकांच्या/सभासदांच्या प्रतिक्रिया वाचून लिहिण्याची स्फूर्ती मिळाली.

कॉलेजमध्ये असताना जीएंच्या कथांनी झपाटून टाकले होते. त्यावेळच्या वयाच्या आकलनशक्ति प्रमाणे त्या समजल्या होत्या. ग्रुप मध्ये सामील झाल्याने

जवळजवळ ३०-३५ वर्षांनंतर ‘कसाब’ कथा पुन्हा वाचली गेली. आणि उजळणी झाली.

असं कधी जीएंच्या कथेवर आपण लिहू असे या ग्रुपमध्ये सामील होईपर्यंत वाटले नव्हते. ग्रुपमधील अभ्यासू प्रतिक्रिया वाचून प्रेरणा मिळाली. जे वाटले ते लिहीत गेलो.

पण मला काही मेहबूबमध्ये तशी नैतिकता दिसत नाही , मित्रा!

मेहबूब हा कथेमध्ये व्यवसायाने कसाब आहे. त्याच्यावर त्याचा उदरनिर्वाह आहे.

त्याची सोनूकडे शेळीची मागणी ही त्याच्या नियत कार्यास धरून आहे. तो सोनूला फसवत नाही. दोन महिन्यापासून शेळीची किंमत तो तीनवरून चार रुपयापर्यंत वाढवत गेला आहे. त्याला सोनूला मदतही करायची आहे.. जनावराचे प्राण घेण्याचे त्याचे तोंडी असलेले वर्णनही त्याच्या व्यवसायास धरून आहे. इथपर्यंत त्याचे वागणे नैतिकतेचे आहे.

पण त्याची कथेत दिसणारी ही व्यावसायिक नैतिकता जीए लगेच एका प्रसंगाने काढून घेतात.

सोनूने निश्चयाने शेळी देण्यास नकार दिल्यावर मेहबूब उठतो. बाहेर एकमेकीला बांधलेल्या हाडकुल्या गाईंना चकचक करत पुढे हकलतो व हातातील काठी सवयीने त्या गरीब, अशक्त, असहाय्य गाईना हाणतो. त्याची ही कृती व्यवसायाला धरून आहे म्हणून मान्य केली तरी त्या मुक्या प्राण्याचा तो जीव घेणार आहे. तो घेण्याआधी विनाकारण त्या गाईंस काठीने मारणे मेहबूबची असंवेदनशीलताच दाखवते. नैतिकता नाही.

यातून जीए कथेतील प्रत्येक पात्राचा विचार किती खोलवर करतात व त्याची मानसिकता क्षणात कशी दाखवतात,... हे सारे अचंबित करून जाते.

मेहबूबची गाईंना मारण्याची कृती सोनूला विचारात पाडते. त्या कृतीवरील त्याचे चिंतन हे........

...जीए कथा कशी गुंफत नेतात याची प्रचिती आणून देत.

हेच जीएंच कसब आहे, अस वाटते. 🙏

- राजेश उनवणे

मस्त निरीक्षण 👍 👍 👍 👍

अचुक interpretation.

- वैभव कुलकर्णी

कथेचा सारांश ,कथानक आपण लक्षपूर्वक सांगीतले आहे. त्याबद्दल आभार मानतो.माणसाने पापभीरू रहावे का ,असा आपण प्रश्न केला आहे. जीएंनी चांगल्याची बाजू घेतली आहे. पण दुर्जनावर पांघरूण घातले नाही. हे त्यांचे इतरांपासून वैशिष्ट्य आहे. उलट चांगल्या माणसांनी, नियतीचा सोटा कधी बसेल हे सांगता येत नाही ,हे लक्षात ठेवावे- असे सांगून सावध केले आहे.

लबाड बांधती इमले माडया।

गुणवंतांच्या हाती झोपड्या।।

असे गदिमांनी लिहिले होते. या कथेत नियतीचा पैलू आहे. व अनाकलनीय नियती केशवरावाच्या रूपाने येवून सोनूसाठी कसाब होते.

- विलास वाघोलीकर

सर धन्यवाद.

आपण फार छान समजावले आहे. तरीही...

चांगल्या माणसांना नियतीचा सोटा का बसतो? गरीब,अडाणी सोनूने असं काय वाईट कृत्य केले होते की नियती केशवरावाच्या रूपाने त्याच्यासाठी कसाब होते? मग...

सारा दोष नियतीला देऊन माणसाने हात झटकून टाकावेत का?

अशाप्रकारचे अनेक वास्तवातले प्रश्न जीए गोष्टीतून निर्माण करतात. वाचकांना अंतर्मुख करतात.

सुख-दु:ख तर प्रत्येकाच्या वाटयास आहे. काही तर आयुष्यभर सुखापेक्षा दु:खच जास्त भोगतात. तरीही जीएन्च्या कथेत, ते ज्या पात्राची कथा सांगतात ते पात्र जगण्याची उमेद हरत नाहीत.

ते दु:खाने हळहळत, अघटित प्रसंगाने क्रुद्ध होत, लोभ-मोहाच्या तावडीत सापडत, केशवरावांसारख्या दानवांच्या हातून प्रसंगी ते नष्टही होत. तरीही ते जीवन सोडून पळून जात नाही. आपला चांगुलपणा सोडत नाही. त्याची ही जगण्याची सुप्त अशी आंतरिक प्रेरणा जीए अनेक कथेतून दाखवतात. ही प्रेरणा व ती शब्दबद्ध करण्याची जीएंची हातोटी त्या सामान्य वा अतिसामान्य माणसाच जीवन वलयांकित करून टाकते.

आणि ते वाचून आपण जीएन्च्या प्रेमात पडतो.

- राजेश उनवणे

कसाब कथेतील खाटीक हाच फक्त त्याचे नियत कार्य करत आहे. आणि पूर्ण कथेत तोच एकटा नैतिकतेने वागत आहे. प्रामाणिक पाने बकरी चा सौदा झाला तर ठीक , पण तो फसवून बकरी मिळवायचा प्रयत्न ही करीत नाही. मनापासून त्याला सोनूला होईल तेवढी मदत आपला व्यवसाय सांभाळत करायची आहे असेच दिसते. पण इतर सगळे पात्र ग्रे शेड मध्ये आहेत आणि एकमेकांचा गळा कापायच्या मागे आहेत.

- विश्वेश्वर नांदेडकर

आपल्या सात्विक सज्जन पतीला तुम्ही माणुस आहात की कसाब?असा प्रश्न जि.ए.आपल्याला पत्नीच्या तोंडुन ऐकवतात. लबाड ढोंगी जगात आनंद सुद्धा मलिन होतो.

- - दिलिप बडे

अगदी बरोबर.....! 👍

याच ठिकाणी जीए ही कथा एका उंचीवर नेतात.

हे वाक्य हाच या कथेचा परमोच्च बिंदू आहे, असे वाटते.

अंत:करणाने निर्मळ असलेल्या गरीब, कष्टाळू सोनूच्या आयुष्यात आलेले अन्यायी वृत्तीचे हे लोक(कसाब) , आता सोनू सारख्या सज्जन माणसालाच ‘कसाब’ ठरवतात. हाच जीएच्या या कथेचा केंद्रबिंदू आहे, असे मला पण वाटते.

आपण म्हणता तसे....

या मानवी जगातील लबाड, ढोंगी लोकांचे भीषण वास्तव जीए ज्या पद्धतीने गोष्टींतून सांगतात तिचे वर्णन-कौतुक करण्यासाठी शब्द नाहीत.

जीए आपणास मनोभावे दंडवत...! 🙏

- राजेश उनवणे

नोटांवर तेलाचे डाग नव्हते ह्यात समाधान आणि आनंद

- अवचितपणे गोष्टीत येणारी पात्र आणि त्यांच्या द्वारे पंचेंद्रियांचा समावेश - चांगलं कथातत्व ...

कसाब वाचली. माणसाची लाचारी आणि त्यातून उत्पन्न होणारी प्रवृत्ती ह्या गोष्टीतून प्रत्ययास येते. शेळी ही एक प्रतिमारूप वापरली आहे - ती सुद्धा माणसाप्रमाणचं लाचार आहे पण प्रलोभनांना बळी पडणं देखील तिच्या हातात नाही! माशीचे रूपक फ्रांझ काफकाच्या "मेटोमॉर्फोसिस" ची आठवण करून देते. माणूस स्वतःबरोबर काही "जेनेटिक" गुण-दोष घेऊनच जन्म घालवतो हे ही ह्या गोष्टीत सांगायचे आहे असे वाटले. येसूबाईचे वाट्टेल ते करून आपले आयुष्य सुधारायची महत्वाकांक्षा, दुसऱ्या पिढीचे आयत्या सुखाचा फायदे घेणे, नाइलाजाने का होईना, पोटा-पाण्यासाठी "वाईट" मार्ग अवलंबिणे असे बरेच मुद्दे ह्या कथेत दाखवून दिले आहे. केशवरावांसारखा एक "जिन" आपल्या आयुष्याला कलाटणी देईल ही वेडी/भाबडी आशा पुन्हा एकदा माणसाच्या सकारात्मक प्रवृत्तीचे प्रतीक आहे असं म्हणूयात! मग त्याच्यापासूनचे धोके माणूस दुर्लक्षित करतो की माहित

असून नजरेआड करतो? प्रत्येक “यशस्वी” कथेप्रमाणे ह्या कथेचा शेवट देखील अनेक शक्यतांचे दरवाजे उघडे करून होतो.

- वर्षा हळबे

मला कथेचे सर्वात शेवटचे वाक्य ,अत्यंत अपेक्षीत असले तरी , कथा संपताना ,दिवस संपताना ,सोनू चे आयुष्य संपताना , अशा रोखठोक पध्दतीत आले आहे की कथा संपल्यावर खुपवेळ शांत बसून रहायला होते.

- वैभव कुलकर्णी

# कांचनमृग
# लेखक- जी ए कुलकर्णी
# कथा संग्रह - सांजशकुन

'कांचनमृग '-' सांजशकुन पुस्तकातील ही कथा मिथककथा, व वास्तवातील व्याध जमातीच्या पार्श्वभूमीवरील कथा आहे. ही कथा जी ए प्रतिभेचे विलक्षण संयुग आहे. सुनीळ जींच्या सूचनेने -ही कथा चर्चेसाठी घेत आहोत. वाचकांनी एकाग्रतेने वाचावी अशी ही कथा, आहे. वाचकांनी त्यावर जरूर प्रतिसाद द्यावा. तसेच आधीच्या कथेबद्दल विशेष मुद्दा असेल तर मांडावा ही विनंती.छंद म्हणून, व्ही एस वाघोलीकर चित्रे काढत असतात. या कथेवरील एक चित्र खाली देत आहे. कालांतराने या कथेवरील इतर चित्रे देता येतील. धन्यवाद.

व्ही एस वाघोलीकर



जीए कुलकर्णी यांची कथा---'कांचनमृग', पुस्तक-सांजशकुन

विवेचन--व्ही एस वाघोलीकर

। )आपल्याला, वाचकांना, कांचनमृग रामायणात भेटतो.

येथे जीएंनी, 'कांचनमृग' या कथेत , नक्षत्राच्या मिथककथेला नवीन आयाम, अर्थ दिला आहे.

2 )कथेची पार्श्वभूमी, खूप प्राचीन आहे.त्यावेळी नागरी वस्ती होती.( म्हणून कथेत रत्ने, सोन्याचा संदर्भ आहे.) पण त्या नागरी वस्तीच्या खूप दूर, जंगले होती. त्यांमध्ये , तिरकामठ्याने शिकार करणारा शिकारी जमातीचा मानवसमुह होता. जीएंनी , त्या शिकारी मानवाच्या पार्श्वभूमीवर या कथेची सुरुवात केली आहे."झोपड्यांमध्ये राहणारे पुरुष, सकाळी तिरकामठे घेऊन बाहेर पडत. व संध्याकाळी मृगया करून, मृत हरिणे आणत."अशी या कथेची पार्श्वभूमी आहे.

भाग एक--कथेचा सारांश--वाचकांनी मूळ कथा वाचली असेल , किंवा वाचावी, यासाठी येथे कथेचा सारांश दिला आहे.

कथानायक असलेला एक व्याध , धाडसी, तरबेज तिरंदाज होता. एकदा धाडस करून, तो एकटाच आणखी आत अतिदुर्गम वनात गेला. तेथे कानठळ्या बसणाऱ्या आवाजाचा धबधबा होता. कथानायक हरणाच्या शोधात होता. त्याला

धबधब्याच्या जवळ, कांचनमृग दिसला. त्या कांचनमृगाची सोन्याची कांती लखलख करत होती व त्याच्या अंगावर झगझगीत रत्ने होती. व्याधाने त्याची बाणाने शिकार केली. जमातीच्या लोकांना दाखवण्यासाठी शिकार वेलीने बांधून आणली. "मी कांचनमृग आणला", असे सांगितले. सगळयांनी वेलीने गुंडाळलेल्या शिकारीकडे पाहिले. तर तेथे मृत, साधारण हरीण होते.

अर्थात सर्वांनी व्याधाची हेटाळणी केली.व्याध, त्या सामुहिक अपमानाने, निराश, दु:खी होवून खचून गेला.

त्या निराशेने पिंपळाच्या झाडाखाली एकटा बसून,"व्याधाची शिकार करणाऱ्या व्याधाची निर्विकारपणे वाट पहात राहिला." इतर त्याला वेडा समजत.त्याला जमातीतील स्त्रिया उरलेले अन्न निर्विकारपणे देत.असेच बरेच महिने गेले. त्याची वस्त्रे जीर्ण झाली.

जीएंनी, सूचकतेने त्या अंधाररात्री त्याचा मृत्यू दाखवला आहे.

नंतरच्या क्षणी 'त्याने' स्वतःकडे पाहिले, तर 'तो',तरल उत्साही झाला होता. नव्या उमेदीने 'तो' धबधब्याजवळ गेला. तेथे कांचनमृग होता. आता यावेळी मृगया न करता, 'त्याने' कांचनमृगाला पकडले , व जमातीच्या वस्तीत आणले.

पण सगळे इतर व्याध, पिंपळाच्या झाडाखाली जमा झाले होते. तेथे जीर्ण वस्त्रातील 'त्याचे 'मृत शरीर, 'त्याने' पाहिले. कांचनमृगाने 'त्याला' परत जंगलात नेले. तेथे त्यांच्यामध्ये संवाद झाला. त्यानंतर "आणि व्याध व कांचनमृग यांच्यात नभांतरी शोभण्यासारखा आक्रुतीबंध निर्माण होवून, तो चमकू लागला."

**भाग दोन--**विवेचन--ए)नक्षत्रे व मिथक कथा---आता माहीत असलेल्या विज्ञानाच्या पलिकडच्या पंचमहाभूतांच्या घटनांचे, मिथक कथांमधून स्पष्टीकरण दिले जात होते.(आताही विज्ञान कथा असतातच.)जगभर माणूस, आकाशातील

नक्षत्रे, तेजोगोल पहात आला आहे. रात्री पाहिल्यावर, चंद्र, त्याच्या कला,त्याचे स्थान, ताऱ्यांचे स्थान, उत्तर दिशा, इतर दिशा, यांचे ज्ञान, माणसाला नक्षत्रांमुळे घेता आले. त्यामुळे जगभर नक्षत्रांच्या मिथक कथा आहेत.

बी)रात्री आकाशात, मृगशीर्ष, किंवा ग्रीकांमध्ये ओळखला जाणारा ओरायन, हा तारकासमूह स्पष्ट दिसतो. हिंदू संस्कृतीत मृगशीर्ष नक्षत्राची अशी मिथक कथा आहे--प्रजापतीने मृगाचे रुप घेतले. व तो उत्तरेकडे पळू लागला.म्हणून मृगाचे तोंड उत्तरेकडे आहे. मग रुद्राने व्याधाचे रुप घेतले, व त्याने तीन ताऱ्यांचा बाण त्या मृगाला मारला. जीएंनी मृगशीर्षाची कथा पुढे नेवून, मिथक कथेला नवा आयाम दिला आहे. त्या आयामाचे विवेचन खाली दिले आहे.

सी) मृत्यू--या कथेत, व्याधाला अपमानाने आत्यंतिक निराशा येते. त्या धक्क्याने तो, निर्विकार, मूढ, स्तब्ध होवून पिंपळाखाली अनेक महिने बसतो. मृगया सोडतो. असे आत्यंतिक निराशेचे परिणाम दाखवले आहेत.

त्याला इतर वेडा समजू लागले. तो मृगया करत नव्हता. रात्री स्त्रिया उरलेले अन्न त्याला देत, व तो जमेल तसे खात असे. त्याचे कान बधीर झाले. दृष्टी मंद झाली. पाऊलही उचलता येईना. वस्त्रे व शरीर जीर्ण झाले. एका मध्यरात्री गूढ गंभीरता होती. जीएंनी तेव्हा त्याचा मृत्यू सूचित केला आहे... पण नंतरच्या क्षणी , 'तो'हलका, उत्साही झाला व 'त्याला' पुन्हा, 'कांचनमृग' दिसला. पण 'त्याच्याकडे' कोणी लक्ष दिले नाही...

आत्यंतिक निराशा व अपमानाने आलेली दिग् मुढ अवस्था, त्यामुळे आलेला मृत्यू जीएंनी प्रत्ययकारी शब्दांत दाखवला आहे.

**भाग तीन**--कांचनमृग व व्याध, यांच्यात झालेला संवाद.--व्याधाच्या मृत्यूनंतर ,व्याध व कांचनमृग यांच्यात संवाद झाला. तो कथेचा गाभा आहे.कारण तो जीएंनी सांगितलेला तत्वार्थ आहे.

ए)समाजात वावरताना, माणसाचे विचार, क्रुती, हे सर्व तेचतेच होतात. समाजातील एखाद्या व्यक्तीमध्ये ते ओलांडून जाण्याचा ध्यास निर्माण होतो. त्या ध्यासातून , कांचनमृग दिसण्याचा क्षण मिळतो. हा कांचनमृग दिसण्याचा, 'युरेका'क्षण कोठेही असतो, असे जीएंनी दाखवले आहे.---

बी)तो क्षण निसर्गातही असतो, असे दाखवले आहे."ज्वालामुखीला सूर्यस्पर्श करावा वाटतो. इंद्रधनुष्याला क्रुष्णपक्षातील तारे पहावेसे वाटतात. पाऊलभर पाण्याच्या तुकड्याला नदी होण्याची इच्छा असते."

सी)सजीवांतही हा ध्यास असतो. जीएंनी म्हटले आहे.."फूलपाखराला उष्णतेची धग कळत असते. पण एका धुंद क्षणी, नेहमीच्या फुलापेक्षा अग्नीपुष्पाची , त्याच्यात आस तयार होते... मृगाला अंधारातही पाण्याचे अस्तित्व कळते...समोर मृगजळ आहे हेसुद्धा त्याला कळत असते.. पण त्याला, क्षितिजावरचे ते सतत हलणारे मृगजळ प्यावेसे वाटते."

डी)हा ध्यास माणसात निर्माण होतो.."एखाद्या माणसाला, अजिंक्य पर्वतशिखरावर जाण्याची आस असते. व कधी त्या प्रयत्नात तो आपले प्राणही गमावतो...दुसऱ्या एखाद्या माणसाला अथांग सागराच्या तळाशी जाण्याची ईर्ष्या असते..."

इ) सीतेला कांचनमृगाचा मोह होतो. याचा वेगळा पैलू, जीएंनी या कथेत सांगितला आहे."कांचनमृग असतो, हा स्वप्नाचा ध्यास असतो, व ( सीतेला) ते सुवर्णवस्त्र परिधान करावेसे वाटते. त्यातून संकटे कोसळली, तरी ती हर्षवेदना होती." असे जीएंनी म्हटले आहे. रामायणातील कथेवर हे ' जी ए भाष्य - आहे

एफ) कांचनमृग प्राप्य नाही. पण त्याच्या ध्यासाची ईर्ष्या, मात्र अमर आहे. "तुमच्या क्षणभंगुर, दवबिंदूसारख्या जीवनास अर्थ येत असेल, तर तो या दिव्य शापामुळे." असे जीएंनी म्हटले आहे.

जी) कांचनमृगाला स्वतःचे प्रतिबिंब पहाता येत नाही, असे जीए म्हणतात. कलावंताला मिळालेली दिव्य प्रतिभा, तो कलामाध्यमाच्या चौकटीत आणत असतो. पण त्या प्रतिभेची उंची व व्याप्ती हे सर्व त्या मर्यादित चौकटीत मावत नाहीत. म्हणून कांचनमृगाला स्वतःचे प्रतिबिंब पाहता येत नाही, असे कथेत म्हटले आहे...कलावंताला स्वतःची प्रतिभा सर्वार्थाने पाहता येत नाही. इतरांना मात्र कलाकृतीत, कलावंताच्या प्रतिभेचा अंश, दिसतो. संगीत कलावंत, मोझार्टला लहानपणी त्याला मिळालेल्या लहान व्हायोलीनमध्ये संगीत आणणे अपुरे वाटत होते. तेव्हा त्याला त्याच्या उंचीएवढे व्हायोलिन द्यावे लागले, व ते घेवून लहान मोझार्टने मोठ्या स्टेजवर,मोठ्या जनसमुहासमोर संगीत सादर केले, याची उदाहरण म्हणून आठवण होते.

एच)माणसांतील कलावंत, लेखक, शास्त्रज्ञ, यांनाही हा ध्यास असतो. तो त्यांना, वेगवेगळ्या कलामाध्यमांत,तसेच भाषेत बध्द करावासा वाटतो.

आय) शब्दकलेच्या प्रतिभेबद्दल, जीएंनी अनेक कथांमध्ये सांगितले आहे.'प्रवासी'कथेत (रमलखुणा पुस्तक) जटाधारी गीतकार म्हणतो.."गीतांबद्दल माझे दुर्दैव निराळेच होते. मला अति दिसत होते." 'गीतपाखरु'कथेत (सांजशकुन पुस्तक) ,"दिव्य पक्षी गाऊ लागतो. त्या संगीतामध्ये, एकाकी अश्रू, वंचनेचे ओरखडे, द्वेषाचे डाग होते."...आणखी, 'प्रसाद'कथेत, (सांजशकुन पुस्तक), सोबती म्हणतो," तुझ्या ओळींचे अर्थ न समजेना का.तुला पाय नसतील. पण तुझे शब्द फार दूरच्या प्रवासाला निघाले असतील." शब्दकलेच्या प्रतिभेबद्दल हा पैलू, या कथेतही दाखवता आहे.

या कथेतील, खालील परिच्छेद, भरतवाक्यासारखा आहे---"तेथील दृश्य पाहून व्याध दचकला व स्वतःला विसरला.पिंपळाजवळ स्वतः त्याचेच जीर्ण वस्त्रातील प्रेत होते व इतर व्याध व्यथित चेहऱ्यांनी भोवती उभे होते. व्याधाच्या

तोंडून विस्मयाचा उद्गार निघाला व त्याने बावरलेल्या डोळयांनी कांचनमृगाकडे पाहिले. कांचनमृगाने शांतपणे मान हलवली व म्हटले,"चल, आता परत आपण माझ्या प्रदेशात जाऊ.आता येथे तुझा संबंध राहिलेला नाही" परतल्यावर कांचनमृग हिरवळीवर बसला व त्याने व्याधाला म्हटले ,"मी तुझ्याबरोबर यायला तयार झाल़ो, त्याच वेळी तुझ्या ध्यानात यायला हवे होते. कारण कोणत्याही मानवाला सजीव असता, कांचनमृगास हस्तगत करण्याचे भाग्य लाभत नाही. तू आपली एक फार मोठी वंचना करून घेतलीस. एका तेजस्वी क्षणी मी तुला दिसलो. परंतु तेवढ्याने तुझे समाधान झाले नाही. ती प्रतिमा दृष्टीपटलावर घेऊन तू रममाण झाला नाहीस.माझी मृगया करून माझ्यावर सत्ता गाजविण्याचा तुला मोह झाला, आपला विजय दाखवून इतरांकडून धन्यता स्वीकारण्याची ईर्ष्या तुझ्या मनात निर्माण झाली आणि त्यामुळे तुझ्या हाती एका सामान्य निर्जीव हरणाचे शव पडले. व्याधा, साऱ्या जीवनात तुला एक उत्कट ज्ञान कधीच प्राप्त झाले नाही. प्रत्यक्ष हत्येपेक्षा मृगयेतील पाठलागात जास्त आनंद असतो. स्वप्नांना जाळयात पकडण्याचा प्रयत्न झाला की हाती निर्जीव शव मात्र पडत असते. अप्राप्य वस्तूच्या मागे धावण्यात जी धुंद , जीवघेणी हर्षवेदना असते, तिचे स्थान क्षुद्र स्वामित्व घेऊ शकत नाही.... कांचनमृग एकदा पाहिलेला जीव नेहमी वेड्यांत जमा होतो.सामान्य मृग पाठीवर आणत जगण्यात त्याला समाधान नाही आणि कांचनमृग प्राप्य नाही, या ताणलेल्या प्रत्यंचेवर तुम्ही सतत जगावे हाच तुम्हाला दिव्य शाप असतो... यापुढे.. अथांग सागराच्या तळाशी जाण्याच्या ईर्ष्येने तू प्राण वेचणार आहेस, आणि पंख असलेल्या शब्दांच्या पंजरी तू जीवनाचा सामर्थ्यशाली ओघ बंदिवान करण्याच्या प्रयत्नात ओठावर गीतांची लकेर ठेवून तुझे नेत्र निस्तेज होणार आहेत...."

शेवटी कांचनमृगासारखी ही प्रतिभा अमर नक्षत्र स्वरूपात असते. जीएंनी कथेशेवटी म्हटले आहे- "आता भोवतालचे सारे अरण्य सहस्त्रावधी प्रकाशकणांनी

तेज:पुंज झाले. आणि व्याध व कांचनमृग यांच्यात नभांतरी शोभण्याजोगा आक्रुतीबंध निर्माण होऊन, तो चमकू लागला."

म्हणून, मानवी प्रतिभेवर प्रकाशझोत टाकणारी, ही कथा,मराठीतील लखलखणारा हिरा वाटते.धन्यवाद

- विलास वाघोलीकर

कांचनमृग- जीए- सांजशकुन

जीएंच्या इतर कथा आणि कांचनमृग या कथेत एक वेगळे पण मला जाणवते. ही कथा जीएंच्या स्वतःच्या जीवनावर असावी. त्यांच्या अंतःप्रेरणा, आकांक्षांचा वेध आणि शोध घेण्यासाठी त्यांनी ती लिहिली असावी. जीए कधीही कोणताही सन्मान स्विकारण्यासाठी कुठे गेले नाहीत, कुठे मिरवले नाहीत. आपल्या मनातला हा गुण लोकांना माणूसघाणेपणा वाटेल याची त्यांना कल्पना होती (त्यांच्या पत्रव्यवहारात त्याचा उल्लेखही आहे). पण त्यांना ते सर्व नकोसे होते. कारण इतर लोकांना त्यातले जे झगमग दिसते ते जीएंना मलीन वाटावे असे कांचनक्षण त्यांच्या वाट्याला आले असावेत. या सर्वांचे भावबंध शब्दबद्ध करण्यासाठीच त्यांनी ही कथा लिहिली असावी. जीए अनेक कथा लिहून त्या अप्रकाशित ठेवून देत असे ऐकले, वाचले आहे. त्यांनी स्वतःचा क्वालिटी कंट्रोल कडक केला होता. इतका की त्यांना जणू कांचनमृगच हवा होता. त्याखाली काही नकोच. उपाशी राहीन. कांचनमृगाचा व्याधाशी झालेला संवाद हा त्यांच्या प्रतिभेने त्यांच्याशी केलेला संवादच आहे.

*"तू फुलपाखरू असताना एका धगधगीत ज्योतीत दग्ध झाला होतास. मृग असताना मृगजळामागे धावत तू संतप्त वाळूमध्ये निष्प्राण झाला होतास. त्या त्या*

*वेळी मी तुला अत्यंत प्रेमाने, आदराने येथे घेऊन आलो होतो. निरनिराळ्या स्वरूपांत कांचनमृग पाहिलेल्या प्रत्येकास या प्रदेशात कधी ना कधी यावे लागतेच. फुलपाखरू ज्योतीत दग्ध होते, आणि मृग मृगजलामागे धावतो, या घटना तुझ्या ज्ञानी सहमानवांना वेडेपणाच्या वाटतात. व्याधा, हा तुमचा पूर्ण भ्रम आहे. आपण काय करतो, याची त्यांना पूर्ण जाणीव असते, आणि त्याच एका धुंद क्षणी ते खरे जगत असतात. वेड्या, फुलांच्या भोवतीदेखील काही काल फिरून वेध घेतल्याखेरीज एकतरी फुलपाखरू फुलावर उतरलेले तू कधी पाहिले आहेस? आणि त्या फुलपाखराला ज्वालेच्या सान्निध्यात येताना त्या धगीची जाणीव होत नसेल, असे का तुला वाटते ? आणि मृगाला जलाभास होतो म्हणून फशी पडून का तो त्या मागे धावत जातो? हीदेखील एक भ्रांत आहे. म्हणजे डोळ्यांना दिसले तरच मृगाला जलाचे अस्तित्व समजले, अंधःकारात जर तो तृषार्त झाला तर तो रात्रभर तहानेने तडफडत राहतो अशी का तुमची समजूत आहे ? अरे, आपल्या वासाच्या सामर्थ्याने ज्याला अंधारातदेखील जलाचा परिसर समजत असतो, त्याला समोर वाहणारे मृगजल म्हणजे सामान्य जल नव्हे एवढे ज्ञान नसते अशी का तुमची कल्पना आहे? प्रत्येक जीवनातच असा एक क्षण येतो, की सामान्याचे निर्जीव बंधन, त्याचे मलीन आवरण यांचा त्याग करावा अशी ऊर्मी मनात निर्माण होते. साध्या फुलावरच हिंडण्याचा फुलपाखराला वीट येतो, त्याला अग्निपुष्पांची आस निर्माण होते. क्षितिजावरील ते ओले नसणारे, पण सतत वाहणारे पाणी एका टोकाने प्राशन करत जाऊन क्षितिजरेषा पार शुष्क करून टाकावी, अशी अप्राप्य इच्छा मृगाच्या हृदयात जागी होते, आणि त्याच मनस्वी धुंदीत त्याचे शव मरुभूमीत निर्जीव होऊन वालुकामय होऊन जाते. आणि तू! तुला कांचनमृगच हवा होता, व त्यासाठी तू आपले आयुष्य अगदी विसकटून टाकून हाडे झिजवलीस.*

*फुलपाखरू, मृग, तू-सारीच इतरांच्या दृष्टीने वेडी ठरलात ! पण कांचनमृग एकदा पाहिलेला जीव नेहमीच वेड्यांत जमा होतो. सामान्य मृग पाठीवरून आणत जगण्यात त्याला समाधान नाही, आणि कांचनमृग प्राप्य नाही, या ताणलेल्या प्रत्यंचेवर तुम्ही सतत जगावं हाच तुम्हाला अत्यंत दिव्य शाप असतो.*

यानंतर जीएंनी पुनर्जन्मावर केलेले सुंदर भाष्यही मुळातून वाचण्यासारखे आहे. ते वाचून मला वाटते की जीए खरेच पृथ्वीतलावर कुठेतरी आले असतील. आणि आजही आपल्या त्या अप्राप्याच्या प्राप्तीसाठी आपली प्रतिभा पणाला लावत असतील.

**आम्हा पामरांना मात्र जीए वाचल्यानंतर दुसरे काही वाचूच वाटत नाही असा दिव्य शाप मिळाला आहे.**

- सुनीळ सामंत

किती सुंदर लिहलय....

खरेच जीए वाचल्यावर इतर नवकथा ,साहित्य (सर्वांची क्षमा मागुन ) फार फार ऊथळ अर्थहिन टाईमपास वाले वाटते.

तो शाप ही आहे आणि जग,जिवन अनभवुन घेण्याची दृष्टी मिळते ते जीएनी दिलेले वरदान आहे..

- वैभव कुलकर्णी

अतिशय सखोल आणि मार्मिक विवेचन.. 👏 👏 🙏 🙏 आणि तुम्ही म्हंटले त्याप्रमाणे जी.ए. वाचल्यानंतर दुसरे काही वाचू तर वाटत नाहीच पण जे लोक लिहीतात त्यांना लिहूही वाटत नाही.

- उमेश तुपे

मी स्वतःला नेहमी भाग्यवान समजते कि जी.एं.च्या नंतर जन्मले! त्यामुळे त्यांचे लिखाण वाचता आले.समजा त्यांच्या आधीच जन्म होऊन मृत्यू झाला असता तर किती मोठ्या ठेव्याला मुकले असते.

खरच जी.ए.ना विश्रांतीची गरज होती.वाचून आपली इतकी दमछाक होते मग हे सगळे मनात दडलेले ,मंथन करून लिहितांना त्यांचे काय झाले असेल?

जी.ए.पुन्हा येतील नव्हे यावेतच ! पण एक भीती वाटते.ऑर्फियस प्रमाणे एकदा मृत्यूलोकात प्रवेश करून आल्यावर ते पूर्वीसारखे असतील? का अजून काही वेगळयाच अनुभूतीचे, दृष्टीकोनाचे लिखाण आपल्या ला वाचायला मिळेल!

- शुभांगी इनामदार


स्वतः च्या आंतरिक उर्मी प्रमाणे कामं करणं, विशेषतः ते कामं जर कलेशी निगडित असेल तर आपण perfection साठी झटत असतो. प्रतिभा आणि त्यातून निर्माण होणारी आंतरिक उर्मी आणि क्रिया किंवा पद्धत यांची सांगड घातली जाऊन एखादी चांगली कलाकृती जन्माला येणं हे कठीणच. कारण या गोष्टी अनपेक्षितपणे घडतात.त्या क्षणांची आस असणं आणि त्यात झोकून देणं महत्वाचे आहे.

-विशाखा आपटे

https://youtu.be/upsRYNjMeNc


कांचनमृग युट्युबवर

- दिलिप बडे



विलास वाघोलीकर





# काकणे - लेखक- जी ए कुलकर्णी - संग्रह - पारवा

- विवेचन- यतीन गुळवणी

पारवा काकणे

जीएंची ही एक कथा आहे. एका ( सत्य?) घटनेवर आधारीत पाच पात्रे घेऊन एका सायंकाळी ते दुसऱ्या दिवशी पहाटेपर्यंतच्या काळातील कथनातून सर्व उलगडा होतो. सामान्य कुटुंबातील घडलेल्या घटनेने मनाला कायमचा चटका लागतो.

खेडेगावातील (जेमतेम व्यापार चालणारे) दुकानदार नरसूभट दुपारी घेऊन एका सायंकाळी ते दुसऱ्या दिवशी पहाटेपर्यंतच्या काळातील कथनातून सर्व उलगडा होतो. सामान्य सालस कुटुंबातील घडलेल्या घटनेने मनाला कायमचा चटका लागतो.

खेडेगावातील (जेमतेम व्यापार चालणारे) दुकानदार नरसूभट दुपारी पेंगत बसला असताना काकणांच्या आवाजाने जागा होतो व कथेला सुरुवात होते. तो आवाज कावेरी ( नरसूभटाची सून) च्या काकणांचा नसून दुसऱ्याच बाईच्या काकणांचा असतो. मग त्याला आठवते आज रविवारची अर्ध्या दिवसाची सुट्टी असल्याने रोजच्याप्रमाणे कावेरी पीतळी पेल्यातून चहा घेऊन येणार नाही. लागतो.

नरसूभट पापभिरू असतो. त्याची पत्नी काकू (सूनेवर) कावेरीवर मुलीप्रमाणे माया करतात. नरसूभटाचा मुलगा बाळकू चकातनाक्यावर कारकून असतो. तो ही सालस असतो. कावेरी त्याची दुसरी पत्नी आहे.

पहिल्या पत्नी (कृष्णा) चा मूलगा जन्मताःच गेल्यावर ती सुन्न झाल्याप्रमाणे नियमित कामे करत असे. एके पहाटे नेहमीप्रमाणे फुले घेऊन आल्यावर भ्रमिष्ट

झाल्याप्रमाणे ती केस मोकळे सोडून बडबडू व नाचू, लागली. तशीच धावत जाऊन तीने गाडीअड्ड्यातील विहीरीत उडी टाकून जीव दिलेला असतो. यावेळेस गाडीअड्ड्यातील दोन खोल्यांत रहाणारा मेस्त्री आर्थिक व पोलीस चौकशीत मदत करून 'मूल गेल्याच्या दुःखाने तडकून आत्महत्या' प्रकरण मिटवतो. हा मेस्त्री एक इरसाल मनुष्य असतो. त्याला लोक टरकून असतात. कथेतील हा खलनायक आहे.

या पार्श्वभूमीवर कथा पुढे सरकते.

खेडेगावातील (जेमतेम व्यापार चालणारे) दुकानदार नरसूभट दुपारी पेंगत बसला असताना काकणांच्या आवाजाने जागा होतो व कथेला सुरुवात होते. तो आवाज कावेरी ( नरसूभटाची सून) च्या काकणांचा नसून दुसऱ्याच बाईच्या काकणांचा असतो. मग त्याला आठवते आज रविवारची अर्ध्या दिवसाची सुट्टी असल्याने रोजच्याप्रमाणे कावेरी पीतळी पेल्यातून चहा घेऊन येणार नाही.

दुकान बंद करुन तो घरी जाण्यास निघतो. गाडीअड्ड्यातील गवत घेऊन जाण्यास (विचारल्यावर,) मेस्त्री नरसूभटास परवानगी देतो. पण 'नरसूभट अंधारात पडेल' व 'बाळकूला रात्रपाळी' असल्याने 'वहिनीला' पाठवण्यास सांगतो.

त्यावरून आठवल्याने नरसूभट विचारतो की आज कावेरीला शेण मिळाले नाही. कधी न घडणारे आज कसे झाले? त्यावर मेस्त्री म्हणतो की त्या (कावेरी) उशीरा आल्या असतील. पण आज रात्री किंवा उद्या सकाळी लवकर पाठवण्यास सांगतो.

नरसूभट घरी जातो तेंव्हा त्याला काकूंकडून कळते की कावेरीला बरे नाही व तीला त्यांनी पडून रहाण्यास सांगीतले आहे. शिवाय घागर भरताना आज तिची काकणे वाढवल्यामुळे काकूंनी बाळकूला नवी काकणे व नरसूभटाचा उपवासा असल्याने केळी आणण्यास पाठवले आहे.

आता मुख्य भाग!

पहाटे फुले व शेण आणण्यास कावेरी गाडीअड्ड्यात गेली असता मुस्त्रीने तीचे डावे मनगट करकचून दाबल्यामुळे तीची काकणे वाढवून मनगटात रूततात. मग मेस्त्रीने दुसऱ्या हाताने तिच्या तोंडावर दाबून तीला आवाज न करण्यास बजावले. भितीने कावेरीचे अंग सैल पडताच मेस्त्रीने तीला उचलून घेऊन त्याच्या खोलीत नेले व तीची अब्रू लुटून तीला खोलीबाहेर घालवून दिले.

कशीबशी ती घरी आली व कपाटामागे पडून राहिली. काकू तीच्या काळजीने चार घरी जाऊन गवती चहा मिळवण्याचा निष्फळ प्रयत्न करतात. लक्षुंबाईकडून मिळालेली गोळी त्या आणतात व कावेरीला घेण्यास बजावतात.

बाळकू नरसूभटासाठी केळी व कावेरीला आवडणारी

निळी काकणे घेऊन येतो. त्याच्या इच्छेखातर कावेरी नवी काकणे चढवते व एकदाच दसऱ्याला घडी मोडलेली (पण कपाटात व्यवस्थित ठेवलेली) साडी बाहेर काढून नेसते. एव्हाना बाळकूचे जेवण आटोपून तो कपडे करून रात्रपाळीच्या नोकरीला जाण्यास तयार असतो. कावेरी तो नेहमी विसरणारी अमृतांजनाची बाटली देते. तो जात असता बराच वेळ त्याला पाठमोरा पहात रहाते. लज्जाहरणाने शरमेची आग, भयंकर अगतिकता,

सात्त्विक माणसांत वावरताना जाणवणारी अपराधीत्वाची टोचणी इत्यादी मनातील काहूरानंतर कावेरीचा निर्णय होतो. नरसूभट व काकू झोपी जातात. सर्वत्र सामसूम झाल्यावर कावेरी जोडवी काढून फणेरीपेटीत ठेवते. आवाज न करता कावेरी दरवाजा उघडून ती बाहेर येते व दरवाजा आपल्यामागे बंद करते. गाडीअड्ड्यातील विहीरीपाशी येताच कावेरीला आपल्यामागे काकणांचा आवाज येतो. आपल्याला मागून कोणाचातरी स्पर्श झालायाचा भास होतो. मागे वळून पाहिल्यावर तेथे कोणीच नसते.

आणि एकदम तिच्या अंगावरून शहाऱ्याची लाट चमकून गेली व तिने एकदम छातीवर हात ठेवला. तिला त्या स्त्रीचा चेहरा दिसत नव्हता. ती बोललीही नव्हती. पण त्या तिच्या स्पर्शाला, काकणांच्या आवाजाला जिभा होत्या. त्यांच्यामुळे कावेरीला त्या दुसरीचे स्त्री-मन चांगले समजले. इतक्या दिवसांच्या अदृश्य पावलांचा, काकणांच्या आवाजाचा एक मूक स्पर्श बनून तिच्याशी बोलून गेला.

( येथे मला कृष्णेच्या आत्महत्येचा संदर्भ जाणवतो.)

पण त्या आघाताने ती एकदम बधिर झाली. त्या नव्या जाणिवैचे ओझे तिला अगदी सहन करवेना. एका वेड्या झटक्यात काकणे किणकिणत तिने कमरेला पदर आवळला व ती झपाट्याने चौथऱ्यावर चढली आणि सतत प्रकाश पिऊनही सुस्त हावऱ्या पडलेल्या गोल अंधारात तिने उडी घेतली.

नेहमीप्रमाणेच अचूक उपमा अंलकारांची पेरणी. अत्यंत काटेकोरपणाने व सूक्ष्मातिसूक्ष्म बारकाव्यांचा उल्लेख या वैशिष्ट्यांसहित मुद्देसूद बांधणी हे मला खूप भावले. बाधित व्यक्तींच्या मनाचा ठाव इतक्या तन्मयतेने मांडतात की कथा वाचून माझ्यासारख्या सामान्य संवेदनशील माणसाच्या मनावर होणारा प्रभाव जाणवून जीए हे हलाहल कसे पचवत असावेत असा मला प्रश्न पडतो. घटनेत संपूर्ण तादात्म्य पावून ती भोगल्याशिवाय असे कथानक रचता येणे कठीण आहे.

- यतीन गुळवणी

यतीनजी, अतिशय सुंदर आणि To the point विवेचन केले आहे. कथा जीएंच्या नंतरच्या कथांइतकी गुंतागुंतीची नसली तरी त्या काळच्या मानाने एक पाऊल (सूचक संदर्भांच्या दृष्टीने) पुढची आहे.

यापुर्वीच्या कसाब कथेच्या चर्चेमधे वर्षा हळबे यांनी म्हटलेले ’माणूस स्वतःबरोबर काही “जेनेटिक” गुण-दोष घेऊनच जन्म घालवतो’ हे वाक्य याही कथेला लागू पडते. नरसूभटाच्या पापपुण्याच्या कल्पनाही एका सीमेपर्यंतच असतात. तो व्यापारामधे गरीबांना फ़सवणे यात काही चूक समजत नाही.

तुम्ही म्हटल्याप्रमाणे ही कथा ’सूक्ष्मातिसूक्ष्म बारकाव्यांचा उल्लेख ’ या दृष्टीने अत्यंत वरच्या दर्जाची आहे. अगदी व्हीर किती खोल आहे ते सांगताना जी ए म्हणतात- ’एखादा ढिकळा खाली जात असे आणि आवंढा गिळल्याप्रमाणे थोड्या वेळाने चटक असा आवाज येत असे’. जी ए द ग्रेट. अशा उल्लेखांतून ते वाचकाच्या बुद्धीचा कस तपासतात आणि तो किती लक्षपूर्वक ओळन ओळ वाचतो आहे, आणि त्यामागे त्यांचा मेंदू कितपत सक्षम आहे, याची खात्री करून घेतात. जीएंची कथा म्हणजे गोष्ट रहात नाही. आणि ती शंभर वेळा वाचली तरीही काहीतरी नवीन एकशे-एकाव्या वेळी मिळतेच.

यतीनजी धन्यवाद.

- सुनीळ सामंत

यतिनजींनी कथेचे कथानक सारांशाने परिणामकारक रीतीने सांगीतले आहे. त्या बददल आभार मानतो. मला जाणवलेली काही वैशिष्टये अशी आहेत.

। ) ही संसारकथा आहे. जीएंच्या बहुतेक कथांमध्ये - लहान गावात ,हातातोंडाशी गाठ असून जगणारी माणसे ,त्यांचे कुटुंब, ही पार्श्वभूमी असते.

2 ) ही कथा गुन्हेगारी पार्श्वभूमीवरील असल्याने गुंतागुंतीची आहे. कसाब ,गिधाडे ,पारधी.. अशा कथांमध्ये जी एंनी माणसातील गुन्हेगारांचे चित्रण दाखवले

आहे. तसेच येथे गुन्हेगारी गुंतागुंतीने दाखवली आहे.यातही आर्थिक, सामाजीक विकलपणा दाखवला आहे. -

पात्रे - 1) नरसूभट- 2) काकू. 3 )मुलगा बाळकू कमी शिकलेला जकात कारकून आहे. त्याला रात्रपाळी असल्याने शाररीक तक्रारी असतात. 4 ) मिस्त्री हा पोसलेला, गुंड प्रवृत्तीचा, वासनापिसाट आहे.कथेत ,त्याने आयुष्यात तीन महिलांचा घास घेतला आहे. गंगूच्या लंगडया नव ऱ्याला विहिरीत ढकलून तो गंगूचा घास घेत आहे. बाळकूच्या कृष्णा या पहिल्या बायकोचा घास घेवून तिला विहीरीत आत्महत्या करायला भाग पाडले. नंतर पस्तीस रुपये देवून प्रकरण मिटवले. कथेत तो कावेरी या बाळकूच्या दुसऱ्या बायकोचा ,कट करून घास कसा घेतो. त्याचे मानसिक, सर्व वातावरणाचे चित्रण कथेत आहे.

- 5 ) कावेरी गरीबाघरची तरुण स्त्री संसारात येते. सर्वसाधारण महिलेच्या संसारी अपेक्षा व जबाबदाऱ्या ती पेलत असते. काळ जुना आहे. बैल गाडया त्यांचा तळ गवत लाकडे शेण्या सारवलेले मातीचे घर देवासाठी फुले लौकर गोळा करणे पहाटे ४ ॥ ला उठून आवरणे चुलीवरचा स्वैपाक लौकर झोपणे हे वातावरण आहे. इंधन व घर - सारवण्यासाठी कावेरी पहाटे जाते व गुंड मिस्त्री तिचा पाशवी घास घेतो. त्या धक्क्यातून तिचे विचार आत्महत्ये कडे वळतात व रात्री ती विहीरीत उडी मारून आत्महत्या करते ( पाणमाय कथा आठवते)

- कथेतील वाक्ये - I ) तुळस आपल्या घरी आली. पण तिला वृंदावन मिळाले नाही

- 2 ) कावरीचे , तिचे डोळे कठोर झाले. गोंधळ विझला. हलके मुक्त वाटले. आधारासाठी आंधळे पणाने बोटे पसरायची धडपड नको.

- 3 ) हजार पायांच्या अजस्त्र किडया प्रमाणे रात्र सरकत होती.

- 4 ) कुठे तरी अंग पसरायचे - कुठे तरी अन्न गिळायचे - कुठे तरी चांदण्या चमकायच्या. - कुठे तरी चोचीला चोच भिडायची - शेण गोळा व्हायचे -

पारिजातकाची फुले गळून कुठे तरी तशीच मरायची - एकाच कृष्णसर्पाचे सहस्त्रावधी खवले - येथे जी एंनी, विश्व हे कृती करणारे, अनाकलनीय ,अनिर्वचनीय आहे;व नियती कृष्णसर्पाप्रमाणे अचानक घाला घालते, असे ,कसाब कथेप्रमाणे वेगळ्या संदर्भात दाखवले आहे. नियतीच्या, कृष्णसर्पाच्या लीला पाहून वाचक हतबुद्ध होतो.धन्यवाद.

- विलास वाघोलीकर

विलासजी, नेहमीप्रमाणेच हेही विवेचन प्रभावी आणि उकल करणारे. या कथेतील अनेक सूचक वाक्ये घाईघाईने वाचणाऱ्या वाचकाच्या नजरेतून सुटण्याची शक्यता असते. मी मागे एकदा जीएंच्या कथेची तुलना उंची वाईनशी केली होती. यावरून ग्रुपमधील लोकांनी माझी भरपूर सालटी काढलेली आठवतात. पण तरीही मी जीएंच्या कथेची बरोबरी उंची वाईन आणि बडा ख्याल यांच्याबरोबर करतो. या तीनही गोष्टी घाईअघाईने कयाच्या नसतात. त्यातल्या प्रत्येक बारीकीशी, nuance शी थोडे घुटमळून, चवीचवीने, ठहराव घेत पुढे जायचे असते. आणि तरीही एखादी तान आपल्या कानांवरून नोंद न होता निसटून जाते. तेव्हा आपल्यासारख्या मुरलेल्या श्रोत्याची ’दाद’ येताच ती समजून घ्यायची असते.

काकणे या कथेबद्दल मी द्विधा मनःस्थितीत असतो. ती इतकी करुण आणि काळीजघेणी आहे की, वाचून झाल्यावर तिचा कडवटपणा मनात रेंगाळत रहातो, व पुन्हा वाचायचा धीर होत नाही.; आणि इतकी सुंदरपणे पेश केली आहे की पुन्हा पुन्हा वाचायचा मोह होतो.

-सुनीळ सामंत



- प्रमोद कुलकर्णी

स्त्री देहाच्या चटपटीत वर्णनापासून GA स्वतःला नेहमी अलिप्त ठेवतात.

' कावेरी स्वतः सरळ नाकाची होती, केस देखील अगदी प्रसन्न लेकुरवाळ्या कुटुंबासारखे.'

बस्स.

इतकेच तीचे वर्णन.

कावेरीला पाहीले की बाळकूला स्वच्छ धुतलेल्या केळीच्या पानावर वाढलेल्या नैवेद्याची आठवण येत असे.

या वाक्यातून बाळकूच्या मनातील कावेरीबद्दलच्या पवित्र भावनाच प्रगट होतात.

काकणे- उमेश तुपे

जी.ए. आपल्या इतर कथांप्रमाणेच येथे ही अगदी थोडया अवकाशात कथेचा संपूर्ण पट उलगडतात. समाजातील सर्वसामान्य माणसांच्या घरात काल, आज आणि कदाचित उद्याही घडत राहील अशी ही कथा आहे असे मला वाटते. जीएंच्या कथा वाचकांची जगण्याची उमेद हिरावून घेतात असे मला कधीच वाटत नाही. त्या इतर कथांप्रमाणे वाचून सोडून देता येत नाहीत. तर त्या वाचकाला दिसणारं आणि न दिसणारं असं जळजळीत सत्य सांगून त्या त्याला मूळापासून हादरवतात, त्याला अस्वस्थ करतात, त्याच्या मनात कितीतरी प्रश्नचिन्ह उपस्थित करतात आणि मग उत्तरे शोधण्यास त्याला सोडून देतात. त्या इतर कथांप्रमाणे मनोरंजन करत नाहीत हे जरी खरे असले किंवा त्यांचा शेवट शोकात्मक किंवा दुख:द होत असला तरी त्यातून मिळणारा आनंद हा अलौकिक आणि अद्वतीय असतो. म्हणून जीएंच्या कथा वाट दाखवणाऱ्या कथा नाहीत तर त्या स्वत: ची वेगळी वाट निर्माण करणाऱ्या कथा आहेत असे मला नेहमी वाटते. विषयांतराबद्दल क्षमस्व. कथेबद्दल पूर्ण पणे लिहणे केवळ अशक्य आहे. किंवा माझी ती कुवत नाही. ते पूर्णपणे माझ्या अवाक्या बाहेरचे आहे पण तरीही एक छोटासा प्रयत्न.

कथेतील मेस्त्री हा धिप्पाड काळा माणूस आपल्या दहशतीनं गावातील लोकांवर जरब बसवून आहे. त्याने स्वत्:च्या भावाचा खून केला आहे. तो कोणासाठी फुकट काहीही करत नाही. तो हॉटेलातली बचकभर भजी फुकट खातो आणि त्या बदल्यात सहा आण्याचं फणस हॉटेलवालया मामाला तीन आण्याला दमदाटीनं देण्यास फणसवाल्याला भाग पाडतो. तो बाहेरुन आलेल्या बैलगाडीवाल्यांना पीठ, तेल, तिखड नरसूभटाकडून दम देवून घ्यायला लावतो व त्याबदलयात नरसूभट त्याची बया न्हाव्याची गंगू हिला बुडखाते समजून आठ-बारा

आण्याची उधारी देतो. असा हा मेस्त्री नरसूभटाच्या मुलाला म्हणजे बाळकूला नोकरीला लावतो. का ?

नरसूभट हा असा माणूस आहे जो मुलांना चार पैशानां दोन पैशाचा माल देतो. कावेरीने चहा धरुन आणलेला कागद तो साफ करुन रद्दीत ठेवतो. थोडयाशा गवतासाठी तो मेस्त्री समोर लाळ टपकावतो. नवं पातळ झोपतानां काढून ठेवण्यास कावेरीला सांगतो. आणि मेस्त्री " ए भटा.." असं उद्धट आणि एकेरी म्हटल्यानंतरही निर्लज्जपणे हसत राहतो. त्याचं कौतुक करत राहतो. का ?

रात्री दोन- अडीच वाजेपर्यंत खिडकीत तांदूळ निवडीत बाळकूची वाट पाहणारी कावेरी, जिन्याची पायरी लागल्यानंतर " फार लागलं का ?" असं नरसूभटाला विचारणारी कावेरी, खिडकीत काळया तुळशीचं रोप लावणारी कावेरी, निळी रेशमीकाडी काकणे आवडत असतानां बाळकूसाठी खोटा उत्साह चेहऱ्यावर आणून आमसुली काकणे घेणरी कावेरी, जिच्याकडे पाहिल्यावर बाळकूला स्वच्छ धुतलेल्या केळीच्या पानावर वाढलेल्या नैवेद्याची आठवण होते इतकी पवित्र कावेरी. कृष्णेबद्दल असूया वाटणारी आणि तिचं सगळचं साहित्य वापरणारी कावेरी शेवटी मरतानांही तिच्याच आवडीची आमसुली काकणे घालून मरते. का आणि कोणामूळे ?

काकणं पिचायची घागरीवर आणि पाल चिंगरायची दारावर; हे जर असच असेल तर कृष्णेचा, कावेरीचा आणि अशा स्त्रीयांचा जन्म मेस्त्री सारख्या लोंकासाठीच होतो का ? मला तर ती विहीर हे मेस्त्री सारख्या लोकांच प्रतिक वाटतं. त्या विहीरीत एखादा ढिकळा जसा खाली जात आणि घास गिळल्याचा चटक आवाज येत अगदी तसचं मेस्त्रीनं अगोदर गंगूच्या नवऱ्याला, मग कृष्णेला आणि नंतर कावेरीला गिळलयं... पण तरीही मेस्त्री सुरक्षित, अपराजित, का ? कदाचित नरसूभटासारखे निर्लज लोकं आहेत म्हणून, कदाचित कृष्णा, कावेरी या स्विकारत

असलेला मार्ग चुकत असेल म्हणून कदाचित बाळकू सारखे उपकाराच्या ओझ्याखाली दबलेले तरुण असतील म्हणून कदाचित... न समजण्या पलिकडे.. किंवा समजूनही न सांगता येण्यापलिकडे काहीतरी...

- उमेश तुपे, नाशिक

बलात्कारीत स्त्रिच्या मूकवेदनेला किती प्रभाविपणे GA यांनी चित्रित केले आहे.

अत्यंत अलिप्तपणे, कुठल्याही व्यक्तीरेखेच्या मोहात न पडता, कुणाचीही बाजू न घेता GA यांनी ही कथा चितारली आहे.

जी. ए. यांची ही अलिप्तता कथेला वेगळीच धार प्राप्त करून देते.

- प्रमोद कुलकर्णी

काकणे ही कथा साधारणत: १९५८ क्या सुमारास प्रसिद्ध झाली. गुंतवळ, चंद्रावळ या १९५५ मध्ये सत्यकथेत प्रसिद्ध झालेल्या कथेपासूनच साहित्य प्रेमींना जी ए च्य कथा आकर्षित करू लागल्या होत्या. निळा सावळा आणि पारवा, हिरवे रावे या त्यांच्या सुरुवातीच्या काळातील प्रसिद्ध झालेल्या कथांचा संग्रह. यातील खेड्याचे वर्णन , व्यक्तिचित्रण त्यातील पात्रांचे स्वभाव आणि एकंदरीतच त्या काळातले समाज जीवन अक्षरशः डोळयासमोर उभे राहते. १९४५ ते १९७० या काळात जन्मलेल्या आपल्या पिढीतील लोकांना या तिन्ही कथासंग्रहातील प्रत्येक

पात्र प्रत्येक घराचे खेड्यांचे बाजाराचे वर्णन आपण प्रत्यक्ष अनुभवल्या चां प्रत्यय आलेला आहे.

काकणे कथेतील बाजाराचा दिवस बैलगाडीची वर्णने आमच्या मामाच्या गावातील बाजाराची वर्णने वाटतात इतकी हुबेहूब उतरली आहेत. सुरवातीच्या काळातील कथा मधून जी ए ची पात्रे ठराविक चाकोरीतून वागणारी आहेत. एखादा खलनायक जी ए नी रंगवला की त्याची कृत्ये मनाला सुन्न करून टाकतात इतक्या सहजतेने आणि निर्दयतेने तो खळपुरूष अन्याय करतो. आणि त्यातून सही सलामत नामानिराळा ही राहतो.

काकणे ही कथा म्हटले तर एका गरीब ब्राम्हण कुटुंबाची कथा, पण शेवटी मन सुन्न करून जाते ते कृष्णा कावेरी या अबला वर झालेले बलात्कार, आणि आत्महत्या. जी ए च खास टच नेहमी प्रमाणे हा की मेस्त्री एवढे सगळे करून सहज नामानिराळा राहतो आणि वाचक स्वतःला हतबल समजतो.

- विश्वेश्वर नांदेडकर

काकणे – जी ए कुलकर्णी- पारवा

जी एंच्या कथालेखनातील सुरुवातीच्या काळातील ही कथा. त्यांचा निळासावळा १९५९ ला प्रकाशित झाला आणि पारवा १९६० ला. त्यात ही कथा सुरुवातीलाच आहे म्हणजे बहुधा १९५५-५८ ची असावी हा अंदाज. जीएंच्या सुरुवातीच्या काळातील सर्वच कथा मानवी संबंधांतील ताण्याबाण्यांवर होत्या. त्यांत यतीनजींनी म्हटल्याप्रमाणे अत्यंत काटेकोरपणाने व सूक्ष्मातिसूक्ष्म बारकाव्यांचे उल्लेख होते. हा काळच गरीबीचा. ग्रामीण, अर्धनागरी आणि नागरी मध्यमवर्गाचीही तशी हातातोंडाशी गाठ असे. काही खानदानी श्रीमंत सोडले तर

बाकी नोकरदार वर्ग आताप्रमाणे सुबत्तेकडे झुकलेला नव्हता. त्यामुळे जीएंच्या कथांतून ती भूक सपाटून येते. तेव्हाची गुन्हेगारीही (आताच्या मानाने )प्राथमिक आणि असंगठित. त्यांचे चित्रणही जीए अत्यंत काळजीपुर्वक शब्दांत करतात. जीए कुठेच बटबटीतपणा येऊ देत नाहीत. ही सर्वच वैशिष्ट्ये काकणेमधे अगदी रेखीवपणे जाणवतात.

एक अतिशय वेदनादायी कथानक, धूसरपणे सावल्यांसारख्या सूचक घडामोडी, वास्तव, पण कुठेही जळजळीत शब्दांचा वापर नाही, आणि तरीही संवेदनशील वाचकाला टोचणी लागेल असा शेवट. खांडेकर, फडके यांनी साहित्य अवकाश व्यापले होते असा तो काळ. अशा वेळी जीएंच्या कथांनी नवीन वाचक वर्गाला काय बहारदार खाद्य दिले असेल याची कल्पना येते. पण त्याचबरोबर जीए हे काही रतीब घालणारे लेखक नव्हते. सुचेल, मनाला रुचेल आणि स्वतःच्या कठोर क्वालिटी कंट्रोलमधे बसेल असेच साहित्य त्यांनी दिले. त्यामुळे असेल, काकणे च्या दर्जाचे त्या काळीही, किंवा नंतर, कोणी लिहिले नाही.

या चर्चेत स्त्रीने आत्महत्या करण्याबाबतच्या अनेल कथांचा उल्लेख आहे. ’जीएंच्या कथेतील स्त्री ’ हा डॉक्टरेटचा विषय आहे आणि आजवर कोणीतरी घेतलाच असेल. त्यांच्या १२० पैकी तब्बल ४३ कथा या स्त्रीकेंद्री आहेत. त्यातील काही कथांमधे स्त्री अतिशय दुबळी, विकल, काहींत सबल पण भावनाशील तर काहींमधे ठाम, कठोर आणि काहींमधे तर खलनायिकाही आहे. या शिवाय सुमारे चाळिस कथांमधे जीएंनी स्त्रीला केंद्राजवळचे स्थान दिले आहे.

हा विषय इथेच थांबवतो. वैभवजींनी वर म्हटले तसे विषय वाहवत जाईल. आणि हा फ़ारच मोठा आहे. अख्खा ग्रुप वाहून जाईल इतका.

- सुनीळ सामंत

अगदी खरे.

जी एं ची कथा गोळीबंद असते.

प्रतिमांच्या नेमक्या वापरामुळे त्यांना उगाच पाल्हाळ लावत बसावे लागत नाही.

कावेरीवर झालेल्या अत्याचाराचे वर्णन त्यांनी किती सूचकपणे केले आहे.

'कावेरीने आपले भणभणारे डोके गच्च आवळून धरले. आजूबाजूने चाकूची धार असलेल्या धगधगीत जाळाच्या जिव्हा आपल्या भोवती फिरत आहेत. त्यातील मध्येच एक छातीला, ओठाला स्पर्श करते आणि ठिणगी पडल्याप्रमाणे स्फोट होतो आणि नंतर शरमेची काळसर मेलेली काजळी धरते, असे तीला सारखे वाटत होते.'

बस्स. इतकंच सूचक वर्णन.

-प्रमोद कुलकर्णी

होय.. प्रमोदजी, तुम्ही अगदी नेमके उदाहरण दिले आहे.

तरीही मला वाटते की जीए आपल्या कथांतील वाक्यवाक्याला काळागणीक आधिकाधिक धारदार टोकदार करत गेले आणि आपली लेखणी अधिकाधिक उंचावत गेले. त्यांचे हे (कमीतकमी शब्दांत सांगून वाचकाच्या समजूतदारपणावर विश्वास ठेवण्याचे) तंत्र त्यांनी विकसित करत नेले आणि पिंगळावेळपर्यंत त्यांचे ते तंत्र फ़ारच जास्त उंचीवर गेले. आपल्या मराठी वाचकांच्या दुर्दैवाने जीएंना फ़ारच अपुरे आयुष्य लाभले. ते अधिक जगते तर त्यांनी मराठी साहित्यात एखादा महाभारतासारखा मैलाचा दगड निर्मिला असता.

- सुनीळ सामंत

बाळकूची पहिली बायको कृष्णा आहे.

कावेरी ही कितीही सालस, समजूतदार असली तरी ती शेवटी हाडामांसाची स्त्री आहे.

सूक्ष्म का होईना पण सवतीमत्सर तीच्यात आहे हे जी एं नी किती सहजपणे दाखवले आहे.

बाळकू तीला सांगतो,'ती देखील तुझ्याइतकीच अबोल होती.'

हे ऐकताच कावेरीच्या मनात शेगडी उधळल्यासारखे झाले!

बाळकू कृषनेला विसरला नाही हे कावेरीचे दुःख होते.

एक वेळ जिवंत सवत परवडली. निदान तिच्याशी भांडता तरी येते!

कावेरीच्या मनातील या मनातील सवती मत्सराबद्दल अजूनही लिहिता येईल. बाळकू कावेरीसाठी आमसोली काकणे आणतो. तशी काकणे बाळकूच्या पहिल्या म्हणजे कृष्णाला आवडत आणतात.

कावेरीला आवडत असतात निळी रेशीमकाडी काकणे.

आमसोली काकणे पाहून ती हिरमूसली होते.

कृष्णाच्या पूर्वानुभवावरच बाळकू आपल्याशी संसार करतो आहे हे तीला खटकते.

कावेरी ही आपल्यासारखीच हाडामासाची आहे हे जी ए आपल्याला पटवून देतात. कृष्णाचे पातळ, तीचे जोडवे ती अगदी नाराजीने स्वीकारते. परंतु अगदी शेवटी मात्र त्या दोघी अगदी एकरूप होतात.

आपल्याला सतत काकणांचा आवाज का ऐकू येत होता ते कावेरीला शेवटच्या क्षणी समजते. कृष्णा तीला सावध करण्याचा प्रयत्न करत होती.

कावेरी विहिरीत उडी मारत असतानाही तीची काकणे किणकीणतात.

काकणांचा तो किणकीणाट आपल्याला मात्र अस्वस्थ करून सोडतो.

- प्रमोद कुलकर्णी

बाळकू कृष्णेला विसरला नाही.हे कावेरीच दुःख होते.एकवेळ जिवंत सवत परवडली.निदान तिच्याशी भांडता तरी येत.(हे शब्दप्रभूंच लेण.)प्रमोद सर आवडल.

- दिलिप बडे

काकणे ही कथा नाही.....फार मोठी कादंबरी आहे.

किती सखोल......

जीए प्रत्येक वाक्यन् वाक्य घासून ,पैलू पाडून ,नक्षीदार ,झगझगीत करून खूप काळजी पुर्वक कथा बांधत असावेत. 🙏 🙏 🙏

कांकणे म्हणजेच बांगड्या...किंवा हिरवा चुडा !

किती विलक्षण आणि प्रभावीपणे जीएनी काकणांना एका तरूण ,सवाष्ण स्त्री चे प्रतिक बनवले आहे....

- वैभव कुलकर्णी

काकणे.

जीएंच्या कथेचे शिर्षक महत्वाचे.

काकणे- स्त्री जन्माचे प्रतिक

काकणे- दुर्बलतेचे , अबलेचे प्रतिक? पुरुषांना म्हणतात- नाही ज्मत तर काकणं भरा.

काकणे- वर्तुळ- पुन्हा त्याच जागी गोल गोल गोल.

काकणे- शून्याचा आकार

काकणे- काच. एकदा तुटली की जोडणे अशक्य.

काकणे- आवाज, ऐकूनही न ऐकू येणारा. अगदी कान देऊन ऐकला तरच.

- सुनीळ सामंत

काकणे – जी ए कुलकर्णी- पारवा

जीएंच्या जिवंत शब्दकळेचे आणि उत्प्रेक्षांचे किती नमूने या कथेत सापडतात. शोधावेही लागत नाहीत.

स्वयंपाक झाल्यावर- काकूंनी दोन लाकडे चुर्रदिशी विझवली व कोपऱ्यात उभी केली. **निदान त्यांची तरी यातना संपली**

तिच्या **भाकरीच्या पापडातून पलिकडचा जाळ** दिसायचा.

बाहेर आता अंधार होता. पण तो आता **विटक्या वस्त्रासारखा रंग गेलेला** होता. त्याच्या **मिशा सापाच्या जिभांप्रमाणे मानेला दंश** करू लागल्या.

पुन्हा **घोगरे केसाळ शब्द**. गुहेमधून हलक्या पावलांनी श्वापदे बाहेर पडावीत तसे.

जवळजवळ बोटांनीच तिला जीभ उचलावी लागली. “हो” ती म्हणाली. जणू **जिभेचाच एक तुकडा** पडला.

बाळकूने एक निःश्वास सोडला व तो गप्प झाला. त्याने तिच्याकडे स्थिरपणे पाहिले. ती आपले केस किंचित ओढून बांधीत असल्याने तिचे कपाळ ताणल्यासारखे दिसे आणि त्यावर ती अद्यापही ओले कुंकूच लावीत असल्याने तेही चकाके. कानात मळक्या झालेल्या हिणकस सोन्याच्या कुड्या होत्या, त्याशिवाय अंगावर मंगलधातू नाही आणि तिला अद्याप शहरी वातावरणाचा स्पर्श नाही.

वहाणा घालून तिला अद्याप चटचट रस्त्यातून चालता येत नसे. तिच्याकडे पाहिले, की बाळकूला **स्वच्छ धुतलेल्या केळीच्या पानावर वाढलेल्या नैवेद्याची** आठवण होत असे; पण दरवेळी त्याला स्वतःचे दारिद्र्यही खुपे. तिच्या कानात **जास्वंदीसारख्या माणकांच्या कुड्या** असाव्यात, अंगावर हल्ली हलकीफुलकी, उनाड पातळे दिसतात तसले नव्हे, तर नऊवारी रेशमी पोताची इरकली लुगडी असावीत आणि **रेशीम तर असे घरंदाज** की त्यावरून सरकणारा **प्रकाश देखील लालसेने उगाचच रेंगाळावा**. पण नाही, आपल्या नशिबी ते नाही. **तुळस आपल्या घरी आली; पण तिला वृन्दावन मिळाले नाही...**

"बाळक्या, काय निर्लज्ज रे तू!" काकू म्हणाल्या. पण भोळ्या कौतुकाने. **आळवाचे पान रूंद पसरावे** त्याप्रमाणे.

कृष्णा आणि कावेरी ही नावेही सूचक आहेत.

सुनीळ सामंत

एक कथा किती अंगानी ऊलगडून दाखवली जाते ,
जीएंच्पाच शब्दात एखादे झगझगीत रत्न सर्व बाजुनी फिरवून निरखावे तसे !
अजुन कितीतरी बारकावे !पैलु दिसतील

- वैभव कुलकर्णी

विडंबना ही वाटते की बाळकू आणि नरसू दोघांनाही दोन्ही स्त्रियांसोबत काय झालं याची कल्पना सुद्धा येत नाही.एक घटना घडल्यावर त्यांना असं का घडलं अशी शंका येत नाही.स्त्रियांची दुःख ही त्यांच्या घरामधील दुय्यम स्थानाप्रमाणेच क्षुद्र असावीत.

- विशाखा आपटे

खरं आहे. त्या याची वाच्यता जाहीरपणे किंवा खासगीतही करत नाहीत.

या कथेत मेस्त्री म्हणतो.. " गप्प बसशील तर ठीक. कुणाला काही कळायचं नाही. मी पुरुष आहे. लोक फ़ार तर बोंबलतील. पण तुझं काय होईल ते बघ."

हे वास्तव आहे. आजही. सार्वत्रिक.

- सुनीळ सामंत

कावेरी च्या आत्महत्येनंतर कदाचित त्या दोघांना अंदाज येईल पण ते काही करू शकणार नाहीत.

- विशाखा आपटे

असे असेल तर नरसू भट आणि बाळकू पेक्षा मला कसाब मधील सोनू कितितरी श्रेष्ठ वाटतो.

- उमेश तुपे

मेस्त्री चं व्यक्तिमत्व, त्याचं वर्णन पाहता घरातील पुरुषांना ह्या दोघीना तेथे एकटं पाठवताना अजिबात कशी काय काळजी वाटत नाही याचं आश्चर्य वाटतं.ते ह्या घटना विशेषतः दुसरी तशीच घटना सहज टाळू शकले असते.

- विशाखा आपटे

याचं एक सार्वत्रिक कारण आहे. रावणाचं चित्र सर्वत्र खलनायक म्हणून नसतं. आणि तुम्ही ज्यांना नायक म्हणता त्यांना खलनायक (किंवा खलनायिका) म्हणणारेही असतात. perception प्रत्येकाचं वेगवेगळं असतं.

मेस्त्री हा लोकांना मदत करणारा आहे असं मानणारेही अनेक (विशेषतः नरसूभट, बाळकू) आहेतच.

- सुनीळ सामंत

जीएंची निवडक पत्रे मध्ये जीएंनी काकणे कथेचा - कावेरीचा - मनापासून उल्लेख केला होता. आता लगेच मला पानाचा संदर्भ देता येत नाही. पण ही कथा पूर्ण काल्पनिक नसावी असे* मला *वाटते. आपल्या भोवताली या ना त्या प्रकारे दुःखद घटना घडतात. त्यांचे मानसिक ओरखाडे खूप टिकतात. समाजात - कुटुंबांत अशा दुर्घटना घडतात की नंतर जर - तर ला अर्थ नसतो. धन्यवाद.

-विलास वाघोलीकर

माझ वैयक्तिक मत. क्षमा असावी. जीए च्या लेखनावर मत मांडण्यात धाडस करत नाही. जी.ए. ची कथा पात्र, विशेषतः, काकणे मधील, ही मुळीच काल्पनिक वाटत नाहीत. ह्या उलट, ग्रामीण आपल्या सभोवती अशी पात्र अनुभवल्याचा भास होतो.. असही जाणवतं, की ह्यांच्या आयुष्यात बाबतीत आपण कसा हा विचार करू शकलो नाही?

- प्रदिप कुलकर्णी

# गिधाडे

# लेखक- जी ए कुलकर्णी

# कथा संग्रह – हिरवे रावे

गिधाडे – हिरवे रावे

जीएंची हिरवे रावे कथा संग्रहातली ही पहिलीच कथा.एकदा ही कथा वाचायला घेतली की सभोवतालचा संपुर्ण विसर पडतो.तसेच दोन दिवस काहीच वावावेसे वाटत नाही.

गिधाडे चा lmpact इतका सॉलीड बसतो की आयुष्यभर ही कथा आपल्या भावविश्वाचा एक भागच बनुन जाते.

मी नेहमी म्हणतो तसे ही कथा आपण वाचत नसतो तर अंतर्मनाच्या पडद्यावर बघत असतो,ते ते प्रसंग अनुभवत असतो, इतकी सामर्थ्यशाली कथा आहे.

□ कथेचे मुख्य पात्र बापू कळुस्कर एका कारखान्यात कारकुनाचे काम करत असतो.त्याला आकडा लावायची सवय असतो.तो मनाने पक्का जुगारी आहे.

या पुर्वी तो एका म्युन्सीपाल्टीच्या आॅफिस मधे काम करत असतो.

तेथे तो आकराशे चौतिस रुपये चोरतो आणि ——— जे आयुष्य जगायचे असते ते मुंबईला जाऊन जगतो....हे वर्णन त्या काळातले असले तरी आजही समर्पक वाटते......पैसे संपल्यावर ,चोरीला गेल्यावर घरी परततो....तुरूंगात

जातो.....नंतर मेहुण्याच्या ओळखीने दुसऱ्या गावात कारखान्यात कारकुन म्हणुन लागतो......

त्याची बायको यशोदा,....हीचे आधीचे आणि या प्रसंगातुन गेल्यावरचे आयुष्यातले बदल फार नेमकेपणे मांडले आहेत..

यातील सर्वात करूण पात्र म्हणजे शैलु !

बापूची लहान मुलगी.हीला कशाचे काहीच माहित नसते......खरी शिक्षा हीलाच मिळाली की काय असे वाटत रहाते....

शेवटी सुध्दा बापूला त्याच्या सारखाच एक माणुस भेटतो आणि बापु त्याला डिवचून त्याच्या आयुष्यावर जगणार असतो.......

बापूचा impulsive nature जीएंनी फार फार प्रभावीपणे लिहले आहे....

आपण प्रत्येकजण थोडेफार impulsive असतोच.

त्या स्वभावामीळे आयुष्यात ज्या चुका घडतात ,ज्या अपमानाला सामोरे जावे लागते ,जे कटु अनुभव मन जतन करून ठेवते आणि पुन्हा पुन्हा आपल्याला आठवण करून देऊन मानसिक त्रास होत रहातो त्याचेच बापू हे प्रतिक आहे.

या कथेत खुप बारकावे आहेत.......

साडे सोळा रूपयांची आँड्रोमाडा अत्तर..,खिशातील कागदाच्या भेंडोळयाने आलेली सौंदर्य दृष्टी.....नोटे प्रमाणे साला प्रत्येक गोष्टीला वाॅटरमार्कच पाहीजे......

लहानपणी श्राध्दासाठी बाजार करायला पाठवले असताना तैलचित्रे काढण्याचे सामान घेऊन येणे आणि वचावचा रंग थापून सारवल्या सारखी चित्रे काढणे....

मनात आलेल्या ईच्छेचा दंश कितका विलक्षण होता की तसे केले नसते तर थोड्या दिवसा साठी वेड लागले असते.......

मोहज्जन चे व्यक्तिमत्व ,

.......शंकरू सोनाराला विकलेला करंडा.....(शंकरू सोनार ,कथा राक्षस मधे पण आहे )........देशमुख, अनगोळकर गुरूजी ,पुंडलीकजी ही पात्रे आपल्या अवतीभवती असतातच....

डॉ. वैभव कुलकर्णी

जी एं. ची प्रत्येक कथा वाचताना अनुभुतीच्या ज्या पातळीवर जाऊन ती भिडते, त्या पातळीवर आपण कथेशी संवाद साधू लागतो.

वैभवजी, आपला या कथेशी, पात्रांशी झालेला भावनिक संवाद आपण मोजक्या, सोप्या भाषेत मांडून आम्हालाही त्या संवादाची त्याच पातळीवर नेऊन अनुभुती देऊ केलीत, याबद्दल धन्यवाद!

आपली शैली वेगळी आहे, अजून खूप काही व्यक्त होऊ पाहणारी आहे, असे जाणवते. 🙏

- डॉ. आशा भागवत

पुंडलीकजी फलज्योतिषावर व्याख्याने देत ,नव्या वकिलाकडे दलाली करीत, आणि गावात तमाशा आला की विंगेत खुर्ची टाकून बसत !

बास.

हीच लिखाणाची ताकद.

तिन वाक्ये आणि आख्खा माणुस समोर ऊभा !

आकड्याच्या धंद्यात ,व्यवसायातील ज्ञान जीएंनी कसे हिकमतीने मिळवले असेल तेच जाणोत !

अंगठा म्हणजे एक, टांगा म्हणजे सहाचा आकडा ,किलवर --3,कोंबडी म्हणजे दोन ,

यात यल्ली म्हणजे शून्य.

यल्ली हा कर्नाटकी शब्द आहे का ?

- वैभव कुलकर्णी

जीएंची व्यक्ती आतून बाहेरून दाखवण्याची लकब बेजोड आहे. मराठीत तरी त्या तोडीचे कोणी नाही.

आपण काही तास खपून गांधीजींचे चित्र काढावे आणि त्याखाली ’गांधीजी" असे लिहावे लागावे, आणि त्याच वेळी एखाद्या निष्णात चित्रकाराने केवळ एक चष्मा आणि वर्तुळाकार डोके एवढेच चारपाच सेकंदांत काढावे ाणि भाव खाऊन जावे इतका जीए आणि इतर लेखकांत फ़रक आहे.

- सुनीळ सामंत

आपल्या प्रत्येकातच एक बापू लपून बसलेला असतो.

पुर्व आयुष्यात काहीतरी चुकलेले असते ,आपल्या स्वभावामुळे.

कधी काही आतातताई निर्णय घेऊन पस्तावलेलो असतो ,(बापूची चोरी,त्याचे मुंबईचे वागणे ,आणि कथेच्या ऊत्तरार्धातील वागणे हे रूपकात्मक आहे )

जीए आपल्यातला बापू कधी बाहेर काढतात ते कळतच नाही.किंवा वाचकाला बापूच्या भूमिकेतुनच कथा अनुभवायला लावतात !

हे जीएंचे असामान्यपण आहे !

मला स्वतःला वैयक्तीकपणे ही कथा वाचताना आठवणाऱ्या प्रसंगांपैकी एक शेयर करतो ————

मी सहा सात वर्षांचा असेन.ईस्लामपुरला !आजोळी आजोबांचा मंत्री का ॅलनीत मोठ्ठा बंगला होता.आजही आहे.आसपास खूप मोकळी जागा असुन मी ,माझा मामेभाऊ ,मावस बहीण आम्ही भरपूर खेळायचो.समोर एक वखार होती.आप्पा पाटलाची वखार ,आजही आहे.त्या वखारीचे ओंडके सगळीकडे पडलेले असायचे.

एक कुत्र्याचे पांढरे पिल्लू यायचे.आम्ही त्याला आमचा खेळगडी समजुन खायला वगैरे द्यायचो.ते सवईने येऊ लागले.पण नंतर त्याच्या बरोबर एक काळे रोगट कुत्रे सुध्दा अन्नाच्या आशेने येऊ लागले.आम्हाला ते मुळीच आवडायचे नाही.

त्याला येऊ द्यायचे नाही म्हणून मी ओंडक्यांपाशी कोणीतरी टाकलेल्या फाटक्या बुटाची लेस काढली आणि त्या काळया कुत्र्याचे चारही पाय बांधुन टाकले आणि त्याला एका मोठ्या ओंडक्या मागे टाकून दिले.

ही गोष्ट खेळण्याच्या नादात अक्षरशः विसरून गेलो.

संध्याकाळी आप्पा पाटील सांगत होते, कोणीतरी कुत्र्याचे पिल्लु बांधुन टाकले होते ,अन दुपारी कावळयांना जिवंत मेजवानी मिळाली.

आजही कुत्र्याच्या पिलाचे ओरडणे ऐकु आले तर अस्वस्थ व्हायला होते.......गिधाडे वाचून असे अनेक बापू (स्वतःतले)दिसतात आणि टोकदार वेदना अनुभवायला लावतात.

कदाचित अशीही मुक्ती मिळत असावी.

जीएंच्या कथांचे विश्लेशण काय आणि कसे करणार ?

आपणही जाणता की जीएंची कथा स्वतःच एक जागृत ,धगधगती ,झगझगीत

विश्र्व असते.

ते विश्र्व वाचकांना आतमधे सामाऊन घेते.आणि आपणासच कथेचा सुत्रधार बनवुन टाकते !

प्रत्येक माणुस जीएंची कथा वेगवेगळया पद्धतीने जगत रहातो

-वैभव कुलकर्णी

खरं आहे, डॉ वैभवजी,

जी ए - या वेगळ्या विश्वाशी माझी ओळख तुम्हीच ३० वर्षांपूर्वी करून दिली होती, त्याबद्दल मनःपूर्वक आभार!!!

पण विश्लेषण हे गरजेचे आहेच कारण

१. आधूनिकरणामुळे बऱ्याच उपमांचा संदर्भ नवीन पिढीसाठी अथवा आंतरराष्ट्रीय / प्रांतीय वाचकांसाठी अनोळखी आहे. उदा "चैत्र" मध्ये हळदीकुंकूचा समारंभ हा foreign audiences ना समजावून सांगावा लागेल आणि म्हणून भाषांतरामध्ये किंवा चित्रिकरण करताना हा समजावून देण्याचा भाग मूळ कथेत

सहज अभिप्रेत होणाऱ्या आणि त्यावर रचल्या जाणाऱ्या अर्थाविष्काराच्या सौंदर्याला थोडे फिके करतात

२. काही प्रसंगांच्या वैश्विक उलगडा किंवा कालातीत दृष्टीकोन हा विश्लेषणाद्वारेच समोर येतो. उदार्णार्थ "मुखवटा" ही कथा अगदी मागच्या वर्षी घडलेल्या कोव्हिड महामारी मध्येही घडू शकते असा थरारक आभास मला झाला होता! त्यामुळे प्रत्येक कथेत आपण नवे अर्थ किंवा वर्तमानाचे पडसाद शोधू शकतो.

३. कालबाह्य अथवा अनाकलनीय आणि त्याउलट कालातीत अशा संदर्भांचा खुलासा तर हवाच पण त्याहूनही अधिक मोलाचा म्हणजे प्रत्येकाचा वैयक्तिक दृष्टीकोन आणि प्रत्येकानी वाचताना अनुभवलेले भावनिक चढउतार - जे तुम्ही अगदी सुंदररित्या नमूद केले आहेत. आणि हा समूहदेखील याच कारणाकरता गठित केला आहे, नाही का?!

- विशाखादत्त

खरं आहे, आपली सहज प्रवृत्ती प्रत्येकाला 'चांगला किंवा वाईट' ही दोन लेबलं चिटकवण्याचीच असते. स्वतःबाबतचं आपलं मत बहुतेकदा चांगलंच असतं आणि अपरिहार्य परिस्थितीत वाईट वागायला आपल्याला नियतीने भाग पाडलं आहे असा समज असतो. हाच दृष्टिकोन इतरांबाबतही बाळगायला हवा.

जीएं च्या कथांमध्ये कुठेही पात्रांबाबत 'चूक / बरोबर'अशी टोकाची मतं मांडलेली नाहीत. माणसांमधल्या नैतिकतेच्या वैविध्याचा कॅनव्हास म्हणता येईल, जीएंच्या कथा! कथेतल्या पात्रांनी अनुभवलेल्या आयुष्याचा अनुभव घेत त्यांना समजून घेता येईल, अशी मांडणी जीए करतात.

बऱ्याचदा जीएं च्या कथा उदास, निराश करतात, असं वाटतं. याचं कारण मला वाटतं,

त्यांच्या कथांमधून जाणवलेली सत्यं कधीकधी अक्षरशः अंगावर येतात. (उदा. गिधाडे. ) आणि आपल्यातल्या गिधाडाला स्वीकारायची आपली तयारी नसते, यामुळे असावं!

- डॉ आशा भागवत

काहीच चूक नसते..काहीच बरोबर नसते.

हे सगळे परिस्थीती सापेक्ष असते

असे तर जीए सुचवत नाहीत ना ?

- डॉ वैभव कुलकर्णी

खरा अन्याय तर त्याची मुलगी शैलूवर होत आहे.

बिचारी उद्या उद्या करता एक दिवस ती चॉकलेट न खाताच ती मोठी होऊन जाणार आहे.

तिच्या बाहुलीचे आणि चॉकलेटचे पैसे बापू आकड्यावर लावून हरवत असे.

बापू कसाही असला तरी त्याचे आपल्या मुलीवर प्रेम आहे.

आपल्या बुश शर्टचे बटण काढून तो तिच्या झग्याला लावून देतो.

- प्रमोद कुलकर्णी

गिधाडे (हिरवे रावे) ही जीएंच्या सुरुवातीच्या कथांपैकी एक.

मला ही एक गंधकथा वाटते.

बापू काळुस्कराच्या या कथेची सुरुवात पेट्रोल डिझेलच्या कुंद वासाने होते खरी. पण तो वास त्याला भूतकाळात त्या ड्रायव्हरपाशी घून जातो, ज्याने ११३४ रुपये ऐन बंद व्हायच्या वेळी दिल्यामुळे त्याच्या खिशात आले. भोई गल्लीत रहाणाऱ्या नदाफ़च्या अंगाला येणारा माशाम्चा वास, त्याला ’तो” मोह झाला कारण तो त्या तरुणीच्या ऊष्ण, उन्मादक वासामागे मुंबईला गेला. नाहीतर त्या कागदाच्या कुबट वासाच्या खोलीत तो काम करत राहिला असता आणि खोली कसली? तिची खिडकी उघडली की फ़िनेलचा वास घाणेरड्या फडक्याप्रमाणे येऊन तोंडावर आदळे. त्या तरुणीला खरोखरच मन चाळवणारा , हावरे करणारा गंध येत होता. तो तिच्याच मागे गाडीच्या सेकंड क्लासमधे गेला. भूक चाळवणारे पुरीभाजी भज्यांचे वास आले पण त्याने तिच्यासमोर काही खाल्ले नाही. उपाशी राहिला.

मुंबईत पहिला दिवस कुबट अंधाऱ्या खोलीत काढला. पण नंतर मात्र ऍंड्रोमिडा अत्तर मिरवू लागला.

पुन्हा घरी आल्यावर शिक्षा भोगून झाल्यावर दूर सासरी मेहुण्याच्या गावी बापू गेला. आणि नवे दबलेले आयुष्य सुरू केले. तर तिथे पुन्हा पेट्रोलचा वास. बापूला मोह घालणारा तो पुंडलिकजींकडच्या पातळ भाजीचा ऊग्र मसालेदार वास. त्यापायी तो मुलीचे चॉकलेट विसरून जातो.

बापूला वाटले- तो म्युनिसिपालिटीत कुबट वास यायचा तो खोलीचा नव्हताच मुळी, तो आपल्याच आयुष्याचा होता.

आपले आयुष्यच फ़िनेलच्या वासाचे.

- सुनीळ सामंत

आईशप्पत ,ग्रेट.

हा एक वेगळा पैलू ऊलगडून दाखवलात 👍 👍 👍

खरच गंधकथा आहे.

बापू कळुस्कर हा OCD चा पेशंट वाटतो का ?

(obsessive-compulsive disorder)

- वैभव कुलकर्णी

एखाद्या सामान्य घटनेतून किंवा एखाद्या सामान्य घटकातून असामान्य कथा निर्मिती जि ए. करत.

बापू कळुस्कर ——आकराशे चोतिस रूपये चोरून जीवाची मुंबई करणारा, लोकरी पँट्स,नीळे बुशशर्ट ,चाळीस रुपयांचे बुट घालुन मरीनड्राइव्हवर सुरमयी डोळयांकडे धीट पणे बघत फिरणारा ,सिगरेटचे टिन ,अत्तर ,सफरचंद वगैरे विकत घेणारा ,गुबगुबीत सीटवर बसून इग्लिश चित्रपट पहातो....

बापू हा पक्का जुगारीच.

बापूला या वागण्याचा कसलाही पच्श्यात्ताप कथेत अढळत नाही.ऊलट आपण कसे कसे बेधुंद जगलो याचा त्याला सुप्त अभिमानच आहे.

पण भित्रेपणा ,कचखाऊ वृत्ती ,जन्मजात दारीद्र्य यामुळे आलेला दुबळेपणा प्रकर्शाने जाणवत रहातो.

हाॅटेलमधे सिंधी क्किन ची नुसतीच स्वप्ने बघतो.

कुणी हुडूत केले तर उडावे लागणारे आयुष्य आहे त्याचे.

पण बापू परिस्थीतीवर सूड ऊगवायचा निष्फळ प्रयत्न करतच रहातो.

हाॅटेलच्या रजिस्टरमधे पी.एस.देशपांडे मास्तरांचे नाव घालणे इतकाच त्याचा वकूब दिसतो.

कथेच्या ऊतरार्धातही बापू जुगारातुनच पैसे मिळवण्याची स्वप्ने बघतो.

बापूमधे multiple personality च्या शेडस् दिसतात.......

- प्रमोद कुलकर्णी

जुगारावर जीएंचे एक भन्नाट वाक्य आहे —वर ऊडी मारून फळ तोडताना पुन्हा पाया खाली जमिन लागेलच याची खात्री नसेल तर तो अस्सल जुगार !

बापू हा आंधळा , चाचपडणारा ,आलेल्या क्षणात क्षणभरच जगणारा आणि श्रीमंतीची स्वप्ने बघणारा भुरटा किरकोळ जुगारी आहे.

त्याच्या बरोबर यशोदा आणि शैलुही पिळून निघतायत !

बापू संशयीपण झालाय , बायकोवर संशय घेत रहातो.....पण प्रसंग जीएंनी वाचकांवर सोडून दिलेला आहे.

- वैभव कुलकर्णी

बापू हा केवळ गिधाड वृत्तीचा खलनायक आहे का?

की पाडगांवकरम्हणतात तसा एक जिप्सी त्याच्या मनात दडून आहे?

की एक (अर्धवट) जुगारी ?

की नियतीच्या हातचं एक खेळणं? स्वतःवर अजिबात ताबा नसलेलं?

एखादा माणूस केवळ एकाच वृत्तीचा असतो का?

-सुनीळ सामंत

बापूच्या व्यक्तिमत्वाच्या अनेक भल्या बुऱ्या शेड्स जी एंनी दाखवल्या आहेत. आपण सर्वसाधारणपणे लोकांकडे बघताना एकाच चष्म्यातून पहात असतो... चांगला किंवा वाईट... चांगल्यात कुठेतरी थोडं नं आवडणारं पण असतं आणि वाईट पूर्ण वाईट नसतो..

-विशाखा आपटे

या कथेचं नाव गिधाडे का ठेवलं असेल?

कथेत जागोजाग गिधाडांचा उल्लेख आहे. पण केवळ तेच असेल?

- दररोजचा दिवस एखाद्या गिधाडाप्रमाणे पंख पसरून यावा

- चारपाच वर्षांच्या अंतरावरून एक गिधाड (आठवणी?) त्याच्या दिशेने आलं

- पोलीस नेत असता आजूबाजूचे लोक गिधाडासारखे पहात असणार

- म्हज्जनची नखे गिधाडाप्रमाणे आत वळलेई होती

- ते सगळे (देणेकरी) गिधाडांसारखे निघून गेले

- सगळी कत्तलखान्यावर घिरट्या घालणारी घाणेरडी गिधाडे

- गिधाडी मान लबलबवत पुंडलिकजी म्हणाले

- शेवटी) बापू गिधाडाच्या झेपीप्रमाणे त्याच्याकडे जाऊ लागला.

- त्याच्यात नखे, चोच रुतवून यापुढे तो त्याच्यावरच जगणार होता.

पण याही पलिकडे जाऊन, मला आठवते की जीएंच्या एका कथेमधे त्यांनी गिधाडाचा उल्लेख केला आहे. (कळसूत्र?) त्यात ते म्हणतात की मेलेले इतर पक्षी दिसतात पण कधी मेलेले गिधाड दिसत नाही. त्याचे भाऊबंद त्याला खात असावेत. गिधाडांपाठोपाठ मानव ही अशी एक जात आहे की स्वजातीला मारते, टोचते, छळते. जीएंना गिधाडे या नावातून हेच सुचवायचे असेल?

- सुनीळ सामंत

कार्ल युंग हा आध्यात्मिक दिशेने मनाचे गुंते सोडवणारा मानसशास्त्रज्ञ. माणूस मुळात हिंस्र असतो, अशी मांडणी करणारा. जी. ए. आपल्या प्रत्येकातल्या हिंस्र गिधाडांशी आपली ओळख करून देतात.

जाताजाता नमूद करायचा मोह आवरत नाही, भारतीय आध्यात्मिक तत्त्वज्ञान प्रत्येक सजीवात परमात्म्याचा अंश असतो, अशा अद्वैतवादावर मांडलं गेलं आहे.

***असं म्हटलं जातं की,मनुष्यप्राणी हा मुळात चांगल्या वृत्तीचा आहे, पण हे खरं नाही. तो सुरुवातीपासूनच राक्षसी, दुष्ट प्रवृत्तीचा होता, असं आपण म्हणू शकतो.***

***आज सैन्यावर, सामुहिक विनाश करणाऱ्या संहारक शस्रास्रांच्या निर्मितीवर, नवनवी जैव रासायनिक हत्यारे बनवण्यावर माणूस अब्जावधी रुपये खर्च करतोय, त्यामागे 'चांगल्या वृत्तीचा अभाव' इतकेच कारण पुरेसे असू शकेल का?***

कार्ल युंग (मानसशास्त्रज्ञ)

- आशा भागवत

गिधाडे —एक नैसर्गिक साफसफाई करणारा प्राणी.

एकदा किंवा पुन्हा पुन्हा अतीत मधल्या स्मृतींचे अनुभव घ्यायला लावुन जीए त्या गिधाडांना बोथट करून जीवन सुसह्य करतात.

गिधाडे —टपून बसलेली , लचका काढायला तयारीत असलेली मानसिकता जी सर्वांच्यात थोड्याफार प्रमाणात आढळते.

गिधाड हा पक्ष्यावरच एक कथा आहे...त्यात एक भुकेलेले उपाशी गिधाड जिवंत माणसाच्याच काळजात चोच खुपसण्याची आशा धरून कित्तेक दिवस उपाशी बसलेले आहे.

जीएंनी एके ठिकाणी तर टकल्या मानेचे गिधाड आणि राजगोपालाचारी यांच्या संयोगातुन निर्माण झालेले......अशा उपमा वापरलेल्या आहेत.

जीएंच्या कथांमधे अनेक पक्षी रूपकात्मक आहेत ,हा एक अभ्यासाचा वेगळा विषय होऊ शकतो.

चार पॅरा ॅग्रापची पिवळा पक्षी ही कुसूमगुंजातली कथा !

मला आवडलेले एक रूपक वाक्य —त्याच्या खांद्यावर समंजस डोळयांचे घुबड बसले होते !

समंजस डोळयांचे घुबड !

अशा कल्पना फक्त महान जीएच लिहू शकतात.

- वैभव कुलकर्णी

गिधाडे - कथा - विवेचक - व्ही एस वाघोलीकर

- --- -

I ) वैभवजी यांनी कथानक थोडक्यात चांगले सांगितले आहे. दिलीपजी यांनी अभिवाचनाचा व्हीडिओ दिला आहे. त्यामुळे कथानक कळण्यास मदत होईल. काही वैशिष्टये येथे मांडतो -

2 ) समाजात रहात असला तरी माणूस एकाकीपणे दरक्षणी निर्णय घेत असतो. पण माणसाकडून व्यसन ,गुन्हा असे काहीतरी घडते. मग तो समाजापासून जास्त अलग होत जातो. व कुठेतरी गुरफटत जातो. जीएंनी समाजापासून अलग होवून अस्तित्व भोगणारी माणसे कथांमध्ये दाखवली आहेत. उदाहरणार्थ ,काळी आजी ,राधी ,शलॉट लग्न ,वंश इत्यादी. तशीच एकारलेली अवस्था, ही कथा दाखवते.

3 ) जीएंनी अनेक कथांमध्ये व्यसने दाखवली आहेत. उदाहरणार्य - अंजन ,सोडवण ,कैरी इत्यादी. गिधाडे मध्ये जुगारी वृत्तीचा बापू काळूस्कर दाखवला आहे. असातसा पैसा मिळवायचा व तो मनाप्रमाणे स्वतःसाठी खर्च करायचा हा त्याचा मनोगंड आहे. व्यसन समोर आले की तो सर्व विसरतो. त्याचा बालपणाचा मनोगंडाचा प्रकार दाखवला आहे. मोठेपणी नगरपालीकेत नोकरी करताना आलेली रकम तो पळवतो. व मुंबईला चैन करतो. त्यावेळी मुंबईचे वातावरण ( हिरवी मखमल गोरा हात कथेप्रमाणे ) दाखवले आहे. गुन्हेगाराचे मनोव्यापार सूक्ष्मपणे दाखवले आहेत. नंतर मटक्याचे व्यसन लागते. तरीही आकडा लावताना त्याची तडफड होते. अशा वेळी जुगारी , तोडग्यांचा कसा विचार करतात हे वर्णन वास्तविक वाटते. 4 )आजूबाजूलाही आपण जुगारांचे अनेक प्रकार पहातो.खूप पैसा मिळवायचा व खूप ऐसपैस खर्च करायचा हे जीवनातील एकमेव काम व्यसनी

माणसांचे राहते. त्यांना कुटुंबाबद्दल माया असते. पण व्यसन समोर आले की, सर्व विसरतात - मनात आलेल्या इच्छेचा दंश विलक्षण असतो -

त्याच्याभोवती सवंगडी ही तसेच भेटतात. व त्यांच्यामुळे तो जास्त गुरफटत जातो. संगती संग दोषा : असे होत जाते.

-5)कथेचा शेवट ट्विस्ट होतो.

कोणीतरी पैसे खाल्लेली पाटील व्यक्ती भेटते. बापू आता त्याचा मागोवा घेवून त्याला गिधाडाप्रमाणे प्रश्न विचारणार असतो. त्याच्या आयुष्यात आपले प्रतिबिंब पाहून आयुष्य समजवणार असतो.

प्रतिभावंत जी ए, माणसातील व्यसने, गुन्हे दाखवण्याचे टाळत नाहीत. जीवन दाखवताना हे पैलू दाखवल्याने, जीवनावरील भाष्य जास्त कळते. म्हणून ही कथा महत्वाची आहे. धन्यवाद.

- विलास वाघोलीकर

विलासजी, अत्यंत सुंदर आणि स्पष्ट विवेचन. वैभवजी आणि यतीनजीं यांचेरमाणे तुम्हालाही यात मानवी स्वभावातील अनेक सहजप्रवृत्ती दिसल्या. पण आपण मांडलेला एक वेगळा मुद्दा म्हणजे एकटेपणी निर्णय घेण्याची एकट्या माणसाची कथा, जो समाजापासून अलग होत जातो आणि अशा अलग माणसांचाही एक समाजगट बनतो. पुन्हा संगती त्या प्रकारचीही मिळते.

विलासजींनी म्हटल्याप्रमाणे बापूला जसे व्यसनाचे, काहीतरी मनसोक्त करण्याचे, अपराधाचे झटके येतात तसेच पश्चात्तापाचे, जबाबदारीच्या जाणीवेचे,

यशोदेवर आणि शैलूवर आपल्यामुळे होणाऱ्या अन्यायाचे उमाळेही येतात. त्याची उदाहरणे शोधण्याचा प्रयत्न करत आहे.

सुनीळ सामंत: खालील छोट्याछोट्या वाक्यांत जीए बापूचा आतला पण दुबळा आवाज नोंदवतात.

गोऱ्या मासाच्या वळणावळणाभोवती हावरी बोटे ताणून फ़िरत होती पण मळक्या पातळातील यशोदा सारखी आड येत होती.

आपल्याला थोडेतरी आयुष्य मिळाले पण तिला? आणि केस पसरून झोपलेल्या शैलूला?

त्याला एकाएकी फ़ार अपराधी वाटले. आपण हिलाच आयुष्यात फ़ार मोठी शिक्षा दिली हे त्याला जाणवले. आणखी पंधरावीस वर्षांनी कशी असेल शैलू? स्वतःच्या घरी? सुखी? की अशक्त, निराश अंगात मन कणाकणाने झिजत, इतरांच्या आयुष्याकडे दुरून पहात?

- सुनीळ सामंत

गिधाडे हा पक्षी स्वत: शिकार करीत नाही. प्राण्यांचे मृत शरीर हे त्यांचे खाद्य. गरुडपेक्षाही मोठा व शक्तिमान. गिधाडामध्ये मृतदेहाचे मांस अनेक रोगाने भरलेले असले तरी ते पचवायची ताकद निसर्गत: असते.

अशा या ‘गिधाड’ प्राण्याचा उल्लेख जीए फार खुबीने कथेत करतात व मनुष्यप्राण्यात असलेली गिधाडी वृत्ती कथेतून दाखवतात.

उदाहरणार्थ --

कणा नसलेल्या बापूच्या आयुष्यात रोजचा दिवस म्हणजे ‘गिधाडाने पंख पसरून यावे व आयुष्याचा लचका तोंडावा’ असा आहे. या एका वाक्यात ते बापूचे आयुष्य ‘मरणप्राय’ असल्याचे सूचित करतात.

कथेमध्ये यशोदा शैलू , मारुती, अनगोळकर गुरुजी, देशमुख, अशा पात्रांचा प्रवेश होतो तेव्हा जीए गिधाडांचा उल्लेख करीत नाहीत.

यशोदेचा प्रवेश कथेत होताच ‘जवळजवळ गिधाडाप्रमाणे तिच्या आयुष्यावर जगतो झाले’ असा उल्लेख लगेच करतात व बापू ही एक गिधाड असल्याचे वाचकांच्या नजरेत आणतात.

अकराशेचौतीस रुपये घेऊन जाण्याचा प्रसंग बापूला आठवताना ‘चार-पाच वर्षाच्या अंतराने एक गिधाड त्याचा रोखाने आले, आणि बापू त्याच्या सावलीत स्वत:ला लपवण्याचा प्रयत्न करू लागला’ अशा ‘प्रसंगाचा उल्लेख’ करतानाही ‘गिधाडे’ शब्द जीए वापरतात.

डीपॉजीटचा हिशेब बंद केल्याने पैसे देशमुखाने भरून घेतले नाहीत तेव्हा “ नशिबाची गिधाडे आपण केव्हा अडखळून पडतो हे पाहण्यासाठी लपून बसली आहेत” असे बापूला वाटते, असे लिहितात...

तेव्हा..

जीए किती खोलवर जाऊन प्रत्येक व्यक्तीचा, प्रत्येक प्रसंगाचा विचार करतात, हे पाहून अचंबित व्हायला होते.

खिसेकापूचा हात “खरबरीत, खवल्याखवल्यांचा, गिधाडाच्या पायासारखा होता”,

किंवा..’,

पैसे देणाऱ्या ड्रायव्हरचा शर्ट 'गिधाडी पंखाच्या रंगाचा आहे', अशा वर्णनाची पेरणी

किंवा....

पोलीस नेताना 'आजूबाजूचे लोक गिधाडाप्रमाणे पाहतील,' किंवा..,

'मोहजजन्ची गिधाडा प्रमाणे वाकलेली नखे व साथीदारासह पंख पसरून गिधाडा प्रमाणे निघून जाणे,'

किंवा....

' पुंडलीकजीची गिधाडा प्रमाणे लांब,तुळतुळीत मान होती' असे वर्णन करताकरता कथेच्या शेवटी...

''बापूचे तोंड गिधाडाच्या चोचीसारखे झाले; व त्याच्यात काहीतरी मोठे, काळे अशुभ पंख पसरून जागे झाले'' असे लिहून,

बापूही आता एक पक्का गिधाड झाल्याचे जीए दर्शवतात तेव्हा त्यांच्या प्रतिभशक्तीला दादच द्यायला हवी.

कथेच्या शेवटी रेनकोटसाठी साठ रुपये चोरणाऱ्या व नोकरी गमावणाऱ्या त्या असहाय्य पाटीलला पाहून अकराशे रुपये चोरून मौजमजा करणारे आपण त्याच्यापेक्षा अधिक नशीबवान व धाडसी आहोत असे बापूचे वाटणे.. आणि त्या व्यक्तिच्यात नखे व चोच रुतवून पुढचे जगणे असे जीए लिहितात तेव्हा..

‘ जीए उत्कृष्ट लेखकाबरोबरच एक उत्कृष्ट मानसशास्त्रज्ञ आहेत हे जाणवते व कथेतील पात्रात शिरून त्याची मानसिक आंदोलने शब्दबद्ध करणारे महान कलाकार असल्याची प्रचिती येते.’

🙏

- राजेश उनवणे

......गिधाड, काफ्का आणि मी!

.

.

फ्रॅंझ काफ्का! जर्मन लेखक! जगप्रसिद्ध! त्याची एक अतिशय छोटी कथा आहे. Vulture...गिधाड या नावाची. अक्षरशः अर्ध्या पानाची ही कथा. हिला कथा तरी का म्हणावं हा प्रश्न पडावा अशी. पण जी व्यक्ती ही कथा वाचेल ती मात्र आयुष्यातले काही क्षण त्यावर विचार नक्कीच करेल....ईच्छा असताना वा नसतानाही!!!हीच ताकद आहे या कथेची. आणि काफ्काचीही. काफ्का काय चीज आहे हे माझ्यासारख्याने सांगायची खरं तर गरज नाही.

'गिधाड' हे प्रतिक एवढ्या अप्रतिमपणे वापरलेलं हे एकमेवाद्वितीय उदाहरण. जीए सारख्या लेखकांच्या कथेत हे प्रतिक वापरलं जातं पण त्याला केंद्रस्थानी ठेवलेलं नसतं. आणि इतक्या गुढ, खोल अर्थाने तर नाहीच. तुम्ही ज्या स्वरूपात तुमच्या आयुष्यात 'गिधाड' बघाल त्या स्वरूपात ते तुम्हाला सापडेल, तुमच्या मनाला भिडेल. आणि ते तुमच्या वृत्तीवर अवलंबून आहे.

आयुष्याला दुःखाचा स्पर्श हा अटळ असतो आणि सिद्धार्थला भेटलेला म्हातारा जे सांगतो ते चिरंतन सत्य असतं. "जगात दुःख आहे, मृत्यु अटळ आहे म्हणूनच आयुष्याला काही अर्थ आहे!!". काफ्काने सिद्धार्थ वाचला होता की नाही हे मला माहित नाही.पण बुद्धाच्या मार्गावरून चालणारा हा वास्तववादी प्रवासी होता हे मात्र या एकाच कथेवरून मला जाणवलं!!

सहज वाचनात आलेल्या या कथेने मला काफ्काच्या प्रेमात पडायला लावलं. मग मेटामाॅर्फासिस असो वा कॅसल , ते वाचनं ओघानेच आलं. स्वतःचं लिखान स्वतःच्या मृत्युनंतर जाळून टाकण्यात यावं असं म्हणणारा हा अवलिया. त्याची Letters to Milena नक्कीच वाचली पाहिजेत. त्याच्या कविताही सुरेख आहेत. सार्त्र, कामु, बेकेट, चेकाॅव्ह काफ्का, रॅंड आणि असे बरेच. मनापासून वाचायला हवेत हेच खरं

त्यात बुडून जाताना आनंदाचे डोहि आनंदी तरंग हेच असतं....

###

"गिधाड" ही कथा अशी आहे...

एक व्यक्ती पडलेली आहे. आणि एका गिधाडाने त्याच्या पायाचे लचके तोडले आहेत. गिधाडाला प्रतिकार न करता ती व्यक्ती त्या वेदना सहन करत आहे. हे पाहून आश्चर्य वाटलेला एक मनुष्य , तू असं दुःख का सहन करतोस? हा प्रश्न विचारतो. ती पडलेली व्यक्ती असहाय्यता व्यक्त करत मदतीची अपेक्षा करते. आश्वासन देत तो मनुष्य निघून जातो. तेवढ्यात ते गिधाड झेप घेवून त्या व्यक्तीच्या डोक्यात चोंच खूपसते..आणि त्या उष्ण रक्ताची जाणीव हीच त्या व्यक्तीची शेवटची जाणीव असते!!!

बस!! संपली कथा!

तुम्हाला काय घ्यायचय, काय म्हणायचय ते तुम्हीच ठरवा...

###

सगळ्यात आधी जर का ही कथा नुसती वाचुन , हं! काय बकवास आहे , असं म्हणाल तरी कथेचा उद्देश पूर्ण होतोच. खरं तर आयुष्य म्हणजे एक बकवास, भंपकपणाच. उद्या काय होणार याची यत्किंचीतही कल्पना तुम्हाला नसते. तुम्ही ठरवता एक आणि घडतं दुसरंच. मुख्य म्हणजे ही कथा ज्याने लिहली, ज्या कालखंडात लिहली तो युरोपीयन माणूस व दुसऱ्या महायुद्धाच्या मागचा पुढचा काळ. सकाळी उठल्यानंतर पुढ्यात काय येणार वा आपण रात्री डोळे मिटल्यानंतर उद्याचा दिवस बघू की नाही हे ही माहीत नाही. पुढच्या क्षणाचं आयुष्य नेमकं कसं असेलयाबाबत काहीच शाश्वती नाही, अंदाजही करता येत नाही तेंव्हा हे आयुष्य नक्कीच बकवास वा भंपकच वाटणार. आणि मग या कथेत तो भेटणारच.आयुष्यातल्या त्या जगण्याचा हा भंपकपणा , जीवनाची एक प्रचंड निरर्थकता, तेवढीच महाप्रचंड अनिश्चीतता आयुष्य बकवासच बनवते आणि या कथेतून काफ्का तुम्हाला ते दाखवत असतोच!!!

......

आता असा विचार करा. गिधाड हे प्रतिक स्वच्छतेचा दूत म्हणून, घाण नष्ट करणारा म्हणून घ्या! मग विचार करा..आयुष्यात भरलेल्या सगळ्या वेदनांचे , वाईटांचे लचके हे गिधाड तोडत आहे असंही दिसेल. कथा आणि कथेचा शेवट नीट वाचल्यास ते जाणवेलच. आपल्या जगण्यातल्या वेदनांना, दुःखाला ,टाकावू गोष्टी समजल्या तर गिधाड त्या संपवून टाकतय असंच दिसेल. कथेच्या शेवटी काफ्का म्हणतोय.... I relieved to feel him....

बघा, रिलीव्हड हा शब्द वापरलाय. म्हणजे रिलीफ मिळवून देणे. कथेत शेवटची जाणीव आहे ती पूर्ण किनाऱ्यावर झिरपत जाणाऱ्या उष्ण रक्तप्रवाहाची! म्हणजेच एका नव्या स्वरूपात आपण परत आयुष्याला सामोरं जाणार आहोत अशी!!!आणि हा अर्थ लावताना ,"मदत करतो, थोडं थांब" असं म्हणणारा या कथेतला जो तिसरा मनुष्य आहे तो म्हणजे समाज वा परिस्थिती!!! आता ही प्रतीकं मनात ठेवून जर कथा वाचली तर एक अजून वेगळा दृष्टीकोन समोर येतो....

मी एकदा असाच रात्री शेताला जात होतो. साधारण साडेदहा अकराची वेळ असेल. थंडगार वारं सुटलं होतं. अंगाला झोंबत होतं. आदल्या रात्री रानडुकरांनी मक्याच्या पीकाच नुकसान केल्याने थोडासा नाराजच होतो. त्याच विचारात चालत होतो. तेवढ्यात अंधारातून अचानक एका झाडातून एक घुबड झेपावलं आणि रस्त्यावरून बहूदा उंदीर वा काहीतरी उचलून तेवढ्याच वेगाने दिसेनासं झालं. त्या घटनेने मला उगाच काफ्काच गिधाड आठवलं. त्या निराश मनस्थितीत मला ,मी म्हणजे कथेतला नायक, जो पडलेली व्यक्ती आहे ,तो वाटू लागलो. मला त्रास देणारी ही परिस्थिती मला माझे लचके तोडणाऱ्या गिधाडासारखी वाटली. आणि दिवसभरात मला डुकरांपासून पीक वाचवण्याचे सल्ले देणारी मंडळी मला कथेतल्या मनुष्यासारखी वाटु लागली. आणि काफ्काबद्दल एक अनामिक प्रेम मनात उचंबळून आलं....

कधी सहज विचार केला तर,

कथेतला तो पडलेला माणूस मी, ते लचके तोडणारं गिधाडही मी आणि मदतीचं आश्वासन देणारा मनुष्य म्हणजे मीच असंही मला वाटत राहातं. एकाच व्यक्तीची ही तीन रूपं—एकाच प्रसंगात—एकाच काळात—एकाच पटलावर. त्यातला एक कर्ता—गिधाड! एक कर्म—पडलेली व्यक्ती आणि तो बघणारा मनुष्य म्हणजे साक्षी!!!! थोडक्यात माझ्या कर्माचे फळ मी भोगताना मलाच साक्षी ठेवतोय.

मी कर्ता होवून कर्माचा शेवट करताना नवीन कर्म करण्याची जाणीव निर्माण करून देतो. आणि या सर्व घडामोडीत मी स्वतःला साक्षी ठेवतो!!!!!

काफ्काला हे असंच, यापैकी एक काही म्हणायचं असेल हे मात्र म्हणण्याचं मी धाडस करू शकत नाही. कथेचा शेवट करताना काफ्का लिहतो ते असं...." I was relieved to feel him , drowning irretriverbly in my blood , which was filling every depth , flooding every shore.."

म्हणूनच मग ही कथा एका वेगळ्या उंचीवर पोचते आणि अनेक मितींमधे मांडता येते. काफ्कासारखा भन्नाट मनुष्य काय आणि कसा विचार करत असेल हे फक्त तोच सांगू शकतो. ग्रेस, जीए, मर्ढेकर आणि असे सगळे यांच्या लिखणासारख वा तुमच्या कोणत्याही आवडणाऱ्या कलाकृतीसारख आहे हे! दरवेळेस जेंव्हा त्या कलाकृतीकडे पहातो तेंव्हा प्रत्येकवेळी ती नव्याने सापडत असते हा प्रत्येकाचा अनुभव असतोच!!!!

गिधाड या कथेतून काफ्काला नेमकं कशावर भाष्य करायचं आहे ते तो आपल्यावर, आपल्या अनुभूतीवर सोडून देतो. काफ्काच्या इतर कथाही अशाच आहेत. उदाहरण द्यायचं झालं तर Before the law ही एक कथा घ्या. तसं तर काफ्काच्या प्रत्येक कथेवर एक निबंध लिहता येतो!

त्याच्या एकंदर लिखाणातच त्याने ही स्पेस जाणीवपूर्वक ठेवली असावी. वाचकाने त्याच्या कल्पनेने भरून काढण्यासाठी. अशी स्पेस ठेवणे ही काफ्कासोबत बऱ्याच जणांची खासियत आहे. खास करून वास्तववादी म्हणजे रॅशनल व ॲब्सर्ड लिहणारे.

एका कैफात कलाकृती जन्म घेत असते. अस्तित्वात येत असते. त्यानंतर त्या निर्मात्याला हे असंच का आलं हे सांगता येईल की नाही याबद्दल मी साशंकच आहे.

गिधाड ही कथा परवा अचानक भेटली आणि हे सगळं आठवत गेलं. खास करून आठवते "ती" पोकळी..."तिची" पोकळी.....जी अजूनही कधी भरता आली नाही. माझ्या कल्पनेने मी खूप काही भरत गेलो त्या पोकळीत...पण तरिही ती मोठी होत गेली..विस्तारत गेली. आता तर मीच बनलोय , एक अविभाज्य भाग त्या पोकळीचा...मिसळून गेलय माझ्या आत्म्याचं संपूर्ण अस्तित्वच त्या पोकळीत......

. ######

निसटून जात असतात,
कितीतरी गोष्टी—
आयुष्यातून.......
आणि पाठीमागे उरते,
निर्माण झालेली—
एक पोकळी!!!!!!

.

विलीन होत जाते,
ही एक पोकळी,
आधीच्या पोकळीत..
आणि विस्तारतो—
पोकळीचा परीघ....
मात्र केंद्रस्थानी असतं,
तुझ्या सोडून जाण्याने,
निर्माण झालेल्या—
पोकळीच कृष्णविवर....
कुणालाही न दिसणारं,
पण सतत जाणवणारं!!!!

.

बाहेर असतो तो,
प्रचंड गदारोळ,
विचारांचा कोलाहल,
जीवनाची भयाण गती,
आणि पोकळीत असते;
तेवढीच भयाण शांतता,
कायमस्वरूपी.....

.

कधीच उमटला नाही,
कोणताही आवाज,
वा एखादा हलकासा,
त्याचा प्रतिध्वनी!!!!

.

मी भरत असतो,
त्या पोकळीचं कृष्णविवर,
एका अनामिक वेदनेने,
अन थकून जातो
त्या पोकळीच्या भाराने
आणि जेंव्हा असह्य होतो,
त्याचा भार—
माझ्या आयुष्याला,
तेंव्हा मी शोधत राहातो
एक असाच किनारा,
जिथे मला भेटू शकेल....

काफ्काचं गिधाड!!!!!

.

मी देवून टाकतो,
माझे सारे शरीर,
आणि आत्माही
जे हरवलेलं असतं
त्या पोकळीत,
त्या काफ्काच्या गिधाडाला,
तेंव्हा भरून जातात...
सारे वेदनांचे डोह,
त्या उष्ण स्पर्शाने....
आणि रिता होत जातो,
माझ्या जाणीवांचा किनारा!!
जाणीवांचा किनारा!!!!!!!!!

.

........../\नागेश कुलकर्णी!!

बापू 100% lmpulsive आहेच.एखादी चुकीची गोष्ट करताना त्याला फक्त त्यातुन मिळणारे तातपुरते बेधुंद आयुष्य जगायचे आहे.

बापू संधीसाधू आहे...oppourtunity मिळाली की लगेच activate होणारा आहे.

बापू विधीनिषेधशुन्य आहे.

- वैभव कुलकर्णी

जीएंना

जीएंना तत्वज्ञाना विषयी खूप आकर्षण होते.

जगातील अनेक विचारप्रवाह ,तत्वप्रणाली त्यांना अभ्यासल्या होत्या ,त्यावर मनन आणि सखोल चिंतन केले होते.

क्षणभंगूरता हा जीएंचा आवडता विषय असावा.त्यांच्या कथांमधे

काही क्षणात होत्याचे नव्हते होते.

..........~~~~~~~रात्री जाग आली असताना मला ऊगाचच बापूचे वागणे काहीही चुकीचे आहे असे वाटले नाही....,.

यावज्जीवेत सुखं जीवेत, ऋणं कृत्वा घृतं पिबेत।

हा चार्वाकचा सिध्दांत ऊगाचच बरोबर वाटला.

मेल्यावर पुन्हा या पृथ्वीवर येणे नाही ,काही जगणे,ऊपभोगणे नाही....,.मिळेल त्या मार्गाने पाहीजे तसे ,पाहीजे ते जगणे ,यात काय चुकले ?

असेही वाटून गेले.

जीएंची कोडी सोडवता सोडवता पुन्हा पुन्हा कोड्यातच अडकून पडायला होते....

- वैभव कुलकर्णी

कथा गिधाडे - हिरवे रावे: विवेचन माधव पुराणिक

१ जी एं कुलकर्णी यांच्या साहित्यात अस्तित्ववादी व अतिवास्तववादी वृत्ती आढळते.

२ अतिवास्तववादी वृत्ती वास्तवाचे भयावह अतिवास्तव प्रतीकांमध्ये रूपांतर करणे.

३ अस्तित्ववादी वृत्ती सातत्याने, अर्थशून्यतेचे व निराशेचे तत्वज्ञान व्यक्त करते.

( संदर्भ डॉ प्रभा गणोरकर - कवयित्री व समीक्षक)

४ गिधाडे कथेत हे प्रकर्षाने जाणवते

५ गिधाडी वृत्ती ( भयावहता, क्रौर्य,निर्दयपणा, हिंस्त्रपणा, कठोरपणा इ ) व त्या वृत्तीचे बळी ( दुर्बलता, केवालवाणेपणा,दीनपणा, हतबलता इ) या दोन्ही वेगळ्या करता येत नाहोत.दोन्ही मिळून गिधाडे व बळींना लगेच व शेवटी निराशेकडे नेतात. दुःख,वेदना , मरणप्राय यातना देतात. शेवटी भावनिक आणि शारीरिक मृत्यू होतो

६ गिधाडे कथेत अशी द्वंद्वात्मक पुष्कळ उदाहरणे आहेत.

७ ( गिधाड=भयावहता ) +( बळी = दुर्बलता ) = ( निराशा +मृत्यू )

उदाहरणे १) रोजचा दिवस गिधाड व बापूंचे आयूष्य बळी

२) बापू गिधाड व यशोदाचे आयूष्य बळी

३)११३४ रूपयांचा प्रसंग गिधाड व बापू बळी

४)डिपाझिटचा प्रसंग गिधाड व बापू बळी

५) खिसेकापूचा खवल्यांचा गिधाड व बापू बळी

६)..ची वाकलेली नखे, साथीदार गिधाड

७) अजस्त्र मशीन गिधाड ,मारूती, सापळयातला उंदीर बळी

८)इतर अनेक उदाहरणे

यावरून गिधाड हे व्यक्तू, प्रसंग, परिस्थिती, अव्यक्त शक्ती,आठवण इ असू शकते. कधी गिधाड बळी होते तर कधी बळी नंतर गिधाड होतो. परिणाम एकच वाढती निराशा

९) 'स्वतः मिळवलेल्या पैशावर ( स्वतः घ्या आयुष्यावर ) स्वतः चाच अधिकार' हे संस्कृतीचे एक मुख्य तत्त्व आहे. गिधाडी वृत्ती हे नष्ट करते. क्रौर्य दाखवून दुर्बलांना लुटते (जसे बापू - यशोदा)

१०) समारोप जी एं चे तत्वज्ञान (अस्तित्व वादी+ अतिवास्तववादी) समर्थपणे व्यक्त करणारी कथा

- डॉ. माधव पुराणिक

डॉक्टरसाहेब तुम्ही प्रत्येकच व्यक्तीच्या नाण्याप्रमाणे दोन बाजू दाखवल्या. गिधाड आणि बळी. व्वाह.

आता गिधाड या नावाचे अन्वयार्थ लागले.

मीच गिधाड आणि मीच बळी. आणि मीच तो पहाणाराही. जीए खरोखरच श्रेष्ठ कथाकार का आहेत ते अशा चर्चेतूनच, विवेचनांच्या मालिकेतून उलगडतं. म्हणजे ूते नेणिवेत असतं. पण चर्चेतून जाणिवेत येतं.

- सुनीळ सामंत

# कैरी – कथासंग्रह- पिंगळावेळ

# तुती - हिरवे रावे

यतीन गुळवणी

कैरी ही जीएंची कथा 'सुगंध' च्या दिवाळी अंकात १९७३ साली प्रकाशित झाली. ती पिंगळावेळ (१९७७) या कथासंग्रहात समाविष्ट आहे. ती स्मृतिकथा वाटावी अशी पण खूप हृद्द आहे.

अशाच प्रकारची त्यांची तुती ही कथा 'साधना' च्या दिवाळी अंकात १९६१ साली प्रकाशित झाली. ती हिरवे रावे (१९६२) या कथासंग्रहात समाविष्ट आहे.

तुतीचा उल्लेख येथे करणे आवश्यक आहे कारण कैरी ही तुती या कथेचा पुढील भाग वाटावा इतपत या दोन ही कथांत समान संदर्भ व व्यक्ती आहेत.

जीएंच्या 'प्रथम पुरुषी एक वचनी' सर्वनामातील एका निरागस बालकाच्या भूमिकेतील या कथा आहेत. (अशाच स्वरूपातील थोडी वेगळी कथा 'राधी' आहे.)

(कदाचित सत्य घटनांवरील) या आत्मकथनात्मक गोष्टी वाटतात. जीए प्रेमींना या कथा माहीत असतीलच पण संक्षिप्त स्वरूपात उल्लेखणे आवश्यक वाटते.

एक सात आठ वर्षांचा निरागस पण सुजाण बालक! आपण त्याचे काल्पनिक नाव 'नायक' धरूया. त्याच्या परिवारातील माणसे म्हणजे

वडील नाना, आई कमळा (नानांची द्वितीय पत्नी) मोठी बहीण सुम्मी, तिच्यापेक्षा थोरला भाऊ दादा (सदानंद), चुलत मामा श्रीपूमामा (श्रीपाद त्रंबक जोशी), सख्खी मावशी तानीमावशी. हो आणखी एक मूक सदस्य म्हणजे कृष्णी गाय!

दादा शिक्षणासाठी दूरगावी असल्याने घरी आई, नाना, सुम्मी व नायक अशी चारच माणसे असतात.

नायक व सुम्मीच्या अनेक गमतीजमती असतात. त्यात तुतीच्या फळांचे रहस्य आहे. तुतीच्याआंबटगोड चवीसाठी ती नेमकी केव्हा खायची हे त्याना माहित असते.

नाना सुम्मीचा विवाह एका प्रौढ बिजवराशी ठरवतात. त्या प्रैढाची प्रथम पत्नी जळून (की जाळून?) मृत झालेली असते. त्या सधन पण शिष्ट माणसांविषयी जनमत प्रतिकूल असते. दादाचा या विवाहाला विरोध असतो. या विषयावर पीतापुत्रात वाद होऊन दादा घर व शिक्षण सोडून आणखी दूर (दांडेलीला) जातो.

सुम्मीचे लग्न होऊन ती सासरी रहाते.

थोड्या दिवसांनी नाना तीला माहेरी आणण्यास जातात पण लग्नातल्या मानपानावरून सासरच्या माणसांची बोलणी ऐकून उलट ऐकवून तसेच परततात. मग महागातली तीन लुगडी विकत आणून आई सुम्मीच्या सासरी जाते. लुगड्यांची टिंगल करून ती मंडळी 'तुमची मुलगी तुम्हांला मेली' असे अभद्र ऐकवतात. सुम्मी मोटेच्या बैलाप्रमाणे पाणीच ओढत असते. तिच्या हातावर डागल्याचा जांभळा डाग असतो.

हातावरचा डागल्याचा जांभळा डाग दाखवून सुम्मी पुटपुटते 'आई ने ग इथून मला'. श्रीपूमामाची तीकडील खेप फुकट होते. एके दिवशी पत्रातून कळते की 'सुम्मी

अपघाताने विहिरीत पडून गेली'. नाना अंथरूण धरतात. चरितार्थासाठी आई इतरत्र स्वयंपाक करू लागते.

ही कथा सुम्मीची आहे. पण फक्त सुम्मी, दादा व नायकाला माहीत असलेल्या तुतीच्या गुपितात गुंफुन जीएंनी या स्मृतीकथेला एका अत्युच्च पातळीवर नेले आहे.

कालौघात नाना व आई यांच्या निधनानंतर 'कैरी' कथा चालू होते.

श्रीपूमामा नायकाला परगावी तानीमावशीकडे पोहोचवतो.तानीमावशी नायकाला जवळ येऊन हुंदके देत सांगते. 'सुम्मीच्या लग्नात मीच अंथरूण धरलेलं. नाना वारले वारले त्यावेळी हे (भाऊराव, तानीमावशीचे पती) आजारी, आणि आता तीच (कमळी) गेली तेव्हा (पावसाच्या पूराचा) ओढा आडवा आला. लग्नानंतर आम्ही दोघी निरनिराळ्या दिशेने गेलो. दोन डोळे शेजारी भेट नाही घरीदरी.'

'आता इथंच शाळा, रोज अभ्यास करायचा, भटकायचं नाही व तानीकडं कसलाही हट्ट करायचा नाही' असे समजावून श्रीपूमामा जातो.

तानीमावशीचे घर लहान व जुने असते. त्यात ती व भाऊराव रहात असतात. भाऊरावाना नायकाची 'ब्याद' वाटते. पण 'हे अन्न उकिरड्यावर न पडता आपल्याच रक्ताच्या माणसाकडे जातं' असे तानीमावशी ऐकवते.

तानीमावशी नायकाला जवळच्या शाळेत दाखल करते. स्वतःच्या मुलाप्रमाणे त्याच्यावर माया करते. शाळेतल्या मुलांच्या दंगामस्तीत मुस्काटात घेऊन पण उलट जबाबी धडक देऊन पळत परतलेल्या नायकाची 'पुढं तुझं कसं होणार' याची काळजी करते.

शाळेत नायकाच्या स्वच्छ सदऱ्यावर निंगू शाईचा डाग पाडतो. धुवून डाग न गेल्याने तानीमावशी डागावर एक फूलपाखरू शिवून देते. त्याच्या शाळेतील गमतीजमतीत ती रमते.

एकदा शाळेतील सहलीला देण्यासाठी चार आणे नाहीत म्हणून नायकाला देशपांडे मास्तर 'भिकारडा म्हणतात. त्यावेळी तानीमावशी त्याला वडाखाली गवतावर घेऊन जाते व सांगते. 'आपणच एकदा जाऊया हरेश्वरला सहलीला. बरोबर पुष्कळ भाकऱ्या भरल्या, मसाल्याची वांग्यांची भाजी, दोन मडकी घट्ट दही, चटणी इत्यादीं न्यायचे बेत आखतात. तिथे झऱ्यावर पालथं पडून ओंजळीने पाणी प्यायचे.

वाटेतील आंब्याच्या झाडांवरच्या ताज्या कैऱ्या काढून त्या फोडून त्यात मीठ व लाल चटणी घालून खाण्यातल्या मजेचे गुपित तानीमावशी सांगते.

खर्चाच्या काळजीने सहल नको म्हणणाऱ्या नायकाला ती समजावते. 'दर वेळी असा हात मागं घेऊ लागलास तर आयुष्यभर तुझे हात रिकामेच राहतील. सरळ नाही मिळालं तर ओरबाडून घ्यायची तयारी पाहिजे.'

पुढे तानीमावशी ऐकवते. 'मी अगदी थोडं देवाकडे मागितलं. ते देखील त्यानं दिलं नाही. पोटापुरतं खायला असावं. एखाद दुसरं पोर असावं स्वतःचं, आपला म्हणता येईल असा संसार असावा. मला एकदा हे सगळं मिळालं देखील होतं; पण इथे आलो जी कीड लागली ती अगदी मुळासकट.'

मग तानीमावशी नायकाला एकटाच फिरून यायला पाठवते. परतताना झुडपातून त्याला नेमके भाऊराव व तुळसा बसलेले दिसतात. घरी तानीमावशीला सांगितल्यावर शिळया उतरलेल्या चेहऱ्याने ती त्याला 'बघीतलेले' शाळेत कोणाला न सांगण्याविषयी बजावते.

दुसऱ्या दिवशी तानीमावशी शाळेत येऊन देशपांडे मास्तराना फैलावर घेते. 'कुणाला भिकारडा म्हणता? तुमच्या झुरळासारख्या मिश्यांना मी घाबरत नाही. पाढे नाहीत, परवचा नाही, काय शाळा आहे की धर्मशाळा? म्हणे सहल काढतो.हरेश्र्वरलाच जायचं तर काय आमचे आम्हांला पाय नाहीत? त्याला तुमची चार आणेवाली मिरवणूक कशाला पाहिजे बरोबर?' एवढ्यावर न थांबता ती रामरक्षा व शिवलीलामृतातील श्लोक म्हणून दाखवते. वर 'तु, तुझी शाळा आणि सहल **घालून घे असे सांगून नायकाचा दाखला मागते.

तानीमावशी नायकाला दुसऱ्या दीड मैल दूरच्या शाळेत दाखल करायला घेऊन जाते. गवती छपराची, एक शिक्षकी छोटी त्याला आवडत नाही. शाळा सुटल्यावर परतताना अर्ध्या वाटेवर तानीमावशीला घ्यायला आलेली पाहून त्याचा कंटाळा 'धुऊन' गेला. 'घरी गेल्यावर खोबरेल लावून गरम पाणी ओतून घेऊ पायांवर' मावशी सांगते. पण घरी पोहोचताच तीचा व

भाऊरावांचा वाद होतो. भाऊराव सांगतत 'उद्यापासून त्याला शाळेत घेऊन जायचं बंद कर. पाहिजे तर तो येथल्या शाळेत जाईल, नाहीतर परत जाईल आपल्या मामाकडे. नसती ब्याद नको आम्हाला.' तानीमावशी रागावलेली असते. नायकाला लोणचेभात देऊन स्वतः काहीच न खाता झोपते.

दुसऱ्या दिवशी भांडी घासायला तुळसा उशिरा येते. तसे भाऊराव तानीमावशीला म्हणतात 'आटप लौकर. त्याला (नायकाला) उशीर होईल. कालचं बोलणं राहू दे बाजूला.'

नव्या शाळेत नायक रूळू लागतो. तिथले जाधव मास्तर जलद बोलताना जरा तोतरायचे आणि 'न' व 'ण', चा उच्चार करताना चुकायचे. एके दिवशी मास्तर नायकाला वाचायला सांगतत. उध्दव व इतर पोरांना हसवण्यासाठी नायक वाचायला

सुरुवात करतो. "पान सात, धडा तिसरा. झासीची रानी लक्षुंभाई फार शानी आणि सूर होती. प प परंतु-----" पोरे हसली. मास्तरांनी त्याच्याकडे पाहून शांतपणे शेजारच्या दुसऱ्या मुलाला वाचायला सांगितले. शाळा सुटल्यावर नायकाला थांबवले. 'दूर दवाखान्यात जायला रात्र होईल' असे नायकाने म्हंटल्यावर मास्तरांनी 'घाबरू नको, हवं तर आपण तुला घरी पोहोचवतो' असे सांगितले. आपल्या खोलीवर मास्तरांनी तोंड धुवून कपडे बदलले. खोलीवरून घरी जातानाच्या वाटेवर मास्तर बोलले "तुझं अक्षर छान आहे, तुला पुष्कळ कविता येतात. मी तुझ्याएवढा होतो त्या वेळी मी गुरं राखत होतो आणि मला एक अक्षर लिहायला येत नव्हतं". ते आतड्याने बोलले. नायकाला वाटले त्यांनी

ओरडून एक मुस्काटात द्यावी.

"इथल्या राणीसाहेब गोऱ्यापान आहेत, हातभर दागिने घालतात आणि त्यांचे वीस नोकर आहेत. तुला पाहिजेत तर त्या तुला घरी घेऊन जायला मिळतील. एवढंच की तुला तुझ्या मावशीला बदली द्यावं लागेल. हूं म्हणालास तर आताच राणीसाहेबांची घोडागाडी तुझ्या दारात आणतो. मग काय म्हणतोस?"

नायकाला वाटले तानीमावशीच्या हनुवटीवरील गोंदण्याची सर हातभर दागिने घालणाऱ्या राणीला यायची नाही.

"मी कित्येकदा पानी, लोनी, कनसं म्हणतो. ती माझी भाषा आहे. अठ्ठावीस वर्षं मी ती बोललो, तिच्यावर वाढलो. ती झाली तरी एक भाषाच आहे. माझी आई रस्ते झाडायची. मला रात्री उशिरापर्यंत पुस्तकासमोर बसवायची. तीला माझं नाव कृष्ण म्हणता आलं नाही. आयुष्यभर मी तीचा किसनाच राहिलो.

ही भाषा बरोबर, की ती भाषा बरोबर याचा तू मोठा झाल्यावर विचार कर. आता ते जाऊ दे. पुस्तकात

लिहिल्या प्रमाणे बोलता, म्हणता आलं पाहिजे, हे देखील खरंच आहे. मी तसा प्रयत्न करतो. पण काही वेळा ते साधत नाही. मी तोतरा आहे हे काय मी मुद्दाम देवाजवळून मागून आलो होय? मी फार शहाणा आहे असं मी म्हणत नाही. मला येतं तेवढं शीक. तेवढं झालं की दुसऱ्या जास्त शहाण्या माणसाकडे जा. मी पुष्कळ लिहितो. कागद आपलं म्हणणं शांततेनं ऐकून घेतो. मी तोतरा आहे, मी पानी म्हणतो म्हणून तो मला हसत नाही."

नायक रडकुंडीला येतो.

"तु तर वेडाच आहेस. रडायला काय झालं? पोरपणी असं चुकतंच; पण ते चुकलं एवढं ओळख म्हणजे झालं. तुझं अक्षर छान आहे, तू देखील का काही लिहीत नाहीस? 'माझे आवडते झाड' यावर वीस ओळी लिही. अगर तुला आवडती माणसं असतील"

नायक डोळे पुसत सांगतो "होय, आहेत की. अगदी पाच माणसं आहेत."

मास्तर " पाच? तू किती भाग्यवान आहेस याची तुला कल्पना नाही. मला एकच माणूस मिळालं होतं."

नायक म्हणतो "पाच म्हणजे सध्या दोनच आहेत. आई, नाना, सुम्मी आता नाहीत; पण तानोमावशी, श्रीपूमामा आहेत."

मास्तर मावशीवरच लिहायला सांगून परवा सोमवारी द्यायला सांगतात.

हा प्रसंग फारच हृद्द आहे. जाधव मास्तरांच्या बोलण्यातून प्रौढ जीए डोकावतात. मास्तर अर्ध्या वाटेवरून परततात. पुढे तानीमावशी ऊभी असते. त्याच्या रडवेल्या चेहऱ्यावरून चौकशी करते. तीचा हात पकडून नायक म्हणतो "हे तसलं काही नाही, निराळं आहे. ती एक माझी गंमत आहे."

मनोमन तानीमावशीवरच्या लेखात लिहायच्या गोष्टी आठवत (उदाहरणार्थ तीने लोणच्याच्या खारात कालवलेला भात संपतो पण भूक रहाते. तीचे एरंडाच्या नळीतले साबणाचे फुगे आपल्या फुग्यांपेक्षा मोठे असतात. श्रीपूमामाला सांगून तीच्यासाठी वहाणा आणायला हव्यात.तीला एक खुरपे हवे. मी मोठा होऊन पैसे मिळवू लागल्यावर तीला नवे निळे झगझगीत लुगडे देणार. तीला पंढरपूरला जाऊन येण्यासाठी पैसे पाठवणार.) तो इतका मावशीवरील

लेखाच्या विचारांत मग्न होतो की त्याला समोरच्या बांधावरून गेलेला मोरसुध्दा दिसत नाही.

दोघे घरी पोहोचतानाच तुळसा घरातून बाहेर पडताना दिसते. तानीमावशी तीला हटकल. भाऊरावानी चहा प्यायला बोलावल्याचे तुळसा सांगते. रागाने मावशी तीने व भाऊरावाने चहा प्यायलेल्या कपबशा दवाखान्याच्या भिंतीवर फेकून फोडून टाकते. तानीमावशी भाऊरावांसमोर उभी राहून म्हणते "आज मात्र अति झालं. आता या घरात मी तरी राहीन नाहीतर ती यशस्वी तरी" निगरगट्ट भाऊराव म्हणतो " तू त्या इरेला पडू नयेत. माझं उत्तर तुला माहीत आहे."

त्या रात्री तीने त्याला सकाळच्या भाकरीवर ताक वाढून जेवण दिले व रागावून झोपवले. मध्यरात्री नायकाला जाग आली ती तानीमावशीच्या ओरडून बोलण्याने. भाऊराव तीच्या गळ्यातील बोरमाळ तुळसाला पंढरपूरला जाण्यासाठी तीन चार दिवसांकरता मागत होते. तानीमावशी म्हणते "ती माळ तुमच्या घरातली नव्हे. ती माळ मला लग्नात कमळीनं दिली आहे. मी जीव देईन; पण माझी माळ देणार नाही. माझं मढं पाडा आधी, मग घ्या ती."

भाऊराव तरातरा दवाखान्यात गेले व परत येऊन त्यांनी एक पुडी तानीमावशीपुढे फेकली. म्हणाले "तुला मरायचं आहे ना, घे हे औषध. चार माणसांना पुरून उरेल. आता बऱ्या बोलानं ती माळ दे--."

भाऊरावानी तानीमावशीच्या गळयात हात घालून माळ हिसकावून. बरोबर तीचे मंगळसूत्र तुटले. शिंक्याच्या तारेने ओरबडून तीच्या कपाळावर रक्त दिसले.नायकाने संतापून पांघरूण फेकले आणि भाऊरावांचा हात पकडून कडकन चावा घेतला. भाऊरावांनी जोरात ढकलल्याने तो समोरच्य

भिंतीवर आदळला. वेंधळयाप्रमाणे उभ्या असलेल्या तानीमावशीने चटकन कपडे वाळत घालण्याची काठी हातात घेतली व म्हणाली "पोराला जर पुन्हा हात लावशील तर तुझ्या अंगाचा शेणकाला करून टाकीन."

दुसऱ्या दिवशी तानीमावशीने पहाटेच नायकाला उठवते. घसाघसा तेल चोळून गरम पाण्याने अंघोळ घातली. लाकडी फणीने केस विंचरून कपाळावर गंधाची टिनकली लावली. थोड्या वेळाने तिने एका लहान गाठोड्यातून चांदीची वाटी व सोन्याचे चार पाच लाखमणी काढले. वाटी त्याला देत ती म्हणाली "ही वाटी बघून घे. परत बघायला मिळायची नाही. तुझ्या बारशाला आले होते तेव्हा कमळीनं मला ती भेट दिली होती."

वाटी व मणी एका फडक्यात घेऊन जाताना म्हणाली " मी बाहेर जाऊन येते. तू कुठं जाऊ नकोस."

नायक तानीमावशीवर लिहायला लागला. दोन ताव भरत आले. मोडलेल्या शिसपेनला तासण्यासाठी ब्लेड शोधताना दप्तरात पुस्तकेच नव्हती. नवल वाटून नायकाने बॅग बघितली तर ती व्यवस्थित भरलेली.

तानीमावशी आल्याबरोबर नायकाने विचारले

“माझं सामान का भरलंस?"

तानीमावशी सांगते "कारण तू आज दुपारी गावी परत जाणार आहेस."

नायक "पण मला अजून स्टेशन वगैरे काही माहीत नाही"

बोरमाळ व मंगळसूत्र शिवायच्या उघड्या गळ्याची तानीमावशी म्हणाली "तू आता मोठा व्हायला शिकलं पाहिजेस. मी तुला किती दिवस पुरणार! नंतर तर तुला सगळं एकट्यानंच सांभाळावं लागेल."

तानीमावशीने (स्वतः काही न खाता) नायकाला मेतकूट भात भरवला. (त्याची बॅग तीने स्वतः घेऊन) दोघे स्टॅन्डवर पोहोचले. तेथील नींबाखाली ती त्याला चिकटून बसून सांगते. "तू आता जाणार. चांगलं मन लावून शीक. तू शहाणा आहेस. मला खूप वाटायचं, घरात पोरं असावेत. एक झालं पण ते दोन महिन्यांतच गेलं. मग तुझ्यासारखा पोरगा कमळीनं पाठवला आणि तू देखील परत चाललास. शेवटी आपला शेर असतो, तेवढंच आपल्याला मिळतं. काही करायला झालं नाही. तुला एक सदरा शिवून देण्याची माझी ताकद राहिली नाही. गोडधोड नाही. घरातलीच साखर बॅगेत ठेवते. श्रीपूला म्हणावं, काही करायला त्राणच उरला नाही."

मोटारीचे तिकीट काढून, आगगाडीत पैसे इब्राहिमकडे देऊन व नायकाला बेळगावकडच्या आगगाडीत बसवून द्यायला तानीमावशी सांगते. वर दोन आणे भूक लागली तर घेण्यासाठी देते.

मग मात्र 'घर सोडून जाताना जुने घर दिसते त्याप्रमाणे रिकाम्या चेहऱ्याने ओलसर डोळ्यांनी पहात उभी

राहिली. नायकाला वाटले तीने हलकट भाऊरावांकडे न राहता आपल्याबरोबर श्रीपूमामाकडे यावे. गाडी सुटताना ती गुडघे उंचावून खाली बसली व डोके खाली घालून रडू लागली.

शाळेजवळ मास्तर कपडे वाळत घालत असताना दिसतात. मारलेली हाक त्याना ऐकू येत नाही. मोटार जरा थांबवायला सांगितलेले इब्राहिमला ऐकू जात नाही. मग नायक तानीमावशीवर लिहिलेले ताव मोटारीच्या खिडकीतून बाहेर टाकतो.(कदाचित मास्तर ते वाचतील व तानीमावशीला भेटून सांगतील. मग ती म्हणेल "वा बराच लबाड होता की पोरगा!" ती आनंदाने हसेल.)

इतरांना मोटारीतून दिसलेले मोर नायकाला दिसतच नाहीत. मध्यरात्री नायक श्रीपूमामाकडे पोहोचतो व मामा खोलीत नसल्याने बाहेर कट्ट्यावर झोपतो.सकाळी उशिरा मामा येतो. नायकाकडून

सर्व हकिकत कळल्यावर मामा नायकाला खाऊ घालून झोपायला सांगतो व बाहेर जातो.

पैशांची व्यवस्था करून श्रीपूमामा तानीमावशीकडे जाऊन तीला आणण्याची तयारी करतो. तो निघाल्यावर थोड्याच वेळात पोस्टमन येऊन एक पत्र टाकतो. नायक पळत जाऊन मामाला ते पत्र देतो. पत्र वाचून मामा परततो व घोगऱ्या आवाजात सांगतो."तानीमावशी गेली. झोपली ती उठलीच नाही"

मामा चिडतो. भाऊरावाला कधीतरी जाऊन झोडपण्याची नायकासमोर प्रतिज्ञा करतो. थोड्या वेळाने सांगतो. "तू घाबरू नकोस. तू आणि मी मिळून त्या भडव्या नशिबाला टांग मारु. आता तू थोडा वेळ बाहेर देवळात खेळून ये."

मामाने जवळजवळ ढकलून दार लावले. नायक देवळाजवळ पोहोचल्यावर त्याला टोपी घरीच विसरल्याचे लक्षात येते. टोपी खिडकीतून मागून घेण्यासाठी नायक तेथे येऊन पहातो तर श्रीपूमामा चिध्यांच्या ढिगावर तोंड टाकून लहान मुलाप्रमाणे एकटाच रडत होता.

नायक माघारी फिरून देवळाजवळील पारावर बसतो. त्या वेळी तेथे आणखी कुणी नव्हते. होती फक्त तानीमावशी! त्याला ढकलून हसणारी मास्तरांना रामरक्षा म्हणून दाखवणारी, धापा टाकत शाळेकडे येणारी, हातातील काठीने भाऊरावांची हाडे मोडायला शांतपणे उभी असणारी आणि मोटार सुटल्यावर उन्हातच गुडघ्यात मान घालून एकटीच बसलेली तानीमावशी!

झाडावरची ताजी कैरी काढून ती फोडून त्यात
मीठ व लाल चटणी घालून ती खावी ही फक्त आठवणच राहिली.
कारण तानीमावशी गेली व जाताना नायकाची
मीठ तिखटाची कैरीच ती आपल्याबरोबर घेऊन गेली.

वाचकांच्या डोळ्यांच्या कडा ओलावणारी ही जीएंची फारच प्रभावी कौटुंबिक स्मृतिकथा आहे. ओघवती भाषा, अकृत्रिम वातावरण, निरागस बालकाच्या नजरेतून गुंफलेली कथा मला खूप आवडली.

- यतीन गुळवणी

तानीमावशीची बहिणीवरील, कमळीवरील, भाऊ श्रीपू, भाचा या वरील अकृत्रिम माया अगदी पदोपदी जाणवते.

किंबहुना ही माया हीच कथेचा केंद्रबिंदू आहे.

आणि श्रीपूमामाची अगतिगता....?!

- प्रमोद कुलकर्णी

कथेतील दवाखाना, त्याच्या खिडक्या असे उल्लेख कथेसाठी पोषक असे गूढ वातावरण निर्माण करते

- स्नेहल बोकील

तुती ही कथा मुलीच्या वडीलानी वाचू नै. मी एकदाच वाचली पुन्हा हिम्मत झाली नाही

- परमजीत सिंग

ह्या सगळ्याच संसार कथा फार सुंदर आहेत, तुती तर पाणीचं येतं सारखं डोळ्यात.

- प्राची बापट

तुती आणि कैरी या कथा, त्यांची मांडणी, भाषा या लर्वच गोष्टी लक्षणीय आहेत. त्यांचे थोडक्यात वर्णन करणे कठीणच.

तुती ( १९६१) आणि कैरी (१९७३) या दोन्ही कथा जोड कथा आहेत. त्यामुळे त्या एकत्रितपणे घेत आहोत.

या कथांत, एका लहान मुलाच्या भावविश्वाद्वारे, एका खचत चाललेल्या मध्यमवर्गीय सुसंस्कृत कुटुंबाचे चित्र जीएंनी रेखाटले आहे.

शेती करणारे वडील, गृहिणी आई, एक मोठा भाऊ, एक सुमी नावाची ताई आणि सगळ्यांत लहान असा कथा नायक. तत्कालिन कुटुंबाचे चित्रच.

उत्पन्न कमी होत जाते, कर्ज वाढत जाते, मोठा मुलगा शिक्षणासाठी बाहेर त्यामुळे त्याचा खर्च वेगळा. या सर्व विवंचनेत घरभाडं थकतं आणि घर सोडावं लागतं.

इथून तुती ही कथा सुरू होते. दुर्दैवाचे दशावतार संपत नाहीत. सुमीचं लग्न बिजवराशी करावं लागतं. त्यामुळे रागावून दादा घराबाहेर पडतो. सुमीला सासरी छळाला तोंड द्यावं लागतं. अखेर तिचा अपघाती मृत्यू (आत्महत्या?) होतो. त्या धक्क्याने वडील आजारी पडतात. घरातली गाय मरते. आणि अखेर वडीलांचाही मृत्यू होतो.

कैरी जी ए कुलकर्णी पिंगळावेळ

कैरी कथेची सुरुवात आईच्या मृत्यूपासून होते. श्रीपुमामा हा कुटुंबाचा जवळचा पण तोही दरिद्रीच. त्यामुळे तो कथानायकाला मावशीकडे नेऊन ठेवतो.

आई नाही हे प्रथम मला जाणवलेच नाही. पण तिच्या रिकाम्या जागेकडे नजर जाताच मात्र भाजल्याप्रमाणे मला समजले- आई नाही, एवढेच नाही तर ती आता परत कधीच येणार नाही.

जीएंच्या या शब्दांनी त्या मुलासाठी (मात्र केवळ त्या मुलासाठीच नव्हे) आपला जीव कासावीस होतो. सहवेदना जाग्या होतात.

कैरी आणि तुती या कथा गेल्या शतकातील सुसंस्कृत पण कनिष्ठ मध्यमवर्गाच्या कुटुंबाचे अगदी टाकोटाक वर्णन आहे. हे वर्णन अगदी आपल्याच

घरातले आहे असे आता साठी सत्तरी ओलांडलेल्या अनेकांना वाटत असेल इतके नेमके. बहिण भावांमधले प्रेम, हातातोंडाशी गाटः असली तरीही बाहेर तसे न दाखवणे, उदार मने, पाव्हणे रावळे, भाड्याची घरे, गाय गुरे पाळणे, शिक्षणासाठी बाहेर असणारी मुले, स्वतः कळ सोसून मुलांची शिक्षणं करणारे आईबाप, बैलगाडीतले प्रवास, दररोजच्या जेवणात शेवटचा भात दूध किंवा ताकाबरोबर जेवणे, आरामखुर्ची आणि आरामखुर्चीत कधीही न बसलेली घरातली मुख्य बाई.

जीएंच्या कथांतून त्या काळाचं वर्णन अचूक डिटेल्स मधे येत रहातं.

- सुनीळ सामंत

तुती लेखक जी ए कुलकर्णी

विवेचक - व्ही एस वाघोलीकर

1) यतिनजीं नी अभ्यासपूर्वक तुती व कैरी यांचे कथानक व भावपरिणाम सांगीतले आहेत. त्यावर लिहिताना वेगळ्या पैलूं तून लिहिणे अवघड आहे. त्यामुळे त्यांवर लिहिताना द्विरुक्ती होवू शकेल. पण या आवडलेल्या भावपूर्ण कथांवर लिहावेसे वाटतेच. त्यामुळे द्विरुक्ती बद्दल यतीनजींची व आपली क्षमा मागून लिहित आहे

2) कथेत बाल निवेदक, भोवतालच्या मोठ्या माणसांच्या जीवनात घडणारे प्रसंग ,त्याच्या शब्दांत सांगत आहे. त्यामुळे त्यामध्ये भावना आहेत. व आपण काही करू शकत नाही, अशी तटस्थतासुद्धा आहे. त्यामुळे ही कथा अत्यंत परिणामकारक

- अगदी आत्मचरित्रात्मक वाटते. ही कथा वाचून गलबलून न जाणारा वाचक दुर्मिळच असेल.

- जीएंच्या अनेक कथांची सुरुवात अस्वस्थपणे होते. व शेवट जास्त अस्वस्थपणात होतो. उदाहरणार्थ ,कैरी ,राधी ,अंजन - - - इत्यादी

तुती कथा वेगळी वाटते. कष्टाने भाकरी खावून, भाड्याचे घरात राहणारे, चौकोनी कुटुंब आहे. थोरला दादा कदाचित 18 वर्षांचा असून शिक्षणासाठी परगावी आहे. पण बालनिवेदक ५ - ६ वर्षांचा आहे. बहिण 15-16 वर्षांची आहे. हसते खेळते घर आहे. आर्थिक चणचण आहे. भाड्याची घरे बदलावी लागतात. तरीही 'बखर बिम्मची ' या जी एं च्या पुस्तकाची आठवण व्हावी, असे, प्रत्येकाला आठवेल असे ,बालजीवन कथेच्या सुरुवातीस आहे.

- त्यात नियती येते ती काळ्या पावलांनी - सुम्मी (सुमन) च्या लग्नानंतरच्या आयुष्यात. आधीची बायको अपघाताने (?) गेलेली, वयस्कर नवरा, गर्विष्ठ, श्रीमंत घरात, सुम्मी ढकलली जाते. तिथे दिवसभर रहाटाचे पाणी काढणे ,काबाडकष्ट करणे, डागाची शिक्षा भोगणे व रानवट माणसांकडून माहेरवरून शिव्या खाणे तिच्या नशीबी येते.

- आणि सुम्मी विहिरीत पडून मरते.

- नंतर बालनिवेदकाच्या आयुष्यात तपाचा वनवास सुरु होतो. वडिलांचे दुखणे, भावाचे भोग ,आईचे दुसऱ्या घरचे कष्ट ,असे सर्व जीवनात येते.

कथेतील वाक्ये - *कृष्णी गाय जुन्या घरी जावून तिथे हाकलल्यानंतर नवीन घरी येत असे.

-* "घाबरट , विहिर काय गिळतेय का तुला?"

- *त्या घरातून येताना मी विहीरीवरचे शेवटचे चाक फिरवून घेतले.

-* सुम्मी पाणी ओढत असताना म्हणाली -" आई मला ने येथून."

- *जांभेकर म्हणाले - "आमची आई. कोण हो तुम्ही?"

-* आमची मैत्री एका दिवसात सुरु झाली व - एका दिवसात संपली.

- * आई बदलली होती. तिचा चेहरा चेपल्यासारखा झाला होता. हाडे खूप वर आली होती व आईचे डोळे पहाताना खोल विहिरीची आठवण झाली.

-* कारट्या ,तू बीए हो. अगर होऊ नकोस. पण आतून बाहेरून दगड हो. अगदी घट्ट डोंगरी दगड हो बघ.

-*** "...आमचे तुतीचे गुपित, सुम्मी दादाला माहीत होते. तुती खाताना अगदी पिकून मऊ जांभळी झालेली असतेना , ती खाऊ नये. ती टचदिशी खाल्ली की, तोंड गोड होते खरे, पण जीभ ओठावर पुसली की सारे संपले! तुती थोडी कच्चीच असावी. म्हणजे अगदी कच्ची नव्हे, तर थोडी पिकलेली, अगदी पिकलेली नव्हे, तर थोडी कच्ची, म्हणजे गोडही लागते, आणि आंबटही लागते. जीभ र व र वते, आणि गोडही लागते. मग तुती बऱ्याच वेळ ध्यानात राहते. हे सुम्मी दादाला माहित होते, पण ते आता इथे नाहीत. आई श्रीपूमामाला ते काहीच माहित नाही. श्रीपूमामाला तर कशाचेही माहित नाही. आता या घरात ते गुपित फक्त एकाच माणसाला माहित आहे.

मला!"

अशी ही कथा मराठीत वाचायला मिळणे हे भाग्यच.

- विलास वाघोलीकर

कैरी. - लेखक जीए कुलकर्णी

विवेचक. ० व्हि एस वाघोलीकर

- - --

I ) कैरी कथेची काही वैशिष्टये मांडता येतील -

२) जीएंनी बालनिवेदकाच्या भाषेत - मोठ्या माणसांचे जीवन काही कथांमध्ये दाखवले आहे. मोठी माणसे कशी अविवेकाने - उलटी सुलटी वागतात. त्या स्थितीत लहान मुलांना मार्ग काढावा लागतो. ते दाखवले आहे. उदाहरणार्थ - तुती - राधी, या कथा. त्याचप्रमाणे 'कैरी 'कथा ही महत्वाची कथा आहे. येथे बाल निवेदक थोडा मोठा आहे. पण परिस्थिती धगाची आहे. वडील नाना - आई कमळी - बहिण सुम्मी हे जगात नाहीत. बाल निवेदक श्रीपूमामाच्या आधाराने तानी मावशीच्या गावी शिक्षणासाठी येतो.

3) आता हे महाराष्ट्रातील एका दुष्काळी गावाचे वास्तविक चित्र आहे. पांढऱ्या मातीचे धुळीचे रस्ते, निवडुंगाचे फड ,कोरडे ओढे, डुकरे ,हे वाचल्यावर वाचकाला म्हसवड जिल्हा सातारा, सारखे दुष्काळी गाव डोळयासमोर येते..

4) पात्रे -

अ) बालनिवेदक हा आईबापाविना पण हुषार मुलगा आहे. नवीन शाळेतले मुलांचे प्रकार - शिक्षकांचे प्रकार दाखवले आहेत. बालनिवेदकाला कथेशेवटी ,भूक पोटात ठेवून, मोठा रेल्वे प्रवास, एकट्याने करून, बेळगावाला गरीब श्रीपू मामाकडे परत यावे लागते.

ब ) भाऊराव व तुळसा - भाऊराव हा तानीमावशीचा पती, तर तुळशी गळयात पडलेली मोलकरीण आहे. घरात असे वातावरण असताना बालमन उध्वस्त होते.भाऊराव हे,बायकोचे- कुटुंबाचे जीवन ,व्यसनाने उध्वस्त करतात, हा जळजळीत अनुभव वाचकाला सुन्न करतो.

5) भाऊराव पैसे उडवतात. त्यामुळे घरात चार आणेही नसतात रॉकेलच्या चिमणीवर मिणमिणत्या प्रकाशात शर्ट शिवून द्यावा लागतो. श्रीपूमामा अनवाणी जातो. ताक भाकरीचे जेवण असते. "देवाकडे मी फारसे मागितले नाही. पण जे थोड़े मागितले तेही त्याने मला दिले नाही." असे तानी मावशी म्हणते. भाऊराव भांडणात ,रागाने दोन पुड्या देतो. "विष घ्यायचे तर घे. तुझी कटकट संपेल" असे म्हणतो.

6) व्यसन - मानवी जीवनात गुन्हा ,व्यसन यांचे स्थान आहे. जगात आबादीआबाद आहे ,अशी भाबडी वर्णने जी एंनी केली नाहीत. अनेक कथांमध्ये व्यसने दाखवली. उदाहरणार्थ -

7) 'सोडवण' मध्ये दारु पिण्यासाठी मित्राकडे जातो व इकडे मुलगी पाण्यात बुडते.'इस्किलार'मध्ये अर्नाल दारू पिवून चालतो. व सैनिक त्याला खडुयात ढकलतात.. 'अंजन'मध्ये भैरुला अफूचे व्यसन असते व तो खड्डयात पडतो.' गिधाडे' मध्ये जुगाराचे व्यसन आहे.

8) तसेच अनेकदा पात्रे स्त्रीलोभात अडकतात. 'कसाब' मध्ये, कमळीला चैनीची चटक लागते. 'पारधी 'मध्ये माई डॉक्टरांच्या गळयात पडते. 'अखेरचा दिवस' मध्ये सावित्री परत येते व नवऱ्याला विष घालते.

9) येथे 'कैरी'मध्ये तुळसा घरात येते व भाऊरावांना पान देत, गावभर उंडारते.

10) काही वाक्ये -" मोर काय असे दिसतात काय? हिरवी निळी वीज असते राव."--" मोर कुणाला दिसला तर दुसऱ्याला दाखवावा. नाही दिसला तर तक्रार करू नये. " यामध्ये जी ए 'मोर' प्रतिमेने कलेबद्दल सांगत आहेत.

11) 'तुती 'कथेत तुती ही मध्यवर्ती प्रतिमा आहे. या कथेत कैरी ही मध्यवर्ती प्रतिमा आहे - कैरी खाताना हिरवी चटणी चालत नाही. लाल चटणी मीठ पाहिजे -

शेवटी तानीमावशी (विषाच्या पुड्या घेवून ) रात्रीत निधन पावते. ही बातमी टपालाने श्रीपूमामा व बालकाला कळते.

1 2) कथेशेवटी ,बाल निवेदकाला तानीमावशी ,व न दिलेली लाल तिखटाची कैरी आठवत रहाते. अर्थात वाचक त्या प्रतिमेच्या बुडून जातो. अशी ही चटका लावणारी 'कैरी 'कथा वाचावी.

oooooooooooooooooooooooooooooooo

टीप - कैरी कथेत, तानीमावशी - आई कमळी - बहिण सुम्मी - बालनिवेदक, प्रामुख्याने येतात. जीएंनी पत्रांत म्हटले आहे - कैरी कथा सोनूमावशीवर आहे ,असा अनेकांचा समज आहे. पण ते तसे नाही. अर्थात लेखकाने कथेचा उगम स्पष्टपणे सांगणे अपेक्षित नाही.

मी एक उदाहरण देतो -नदीकाठच्या झाडावरील पक्षाकडे स्पष्टपणे पाहणे, व ते दृश्य चित्रित करणे - हा कलेचा एक भाग होवू शकतो. पण नदीच्या वाहत्या पाण्यात त्या पक्षाचे प्रतिबिंब पाहणे, व चित्रित करणे -हा सुद्धा कलेचा भाग होतो.' कैरी' कथेत, सोनूमावशीची छाया - प्रतिबिंब आहे ,असे म्हणण्यास आधार आहे ----

कथेतील तानीमावशी दुष्काळी गावात रहात आहे. कथेत बालनिवेदकाचे वडील ,आई ,व बहिण यांच्या निधनांचे उल्लेख आहेत. नवरा व्यवस्थित वागत नाही. तिथे बालनिवेदकाचे शिक्षण काही महिनेच झाले. नंतर तो रेल्वेने बेळगाव येथे आल्याचा उल्लेख आहे.

जीएंनी "काजळमाया" पुस्तकाच्या अर्पण पत्रिकेत म्हटले आहे - "सोनू मावशीस, तू आम्हाला आणखी एक आई होतीस.” या वास्तविक उल्लेखावरून

सोनूमावशीने ,जी एं ना आईसमान लळा लावला होता. कथा वाचताना यामुळे कथेचे सच्चेपण जास्त लक्षात येईल. धन्यवाद.

- विलास वाघोलीकर.

तुती- जी ए कुलकर्णी- हिरवे रावे व कैरी- पिंगळावेळ

एखादे कुटुंब (किंवा समाज) गरीब वा श्रीमंत असणे ही एक गोष्ट असते आणि ती आर्थिक प्रगतीकडे जाते की गर्तेकडे ही वेगळी गोष्ट असते. (उदा. अनिल अंबानी हा कितीही श्रीमंत असला तरी गर्तेकडे जातो आहे).

तुती ही कथा आर्थिक स्थिती खालावण्याकडे कल असलेल्या कुटुंबाची आहे. मल्लापा कासाराचे घर ते देसाई गल्लीतील घर हा प्रवास त्या कुटुंबातील एक लहान मुलगा कसा पहातो ते वाचताना मन सुन्न होते. अगदी छोट्या गोष्टी, पण त्याचा बालमनावर उमटणारा ओरखडा आपल्याही मनावर उमटेल असे जीएंचे शब्द आहेत.

जीए यांना परदुःखाचा कळवळा आहे. आणि तो कळवळा आपल्या वाचकापर्यंत पोहोचवण्याची हातोटी शब्दकळाही आहे. यातील केवळ एकच गोष्ट असणारे लेखक आपण पहातो. ज्यांना मनापासून कळवळा आहे पण शब्दसंपत्ती अपुरी पडते किंवा आक्रस्ताळेपणा येतो, असे लेखक मागे पडतात. उलट शब्द संपत्ती प्रचंड आहे पण मनातून खरा कळवळा नाही असे लेखक पुढे आले तरी त्यांच्या ढोंगीपणाने उघडे पडतात. विचक्षक वाचक ते हेरू शकतात.

तुती या कथेतील खास मला भिडलेल्या गोष्टी-

शेवग्याच्या शेंगांच्या डिंकाच्या गोळयांत आनंद शोधणरा मुलगा.

सुम्मीचे हसणे, ( देव्हाऱ्याच्या पितळी तोरणातले घुंगूर वाजलयासारखे, पावकप चहा पिणारे नाना, वांग्याची भाजी, गाडगंभर घट्ट चुन्यासारखं दही, आणि भाकरी. सोबत शेतातूनच तोडून आणलेल्या हिरव्या मिरच्या. नाना रागावून बाहेर गेले त्या दिवशी सुम्मी जेवली नाही आणि भावाला खुपसे दही मिळाले. दूध न देणाऱ्या गायीला सोडून देता न येणारे, व त्यापायी घर न मिळणारे कुटुंब. यातून या सगळ्या कुट्टुंबाच्या नैतिकतेचे आणि भावुकतेचे जीएंनी केलेले वर्णन वाचून वाचक स्तब्ध होतो.

या कथेची मांडणी रिपोर्ताज सारखी आहे. जे समोर दिसतं ते मांडणं. त्याचा अर्थ लावण्याचं काम वाचकावर सोपवलं आहे. अनेक घटना किंवा मोठ्या माणसांचे उद्‌गार तो लहान मुलगा कोणत्याही पुर्वग्रहाशिवाय सरळ जसे ऐकले तसे सांगतो. जीएंचा आपल्या वाचकांवर किती विश्वास होता ते त्यातून जाणवतं. किंवा जीएंना आपल्या लेखनासाठी कोणता वाचक अभिप्रेत होता तेही जाणवतं. साहित्याकडे मनोरंजन किंवा टाईमपास म्हणून पहाणारा वाचक त्यांच्या डोळयांसमोर नव्हता. वाक्याच्या मागचा दडलेला अर्थ शोधणारा वाचकच त्यांनी गृहित धरला होता.

जीएंच्या लेखनकौशल्याचाही या कथेत वेगळा घाट दिसतो. इस्किलार मधे लांबलचक पल्लेदार चार चार ओळींचे एक एक वाक्य लिहिणारे जीए, या दोन्हीही कथांत सहा आठ दहा शब्दांपलिकडे जात नाहीत. ते शब्दही अगदी साधे. रोजचे. संस्कृतप्रचुर नाही. अवजड आणि अवघड शब्दांशिवायही किती सुंदर लिहिता येते ते जीए दाखवतात. अगदी साने गुरुजींसारखी वाक्यं. श्यामची आईच जणू. (विनोदात ते चिंवि आणि पुलंहून अधिक खट्याळ लिहू शकतात हेही आपण पाहिलं आधी). इथे मला पं. वसंतराव देशपांडेंच्या गाण्याची आठवण झाली. या भवनातील गीत पुराणे म्हणताना प्रत्येक अक्षरावर ताना पलटे अलंकारांची बरसात करणारे वसंतराव

जेव्हा बगळ्यांची माळ म्हणतात तेव्हा एकही तान घेत नाहीत. श्रीमंती असली तरी ती कुठे दाखवायची आणि कुठे नाही याची जाण असलेले जीए मला या कथेत दिसले, अगदी साध्या स्वच्छ वेषातले.

अस जरी असलं तरीही मला वाटतं जीएंनी या दोन(आणि राधी) गंभीर कथांसाठी एक लहान मुलगा प्रथमपुरुष म्हणून निवडण्यामागे, किंवा ही कथा मुळात प्रथमपुरुषी लिहिण्यामागे (त्यांच्या इतर काही कथा प्रथमपुरुषी असल्याचं मला आठवत नाही) काय कारण असावं हे मला अजूनही कोडंच वाटतं. कोणी सोडवेल?

- सुनील सामंत

- जीएंनी बालनिवेदक निवडला याची कारणे शोधण्याचा या आधी प्रयत्न केला आहे - I ) बालनिवेदक भावभावनांचे तीव्र निरिक्षण करू शकला. 2) सर्व घटनांत - लग्न - संसार -छळ - मृत्यूमध्ये तो कर्ता नसल्यामुळे ,त्रयस्थपणे सांगू शकतो. 3) कैरी कथेच्या विवेचनात, मी टीप दिली आहे. ही कथा प्रत्यक्षातील सोनूमावशीचे प्रतिबिंब आहे. त्या दृष्टीने या कथा आत्मनिवेदनाची प्रतिबिंबे आहेत. कलावंत म्हणून नावे - गाव इत्यादी बदलण्याचे स्वातंत्र्य घेणे उचित आहे. जाणकारांनी विगो वडेर यांचे - अर्पणपत्रिकांतून जी ए दर्शन, राजहंस प्रकाशन ,पुणे ,हे पुस्तक जरूर पहावे. जी ए कथांची जाणीव जास्त समृद्ध होईल आपल्या परवानगीने हा उल्लेख करत आहे. धन्यवाद.

- विलास वाघोलीकर

जीएंच्या आपणांसर्वांनाच मोहीत करणाऱ्या (चपखल बसणाऱ्या)

उपमार्लकाराचा इतर कथांमध्ये आढळणारा वर्षाव या दोन तीन आत्मकथनांत अभावानेच दिसतात. निवेदकाची बालसुलभ,

अकृत्रिम पण सुजाण कथनामुळे वाचकांच्या मनाचा ठाव घेतला जातो. नीवेदकाचे स्वतःचे बोल व त्याच्या कृती पूर्णतः नैसर्गिक वाटतात.

- यतीन गुळवणी

तुती आणि कैरी वाचताना आपण अनुभवलेले बालपणीचे छोटे छोटे निरागस आनंद आठवले. आत्ताच्या लहान असलेल्या पिढीचे आनंद किती वेगळे,रेडिमेड आणि चकाकणाऱ्या वस्तूंवर औलंबून आहेत, किती फरक पडला आहे सर्व गोष्टीमध्ये..हे प्रकर्षाने जाणवले. सामाजिक जीवन आणि सांस्कृतिक मूल्ये यांची एकमेकातील वीण किती घट्ट असते...दुसऱ्यांचा विचार करणे त्यांच्यासाठी निरपेक्ष भावाने काही करणे, झाडा- पाना -फुलांसाठी, प्राण्यांसाठी करणे हे अपसूक सवयीतुन येतं होते.. (जे घरातील स्त्रियांच्या वागण्यात दिसते )त्यात मी काही केले हा भाव नव्हता. एक भक्तीभाव होता, त्यात साधेपणा वं निव्वळपणा होता जो आता हरवत चालला आहे.

- विशाखा आपटे

पिंगळावेळ: कैरी(१९७३)(२३ पाने):

लेखकाचे कथा लिहिताना वय ५१ वर्षे-

कथालेखनाची मुख्य दिशा सापडल्यावर १३ वर्षे

विवेचक -माधव पुराणिक

१ कथासंग्रहाचे नाव - पिंगळावेळ - अर्थ- पिंगळा म्हणजे लहान आकाराचे घुबड. घुबड हे लक्ष्मीचे वाहन आहे. पिंगळे रात्री आवाज करतात. ते गुप्त धनाची भाषा बोलतात असा समज आहे.ते क्रूर,अशुभ समजले जातात.

पुरूष स्त्री बरोबर घ्या नात्यांमध्ये ( वासना,प्रणय.प्रेम) अदभुत,गूढ भावनिक अनुभव(धन) रात्री आक्रमकपणे शोधत असावेत.

२ शीर्षक/ मुख्य आशय- कैरी : तानीचे स्वप्न असते कि तिचे आयुष्य झाडावरच्या उबदार ( पूर्ण पिकलेल्या रसाळ ( झाड आदिम प्रतिमा = पुरुष) आंब्यासारखे असावे.

कैरीचा लाल तिखट( शरीर) मिसळून,मीठ लावून ( गाणे गुणगुणत ( भाऊराव), विडा भरवत स्वाद घ्यावा. हिरवी चटणी नको. हिरव्याने लाल होऊन अदभुत स्वाद व्हावे.

ते स्वप्न पूर्ण होत नाही शेवटी कैरी देठ तुटून मातीत मिसळून जाते. तिची मूल न झाल्याने आंबा होऊन फळायची इच्छा ही अपूर्ण राहिली.

मी च्या वयात येण्यापूर्वीच्या अवस्थेत ( वय ९+-१३) दिसलेले रंग - मुख्य रंग हिरवा आहे. हा रंग लाल रंगाच्या तिखटापूर्वीचा, लाल फळापूर्वीचा, उसळणाऱ्या लाल रक्तामुळे वीणा,लाजून,बहरुन लाल होणाऱ्या कांतिपूर्वीचा आहे.

उदाहरणे- अ) हिरवट पिवळट पसारा ब) हनुवटी वरील हिरवा गोंदलेला ठिपका / हिरवी खूण क) हिरव्या दाढीप्रमाणे झाडी ड) हिरवी निळी वीज इ ) हिरवे कुलूप

मी हा वयात येण्याच्या काठावर आहे. त्याच्या जाणिवा/ भावनिक प्रतिक्रिया सर्वसाधारण, ढोबळ,तीव्र, आहेत. पण त्याचे पुढील आयुष्यातले त्यामुळे भावनिक प्रारुप ठरते म्हणून जी एं नी हा बालनायक निवडला.

तानी प्रणय/ प्रेम भावनेचे वात्सल्य भावनेत रूपांतर करते पण ते अपुरे ठरते.भय व दु:ख या मूलभूत भावना तिला आत्मनाशाकडे नेतात.

३ कथेची सुरुवात व शेवट - नेहमीप्रमाणेच पण आता जास्त भयावह अशा घटनेने - मी च्याआईचा मृत्यू, मी चे लहानपणी चे ( साधारण नवव्या वर्षी= इयत्ता दुसरी) घरापासून विस्थापित होणे ( नायकाची दु:खद मनस्थिती), भीषण गरिबीचे वर्णन यांनी होते.

शेवट तानी मावशीचा मृत्यू ( ४ माणसांना पुरेल एवढे विष नवऱ्याने आणून दिल्यानंतर) ने होतो.

शेवटचे वाक्य "तानीमावशी गेली व जाताना माझी मीठ तिखटाची कैरी घेऊन गेली."

हे नायकाने प्रौढ स्थितीत लिहीले आहे.ते नायकाची भावनिक स्थिती तानीमावशी सारखीच हृदयद्रावक होते असे दर्शविते.

" मी कधीच मोर पाहत नाही.मला मोर दिसत नाहीत.( नायक)

नायकाचे नशिब असे कि ऐहिक/ मानसिक आयुष्यात त्यांच्या वाट्याला प्रणय / प्रेमाचे सुख येत नाही

जी एं च्या कथांमध्ये नायकाचा मृत्यू ( भावनिक) वेगवेगळ्या पध्दतीने होतो हे वैशिष्ट्य पूर्ण वाटले.

४ कथेतील तत्त्वज्ञान- ९ वर्षांच

९ या कथेत प्रथमच भारतीय तत्वज्ञानातले देव,दैव यांचं उल्लेख आहेत. हे विशेष होय

अ) तानी ' दैव देते व कर्म नेते" ( हताशपणा,हतबलता)

ब) श्रीपुमामा - भडव्या नशिबाला टांग मारू( सर्वनाश झाल्यावर)

क) श्रीपुमामा - माझं फुटके नशिब

ड) नशिबाने दावा साधला

१० समारोप- वास्तवाचा भास करुन देणारी पण अस्तितावादी उत्तम कथा

माधव पुराणिक

जी ए तुती(२३पाने)हिरवे रावे १९६१कथालेखकाचे वय ४१

जी ए _ कैरी (२४पाने)पिंगळावेळ १९७३लेखकाचे वय ५३

दोन्ही कथांमधून लेखकाच्या प्रतिभेचा विकास

विवेचक - माधव पुराणिक

१ दोन्ही कथा प्रथम पुरूषी एकवचनी,बालनाट्य ९ वर्षे

२ कैरीतला शेवट प्रौढ वयातला व वेगळा

३ दोन्ही कथांमध्ये फार साम्य

४ अत्यंत गरिबीमुळे अन्नान्नदशेकडून आलेल्या दुःख व निराशेतून आधी भावनिक, सामाजिक व शेवटी शारीरिक मृत्यूकडे एकट्याने प्रवास

५ दोन्ही कथांत विहीर हे महत्त्वाचे स्थळ.तुती मध्ये विहीरीत २ प्राणी व ३ स्त्रिया मरतात

६ दोन्ही कथांत सर्वत्र मृत्यूची सावली पसरलेली.तुती कथेत एकूण ४ प्राणी (नैसर्गिकरित्या) व २ स्त्रिया सासरची पुरूषप्रधान छळ करण्याची वृत्ती व माहेरचे अठरा विश्व दारिद्र्य याने मरतात.एक स्त्री अपघातात मरते

७ तुती व कैरी कथांची शीर्षक संकल्पना सारखी आहे

८ तुती ४+१ देवळांचे ओझरते उल्लेख आहेत तर कैरी कथेत ठसठशीत उल्लेख आहेत

९ तुतीत शाळा/ झाडं/ मास्तर/ फुले इ संक्षिप्त भाग कैरी कथेत विस्ताराने आहे.ब्रह्म संकल्पना नकारात्मक आहे

१० समारोप - १२ वर्षांत जी ए घ्या कथांची अतिवास्तववादी ( भयावह कल्पना) + अस्तितावादी (एकटेपणा, क्षुद्र अस्तित्वाची जाणीव, पोकळ सामाजिक संबंध इ) चौकट तीच राहिली. जगण्यातील मृत्यू ( शारीरिक, भावनिक, सामाजिक इ) भोवती फिरत राहिली. (" मरणात खरोखर जग जगते"!?)

११) "अस्तीस्तोत्र","अहम्"(१९६१) या कथांच्या बीजाचा पुढे वृक्ष झाला आहे.

१२ )तुती कथेत नाना अर्धमेले होतात.आई खोल विहीरीच्या डोळयांची होते. मी ला विहीरीचे तोंड गिळण्या करता मोठे वाटते. घरही आधी ४ मग ३ मग २ होत नाहीसे होते.

१३) कैरी कथेत स्त्रियांचे दुःख अप्रतिम, कलात्मक आणि मूलभूत असे व्यक्त केले आहे

पुराणिक सर, आपण केलेले अत्यंत शास्त्रशुद्ध विवेचन अतिशय आवडले. जीएंच्या कथाविश्वाचा प्रवासही (तुती ते कैरी) आपण रेखाटला आहे. या कथेचा अस्तित्ववादी कोन मला फ़ारसा जाणव्ला नव्हता. मुळात ही तत्त्वज्ञानविषयक कथा नसावी असे माझे मत पडले व जीएंच्या इतर कथांहून ही कथा वेगळी, वास्तविक जीवम्न रेखाटणारी वाटली. यातले नशीबाबद्दलचे उल्लेख एकत्र करून आपण यामागचा नियतीचा करंट नेमका हेरला आहे. हा वेगळा पैलू दाखवल्याबद्दल मनःपुर्वक आभार.

- सुनीळ सामंत

माननीय पुराणीक सरांना सादर नमस्कार. आपण तुती व कैरी कथांचे केलेले चिंतनशील समालोचन, खूप आवडले. आपल्या लिखाणातून इतर अनेक मुद्दे मिळतात. हे सर्वांना फायदेशीर आहे. आपण तुती कथेवरील विवेचनात क्र. 10 मुद्दा मांडला आहे. तो मी ,अभ्यासक ,विद्यार्थी भूमिकेतून ,आपणाकडून समजून घेत आहे.

२)आपण क्र. 10 मुद्यामध्ये अतिवास्तववादी व अस्तितावादी यांच्या चौकटीचा उल्लेख केला आहे. मला अस्तितावादी - अस्तित्ववादी विचारसरणी थोडी माहीत आहे. ती अशी - माणूस हा अस्तित्वात असतो व त्याला जाणीव असते.त्याला जगताना प्रत्येक क्षणी निर्णय घ्यावा लागतो ( म्हणून तो अटळपणे असतो ). तो निर्णय अंतिमतः एकाकी असतो. म्हणून त्या निर्णयाला तो अंतिमतः स्वतः जबाबदार असतो. असे अस्तित्ववादी ( म्हणजे अस्तितावादी ) विचारसरणी मांडते. आवश्यकतेप्रमाणे यात आपण दुरुस्ती करावी.

३)नंतर आपण अतिवास्तववादाचा उल्लेख केला आहे. ती विचारसरणी समजून सांगण्याचे मार्गदर्शन आपण कृपया करावे. आवश्यक लिंक्स, पुस्तके, संदर्भ द्यावेत ही विनंती. आपणास तसदी देत आहे, याबद्दल क्षमस्व. धन्यवाद. गुड डे.

- विलास वाघोलीकर

# गीतपाखरू- सांजशकून

- विवेचक- राजेश उनवणे

सांज शकून कथासंग्रहातील ही एक रुपक कथा. १९६५ च्या मराठवाडा या दिवाळी अंकात प्रथम छापून आली.

येथे ग्रुपवर कथा सांगताना सोयीसाठी ती तीन भागात लिहिलेली आहे. मूळ कथा सलग आहे. तीन भाग संपल्यानंतर शेवटी कथेतील रुपकांचा मला भावलेला अर्थ व कथेचा सारांश विशद केलेला आहे.

कथेच्या प्रथम भागात कथेचे स्थळ वर्णन केलेले आहे.

भाग-१

एक धुळीने भरलेला रस्ता आहे. त्यावरून 'अनवाणी' प्रवाशांची एक रांग हळूहळू पुढे सरकत आहे. रस्त्याच्या कडेला एक झाड आहे. त्या झाडाखाली (आभाळाएवढे हिरवे गोपुर असलेल्या झाडाखाली—जीए) शुभ्र लांब दाढी असलेला वृद्ध बसला आहे. त्याचे डोळे खोल, निर्विकार, अनुभवज्ञानी आहेत. कारण खूप सुख-दु:ख त्याने समोरून जाताना पाहिलेली आहेत. सुरकुतलेल्या चेहऱ्यावरून त्याच्या वयाचा अंदाज येत नाही. पण त्याच्या वयासंबंधी जीए लिहितात,-- 'पृथ्वीच्या क्षितिजावर सूर्य प्रथम उगवला, त्यावेळीही त्याचा चेहरा इतकाच सूरकुतलेला असेल. एका उत्पातक्षणी सूर्याची शकले होऊन वेड्या वेगाने ती भिरभिरु लागतील, तेव्हाही त्याचे डोळे इतकेच अनुभवज्ञानी असतील.'

याचा अर्थ, पृथ्वीच्या/सृष्टीच्या जन्मावेळी हा वृद्ध होता व अंत होताना पण असणार आहे. दोन्ही वेळी तो तसाच असणार आहे,-- "खूप सुखदु:ख पाहूनही निर्विकार, अनुभवज्ञानी. स्थिर."

अशा या वृद्धासमोर वेगेवगळया रंगाच्या बिया असलेल्या वाट्या ठेवलेल्या आहेत. बिया रत्नाप्रमाणे झगझगीत आहेत. वृद्धाच्या मागे वाळलेल्या फुला रोपांचा ढीग पडलेला आहे. ---'पण ती मातीमोल झाल्याने एकेकाळी ती जिवंत फुले होती, फुले देणारी रोपे होती हे कोणाच्या ध्यानात येत नसे.'---इति जीए.

(कथेच्या स्थळाचे वर्णन करणारा पहिला भाग येथे संपतो. दुसऱ्या भागात कथास्थळावरील घटना घडण्यास सुरुवात होते.)

भाग-२

वृद्धासमोरून जाताना प्रत्येक प्रवासी रेंगाळतो. एखादे बी उचलल्याशिवाय तो वृद्धाचे समोरून हलत नाही. पण त्यापैकी --- 'पुष्कळजण काही अंतर पुढे गेल्यावर वैतागून त्या बिया फेकून देत व ओलसर डोळयांनी चालू लागत.'—इति जीए. पण बिया न घेता आजतागायत कोणी प्रवासी गेलेला नाही. जीएंच्या भाषेत --– 'पण वृद्धासमोरून तशाच विमुक्त मनाने पुढे जाणारा प्रवासी अद्याप जन्मला नाही.'

आता एक प्रवासी वृद्धासमोर उभा राहतो. हा या कथेचा नायक आहे. तारुण्यात त्याने नुकतेच पाऊल टाकले आहे. तो नीलमण्यासारखे दिसणारे बी उचलतो. त्या बी चे वर्णन करताना वृद्ध म्हणतो, "त्याला मैत्रीचे फूल येईल. त्याचा रंग आभाळाच्या तुकड्यासारखा व गंध जाईचा असतो. त्या वासामुळे प्रवास कितीही लांबचा असला तरी शरीर दमत नाही. मन कोमेजत नाही. पण ते बी रुजायला फारफार वर्षे लागतात. तुझ्याने तेवढा दम धरवेल का?"

प्रवासी अधीर उत्साहाने मान हलवतो. वृद्ध दीर्घ नि:श्वास सोडून ते बी त्याला देतो.

पण समाधान न झालेने प्रवासी आणखी एक बी उचलतो. ते बी माणकाच्या तुकड्या एवढे, सूर्याच्या पहिल्या किरणासारखे आहे. त्या बी चे वर्णन करताना वृद्ध म्हणतो, " हे बी प्रीतीचे आहे. ते अगदी ठिणगी पडल्यासारखे वाढते किंवा पाहतापाहाता गोठून मरते. पण याच्या फुलाचा प्रकाश अंधारात दिसतो. प्रवासात एखादा रक्ततारा मार्ग दाखवत असल्याप्रमाणे ते सोबत राहते. पण त्याला सांभाळून हात लाव. त्याच्या पाकळ्यांना विषारी धार असते. त्यांनी काढलेले रक्ताचे ओरखडे कधी ही बरे होत नाहीत."

तरुण प्रवासी हावरेपणाने अनेक बिया ओंजळीत घेतो. वेगवेगळ्या रंगाच्या या बिया आहेत. गडद निळसर हिरव्या, जांभळया, आंब्याच्या कोवळया पालवी सारख्या लालसर, कस्तुरीमृगाच्या पाठीसारख्या गडद तपकिरी अशा अनेक बिया त्याने गोळा केल्या. ते पाहून वृद्धाचा चेहरा सुरकुततो. तो म्हणतो, "कशाला इतक्या बिया नेतोस? त्यातील एक रुजवायला आयुष्य खर्चावे लागते, हाताच्या काड्या होतात, वेड्याप्रमाणे श्रद्धा ठेवावी लागते."

पण हे म्हणण्यापूर्वी एक वाक्य कथेत आहे.---"स्वप्नांची किंमत द्यावी लागते, ती ती उचलताना नव्हे, तर ती फेकून देताना."—इति जीए.

प्रवासी तरुण आहे. त्याचे दंड बलवान आहेत याचा अर्थ तो शक्तिमान आहे. त्याच्या चालण्यात एक आत्मविश्वास आहे. हा आत्मविश्वास एवढा कणखर, दृढ आहे की --–'स्वप्नांच्या बियांवर नुसती फुंकर टाकली तर तीला फुले येतील असा समज होता.'---जीए.

पण यापेक्षाही सामर्थ्यशाली प्रवाशांचा या प्रवासात “चोळामोळा” झालेला त्या वृद्धाने पाहिला होता. तो चोळामोळा कथेत वाचण्यासारखा. हा प्रवास पश्चिम क्षितिजा पर्यंतचा, त्या खाली उतरण्याचा आहे. असे उतरलेले प्रवासी फार कमी आहेत. ----‘स्थिर हातात एखाददुसरे फूल घेऊन पश्चिम क्षितिजाखाली उतरलेले प्रवासी फार थोडे. त्या सगळयांची नावे वृद्धाला माहीत होती, कारण तसे होणे हा त्याचा पराभव होता. त्याच्याशी झालेल्या व्यवहारात त्याच्यावर मात होती.’— जीए.

या तरुणाचाही पराभव होणार याची वृद्धाला खात्री आहे. प्रवासी पुढे सरकताच वृद्ध त्याच्याकडे हसून पाहतो. प्रवाशाच्या सर्व आशा, श्रम, आपलेच होणार व या मागच्या ढीगात पडणार याची वृद्धास खात्री आहे. या ढीगाचे वर्णन भाग-१ मध्ये आहेच.

भाग -३

तरुण प्रवाशाच्या प्रवासाला आता सुरवात झालेली आहे. चार छोट्या कुंड्यात बिया टाकून काठीची कावड बनवून तो निघाला आहे. सोबत दुर्दम्य असा आत्मविश्वास आहे. त्याचा प्रवास पश्चिम क्षितिजाच्या पलीकडे गेल्यावर संपणार आहे. पण तो संपण्यापूर्वी कुंडीतल्या रंगीत, स्वप्नांच्या बियांना अंकुर फुटून तशीच रंगीत फुले आली पाहिजेत, तरच आपण वृद्धा बरोबर झालेल्या व्यवहारात म्हणजेच या प्रवासात यशस्वी होऊ याची त्याला जाणीव आहे.

कथेत इतर प्रवासी कंटाळून या कुंड्या फोडून टाकतात. रागाने भिरकावून देतात. बियांना अंकुर न फुटल्याने वैतागून “ओलसर डोळयांनी” प्रवास सोडून देतात. काही दुबळी पावले ओढत तसेच चालले आहेत. त्यांच्या कुंड्या फुटून माती

व बिया केव्हाच खाली पडल्या आहेत. पण ते तशाच वेड्या हट्टाने फुटक्या कुंड्या घेऊन क्षितिजाकडे चालले आहेत.

ज्यांचे बियांना अंकुर आले व फुलेही आली असेही काही सामर्थ्यशाली प्रवासीही आहेत. त्यांचे वर्णन वृद्धाचे विचारातून पूर्वीच कथेत आलेले आहे. ते करताना जीए लिहितात –--" रक्ताच्या शिंपणीने फुलवलेले फूल नुसते तोडायलाही आता सामर्थ्य नसलेले, फुलांच्या दिशेने धडपडत असतानाच निष्प्राण झालेले हात त्याने पाहिले होते. पण तो काही बोलला नाही. कारण या प्रवाशालाही ते सार पुढे दिसणारच होते."

कथेच्या नायकाच्या प्रवासातही आत्तापर्यंत काही वेगळे घडत नाही. अश्रू, रक्त यांची शिंपण करूनही बिया अंकुरल्या नाहीत. पश्चिम क्षितिजाची कड हातभर राहिली आहे. --- 'ती ओलांडून खाली पाऊल टाकले, की सारे श्रम संपले, दु:खाची झळ नाही, स्वप्नांची गरज नाही.'---जीए.

त्याचे मन विषण्ण होते. इतर प्रवाशाप्रमाणे त्या कुंड्या फोडून टाकाव्यात म्हणून तो एका कुंडीस हात घालतो, तेव्हा दुरून एक स्त्रीची 'नको नको' अशी येणारी आर्त किंकाळी, दुसरीला हात लावताच ओळखीच्या माणसाची 'थांब थांब' अशी खूण व तिसरीच्या वेळेस आईची आठवण त्यास कुंडी फोडण्यापासून परावृत्त करते. चौथीच्या वेळी मात्र क्षितिजा पलीकडून निळसर प्रकाशातील, कमळावर बसलेल्या आकृतीने दर्शन देऊन स्मित हास्य केल्याने चौथी कुंडीही तो फोडत नाही.

शरीरातील त्राण संपले आहेत. क्षितिजाचे हातभर अंतर त्याला असह्य झाले आहे. तरीही त्याने क्षितिजा पलिकडे एक पाऊल टाकले व विषण्ण मनाने कुंड्या खाली ठेवल्या. त्याच्याजवळ एकच श्वास उरला असताना वेगेवेगळ्या

प्रकाशकिरणांचे कोंभ आले. तो श्वास अश्रूत भिजवून हलकेच फुंकर मारत कोंभावर पसरून टाकला.

चार कोंभ एकत्र होऊन त्याचा दिव्य पक्षी आकाशात उडाला आपल्या सारखाच चार-सहा पक्ष्यांच्या संगतीत गाऊ लागतो. त्या स्वरांनी बाकीचे प्रवासी मोहरून जाऊन त्यांच्या पावलांचा वेग वाढतो. पण त्या स्वरांचा खरा अर्थ प्रवासी नायकास कळतो. त्याच्या आयुष्यातील प्रमुख घटना त्या स्वरात आहेत.

तो स्वर ऐकताच ‘ हजारो दिवस मागे असलेला ’ वृद्ध जाळे टाकून त्या पक्षास पकडण्याचा प्रयत्न करतो. वैतागाने जाळे परत घेऊन ते उसवून टाकतो.

प्रवासी क्षितिजापलिकडे स्वत:चे शरीर आर्त हताश ताणाने ढकलतो. पण त्याच्या चेहऱ्यावर तृप्तीचे सौम्य हास्य आहे. हसतहसत बिया देणाऱ्या वृद्धा कडून ते शेवटचे हास्य जिंकून घेतलेले आहे.

येथे कथा संपते.

------0000-----

कथेमधील काही महत्त्वाची रुपके व त्यांचा अर्थ ---

१) धुळीचा रस्ता --- हा रस्ता म्हणजे जन्मापासून मृत्युपर्यंतचा प्रवास.

२) अनवाणी प्रवासी –-- म्हणजे जन्माला आलेला जीव. मनुष्य जन्माला येतो त्या क्षणाला त्याच्यापाशी नग्न देहाशिवाय काहीच नसते. म्हणून त्याची पावले अनवाणी आहेत.

३)        झाड --- हे झाड आभाळाएवढे हिरवा गोपुर असलेले आहे. म्हणजे अतिविशाल,ब्रह्मांडासारखे आहे. प्रवाशांची रांग या झाडाजवळूनच जाते. हे प्रवाशाचे जन्मठिकाण आहे.

या झाडाच्या गोपुरापाशी प्रवासी येणे म्हणजे मनुष्याचा जन्म होणे.

४)        वृद्ध --- म्हणजे नियती. ती वृद्धाच्या रूपाने या गोपुरात बसलेली आहे. अनेक सुख-दु:खे समोरून जाताना तिने पाहिली असल्याने ती अनुभवसंपन्न, अनुभवज्ञानी आहे. त्यामूळे तिचे डोळे खोल व निर्विकार आहेत. ती पृथ्वीच्या जन्मापासून आहे व पृथ्वीचा अंत होईल तेव्हाही ती असेल. (दोन्ही वेळी तो तसाच असणार आहे,-- "खूप सुखदु:ख पाहूनही निर्विकार, अनुभवज्ञानी. स्थिर." –इति जीए)

त्यामूळे तिच्या (नियतीच्या) वयाचा अंदाज (वृद्धाच्या) सुरकुतलेल्या चेहऱ्यावरून बांधता येत नाही. तिच्यासमोर वाटयामध्ये निरनिराळया रंगाच्या बिया आहेत.

५)        रंगबिरंगी बिया --- या बिया रत्नाप्रमाणे आहेत. प्रेम, मैत्री, क्षमा, करुणा, निष्ठा, सत्य, शुचिता, पावित्र्य, वात्सल्य इत्यादी मानवी जीवनातील सद्गुण- जीवनमूल्ये म्हणजे या बिया. या बिया (म्हणजेच हे सद्गुण) प्रवाशाने स्वत: वाटीतून उचलायचे आहेत. नियती ते स्वत:च्या हाताने देत नाही. आजपर्यंत एकही प्रवासी हे सद्गुणाचे बी न घेता पुढे गेलेला नाही. यातील एक जरी बी नीट रुजले व त्याला फूल आले (म्हणजे त्याने एकजरी सद्गुण आयुष्यात नीट जोपासला) आणि ते फूल (सद्गुण)

घेऊन जर एखादा मानव क्षितिजापलिकडे ( म्हणजे मृत्यूच्या महाद्वारातून- मोक्षाकडे) गेला तर....

त्याने नियतीला जिंकलेले आहे. हा त्या वृद्धाचा पराभव आहे. वृद्धाशी (नियतीशी) झालेल्या व्यवहारात प्रवाशाने (मनुष्याने) केलेली मात आहे.

आत्तापर्यंत अशी मात, असा पराभव करून काहीजण गेलेले आहेत. पण ते फूल स्थिर (स्थितप्रज्ञाप्रमाणे) हातात धरून क्षितिजा पलीकडे (मोक्षप्राप्ती) गेलेले आहेत. ते फार थोडेजण आहेत. त्यांची नावे वृद्धाला(नियतीला) माहिती आहेत.

मोक्ष मिळावा असे मानवाचे ध्येय असते. एक स्वप्न असते. पण ते प्रत्येकास साध्य होत नाही. सदगुणांची जोपासना करताकरता अनेकांच्या जीवनप्रवासात ते स्वप्न कोलमडून पडते. अनेकांचा स्वप्नभंग होतो. म्हणून जीए कथेत लिहितात,---
“स्वप्नांची किंमत द्यावी लागते, ती ती उचलताना नव्हे, तर ती फेकून देताना.”

६) बियांचे रंग --- रंगांच्या शास्त्रामध्ये मुख्य रंग निळा, हिरवा, तांबडा, पिवळा हे आहेत. पांढरा रंग सर्व रंगांचा गुरु आहे. ( शुभ्र लांब दाढी असलेला वृद्ध- इति जीए)

निळा रंग हा ज्ञानाचे प्रतिक आहे. प्रसन्नता, स्तब्धता, शांतता, स्थिरता अशा भावना तो निर्माण करतो. (कथेचा नायक प्रथम नीलमणी सारखे दिसणारे बी उचलतो) हा आकाशाचा रंग आहे व तो मर्दानी व मैत्रीचाही समजला जातो. कथेत नीलमणी बी ला मैत्रीचे फूल येणार आहे.

दुसरे बी सूर्याच्या पहिल्या किरणासारखे आहे. सूर्योदय होताना सूर्य विशेषकरून लाल, पिवळया रंगाची पखरण करतो. त्याचप्रमाणे सूर्याचे सकाळचे

पहिले किरण आरोग्यदायी असतात. लाल रंग हा प्रेमाचे प्रतिक मानला जातो. म्हणून हे बी प्रीतीचे, प्रेमाचे आहे.

रंगशास्त्रामध्ये-- पिवळा रंग अग्नीचे प्रतिक आहे. तपकिरी रंग हा काळया-पांढऱ्या रंगाचे मिश्रण आहे. त्यामूळे तो निर्जीव रंग असल्याचे समजले जाते. हिरवा रंग इच्छाशक्तीच्या लवचिकपणाचा निर्देशक असून आरंभभाव व चिकाटी, हट्टीपणा, स्वाभिमान या रंगातून व्यक्त होतो. अध्यात्मशास्त्रात जांभळा रंग ध्यानासाठी उत्कृष्ट समजतात.

७) चार कुंड्या ---- धर्म, अर्थ, काम, मोक्ष हे चार पुरुषार्थ मानले जातात. चार कुंड्या त्याचे प्रतिक आहेत असे वाटते. कारण कथेच्या शेवटी नायक चौथी कुंडी फोडावयास निघतो तेव्हा क्षितिजा पलीकडून निळसर प्रकाशातील, कमळावर बसलेल्या आकृतीने दर्शन देऊन स्मित हास्य केल्याने चौथी कुंडीही तो फोडत नाही. ब्रह्मदेव हे कमळावर बसलेले असतात.

८) कुंड्या फोडण्यासाठी उचलताना धावून आलेल्या व्यक्ति –

नायकाने हावरेपणाने अनेक सदगुणांच्या बिया घेतल्या. जीवन प्रवासात अनेक वेळा दु:खद प्रसंग येतात. त्यावेळी मनुष्य निराश होतो व अश्रु ढाळतो. स्वकीयांनीच केलेल्या विश्वासघातामुळे जखमा होतात. सद्गुणां वरचा त्याचा विश्वास उडतो. मग या बिया तो फेकून देतो. पण कथेतील नायकाचा विश्वास दुर्दम्य आहे. स्वत;वर त्याचा दृढ विश्वास आहे. दु:खद/निराशेचे प्रसंग या जीवनप्रवासात त्याने सदगुणांची पेरणी केलेली आहे. निस्वार्थी मैत्री, निर्मोही प्रेम जीवनात भेटलेल्या व्यक्तींना दिलेले आहे. दिलेले आहे. प्रवासाचा अंत होत आलेला असताना (मृत्यु

समीप आला असताना) त्या बियांना तरीही अंकुर -फुले येत नाहीत. तेव्हा तो निराशेने कुंड्या फोडण्यासाठी उचलतो. त्यावेळी..

निर्मोही प्रेमाची खूण असलेली नायकाची सहचारिणी, निस्वार्थी मैत्रीचा साक्षीदार असलेला त्याचा मित्र (परिचित आवाज), आणि आई तर करुणेची, वात्सल्याची मूर्तिच असते. हे सगळे धावून आल्याने नायक कुंड्या फोडत नाही.

९) वृद्धाच्या मागे वाळलेल्या फुला रोपांचा ढीग -- कथेत इतर प्रवासी कंटाळून या कुंड्या फोडून टाकतात. रागाने भिरकावून देतात. काही दुबळी पावले ओढत तसेच चालले आहेत. त्यांच्या कुंड्या फुटून माती व बिया केव्हाच खाली पडल्या आहेत. पण ते तशाच वेड्या हट्टाने फुटक्या कुंड्या घेऊन क्षितिजाकडे चालले आहेत. येथे सदगुणांची -जीवनमूल्यांची जोपासना करणे त्यांना प्रयत्न करूनही जमले नाही., असेच लेखकास सुचवायचे आहे. सामर्थ्यशाली प्रवाशांचा ही या प्रवासात "चोळामोळा" झालेला आहे. त्यांच्याकडील बीयांना अंकुर येऊन फुले आली. पण ते तोडण्याचे व क्षितिजापलिकडे जाण्याचे (मोक्ष-प्राप्ती करण्याचे) त्राणच त्यांच्याकडे राहिले नाहीत. ते मृत्यूस सामोरे गेले. वृद्धाच्या मागे वाळलेल्या फुला-रोपांचा असलेला ढीग हा त्याचीच साक्ष आहे.

१०) कुंडीतुन आलेले konbh--- मृत्यु समीप आला असताना(क्षितिज हातभर राहिले आहे, एकच शेवटचा श्वास राहिलेला आहे ---इति जीए) नायक चारी कुंड्या ठेवतो. त्याचवेळी अंकुर फुटून कोंभ येतात. ते प्रेम, मैत्री, वात्सल्य याचे प्रतीक आहेत. नायकाने जीवनप्रवासात या सद्गुणांना दृढ विश्वासाने जोपासले आहे. (त्याच्याजवळ एकच श्वास उरला असताना वेगेवेगळया प्रकाशकिरणांचे कोंभ

आले. तो श्वास अश्रूत भिजवून हलकेच फुंकर मारत कोंभावर पसरून टाकला.---- जीए) ते कोंभ पाहून नायक आनंदाचे अश्रु त्यावर टाकत नाही. तर ते अश्रु रोखून, त्यामध्ये भिजवलेला तो शेवटचा श्वास त्या कोंभावर पसरवून टाकतो.... हलकेच फुंकर मारल्यासारखा..!

-------०००-------

थोडक्यात,

तरुण प्रवासी हा या कथेचा 'नायक' आहे. तर वृद्ध हा या कथेचा ''महानायक'' आहे.

नायकाने अखरेच्या क्षणी महानायकास जिंकलेले आहे.

या जीवन-प्रवासात त्याने अनंत अडचणी असतानाही सदगुणांची, मानवी जीवनमूल्यांची जोपासना केलेली आहे. शेवटच्या क्षणापर्यंत त्याने हार मानली नाही. नायकाचा हा प्रवास आता कायमचा संपलेला आहे. शेवटच्या श्वासापर्यंत त्याने धीर सोडला नाही. जेव्हा तशी वेळ आली तेव्हा ते सद्गुण धावून आले व त्याचा आत्मविश्वास ते (ज्यांच्यावर त्याने निस्वार्थी पणे जीवन घालवले अशा व्यक्ती) खचू देत नाहीत.

एक दुर्दम्य आत्मविश्वास प्रथमपासूनच नायकापाशी होता. त्या आत्मविश्वासाने त्यास विजयी केले. तो जीवन-मुक्त झालेला आहे. त्याच्या चेहऱ्यावरील तृप्तीचे हास्य त्याचे द्योतक आहे.

सुरवातीस बीया देताना हसणाऱ्या वृद्धाकडून (नियतीकडून) त्याने ते हास्य जिंकून घेतले आहे. नायकाने महानायकाचा केलेला हा पराभव आहे. आणि जो

महानायकास जिंकतो तो ही महानायकच ठरतो. महानायक होऊन जातो. महानायकात विलीन होतो.

टीप : -

कथेतील सर्व रुपकांचे अर्थ वरील सारांशमध्ये लिहीलेले नाहीत.

‘गीतपाखरू’ या रुपक कथेचा मला भावलेला वरील अर्थ हा अंतिम आहे असा गैरसमज कृपया करून घेऊ नये. एखाद्या रसिक जाणकारास कथा वाचून त्याच्या दृष्टिकोनातून कथेचा दुसरा नवीन अर्थ सुचू शकतो. तो वाचावयास मिळणे आनंदमयी असेल.

मूळ लेखकास म्हणजेच जीएंना हाच अर्थ अभिप्रेत होता का याबद्दल ज्ञात नाही.

जीएंना ही कथा कशी सुचली, कथा लिहितानाचे त्यावेळचे त्यांचे भावविश्व, कथेतील रुपकांचा त्यांना अभिप्रेत असलेला अर्थ याबाबत एक उत्सुकता आहे. जिज्ञासा आहे. ती पूर्ण होईल का याबाबत संदेह आहे.

पण विशेषत: या कथेच्या निर्मितीबाबत ग्रुप वरील सर्व मान्यवरांपैकी कोणास कोठे काही वाचावयास मिळाले असेल अथवा कथेच्या निर्मितीबाबत थोडीफार जरी माहिती असेल तर ती ग्रुप वर वाचावयास मिळाल्यास खूप आनदं होईल.

धन्यवाद..! 🙏

- राजेश उनवणे

स्वप्नांची किंमत द्यावी लागते, ती ती उचलताना नव्हे, तर ती फेकून देताना.

The perfect point.

राजेशजी, अतिशय उत्तम आणि विस्तृतपणे विवेचन केले आहे. कथेतील बारकावेही नेमके टिपले आहेत.

अनवाणी- अगदी बरोब्बर अर्थ लावला

कुंड्या फ़ोडताना धावून आलेल्या व्यक्ती. सुंदर अर्थ.

शेवटच्च्या कुंडीबद्दल थोडा गोंधळ आहे. ती लक्ष्मी आहे का? मोह? लोभ? कमळ हे आणखी कशाचे द्योतक आहे का?

वृद्ध हा नियती की नियंता की काळपुरूष? की अजून काही? चर्चा व्हावी

विवेचन आवडले. सुंदर लिहीले आहे. कथा न वाचलेल्याही समजेल असे.

-सुनीळ सामंत

माननीय राजेशजी - गीतपाखरूचे आपण केलेले प्रास्ताविक व विवेचन हे अभ्यासपूर्वक - चिंतनमय - व शब्द सौंदर्य दाखवणारे आहे. प्रत्येकाने जरूर वाचावे असे. ही कथा वाचकांना अर्थ लावायला आव्हानात्मक पण तरीही अर्थपूर्ण आहे. मी देत असलेल्या विवेचनात पुनरुक्ती होईल याबद्दल आपली व इतरांची क्षमा मागून हे विवेचन देतो. धन्यवाद.

-विलास वाघोलीकर

श्री राजेश सर

अप्रतिम निव्वळ अप्रतिम. कथेचा सारांश फार सुंदर रितीने विषद केला आहे. गीतपाखरु रुपक कथेचा अन्वयार्थ अगदी योग्यच आहे. अप्रतिम विश्लेषण. आपली शैली खूप छान आणि ओघवती आहे. कुठेही क्लिष्टपणा नाही. वाचताना हे जाणवत होते की कोणीतरी कथेचा सारांश आणि अन्वयार्थ सांगत आहे. खूप खूप

प्रशंसनीय.

अत्युच्च दर्जाचे बौद्धीक समाधान दिल्याबद्दल खूप खूप धन्यवाद.

HAT'S OFF TO YOU Mr. RAJESHJEE.

-शिवाजी कुऱ्हाडे

गीत पाखरू - ( सांजशकुन ) लेखक जी ए कुलकर्णी

विवेचक- व्ही एस वाघोलीकर

। ) ही कथा ,जी ए कुलकर्णी यांची प्रमेय -कथा वाटते. अर्थ लावताना , गणितात + क्ष किंवा - क्ष अशी अनेक उत्तरे येवू शकतात. तशी ही कथा वाटते.

२)पात्रे व प्रसंग - झाडाखाली वृद्ध पुरुष बसला आहे. प्रत्येक प्रवासी त्याच्या समोर जावून बी घेवून कुंडीत लावतो. व प्रवास करतो. नायकही चार बियांची कुंडी घेवून प्रवास करतो. बहुतेक सर्व प्रवासी अयशस्वी होतात. कुंडीत फूल आले तरी ते पाहण्याआधी प्रवासी कोसळतात. व ते फूल मातीमोल होते.

३)( अनंत कथेप्रमाणे) हा एकमेव प्रवासी, कष्टाने क्षितिजापर्यंत जाण्याआधी ,त्याच्या बीयांचे अनेकरंगी फूल व नंतर पाखरू बनून ,आकाशात उडते व अलौकिक गीत गाते. त्या गीतपाखरूला पकडण्यासाठी वृद्ध जाळे टाकतो. पण अयशस्वी होतो. व प्रवासी समाधानाने क्षितीजपार होतो - मरतो.

४) वृद्ध पुरुष म्हणजे कालपुरुष. त्याला भूत, वर्तमान ,भविष्य यांचे ज्ञान असते. मत्स्यकन्या ( पारवा ) कथेतही असा वृद्ध पुरुष दाखवला आहे.

५ )तो वृद्ध पुरुष प्रत्येक बीचे गुणदोष दाखवतो. मैत्री, प्रेम, स्वप्ने ,आईची माया ,शांतता यांच्या बीया असतात. त्यांना रक्त ,घाम, वेळ यांचे शिंपण करावे लागते.

काही बीया रूजायला वेळ लागतो. काही ठिणगीप्रमाणे रुजतात. काहींच्या पानांना विषारी धार असते. काही गोठून जातात. काहींना फूल यायला इतका वेळ लागतो की ,ते तोडण्यासाठी हात उचलायचीही शक्ती रहात नाही. यामध्ये जीए माणसाच्या स्वप्नांचे - महत्वाकांक्षांचे प्रकार दाखवतात. व ते निवडून आयुष्याचा प्रवास करावा लागतो असे सांगतात. बीयांना रंगीत कोंब येवून फूल व उडणारे पाखरु होण्यातून ,जीए प्रतिभेवर भाष्य करतात.

६ )यामध्ये खूप प्रकारच्या प्रतिभा येतात.बागकामातील प्रतिभा आहे. चित्रकलेतील रंग आकार समजण्याची प्रतिभा आहे. उंच जावून बर्ड व्ह्यू पाहणाची प्रतिभा आहे. जीएंच्या शब्दांत आकाशस्थ प्रश्न पाहण्याची प्रतिभा आहे. पाखरू होते - म्हणजे शिल्पकलेची प्रतिभा आहे. गीत गाते, म्हणजे शब्दकलेची प्रतिभा आहे व स्वरांत गायन आहे, म्हणजे संगीताची प्रतिभा आहे. हे सर्व उडणारे आहे, गतीमान चित्रपटासारखे आहे.जीए सर्व कलांबद्दल बोलत आहेत.गीतपाखरूचे गीत ही कलाकृती असते. ती कलाकृती, काळपुरुष पकडून नष्ट करू शकत नाही.

७)मायकेल एंजेलोची शिल्पे ,लिआनार्डोची चित्रे, वाल्मिकींचे रामायण ,मोझार्टच्या संगीतरचना,वेरुळचे शिल्प मंदिर... या थोड्या तरी काळाच्या पलिकडे जातात. पण त्यांचा कलाकार मात्र क्षितिजापलिकडे जावून निधन पावतो.

८) जीएंनी कलेबद्दल अनेक कथांत लिहिले आहे - 'प्रवासी' कथेत गीतकार म्हणतो," त्याला खूप डोळे असल्याने खूप दिसे. त्यामुळे त्याची गीते लोकांना सहन न झाल्याने ,त्याला जंगलात ठेवले जाते." तसेच' प्रसाद 'कथेत म्हटले आहे -" तुला न का चालता येईना - पण तुझे शब्द फार दूरच्या प्रवासाला निघतील."तसेच ' ऑर्फियस'मध्ये त्याच्या संगीतबद्दल देव म्हणतो ,"तुला मृत शरीराला जिवंत करता आले नाही ,तरी तू मृत क्षण मात्र जिवंत करतोस."

९ )जीए कुलकर्णी या कथेत, काळपुरुष, आयुष्य, त्यातले कष्ट ,कलाकाराचे कष्ट, प्रतिभावानाची कलाकृती व तिचे खूप काळ टिकणे ,नंतर कलाकाराचा मृत्यू यावर भाष्य करतात. म्हणून ही कथा, कलाकृती व कलावंताच्या दृष्टीने खूप महत्वाची आहे. धन्यवाद.

- विलास वाघोलीकर

विलासजी, आपला प्रमेयकथा हा शब्द आवडला.

जीएंच्या या कथेतील विविध कलांचे बारकावे व त्यांची सखोल जाण हे या कथेचे चरमबिंदू आहेत हे खरेच. जीएंसारखा प्रतिभावंत जर लेखक नसता तर ते इतर कोणत्यातरी माध्यमातून आपल्यापर्यंत आलेच असते.

ही कथाच मुळी कलाकाराच्या "जीवनाहून मोठ्या जीवनाचा" उत्सव आहे. कलाकार मरण पावतो आणि तरीही अमरच असतो. लताजींचा नश्वर देह जरी आता नसला तरी त्या आपल्यात अनंत काळ असतील. या अर्थाने कलाकाराचे जीवन

त्याच्या शारीर जीवनाहून फ़ार मोठे असते. जीएंच्या कथेचा हा अतिशय आशावादी संदेश आपण नेमका हेरला आहे.

- सुनीळ सामंत:

श्री वाघोलीकर यांना स.न.

१ ही गटचर्चा सुरू झाल्या पासून प्रत्येक कथेवर तुम्ही सातत्याने, सखोलपणे, समर्पकपणे,सुंदर चित्रांसह,सविनय ,सुरेख टिपणे लिहीत आहात.ती मी आवडीने वाचतो.

२ या सक्रिय सहभागाबद्दल तुमचे अभिनंदन.

३ मी १९७३ च्या आसपास अस्तित्व वादी लेखकांचे ( काफ्का,काढू,सार्त्र हायडेगर, ) साहित्य वाचले. त्याची उदाहरणे अनुभवातून समजली.

सध्या मुराकामी हा जपानी कथाकार ( प्रत्येक कथा ४० पाने ८ कथासंग्रह) अस्तितावादी साहित्याचा अग्रणी आहे.त्याच्या कथांत रूपक नाही,उपमा- अलंकार नाहीत, मृत्यू नाही, शहरी आधुनिक श्रीमंती/ मध्यमवर्गीय जगणे,सिन्हा घटना,खूप संवाद आहे असूनही कथा गडद काळय रंगाची निराशा जन क. जी एं चा मुराकामी सध्यचा प्रतिनिधी.( नोबेल पारितोषिकाची शक्यता)

४ अतिवास्तववाद इ वर इतर समीक्षा लेख, प्रस्तावना इ तून वाचले.त्याची उदाहरणे जी एं च्या प्रत्येक कथेत पुष्कळ आहेत.

५ कधीतरी अतिवास्तववादाच्या मुख्य सूत्रावर टिपण लिहीन.

माधव पुराणिक

गीतपाखरू- जी ए कुलकर्णी- सांजशकुन

जीएंची १९६५ मधली ही कथा. चाळीशीत पदार्पण केलेले , आता नवोदित नसलेले पण अजूनही श्रेष्ठ साहित्यिकांत गणले न जाणारे जीए तेव्हा असावेत. खांडेकर, फ़डक्यांचा तो काळ होता. त्यावेळची ही कथा.

जीएंच्या रुपककथांची शैली बहरत होती. भाषा प्रासादिक होत होती. रुपक आणि भाषा या दोन्हीही अर्थांनी ही कथा लक्षवेधी आहे.

“त्याला मैत्रीचे फूल येईल, " वृद्ध म्हणाला. “त्याचा रंग आभाळाच्या तुकड्यासारखा असतो, व गंध जाईचा असतो. त्याच्या वासामुळे प्रवास कितीही लांबचा असो, शरीर दमत नाही, मन कोमेजत नाही. पण ते रुजायला फार फार वर्षे लागतात. तुझ्याने तेवढा दम घरबेल का ?"

प्रवाशाने अधीर उत्साहाने मान हलवली. एक दीर्घ निःश्वास सोडून वृद्धाने त्याला ते बी दिले, पण प्रवाशाचे समाधान झाले नाही. त्याने सूर्याच्या पहिल्या किरणासारखे, माणकाच्या तुकड्याएवढे एक बी उचलले.

"हे बी आहे प्रीतीचे. ते अगदी ठिणगी पडल्याप्रमाणे वाढते, किंवा

पाहता पाहता गोठून मरते. पण याच्या फुलाचा प्रकाश अंधारात दिसतो. प्रवासात एखादा रक्ततारा मार्ग दाखवत असल्याप्रमाणे ते सोबत राहते. पण त्याला सांभाळून हात लाव, कारण त्या पाकळयांच्या कडांना विषारी धार असते. त्यांनी काढलेले रक्ताचे ओरखडे कधी बरे होत नाहीत."

त्या प्रवाशाने हावरेपणाने ऑजळ भरून घेतली. मोराच्या मानेप्रमाणे गडद निळसर हिरव्या, आत एक ठिणगी जळत आहे अशा जांभळया, आंब्याच्या कोवळया पांलवीसारख्या लालसर, कस्तुरीमृगाच्या पाठीसारख्या गडद तपकिरी अशा अनेक बिया गोळा केल्या. स्वप्नांची किंमत द्यावी लागते, ती ती उचलताना

नव्हे, तर ती फेकून देताना, हे त्या प्रवाशाला अद्याप माहीत नव्हते. वृद्धाचा चेहरा जास्तच सुरकुतला. तो म्हणाला, "कशाला इतक्या बिया नेतोस ? त्यातील एक रुजवायला आयुष्य खर्चावे लागते, हाडांच्या काड्या होतात, वेड्याप्रमाणे श्रद्धा ठेवावी लागते."

सुनीळ सामंत

गीतपाखरू सांजशकुन १९६५_ ३ पाने

विवेचक_ माधव पुराणिक

१) या कथेत प्रथमच सुरुवात व जवळजवळ शेवटापर्यंत खूप सकारात्मक भाव, समृद्ध जगण्यासाठीच्या मूलभूत भावना जी एं नी अतिशय कलात्मकरीत्या, सुंदरतेने, प्रभावीपणे चितारलेल्या आहेत. शेवट मात्र नेहेमीप्रमाणे न करता नायकाचा मृत्यू पण स्थितप्रज्ञ दाखवलेला आहे.

मुक्तीचा अनुभव शेवटच्या क्षणीच येतो असे सुचविले आहे.तो कोणाला सांगता येत नाही. पण प्रयत्नांनी काही व्यक्ती मुक्त होतात हे प्रथमच मान्य केले आहे. पण हे प्रमाण ७० ० कोटीत ७०० इतकं नगण्य असू शकते असे निराशाजनक ही सुचवितात.

ही मुक्ती प्रत्येक माणूस व कलाकार ही घेउ शकतो.

कलाकार या शुध्द भावना वा शुध्द सत्य जाणीव लेखनाद्वारे व्यक्त करतो.

काही व्यक्ती सांसारिक प्रयत्नांनी ही मुक्ती मिळवितात.

जी एं नी विमुक्त व श्रध्दा हे भारतीय तत्वज्ञानातील शब्द प्रथमच वापरले आहेत.

२ श्री राजेशजींनी उत्तम ,समर्पक,योग्य असे रूपकांसंबंधी विवेचन केले आहे त्यासंदर्भात माझे मत मांडतो -कंसात त्यांचे मत. रूपके-

अ) धुळीचा रस्ता -(जन्मापासून मृत्यूपर्यंतचा प्रवास) यात धूळ म्हणजे धूसर, अस्पष्ट आकलन, रस्ता चुकविणारे

आ) अनवाणी प्रवासी-( जन्मवेळ= नग्न देह= अनवाणी पाऊले)- या चिरंतन सुखाच्या शोधात बाह्ू गोष्टींचा उपयोग कमी.पाउलांना कष्टाची सवय जास्त उपयोगी

इ) झाड- ( प्रत्येकाच्या जन्माचे ठिकाण) हे निसर्गाच्या, (हिरवे गोपुर) विश्वाच्या अनंत शक्तीचे प्रतीक आहे. प्रत्येक जण ही मर्यादित शक्ती अनुभवतो.

ई) वृद्ध - (नियती, सुखदुःखापलिकडे, निर्विकार ) हे जन्मापासून ते शारीरिक मृत्यू पर्यंतच्या काळाचे प्रतीक आहे. या वेळात प्रत्येकाला या भावनिक, सामाजिक काळासमोरून जावें लागते.व्यक्तीच्या मनातल्या काळाचा (वर्तमान, भूतकाळ भविष्यकाळ) अंत होतो. हा काळ प्रत्येकाच्या मनातले विश्वव्यापी मन ( universal mind), आदिम भावना पण आहे.( कार्ल युंग). प्रत्येक प्रवाशाचे नियतीने त्याला दिलेले मन व अंतर्मन शेवटच्या क्षणापर्यंत या काळ/ विश्वव्यापी मन/मनाला सतत फसविणारी माया यांच्या बरोबर असते.

उ) रंगीबेरंगी बिया - ( प्रेम, मैत्री,क्षमा,करूणा, निष्ठा,सत्य,पावित्र्य, वात्सल्य इ मूल्ये) प्रत्येक प्रवासी शाश्वत सुखाच्या, आनंदाच्या शोधात असतो. त्याच्या दु:खद मनाला सुखाचे अस्तित्व माहीत असते. त्याला एकतरी बी घ्यावी लागते कारण तो सुखदुःखाच्या बंधनात असतो. विमुक्त नसतो.पण ती अमूर्त इच्छा ( त्याच्या विश्वव्यापी मनातली) त्याला वृध्दाकडे खेचते.

एकतरी बी रुजते म्हणजे दुसऱ्या स्त्रीवर/वस्तूंवर आधारित सुख दुःख मनातून नाहीसे होऊन मन दिव्य आनंदाचा उत्सव होणे. तरूण ( मन, अंतर्मन) व वृध्द

(विश्वव्यापी मन, विलय भावना) प्रत्येकात असतात ही अस्तित्ववादी अपरिहार्य निवड सारखी करावी लागते.

ऊ) बियांचे रंग-१ निळा- (ज्ञान,आकाश- ज्ञान,स्थिरता, प्रसन्नता,शांतता, स्तब्धता,)२ लाल-(सूर्य,लाल, प्रीती)

३ पिवळा - (अग्नी) इ

चार बिया या मनाला सर्वोच्च सुख देणाऱ्या ४ भावना - शेवटच्या क्षणीही मनाच्या तळातून वर येऊन प्रत्येकाला सावरणाऱ्या,आहेत.

बी नं १ स्त्री ची अंधुक आकृति= शरीरसुख, प्रणय, प्रीती.

बी नं २ = परिचित चेहेऱ्याचा माणूस= मैत्री= सामाजिक, भावनिक आधार

बी नं ३ = लहानपणी वात्सल्यात न्हाऊ घालणारी आई

बी नं ४= शांत, सस्मित चेहेरा = गुरूतुल्य व्यक्ती

या चार बिया शुध्द स्वरूपात विश्वव्यापी मन होतात. तोपर्यंत शेवटच्या क्षणापर्यंत अथक कष्ट करावे लागतात.मग शरीर थकून पडले तरी मन विश्वव्यापी झाल्याने सर्व संवेदनांची( स्पर्श, रूप (चित्र),वाणी(शब्द,ध्वनि),श्रवण ( गीत,नाद,स्वर), हात(पंख होतात) जाणीव मन व इंद्रिये यांच्या पलिकडे अतिसूक्ष्म होऊन गीत पाखरु होते. मग माया नष्ट होते व जीव बियांखेरीज विमुक्त होतों.

ए) ४ कुंड्या ( धर्म,अर्थ,काम,मोक्ष , निळया कमळावरील व्यक्ती= ब्रह्मदेव ) या कुंड्या म्हणजे प्रत्येकात असलेले शृंगाररस( रति भाव),मैत्री= भक्तीभाव, वात्सल्य= करूण रस,हे प्रयत्नांनी शुद्ध, स्वच्छ,निर्मल,स्फटिक रूप होऊन शांत रसात= मुक्ती भाव विलीन होतात.

ऐ) कुंड्या फोडणाऱ्या व्यक्ती - प्रयत्नवीर नायक मन विशाल करून प्रेम,मैत्री,करुणा, विश्वास सर्वांवरच दाखवितो. मर्यादित सुखदुःखाचे उदात्तीकरण करून शुध्द भावनेचे दिव्य बीज शाश्वत करतो. त्यांची आठवणीतील प्रतिके (स्त्री ,माता,मित्र गुरू) शाश्वत रूप घेतात.

ओ) वाळलेल्या फुलारोपांचा ढीग -( सामर्थ्यवान प्रवाशांचा चोळामोळा,अपयशाने) हा ढीग आतापर्यंत मरण पावलेल्या माणसांचा होता.त्यांच्या प्रेम, वात्सल्य, करुणा,शांती इ अमूर्त पण सुखदुःखाच्या भावना बियांच्या रुपात वृद्ध माणूस ( अनंत काळ,माया,विशवमन) बाळगून होता.जीवांना त्या घेऊनच जगायचं होते- मुक्त व्हायचे होते.

ओ) कुंडीतून आलेले कोंब-( अश्रू व रक्त यांचे बलिदान शुध्द शाश्वत भावना निर्माण करते.) देहबुध्दी - मनाची सुखदुःखे यांचे बलिदान गीत पाखरांचे दिव्य गाणे उत्पन्न करते

३) समारोप- एक लोकिक शब्दात व्यक्त केलेली अलौकिक कथा.प्रभावी रूपक/प्रतीकांच्या द्वारे जगण्याचा अर्थ लावण्याचा केलेला काव्यमय प्रयत्न

माधव पुराणिक

माधव सर, आपण यातला जो सकारात्मक भाव पाहिला तोच मलाही भिडला आणि भावला. जीवन आनंदाचे आहे, आणि ते टिपले पाहिजे.

एकूणच सांजशकुन हे पुस्तक अस्तित्त्ववादापासून, शून्यवादापासून (अस्तिस्तोत्र) ते सकारात्मकतेचा (अहम) प्रवास आहे.

- सुनीळ सामंत

एकंदरीतच गीत पाखरू ही कथा एका कविते सारखी आहे. प्रतिभावान कवीची कविता वाचताना जसे दरवेळी एखाद्या ओळीचा नवीन संदर्भ लागतो तसे या कथेचे आहे.

साधारणपणे प्रत्येक मनुष्याचे जीवन हे प्रवासाच्या रुपकातून दाखवले आहे या बाबत सगळयांचे एकमत आहे.

प्रत्येकाच्या कल्पनाविलास करण्यास या कथेत खूपच वाव आहे.

तरीपण माझ्या मते खरा जीवनाचा प्रवास प्रत्येक माणूस बालपण संपवून स्वतःचे जीवन सुरू करतो तेव्हा सुरू होता तेव्हा तो आपल्या आयुष्याचे ध्येय ठरवतो. वेगवेगळी स्वप्ने पाहतो ती स्वप्ने प्रत्यक्षात आणण्याची धमक म्हणा शक्ती म्हणा , दृढ इच्छा म्हणा त्याच्या मध्ये तारुण्याच्या उंबरठ्यावर आसते.

माझ्या मते बियांचे रूपक हे प्रवासाला निघालेल्या माणसाच्या स्वप्नांचे आहे. त्याला स्वतः ची स्वप्ने ( बिया) निवडायचे स्वातंत्र्य आहे. प्रत्येक व्यक्ती ला बिया निवडताना वृध्द व्यक्ती त्याला प्रत्येक स्वप्न पूर्ण करण्यासाठी येणाऱ्या आडचनी बाबत सावध करत आहे.

काही पोस्ट मध्ये बिया चे रूपक नातेवाईकांसाठी वापरल्याबाबत मत दिले आहे. माझ्या मते नाती ही जन्माने आपल्याला चिकटतात. ती निवडायचे स्वातंत्र्य आपणास नाही. पण कथेच्या शेवटी पत्नी आई मित्र आणि शेवटी देव त्याला आधार देतात. यात ही जी ए नी देवाचा आधार सगळयात शेवटी दाखवला आहे. तसे पाहता आपली स्वप्ने पूर्ण करताना किंवा एकंदरीतच जीवनाच्या प्रवासात आपल्याला प्रत्येक संकटाच्या वेळी आयुष्यात ही सगळयात पहिला आधार आईचा, मग पत्नीचा , मग मित्राचा आणि शेवटी देवाचा आधार असतो. याच क्रमाचा जी ए पण कथेत वापर करतात.

थोडक्यात प्रत्येकाला आपल्या कल्पना प्रमाणे कथेचा अर्थ काढता येईल. आणि जी ए यांच्या एक पत्रात त्यांनी हाच विचार मांडला आहे.

- विश्वेश्वर नांदेडकर

विश्वेश्वरजी आपण अतिशय सुंदर आणि नेमके विवेचन केले आहे. विशेषतः मला चवथ्या बी बद्दल जो संशय होता त्याचे आपण निराकरण केले आहे.

माधवजींनी धुळीचा रस्ता आणि अनवाणी पावलांचा जो अन्वयार्थ लावला तोही आवडला.

अजूनही मला वृद्धाबद्दल नेमकेपणी कळलेले नाही. मला तो दत्तच वाटतो, ब्रह्मा विष्णू महेश यांचे एकत्व. असो. अध्यात्मिक ज्ञानी व्यक्ती यावर विशेष काही लिहितील असे वाटते.

आपण या प्रवासाची सुरुवात तरुणपणी दाखवली आहे हेही बरोबर आणि नातेवाईक ही निवडीची गोष्ट नाही हेही बरोइबर. आपण इतक्या सुंदरपणे ही कथा समजून घेतली हे पाहून आज जीए असते तर तेही वाह म्हणाले असते.

जीएंच्या कथांवर अनेक चांगली आस्वादात्मक पुस्तके आहेत. पण त्यांचा एकच लेखक (साहजिकच) असतो आणि तो त्याच्या आकलनाद्वारे लिहितो. त्यामुळे इथे मला विलासजी, माधवजी, विश्वेश्वरजी, वैभवजी, राजेशजी, यतीनजी व इतरही सर्वांचे जे सखोल आणि वैविध्यपूर्ण आकलन पहायला मिळते त्याने जास्त आनंद मिळतो.

- सुनीळ सामंत

स्पष्टीकरण- माधव पुराणिक

प्रश्न-( नामकाका)अजूनही मला वृद्धाबद्दल नेमकेपणी कळलेले नाही. मला तो दत्तच वाटतो, ब्रह्मा विष्णू महेश यांचे एकत्व. असो. अध्यात्मिक ज्ञानी व्यक्ती यावर विशेष काही लिहितील असे वाटते.

उत्तर -१ जी एं अध्यात्म (भारतीय तत्वज्ञान) अजिबात मानत नाहीत. नियती = जगण्यावर प्रभाव टाकणारी नियमशून्य शक्ती मानतात.पण कथांत भारतीय संस्कृतीतील प्रतिके वापरतात.उदाहरणार्थ - देऊळ,मठ,पुजारी,मंदिर, नशिब ,तबकातील श्री चिन्ह , कमळ,इ.

म्हणून उत्तर अस्तितावादी चौकटीत.

२ वृद्ध=ब्रह्मा-विष्णु-महेश= उत्पत्ती -स्थिती -विलय= जन्म -जीवन - मृत्यू = भूतकाळ -वर्तमानकाळ -भविष्यकाळ= सुख-दु:ख- सुखदुःखाच्या पलिकडे= मर्यादित सकारात्मक भावना (प्रेम/वात्सल्य/वासना/मैत्री) -मर्यादित नकारात्मक भावना( द्वेष/राग/तिरस्कार/तुटकपणा)- अमर्यादित सकारात्मक भावना = कलेची उत्तुंग प्रतिभा = सामान्य माणसांमधील उत्तुंग सद्गुण

(व्यक्तीमधला = मर्यादित,नियती अमर्यादित)

हे एकाच व्यक्तीत

- माधव पुराणिक

वर माधवजींनी जे सकारात्मक भावा विषयी लिहिले आहे त्याबद्दल माझ्याकडून थोडे अधिक-

सांजशकुनमधील कथांच्या क्रमाबद्दल पुर्वी लिहिले आहे. या कथांतील पहिली कथा शून्यवादी, आयुष्याच्या अर्थहीनते बद्दल आहे तर अंतीम कथा – अहम- अस्तित्ववादी, आयुष्यातील अहमच्या , जीवनाच्या आणि काळाच्या प्रचंड पटलावर आपला ठसा उमटवून जाण्याच्या मानवी प्रवृत्तीबद्दल आहे. हा संपूर्ण प्रवास मला निराशावादाकडून आशावादाकडे जाणारा वाटला. हा क्रम जीएंनी जाणिवपुर्वकच ठेवला असेल असे मला वाटते.

गीतपाखरू ही कथा साधारण मध्यावर येते.

ही कथा निराशावादी नक्कीच नाही. आयुष्य रंगीत आहे. विचारपुर्वक निवडले तर (इथे अजून त्यांनी नियतीवाद आणलेला नाही) सुंदर आहे. आनंदमयी आहे. पण सर्वांनाच ते जमत नाही. फ़ारच थोडे लोक आपला आनंदाचा ठसा इथे उमटवून जातात.

हा खाली दिलेला उतारा वाचून खुप छान आशावादी जिवंत वाटते…

*विषण्ण वंचित मनाने सगळ्या कुंड्या खाली ठेवल्या.*

*आणि त्याचे डोळे एकदम चमकले. प्रत्येकीतून लाल, निळा, सोनेरी, जांभळा कोंभ रंगीत प्रकाश किरणांप्रमाणे उभा होता. आता त्याच्या आयुष्यात एकतरी समाधानाचा क्षण निर्माण झाला होता. पण त्याचे एक पाऊल क्षितिजाखाली गेले होते, व त्याच्याजवळ एकच श्वास उरला होता. त्याने तो श्वास अश्रूंत भिजवला, व हलकेच सगळ्या कोंभांवर पसरला.*

*ते चारही कोंभ एकत्र आले, व त्याचा एक दिव्य पक्षी होऊन आभाळात उडाला. त्याचे पंख निळे होते, डोळे रक्त थेंबासारखे, चोच जांभळ्या मखमलीसारखी, व डोक्यावरील रत्नतुरा सोनेरी होता. तो बाणाप्रमाणे वर उडाला, व आपल्यासारख्याच चारसहा पाखरांच्या संगतीत तो चांदण्यातून येणाऱ्या*

*प्रकाशतंतूसारख्या आवाजात गाऊ लागला. त्याचा आवाज ऐकताच मागच्या प्रवाशांचे चेहरे उजळले, त्यांची शरीरे मोहरली, आणि पावलांना*

*नवी जिवंत गती आली.*

*त्या स्वरांनी ते मोहून गेले खरे, पण त्याचा खरा अर्थ समजला तो त्या प्रवाशालाच त्याच्या मागोमाग येत त्याच्या आयुष्यातील एकेक चिन्ह उचलून जणू त्या पाखराने स्वतःसाठी स्वरांचे चिरंतन घरटे केले होते. मध्यरात्री वीज कडाडताच, आपल्या मृदू ऊष्ण छातीवर आश्रय देणाऱ्या आईचा आवाज त्यात होता. यौवनधुंद ओठांचा मदिर स्पर्श, वंचनेचे ओरखडे, द्वेषाचे जळते डाग, अंधाराच्या दाट पडद्याआड ढाळलेले एकाकी अश्रू, - या साऱ्यांच्या खुणा त्यात होत्या.*

-- आणि या कथेचे भरत वाक्य---

**बिया देताना वृद्ध नेहमीप्रमाणे हसला होता, पण एका तरी प्रवाशाने त्याचे हास्य शेवटच्या क्षणी त्याच्याकडून हिरावून घेतले होते.**

- बस. याचसाठी केला होता अट्टाहास-

- सुनीळ सामंत

**प्रतिक्रियांवरची प्रतिक्रिया**

जीए एक प्रतिभावान, प्रज्ञावंत असे मराठीतील कथालेखक. त्यांच्या अनेक कथा वाचकांना भुरळ घालतात. प्रदक्षिणा, कैरी, गिधाडे, पारवा इत्यादीसारख्या वाचकाला सहज आकलन होतील अशा कथांबरोबरच स्वामी, ईस्किलार, गीतपाखरू यासारख्या वाचकाला अनाकलनीय वाटतील अशा अनेक रुपकात्मक , प्रतिकात्मक कथा ते विलक्षण ताकदीने शब्दबद्ध करतात. ते लिखाण वाचताना

जीएंच्या लेखणीतून साक्षात सरस्वती वीणा वाजवत आहे, किंवा ती रुपके व प्रतिमा पाहून नृत्य करते आहे असा भास होतो.

'गीतपाखरू' या कथेवर व तिच्या रसग्रहणावर ग्रुपमधील सन्माननीय सदस्यांनी अतिशय मौलिक विचार मांडलेले आहेत. काही सदस्यांनी व्यक्तिगत मेसेज पाठवून, परवानगीच्या औपचारीकतेने, व्यक्तीश: संपर्क साधला व त्यांच्याबरोबर झालेल्या चर्चेने कथेतील आणखी सौन्दर्यस्थळे दृष्टीस पडली, हे माझे भाग्यच. काहींनी कथा समजण्यास मदत झाल्याबद्दल कौतुकमिश्रित आभार मानल्याने अगदी गुदमुरून गेलो. त्यामूळे सर्वांचे नामोल्लेख टाळून आपण सर्वांनी दिलेल्या कौतुकास्पद प्रतिसादाबद्दल मन:पूर्वक धन्यवाद मानतो.

माझ्यासारखा सामान्य वाचक जीएं सारख्या प्रज्ञावंताचे लिखाणावर भाष्य करण्याचे शिवधनुष्य उचलण्याचा प्रयत्न करतोय हे खर तर अतिशय **विरोधाभासी चित्र** आहे. सुनीळ सरांनी या कथेवर लिहावे असे सुचवल्यानंतरच जीएंची क्षमा मागूनच हा प्रयत्न केलेला आहे. ते शिवधनुष्य उचलणे तर सोडाच साधं हलवायलाही मला जमलंय असे वाटत नाही.

माझ्या 'गीतपाखरू' पोस्टच्या शेवटी दिलेल्या टीपमध्ये ---'कथेतील काही रुपकांचे अर्थ वरील सारांशमध्ये लिहीलेले नाहीत.'---- असा उल्लेख केलेला आहेच. पण ग्रुप मधील जाणकारांनी त्या न लिहिलेल्या काही रुपकांचे अर्थ त्यांच्या दृष्टीकोनातून सुंदररित्या सांगीतल्याने मलाही त्याचे वेगळे पैलू समजण्यास मदत झाली.

थोडेसे विषयांतर करतो--

जाणकारांनी कथेबाबत आपले जे मौलिक विचार मांडलेले आहेत त्यापैकी श्री. पुराणिक सरांनी लिहिलेल्या एका महत्त्वाच्या मुद्दयाने लक्ष वेधून घेतले. तो म्हणजे ‘मुरोकामी यांचा व त्यांच्या संभाव्य नोबेल परितोषकाचा’ त्यांनी केलेला उल्लेख.

हारूकि मुरोकामी यांच्या कथा जीएं सारख्याच एखाद्या अंधाऱ्या भुयारात नेतात. आडवळणाने कथा सांगत सांगत लेखकाला जो संदेश सूचित करावयाचा आहे त्यासाठी त्या अंधारात वाचकाला नेऊन त्याच्यावर एकदम प्रकाशझोत टाकतात. वाचक त्या प्रकाशझोतात दिपून जातो आणि वाचकाचे डोळे हळूहळू त्या प्रकाशाला सरावल्यानंतर लेखकाचा संदेश व कथेतील सौन्दर्यस्थळे त्यास दिसू लागतात. त्यांना कधीतरी नोबेल मिळेल, या त्यांच्या मताशी सहमत आहे.

युरोपियन लेखकांच्या मांदियाळीत या जपानी-आशियन लेखकाचे हे यश निश्चितच कौतुकास्पद आहे.

पाउलो कोएलो याची 'द अल्केमिस्ट' ही कादंबरी अशाच रुपकांमुळे गाजली. ‘इतरत्र ज्या खजिन्याचा शोध घेण्यासाठी आपण आयुष्य घालवतो ते वास्तवात आपल्या जवळच असतात’-- असा संदेश देणारी ही एक जादूभरी परिकथाच आहे. 'स्वप्नांचा शोध-मार्ग दाखवणारी' ही कादंबरी या ब्राझिलिअन लेखकाने— **‘आत्मविश्वासू हिम्मतबाज, स्वप्ने साकार करण्याची दुर्दम्य इच्छाशक्ति असणाऱ्या आपल्या जिगरी दोस्ताना’-** अर्पण केली आहे हे विशेष.

**मराठी भाषेत हेच तर आमचे जीए कित्येक वर्षापूर्वीपासून करीत होते. मानवी जीवनातील स्वप्नांचा, दु:खांचा, क्षणभंगुर सुखांचा शोध घेणाऱ्या त्यांच्या कथा ते इंग्रजीचे उत्कृष्ट प्राध्यापक असताना व इंग्रजी साहित्याचे**

**विस्तृतपणे वाचन व त्यावर भाष्य करीत असतानाही त्यांनी त्यांच्या कथा इंग्रजीमध्ये किंवा मराठी बरोबरच इंग्रजीतही का लिहिल्या नाहीत याचे मला कोडे पडते.**

'प्रिय जीए स. न. वि. वि.' या जीएंच्या भगिनी सौ. नंदा पैठणकर संपादित पुस्तकाच्या प्रस्तावनेत श्री. जयवंत दळवी यांनी या विषयावर भाष्य केले आहे. त्यांच्या मते -- 'जागतिक वाड्.मयात मराठी साहित्य गेले पाहिजे असे म्हणणे सोपे असते. प्रत्यक्षात जाणे कठीण असते. जीएंच्या कथांना जागतिक वाड्.मयात स्थान मिळाले पाहिजे असे म्हटले जाते. त्यातून जीएं बद्दलचा अभिमान व्यक्त होतो हे खरे! पण जागतिक वाड्.मयात स्थान मिळणे ही तशी सोपी गोष्ट नाही. ही किमया अगदी काही प्रमाणात जपानी लेखकांना साधलेली दिसते.' – ही प्रस्तावना १९९४ मध्ये त्यांनी लिहिलेली आहे. न्यू जर्सी येथे राहणारे मुरोकामी ही किमया आज जगाला दाखवीत आहेत.

**जीए निश्चितपणे त्याच ताकदीचे किमयागार आहेत, असे 'डोळसपणे' आवर्जून सांगावेसे वाटते.**

**जीए यांना जागतिक स्तरावर समर्थपणे नेले पाहिजे अशी कित्येकांची प्रामाणिक भावना आहे. जीएंच्या जन्मशताब्दी वर्षात त्यांच्या कथा जागतिक पातळीवर पोहोचाव्यात यासाठी प्रयत्न व्हायला हवेत.**

**जीएंच्या जन्मशताब्दी वर्षात या दृष्टीने यशस्वी प्रयत्न करणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल, असे वाटते.**

- राजेश उनवणे

अहो जी ए नी एकदा असे लिहले आहे की लेखक म्हणून मला ्माझा काडी चा ही अभिमान नाही. आणि तुम्ही जागतिक त्यांच साहित्या मधे त्यांच यश नाही.ते तर सांगत की मझ्या कथा सन्ग्रह्या च्या प्रती मर्यादीत प्रकाशीत करा. ज्याला आवड असेल तो कुठूनही उपलब्ध करेल आणि वाचेल त्याना जर प्रसिधी ची जर हाव असती तर ते असे कही लिहले नस्ते. एका रशियन लेखकाने लिहले होते जर जी ए आमच्य कडे असते तर कीत्येक आयलंड्सचे चे मालक असते.

आणखी एक जीए च्या कथा इतक्या सोप्या नसतात की दोन चार वेळेस वाचून कळतील. हजारदा वाचावे लागतात आणि प्रत्येक वेळेस काही तरी नविन मिळते. आता तुम्ही इस्किलार. काकणे. कसाब. बदल खुप लिहले मी तुम्हा ना एक दोन दिवसात सांगेन तुम्ही काय गमावले.

आता तुम्ही माझ्या कडे जीए ह्यांच्या भाषेत पाच पाया च्या वासरा सारखे पाहणार

- परमजित सिंग

# गुंतवळ- जी ए कुलकर्णी- निळासावळा

गुंतवळ ही रूढ अर्थाने कथा नाही.

कथेला एक मध्यवर्ती गोष्ट, सुरुवात मध्य शेवट असतो तसे हे नाही.

हे एक चित्र आहे. एखाद्या अवाढव्य कॅनव्हासवर बहुतांश पिवळट मातकट रंगाने रंगवलेले रखरखीत चित्र.

माणसे, आयुष्ये, तुटक घटना यांचा एकमेकांत गुंतलेला पिकासो टाईप चित्रांचा गुंता.

बुटांची सवय नसलेला देशपांडे, तोतरा साळवी, सदाहसरा कृष्णास्वामी, पत्रं आणणारा अमीन. हॉटेलवाला सदूभाऊ, नोकर लहानगा पांड्या, सोज्ज्वळ आयुष्याची आस असलेला, बहिणीची आठवण काढणारा जोशी, भजी तळणारी कोकणी राधाबाई, शिवराळ मजूर, नकलाकार म्हातारा डिसोझा अशा मंडळींची गुंतवळ. एकमेकांशी कसलाही संबंध नसलेली, पण धरणाच्या बांधकामात, रखरखीत उन्हाळयात एकत्र आलेला गुंता. कथेतलेच शब्द वापरायचे तर, सारेजण जळत्या पडद्यावरील आकृती असल्याप्रमाणे, त्या उन्हाच्या विशाल पसाऱ्याला चिकटलेले

ही कथा जीएंच्या भाषासौंदर्यासाठीही वाचावी. सौंदर्य म्हणजे ते तसले झगमगीत नाही. अस्सल गांवरान रांगडया भाषेचं सौंदर्य, मुक्त शिव्या जिभेने अंग झाडल्यासरख्या.

या कथेत जे आहेत, त्यांच्या स्मरणरंजनात अजून बरेचजण येतात आणि जातात. पांड्याचा दुकानदार बाप आणि आजी येते, जोशीची कुमुद गुप्ते येते, अशक्त

बहिण येते, फ़ाळणीच्या जखमांनी पोळलेला, ड्रेझरच्या दातांखाली मेलेला सरदारजी येतो, त्याची अत्यंत नाजूक मुलगी येते, सदूभाऊची सोडून गेलेली गोरी बायको आणि वेडसर मुलगी येतात.

आठवणींच्या अधमधे काही फ़ुटकळ घटनाही घडतात, नाही असे नाही. आठवलेंची बायको वाळत घातलेले कपडे गोळा करायला घराबाहेर येते आणि जाते, डिसोझा पांड्याबरोबर नाच करतो, आणि दिवसभरातली सर्वात मोठी घटना, अमीन पत्रं घेऊन येतो ती.

एका बारक्या झोपडीतच ही कथा जगते. निरनिराळ्या भावनांच्या कुजबुजीने बावरलेली झोपडी. जीएंच्या इतर कथांहून अगदी वेगळी कथा.

या कथेत मला एका abstract चित्रासारखेच वाटले. अनेक अति लघु कथा एकमेकांत गुंतलेल्या असाव्यात आणि त्यांचा एकमेकांशी कसलाही संबंध नसावा तसे.

जीएंच्या अनेक कथा मी कितीही वेळा (शंभर वगैरे) वाचू शकतो. ही त्यातली नाही. कदाचित या ग्रुपमधल्या चर्चेनंतर मला ती तितकीच आवडायला लागेल, अस्तिस्तोत्रसारखी, ही आशा आहे.

कथा वाचून दिलेल्या आपल्या प्रतिक्रियांची वाट पहातो.

-सुनीळ सामंत

गुंतवळ कथा- विवेचक - व्ही एस वाघोलीकर

1) गुंतवळ कथेत दुपारी २ - 3 तासांच्या कालावधीत जे नाटय घडते ते कथानक म्हणून येते. धरणाचे काम म्हणजे पात्रांची तशी गर्दी आहे. पण पोटासाठी

रानोमाळ कष्ट करायला गावापासून दूर , ही माणसे आल्याने, एकाकी आहेत. प्रत्येकाचा भूतकाळ त्याला सतावत आहे. हा एकटेपणा ,विलगपणा फक्त कुटुंबांच्या मुळे नाही. जी ए आकाशस्थ शक्तींना प्रश्न विचारत असल्यामुळे, मानवालाच हा एकटेपणा आला आहे. ' प्रत्येक माणूस अंतिमतः बेट असतो ' हे जाणवून देणारी ही कथा आहे.

2 ) यात सरदारजीचे पात्र महत्वाचे आहे. ही कथा सन 195 5 मध्ये सत्यकथेत प्रसिद्ध झाली. तेव्हा व आताही 1947 च्या फाळणीवर ललित लेखन फारसे नाही. जीएंनी थोड्या शब्दांत त्यातील भयावहता दाखवली आहे. सगळीकडे आबादीआबाद असते असे दाखविण्याचा भाबडेपणा जी एंकडे नाही. जी ए म्हणतात -

"पंजाबात सरदारजी एका अत्यंत श्रीमंताघरचे मुख्य होते. शिवाय त्यांचे मोटारीच्या सुट्या भागांचे एक प्रचंड दुकान होते. पण फाळणीच्या उत्पातात त्यांचे घराणे मातीमोल होऊन नामशेष झाले. हातपाय बांधून त्यांच्या डोळयासमोर घरातील एकोणीस जणांना गोळया घालण्यात आल्या. पण त्यांच्या डोळयापुढे धगधगले ते दृश्य निराळेच होते. त्यांची धाकटी मुलगी कुशवंती म्हणजे साऱ्या घरातील डाळिंबाची कळी होती. त्या श्रीमंती ऐषआरामी घरात खुद्द सरदारजींच्या रेशमी कपड्यापेक्षा तिच्या पायांतील सपाता जास्त मूल्यवान असत. तिच्या चेहेऱ्यावर सूर्याचे किरण चिकनच्या पडद्याखेरीज कधी पडले नाहीत. वाळयाच्या कोमल गंधाखेरीज वारा कधी तिच्या शुभ्र उरोजाला लागला नाही. पण सरदारजींच्या डोळयासमोर त्यांनी ज्यावर निरतिशम प्रेम केले, ते सारे उध्वस्त, भग्न, मलिन झाले. ते पहाताना त्यांचा डोळादेखील ओलावला नाही, इतके त्यांचे मन बधिर झाले होते. जेथे पाऊल टाकताना नबाबांना आनंद व्हावा तेथे कल्हईवाल्यांनी पथाऱ्या

पसरल्या, राजशाही पलंगांना बकऱ्या शेळया बांधल्या गेल्या, आणि वणव्यानंतर जळून काळवंडलेली घरे आणि मने पाठीमागे आर्त तळमळली.एकट्या सरदारजींना मात्र मुद्दामच सोडले. ते बधिर मेलेल्या मनाने खाली सरकत सरकत मुरवाडला आले होते."

3 ) जी ए कुलकर्णी यांनी त्यांच्या कथांतून वाचकाला अनेक प्रदेश दाखवले आहेत. ते शब्दप्रभू असल्याने - रंग ,आकार ,दिवसाचा काळ ,उष्णता ,विस्तार ,आकाशाची पार्श्वभूमी ,जमीनीचा पोत ,हे सर्व दाखवून त्यांनी त्या प्रदेशांमधील माणसांचे विश्व दाखवले आहे. ते इतके जिवंत असते की, जणू वाचक त्या प्रदेशात प्रवास करतो. उदाहरणार्थ -

i ) गुलाम कथेत झगझगीत सूर्यप्रकाशात अनंत वाळूकणांचे क्षितिजापर्यंत पसरलेले वाळवंट येते.

ii) गोरिला. अहम कथांमध्ये हिरवेपणाने झाकलेले जंगल येते.

ii) इस्किलारमध्ये राजधानीचे सर्व नगर येते. समुद्र किनारा, टेकडी ,भव्य ग्रीक देऊळ, खाली बाजार रस्ता, गारुड्याचा खेळ, मद्यालय, सैनिक, दुकाने, हे सर्व चित्रपटाप्रमाणे दाखवले आहेत. अशी अनेक उदाहरणे आहेत.

- 4 ) गुंतवळ मध्ये माळ हा महत्वाचा घटक आहे. धरणाचे काम, ड्रेजरसारखी मोठी यंत्रे ,झोपडीवजा हॉटेल दाखवताना ,खणल्यावर जमीनीतून येणारे रंगीबेरंगी किडे , रखरखता माळ, धुळीचे लोट, नाकातोंडात जाणारी धूळ ,सूर्याचे तापणे, हे सर्व दाखवून माळ जिवंत केला आहे. चारही बाजूने माणसे त्या कामासाठी आली आहेत. त्यांचा एकमेकांशी संबंध नाही. जी एंना मात्र आकाशस्थ शक्तीशी जोडलेली ही गुंतवळ जाणवते. व मग ते कथेशेवटी लिहितात -

-" भोवतालची माणसे ,उन्हात भुसभुशीत होणारा मातीचा ढेकळा, निंबाची झाडे ,दगड पालथा करताच त्याखालून धडपडत इतस्ततः पसरणारे रंगीबेरंगी किडे - ही सारी आपण एकत्र कशाला आलो? आपला त्यांचा काय संबंध आहे? आपण सारी एका विशाल अज्ञात आकृतीतील रांगोळीचे ठिपके असूही.आकृती? की नुसती हजार तोंडांच्या अजस्त्र बुळबुळीत गांडुळाप्रमाणे वळवळणारी वेडी अर्थहीन गिचमीड ? वाऱ्याने निरनिराळया धाग्यांचा पुंजका एकत्र गोळा व्हावा, त्या गुंतवळीतून एक धागा बाहेर जातो, दुसरा येतो, याखेरीज संबंध नाही, दोन धाग्यात आतड्याची ओढ नाही-ओढ नाही.... जोशीच्या एकाकी स्वभावात आज आठवणींची चलबिचल होत आहे. कवड्या खुळखुळून टाकाव्यात त्याप्रमाणे तो त्याच त्या आठवणींचे दान शोधतो. "

5.विश्व व मानव ( सजीव ) यांच्यातील संबंधांबद्दल जी एंनी, स्वामी ,अस्तिस्तोत्र ,माणसाचे काय.. या कथांत प्रखरपणे लिहिले आहे. माणूस विश्वाचा भाग आहे. पण विश्व ,माणसाव्यतिरिक्त, अनिर्वचनीय नियतीने गरगर फिरत असते. यातून जीएचा सुधारित नियतीवाद येतो.गुंतवळमध्येही त्याचे सूतोवाच आहे. म्हणून ही कथा महत्वाची वाटते. धन्यवाद.-

- विलास वाघोलीकर

अतिशय सुंदर विवेचन व विश्लेषण वाचुन कथा जास्त समजली. सुनिळजी ची पिकासोच्या ॲबस्ट्रॅक्ट पेंटिंग आणि विलासजींनी दिलेली रांगोळी चे टिपके ह्या दोन्ही उपमा चपखल वाटतात. मानव म्हणजे ह्या विशाल जिवनपटावर नियतीने मांडलेल्या सोंगट्या तशा यक्श्चित. तथापी त्यात प्रत्येक व्यक्तिची एक वेगळी कहाणी. त्याची त्याची दुःख, भोग, आशा. मला असे वाटते (कदाचित मुर्खपणा

असेल) ह्या कथेतील पात्रांची अवस्था बा. सी. मर्ढेकरांच्या "पिपात ओले मेले उंदीर " शी काही साम्य असावे काय? असा प्रश्न पडला. त्यावर अभ्यासु मंडळी प्रकाश टाकु शकेल.

विलासजींनी म्हटल्याप्रमाणे दुपारच्या दोन चार तासाची ही कहाणी जिवानाचा गहन अर्थ सांगणारी असे मला वाटते. तोअर्थ आणखी स्पष्टकरणारे व त्याची गहनता दाखवणारे आपले दोघांचेही विवेचन आवडले.

- श्रीकांत देशमुख

विलासजी, खुप सुंदर आणि विस्तृत विवेचन.

यातल्या प्रत्येकाकडे गतजीवनातील दुःखे आहेत आणि इथे मन रमवणारेही काही आहे. छोटे विश्वच आहे हे.

-सुनीळ सामंत

अतिशय सुंदर विवेचन व विश्लेषण वाचुन कथा जास्त समजली. सुनिळजी ची पिकासोच्या ॲबस्ट्रॅक्ट पेंटिंग आणि विलासजींनी दिलेली रांगोळी चे टिपके ह्या दोन्ही उपमा चपखल वाटतात. मानव म्हणजे ह्या विशाल जिवनपटावर नियतीने मांडलेल्या सोंगट्या तशा यक्श्चित. तथापी त्यात प्रत्येक व्यक्तिची एक वेगळी कहाणी. त्याची त्याची दुःख, भोग, आशा. मला असे वाटते (कदाचित मुर्खपणा असेल) ह्या कथेतील पात्रांची अवस्था बा. सी. मर्ढेकरांच्या "पिपात ओले मेले उंदीर" शी काही साम्य असावे काय? असा प्रश्न पडला. त्यावर अभ्यासु मंडळी प्रकाश टाकु शकेल.

विलासजींनी म्हटल्याप्रमाणे दुपारच्या दोन चार तासाची ही कहाणी जिवानाचा गहन अर्थ सांगणारी असे मला वाटते. तोअर्थ आणखी स्पष्टकरणारे व त्याची गहनता दाखवणारे आपले दोघांचेही विवेचन आवडले.

-श्रीकांत देशमुख

गुंतवळ ही कथा खूपच विलक्षण आहे. एखादा प्रतिभावान दिग्दर्शक जसे चित्रपटातील अगदी छोटा प्रवेश असणारे पात्र सुद्धा अशा प्रकारे दाखवतो की तो अनेक वर्ष स्मरणात राहील. उदा शोले. त्या प्रमाणे अनेक पात्रांची भाऊ गर्दी असलेली छोटेखानी कथा आसूनही प्रत्येक पात्र कथेत ठसठशीतपणे समोर येते आणि कायम स्मृतीत घर करून जाते. एवढेच काय , माळरान , हॉटेल चे स्वयंपाकघर, हॉटेल चे वातावरण हे पण अगदी पात्र प्रमाणे लक्षात राहते.

गुंतवळ कथेवर काय लिहिणार? लिहायचे तर खूप काही लिहिता येईल. पण नुसता पात्र परिचय करणे किंवा हॉटेल, धरण, माळाचे वर्णन म्हणजे ही कथा नाही. जी ए ची ही आगदी सुरवातीच्या काळातील कथा आहे. त्या काळी सत्यकथेत खूपच निवडक आणि सकस कथांची निवड होत असे. त्यामुळे सत्यकथेत कथा छापून आली की त्या लेखकाची साहित्य वर्तुळात लगेच दखल घेतली जाई. त्या दृष्टीनेही या कथेकडे पाहिले पाहिजे.

गुंतवळ आणि चंद्रावळ या दोन कथानी त्यांनी सर्वांचे लक्ष वेधून घेतले होते.

जी ए ना या कथेतून फक्त काळाच्या एका लहानशा तुकड्यातून मानवी जीवनातील शुष्क वाळवंटी निरर्थकता च दाखवायची आसल्याने त्यांनी या कथेत कोणतेही पात्र केंद्रस्थानी ठेवून उभे केले नाही.कोणतेही पात्र, नायक उभे न करता

निव्वळ स्थळ आणि व्यक्तीला बहाल केलेल्या विषेशणात्मक उपमा मधून कथेला बांधण्याचे जी ए चे कौशल्य विलक्षणच आहे.

समोर आलेल्या परिस्थिती ची अपरिहार्यता हा एक शापच या कथेतील प्रत्येक पात्राला लागला आहे याला नियती म्हणा , बिन कण्याची पात्रे म्हणा , की आजुन काही. पण प्रत्येक वाचक अपरिहार्य पाने आपल्या जीवनातील ही आसा काळ , ज्या वेळी जीवन पूर्ण निरर्थक वाटू लागते आठवू लागतो.

वाचक यातील पात्रात स्वतः ला शोधू लागतो आपण या कथेतील कोण सदू भाऊ , साठे , डिसुझा की जोशी?

वाचक या कथेतील पात्रांची यातून सुटका होणार की नाही हाच विचार करून बेचैन होतो. आयुष्याच्या या तुकड्यातून सुटका नसलि तरी यातील पात्रे या धगधगत्या जीवनात जो लहानसा आनंद मिळवायचा केविलवाणा प्रयत्न करता त्यामुळे वाचक आधिकच उदास होत जातो. जसे कमनीय मुलीचे कॅलेंडर हा साठे साठी, डिसुझाच्या माकड चेष्टा हा पांडा च्या आयुष्यातील तर इंजनीयर च्या बायकोचे कपडे वाळत घालताना पाहणे कारकुनाच्या आयुष्यात चिकट आनंदाचे काही क्षण मिळवून देतात. या कथेत जवळपास सगळीच पात्रे हा केविलवाणा प्रयत्न करताना दिसतात.

ही कथा फारशी पुढे सरकत नाही, रोजच्या जीवनातील अपरिहार्यता त्यातून आलेला कंटाळा, उबग आणि ते जीवन सक्तीने जगण्याचा कपाळी आलेला अटळ भोग या भोवती ही कथा फिरत राहते.

या कथेचे खरे सौंदर्य कथेच्या भाषेत आणि वर्णनात आहे असे माझे मत आहे. मी अनेकदा ही कथा वाचली. वाचतो. पोलिस खात्यात नोकरी केल्याने आणि बरीच वर्षे तालुका पातळीवर काढल्याने आनेकदा माळराने पायाखाली भर दुपारी

तुडविली आहेत. धरणाची कामे पाहण्याचा ही प्रसंग अनेकदा आला. कॉलेज जीवनातच ही कथा वाचल्याने आश्यावेळी त्या कामगारांत मी या कथेतील पात्र हुडकायचा ही प्रयत्न केला आहे.

सरदारजी च्या मुलीने मनाच्या कोपऱ्यात जे घर केले तेथून ती आजूनही निघाली नाही.

गूंत वळ कथेचे शीर्षक सार्थ आहे. पात्रांचा एवढं गुंता आहे पण. कोणाची ही एकमेकाशी भावनिक गंतवळ नाही. प्रत्येक पात्र स्वतंत्र आयुष्य जगत आहे.

फक्त एकच सांगता येईल. की कथा वाचत राहा आणि जी ए क्या भाषेचा आणि वर्णनाचा आनंद मनसोक्त या कथेतून घ्या

- विश्वेश्वर नांदेडकर

क्या बात है विश्वेश्वरजी. तुम्ही अगदी माझ्या मनातले लिहिले आणि अत्यंत सुरेख शब्दांत.

मला चित्र दिसले तुम्हाला चलचित्र.

जीएंच्या शब्दांत ब्रश आणि कॅमेरा, स्वर आणि गंध ़यांचे इफ़ेक्ट जाणवतात. तुम्ही ते बरोबर हेरले आहेत.

विशेष- केविलवाणा प्रयत्न. हेच ते आपण. आपण सर्व.

- सुनीळ सामंत

अगदी खरे. तसे इफेक्ट आणल्या शिवाय जी ए पुढे सरकतच नाहीत. त्या साठी सगळ्या उपमा त्यांच्या समोर हात जोडून उभ्या आसतात.

- विश्वेश्वर नांदेडकर

। )आपण विचारपूर्वक व छानच समिक्षा केली आहे. गुंतवळच्या विवेचनात आतापर्यंत मी वाचलेले उत्कृष्ट.

2 ) कृपया यापुढेही असेच आवर्जून कथांबद्दल लिहित रहावे ही विनंती.

3 ) कथा वाचकाला प्रथम वर्णनपर वाटेल - पण अमिन टपाल घेवून येतो ही कथेत प्रचंड घटना असते. पूर्वी मी नातेवाईकांचे पत्र उतावीळपणे वाचायचो त्याची आठवण झाली.

- विलास वाघोलीकर

जीए गुंतवळ _निळासावळा लेखनकाळ १९५५- _माधव पुराणिक

कथालेखकाचे वय३३प्रतिभाविकासातली सुरवातीचा "जीवनदर्शन टप्पाअनाकलनीय नियती ,माणसाचे पारतंत्र्य व आदिम वृत्तींचा आकस्मिक उद्रेक,सुखाचा शेवट_विवेचनाचे स्वरूप _कथाआकलन आहेकथा आस्वाद नाही

१ सूत्र जी एं ची बहुतेक पात्रे आदिम ,पाशवी पातळींवर जगतात.( अन्न,वस्त्र, निवारा - त्याकरता अपयशी व्यावहारिक धडपड, वासना- हिचे मनातील अर्तक्य उफाळणे)

पात्रे -अ)सदूभाऊ -- कोकणी ( वासनेचा उद्रेक त्यामुळे सुखी संसाराचा शेवट( आवडती बायको +मुलगी). कोकणीच्या निवडीचे परिणाम स्वीकारावा लागतो.- जगण्यासाठी.पण मन (तिच्यामुळे) निर्बुद्ध म्हशी सारखं. सरळ धाग्यांची गुंतवळ करतो - त्याची नियती शरीराची लालसा)

ब) पात्र - सरदारजी - नियतीच्या आघातानंतर विचित्र वागतो - जगण्यासाठी. कडक उन्हात मेलेल्या मनाने

क)जोशी - मनासारखं जगता न आल्याने जगण्यासाठी भयावह दिवस काढतो ( आरामाची लालसा)

ड) डिसोझा अकस्मात अफरातफर करतो( पैशाची लालसा)

२ शीर्षक - गुंतवळ - सगळयांचे दिवस प्रथम - एखादी तरूणी रोज सकाळी केस विंचरते , किंचित गुंतवळ फेकते तसे सरळ होते. मग त्यांच्या अचानक आदिम उसळण्याने वा नियतीच्या आघाताने ( घर जाळणे, सामाजिक परिस्थिती ने जोशीला हवी तशी नोकरी न मिळणे ) तरूणीचे( सुखाचे, इच्छापूर्तीचे,) सरळ धागे कमी , विसंगतीचे, विस्कळित पणाचे धागे जास्त. नंतर मन जसे हलके, पोकळ, निर्जीव,जळके, मुकाट, आर्त तळमळणारे, वेडे राक्षसी, एकाकी, दुःखी,मरणारे,आंधळे, मेलेल्या संवेदनांचे,मलिन ( ही सर्व पात्रांच्या मनाचे जी ए कृत वर्णन) तसे ही सर्व पात्रे स्वतः ची गुंतवळ बाहेरच्या नियतीच्या प्रचंड,अफाट गुंतवळीत पाहतात.मग त्यांना असंबद्ध धागेच नात्यात दिसतात. ते मग रूक्ष, वैराण,अशुभ,अबोल, अर्थहीन,जड सरपटणारे जगणं ओढतात.क्षणिक इतरांबरोबर विचित्र बोलून चमत्कारिक वागून मरेपर्यंत असेच जगतात( जी ए चे वर्णन)

३ समारोप _ अस्तितावादी तत्वज्ञानाचा मूलभूत प्रश्न यात ठसठशीत , कलात्मक रीतीने , व्यक्त केला आहे.

प्रश्न- आधी अस्तित्व= माझी इच्छा पूर्ती/ वासना पूर्ती= मला समजलेले विचार/भावना/कल्पना/कृती हे हेच सत्य = आदिम उसळलेली वृत्ती= तिचे परिणाम= जगणं व निराशा सहन करणे - नियती चा अखेरचा फटका बसेपर्यंत

- माधव पुराणिक

# गुलाम - काजळमाया - लेखक - जीए कुलकर्णी

विवेचक - व्ही एस वाघोलीकर

- जी ए कुलकर्णी यांची ही कथा वेगळ्या वाळवंटी देशातील आहे. बर्टन लेखकाने, अरबस्तानात जावून तेथील भाषा अचूकपणे शिकून, अरबी कथांचे इंग्लीशमध्ये भाषांतर केले. त्याची या कथेमुळे आठवण होते.

- 2 ) कथानक -बहुतेक हिंदमधून आलेला नायक मुसाफिर, एमाम नदीच्या उगमाचा शोध घेण्यासाठी अल एदिना राज्याच्या सिदीला भेटण्यासाठी निघाला आहे. तेथे भेटवस्तू देवून मुठीएवढे हिरे घेण्याची त्याची गुप्त मनिषा आहे. पण त्या देशाची रूढी असते की, एका गुलामाला मारायचे. म्हणून मित्र दोन उंट व सामान घेवून प्रथम तो गुलामांचा व्यापारी एमराकडे जातो. तेथे रत्न देवून मुका, धिप्पाड गुलाम विकत घेवून ,तो वाळवंटी प्रवासाला निघतो. त्याआधी एमराचा कुबडा सेवक , "अल मक्तुब मक्तुब "- जे लिहिले आहे ते लिहिले आहे ,असे म्हणताना खडबडीत हसतो. एमरा सिदीसाठी भेटवस्तू म्हणून एक बंद वाटणारी पेटी देतो.

- नंतर - त्यांचा जीवघेणा वाळवंटी प्रवास सुरु होतो. सगळीकडे डोळे जाळणारे रखरखीत सूर्यप्रकाश तापणारे, अणूंप्रमाणे अनंत वाळूचे कण. त्यातही गुलामाच्या छळाचे अनेक प्रकार दाखवले आहेत.

- मित्र मरतो. रात्री गुलामही घंटा तोडून उंटांना मारून पळतो. आता मुसाफिर एकटाच पाण्याच्या घोटासाठी पायी वाळवंट तुडवतो.

- तो कसाबसा अल एदिनाला पोहचतो. तेथे चौकोनी पाण्याचा हौद असतो - व सिंहासनावर सिदी व शेजारी वृद्ध सरदार असतात. मुसाफिर सांगतो की ,माझा गुलाम पळून येथे आला आहे. सरदार सांगतो की ,तो गुलाम नव्हता तर येथील पूर्वीचा सिदी होता. शिकारीला गेल्यावर हरवला होता. तू त्याचा छळ केलास व तूच येथे गुलाम आहेस. त्यामुळे तुला मृत्यूदंड देणार. शेवटची इच्छा म्हणून तो पेटी पहायला मागतो. त्या पेटीतल्या कापडावर ,भविष्याचे चित्र सारखे बदलून रेखाटले जात असते. आताच्या चित्रात मुसाफिरला मारले जाते, हे दाखवले जाते. तर थोड्या वेळानंतर चित्र दिसते की, तेव्हा (सत्तेसाठी ) वृद्ध सरदार त्या सिदीला मारतो व सिदी कोसळतो. हे पाहून मुसाफिर मरतानाही कुबड्याप्रमाणे खडबडीत हसतो.कारण त्याच्या मनात "अल मक्तुब मक्तुब "हे पटले असते.

- 3.जीएंचे दिशादर्शन - या कथेतून जी ए सुचवत आहेत की," फासे खुळखुळवणे आपल्या हाती असते. पण दानावर आपली सत्ता नाही." प्रत्येकजण कोणाचा तरी गुलाम असतो. व सर्वजण नियतीचे गुलाम असतात. नियती अनेक रुपांमध्ये येते. उदाहरणार्थ, पाणमायमध्ये वृद्ध स्त्री असते. रक्तमुखीत तरुण स्त्री असते. बळीत जमावाचे रूप घेते......इस्किलारमध्ये सेविका, रमल शब्द सांगते.....त्यापेक्षा येथे भविष्याचे चित्र स्पष्ट होत जाते. फक्त ते हातात कापड असणाऱ्याला कळत जाते....या कथेत नियती, कुबड्याच्या रुपात येवून ,चित्रे काढून सूचना करते. लिहून ठेवलेले पुढे पुढे होत जाते, हे दाखवण्यासाठी ,अद्भूतपणे कुबडा, कापड, चित्रे व पेटी यांची सांगड या कथेत आहे.

- 4. जी ए म्हणतात -" भविष्यकाळ वर्तमान झालेला काही वेळा माणसाला पहाता येतो. पण वर्तमान भूतकाळ झाले ला पाहण्यास बहधा तो जगत नाही. " म्हणजे शेवटी अशी वेळ येते की आपला वर्तमान संपतो. तो भूतकाळ झालेला

आपण पाहू शकत नाही. - आपण मरतो, तो क्षण नियतीने लिहिलेला असतो - अल मक्तुब - मक्तुब.

- मुसाफिरला वाटते की आपण स्वतः निर्णय घेवून गुलामाला विकत घेतले व अल एदिनाला हिरे मिळणार. पण हे इच्छास्वातंत्र्य नियतीच्या चौकटीत असल्याने तो स्वतः होवून मरण्यासाठी, अल एदिनला जातो.

- काही वाक्ये - । ) नद्यासरोवरांचा धर्म वाळवंटात वेडा ठरतो. तर वाळवंटातला धर्म समुद्रावर खुळा ठरतो - वाळवंटातील धर्मावर हे स्पष्ट भाष्य आहे.

- 2) जिवंत रहाणे हा धर्म असताना - सभोवती समाज नसताना ,मी ठरवेन ती नीती. व मी करतो तो धर्म.

- याप्रमाणे या कथेत, वेगळा वाळवंटी प्रदेश घेतला आहे. तेथील माणसांची जगण्याची धडपड दाखवली आहे. त्यासाठी इतर माणसांना गुलाम करतात ,छळ करतात ,विश्वासघाताने मारतात, व माणसे जगतात. अस्तित्व हेच खरे व त्यासाठी इच्छास्वातंत्र्य आहे अशी अस्तित्ववादी विचारसरणी घेवून माणसे जगतात. पण त्याचवेळी कोणीतरी - नियतीने लिहिल्याप्रमाणे घडते ,ही प्रबळ विचारसरणी आहे. त्यामुळे माणसाचे इच्छा स्वातंत्र्य हे नियतीच्या चौकटीत असते -हे कथेत मान्य करावे लागते.हा जीएंच्या सुधारित अस्तित्ववाद व नियतीवाद यांचे संयुग आहे. म्हणून ही कथा महत्वाची आहे. धन्यवाद. –

- विलास वाघोलीकर

सुनीळ सामंत: विलास सरांनी अतिशय कमीत कमी सब्दांत ही अवाढव्य कथा कशी पुर्ण केली याचे कौतुक आहे. विश्वेश्वरजींनी म्हटल्याप्रमाणे या कथेवर कादंबरी लिहीता येईल इतके मटेरिअल या कथेत आहे.

गुलाम ही कथा एका अत्यंत मनोरंजक बॉलीवूड सिनेमाची पटकथा होऊ शकते. अगदी गाणी नाच वगैरेंसह.

गुलाम ही माझी अत्यंत आवडती आणि मनाला रिझवणारी, शांत करणारी कथा आहे. एखाद्या अशांत क्षणी, मन घाबरे झालेले असता ही कथा वाचावी. मोरपीस फ़िरवून मनाला शांत करते. अल मख्तूब मख्तूब हा तर शांतीचा मंत्रच आहे. अगदी ओम शांतीः शांतीः सारखा. कथा इतक्या इतक्या वळणावळणाने जाते की मन आपोआपच त्या कथेमध्ये गुंतून राहते. एक विचार करू जावा तोवर दुसरे काहीतरी वेगळेच घडते. कोयते मांडीवर घेऊन बसलेले दोन हबशी एका क्षणी दिसतात दुसऱ्या क्षणी नाहीसे होतात. अगदी तसेच आपल्या मनातील भयकारी विचारही गुल होतात. आणि परत येतात. एका क्षणापुर्वीचा गुलाम, राजा होऊन जातो आणि आताचा राजा काही क्षणांनी प्रेत होऊन लुढकणार असतो.

मग कसले भय आणि कसली चिंता.

अल मख्तूब, मख्तूब.

सुनीळ सामंत: या कथेतील मला प्रचंड आवडलेला उतारा म्हणजे जीएंनी केलेलं भारताचं यथार्थ वर्णन. इतकं सुंदर वर्णन आजवर कोणत्याही स्तोत्रात केले गेले नसेल.

****माझा देश इथून हजारो कोसांवर आहे. तो अतिशय घरंदाज आहे व त्याला अनेक शतकांची कुलीनता आहे. इतर माणसं फक्त आयुधंच म्हणून दगड वापरत असता आम्ही त्यावर देखण्या आकृती कोरल्या, अक्षरं खोदली; इतर माणस जनावरांची शिकार करताना केवळ ओरडण्यासाठीच आवाजाचा उपयोग करत असता, आमच्या कवींनी सागरांची गर्जितं***

***गायली, सौंदर्यस्तोत्रं लिहिली. तिथलं आभाळ वितळलेल्या नीलमण्यासारखं आहे, आणि तिथल्या एखाद्या घरात सूर्यप्रकाशाचा कवडसा उतरला तर त्यात अणुरेणू दिसणार नाहीत.***

***माझ्या त्या देशात, संगमरवरी सुबक खांबांची अनेक मंदिरं आहेत. तिथल्या आरसपानी तलावात हंस पोहतात आणि तिथल्या स्त्रिया सुरेल संगीतासह नृत्य करत असता त्यांच्या पावलांखाली कमळ ठेवलं तर त्याच्या पाकळ्या दुमडणार नाहीत*.***

- सुनीळ सामंत

सुनीळसरांनी लिहिल्याप्रमाणे गुलाम कथा विलाससरांनी थोड्या शब्दांत नेमकेपणाने सांगून सौंदर्यस्थळे दाखवली आहेत. या खूप छान विवेचनाबद्दल आभारी आहे. सुनीळसरांची सुयोग्य दाद वाचून हुरूप वाटला.

जीएंनी वाळवंटाचे वर्णन इतक्या अचूकपणे केले आहे की, प्रत्यक्ष सफर केल्याप्रमाणे वाटते. भाषासौंदर्य अप्रतिम! बाकी नियतीवाद, आपण कठपुतळी या जीएंच्या वैशिष्ट्यपूर्ण मुद्द्यांवर डा◌ॅक्टर माधवसरांचे भाष्य वाचणे औत्सुक्याचे असेल. ओघानेच सांगतो 'अल् अल् मख्तूब' हा उल्लेख 'पावलो कुएल्लो' च्या

'Alchemist' मध्ये वाचलेला आठवतो. जीएंच्या इतकी मनाची पकड Alchemist ने घेतली नाही.

- यतीन गुळवणी

The Alchemist novel was written in 1988.

The era of kathputali is of 1955.

Al Al Makhtub may be the invention of GA.

-शिरीष

**al-maktoob**

Al-maktoob (المكتوب) literally means “that what is written” and refers to the idea that everything is pre-determined by God (or in some other sense), because it has been “written” in the book of life already. This concept is wide-spread in the Arab world and is often used to rationalize events ex post, e.g. “كان مكتوب عليه” – “it was written for him” or “that was his fate”.

al-maktoob

al-maktoob

: गुगलवर शोधल्यावर अल मक्तूब सहजच सापडले. शंका होती, कारण जीए स्वतःचे शब्द निर्माण करण्यात निश्ढ्णात होते, सेरेपी, इस्किलार, स्किलार, स्किहाड, एली इत्यादी. पण मक्तूब हा मूळ अरबी तात्विक शब्द आहे.

-सुनीळ सामंत

उत्तम. जीएंचे ज्ञान विश्वकोषासमान होते. त्यामुळे त्यांच्या कथांमध्ये विज्ञान, अध्यात्म ,इतिहास, भूगोलाचे खूप संदर्भ असतात. त्या पार्श्वभूमीवर अभ्यास केला तर, प्रमेय सोडवल्याप्रमाणे कथा जास्त - जास्त -आणरवी जास्त, कळत जाते -

मुरलेल्या मधाप्रमाणे. आपण व इतर कथेचा इतर इतका अभ्यास करत आहात, हे कळून आनंद झाला. अशा गंभीर चर्चेने, या ग्रुपच्या उद्देशाबद्दल फायदेशीर होईल. खूप धन्यवाद

. विलास वाघोलीकर.

गुलाम या कथेत आपण सर्व नियतीचे गुलाम आहोत हे सौंदर्यपूर्णरित्या अधोरेखित केले आहे. अगदी उत्कृष्ट बोल्ड कलमकारीने. ही नियती लिहिणारा प्रथमच जीएंच्या साहित्यात आला आहे. कुबड्याच्या स्वरुपात.

कथेच्या एवढ्या विस्तीर्ण वाळवंटात हा कुबडा तसा यःकश्चितच रहातो. पण तोच तर नायक आहे या कथेचा. नाही? आपल्याला हात धरून एमराकडे नेले कोणी? विसरलात? आणि त्या काळोखातही आपले हुबेहूब चित्र काढले. आणि लगेच त्याच्या चिंध्या केल्या. कारण वर्तमान फ़ार काळ रहात नाही. चिंध्याच होतात. आणि सिदीला द्यायची भेट कोणी दिली? वेडगळपणे हसणारा, बारक्या मुलाएवढीच उंची पण गुढघ्याला पोचलेली शुभ्र दाढी. उड्या मारत चालणारा. अतिकुरूप खुजा. जुन्या जर्दाळूसारखा आकसून आकसून सुरकुतलेला चेहरा. तोच तर नायक आहे ना. जीएंचा. तुमचा आणि आमचाही.

पण मग एमरा कोण? धिप्पाड. जागा न सोडणारा. तुमच्या आतल्या खिशात काय आहे हेही जाणणारा. तुम्ही कुठून आलात आणि कुठे कशासाठी चाललात याची बित्तंबातमी असणारा. तो त्या कुबड्याला अगदीच भाव देत नसल्यासारखे म्हणतो- ’ त्याच्याकडे लक्ष देऊ नकोस, त्याचे शब्द म्हणजे वाळूवरील फ़क्त रिकामे वारे आहेत". कुबड्याला, नियतीला दुर्लक्षित कर म्हणणारा, पण त्याला आपल्यापाशीच ठेवणार हा एमरा कोण? ईश्वर?

नीयतीवाद सांगतो, अल मख्तूब, मख्तूब. काहीही कर. कितीही कर. कोणालाही शरण जा. अथवा जाऊ नको. मी लिहीले. लिहीले. आता- त्यात -बदल- होणे -नाही.

ईश्वर सांगतो, तू प्रयत्न कर. मी तुला सहाय्य करीन. अर्थात मी त्याची किंमत म्हणून रत्न मागून घेईन. पण प्रयत्न कर. इच्छित स्थळी पोहोचण्यासाठी सारी कायनात म्हणजे पुन्हा मीच तुझ्या सहाय्याला येऊ.

बिननावाचा कुबडा आणि धिप्पाड एमरा.

बाकी सगळे वाळवंट.

- सुनीळ सामंत

एकदा प्रमेय म्हटलं की केवळ क्ष ची किंमत काढून नाही चालणार बरं का!

क्ष य झ अ ब क सर्वांचा अर्थ लावायला हवा

सावलीत बसलेले ते कोयते घेतलेले दोन हबशी कोण आहेत? ते दोन का आहेत? तेच पुन्हा दरबारात आहेत का?

मुशाफ़िराचा मित्र कोण? इतका बुद्धीमान व धूर्त मित्र. त्याला वेड का लागते? त्याला कथेत जागा का दिली आहे? जीए उगाचंच एखादं पात्र निर्माण करत नाहीत.

पेटी वेशीबाहेर पडतानाच का मिळते? आणि ती मुशाफ़िराला उघडता येत नाही असे का?

लाल वस्त्रातील माणूस कोण? बाकी सर्वांची वस्त्रं निळी का आहेत?

हौदाचा अर्थ काय?

अजून खुप सारे प्रश्न आहेत.

आणि याची उत्तरं ज्यांना माहित असतील त्यांनी द्यावी अशी माझी विनंती आहे कारण मला ती सोडवता येत नाहीत.

आणि ज्यांना ती माहित असतील त्यांनी दिली नाही तर ते आपलं नेहमीचं हजार शकलं होऊन पायाशी लोळू लागतील वगैरे..

- सुनीळ सामंत

कथा_गुलाम

मी आज पहिल्यांदाच जी ए कुलकर्णी यांच्या कथेविषयी लिहण्याचा प्रयत्न करत आहे.अगदी साध्या शब्दात.

ही कथा सुरू होतेय...मृत जनावराच्या सडत चाललेल्या आतड्यात पुढे सरकत जावे..या वाक्याने.

ज्यातून तिरस्कार..घृणा..किळस अशा भावना जागृत होऊन कथावाचनाच्या प्रवासाला सुरूवात होते. मग आपण वाळवंटात जाऊन पोहचतो.जसा परीसर तशी माणसे या प्रमाणे एक एक व्यक्ती भेटू लागतात.सोबतीस असतो एक मुशाफिर.त्याला पुढे नेणारा कथानायक आकसलेल्या जरदाळू सारखा कुबडा, तिरस्कार वाटावा पण अत्यंत हुशार असा एमरा,एखाद्या प्राणी संग्रहालय पहायला मिळावा असा प्राणी म्हणजे गुलाम जो मुशाफिराला गंडवून जातो आणि नंतर अल एदिनचा सम्राट.अशी एकापेक्षा एक सरस पात्र या कथेत येत कथा रंजक करू लागतात.

प्रत्येक व्यक्तीमत्व लक्षात रहावे इतके वेगळेपण जीए नी शब्दबद्ध केले आहे.सावलीचा आनंदही ज्यांना उपभोगता आला नाही अशांची मानसिकता व या सर्वांवर नियतीचे वर्चस्व सिद्ध करणारे कथेचा शेवट.सारे काही अद्भूत वाटते. या

कथेत क्षणाक्षणाला उत्कंठा वाढविणारे प्रसंग व परिसर दर्शन आहेत.कथा वाचल्यानंतर अस्वस्थ वाटायलाच हवे व नियती दर्शन घडावे ही कथेची फलश्रुती आहे.

- डॉ. अलका तडकलकर ,

अंबाजोगाई

व्वा अलकाजी. अगदी यथार्थ. तुम्ही बारकाईने शब्दनशब्द वाचून समजून घेता किंवा जमजून घ्यायचा प्रयत्न करता हेच मोठे आहे. तुमचे या ग्रुपवर, चर्चेत मनःपुर्वक स्वागत.

अलकाजी ही कथा वाचून अस्वस्थ होतात.

मी ही कथा वाचून एकदम गारेगार स्वस्थ होतो. निवांत होतो. ड्रायव्हरच्या मागे निवांत बसलेल्या प्रवाशासारखा.

- सुनीळ सामंत

अगदी योग्य वाक्ये. "सावली चा आनंदही मिळत नाही असे वाळवंट "- या मोजक्या ( जी ए प्रमाणे ) शब्दांत वाळवंटाची भीषणता दाखवत आहात. जीएंचे आपल्यावर ,अनुभव देण्याचे ऋण आहे. ते कमी करण्यासाठी आपण लिहितो. आपणही लिहिते व्हावे, ही नम्र विनंती

- विलास वाघोलीकर

मित्र नारिंगाची टेकडी समजून मुशफिराला तिथे नेतो आणि वास्तवात तिथे उंटाचे सांगडे व नंतर माणसाचा सांगाडा सापडतो, तो त्याचं मांडणी शिल्प बनवतो, नकळत तो भविष्यातील घटना प्रतिकात्मक रीतीने दाखवतो. पण हा संकेत दोघांनाही कळत नाही.कला त्मक निर्मिती करताना माणसाला त्याच्या वर्तमानातील कष्टप्रद अवस्थेचा कसा विसर पडतो ते दाखवले आहे.मित्र त्या बनवलेल्या शिल्पाकृतीला परत येईपर्यंत थांबायला सांगतो. स्वतः ची वेळ येईपर्यंत माणूस किती गाफिल राहतो. जे हातात मिळेल त्याच्याशी खेळत बसतो, त्यातून काहीतरी सृजनात्मक करायचा प्रयत्न करतो, मग ती हाडे वं सांगाडा का असेना.

- विशाखा आपटे

क्या बात है.

या प्रसंगावर मी खुप डोकेफ़ोड करायचा प्रयत्न केला. एक खात्री ही की जीए अनावश्यक असा एकही शब्द लिहीत नाहीत. या संपूर्ण कथेत या प्रसंगाचे महत्व समजतच नव्हते.

- सुनीळ सामंत

गुलाम या कथेचे इतके विविध व खोलवरचे कंगोरे आहेत की विश्वेश्वरजींनी म्हटल्याप्रमाणे त्यावर खरोखरच एक कादंबरी लिहिता येईल. या प्रत्येक कंगोऱ्याला इतके विविध आभास व नक्षी आहे की त्या प्रत्येक नक्षीत आपण हरवून जाऊ शकतो. जीए जर लेखक नसते तर ते एक मोठे चित्रकार किंवा चित्रपट दिग्दर्शक झाले असते. आता हेच पहा ना; त्यांनी आमराचे गाव त्यातल्या गल्ल्या बोळ हे केवळ शब्दातून इतके जिवंत केले आहेत तर कॅमेराला त्यांनी किती मोठा आयाम दिला

असता! प्रकाश सावली आणि काळोख यांची भाषा ज्याला समजते तोच समर्थ चित्रकार किंवा चित्रपट दिग्दर्शक होऊ शकतो. एमराचे गाव, वाळवंट, सिदीचे शहर, तटबंदी, शिदीचा दरबार, त्या दरबारातील हौद, त्यातील मानकरी, त्यातील हबशी, अगदी त्यातील पायऱ्या सुद्धा जीए केवळ शब्दातून दाखवतात. मुशाफिर जेव्हा पाण्यात उतरतो तेव्हा आपणही थंडगार होतो. कथेच्या शेवटी चित्र पाहिल्यावर आणि ते पुन्हा पाहिल्यावर मुशाफ़िर थबकला आणि विस्फारित डोळ्यांनी पहातच राहिला. चित्रात बदल झाला होता. वृद्धाने आपली भीषण कट्यार गुलामाच्या पाठीत खुपसली होती. त्यावेळी मुशाफिराला आतून पोखरलेल्या अंगात अनेक कीटकांनी आवाज सुरु करावा त्याप्रमाणे वाटले. त्याने सुकत चाललेल्या कापडी चित्राची घाईघाईने घडी घातली व ती गुलामाकडे परत दिली व गुलामाकडे पहात तो अनावरपणे मोठ्याने हसू लागला. त्याच्या हसण्याचा आवाज आता अगदी कुबड्या च्या आवाजा प्रमाणे होता चिंबलेला, शरण, उमज पडलेला.

इथे मीही कापडी चित्राप्रमाणे पुस्तक मिटतो. मलाही आतून पोखरणाऱ्या कीटकांचा ध्वनी येऊ लागतो. आणि मीही हसू लागतो. ड्रायव्हरच्या मागे निवांत बसलेल्या प्रवाशासारखा.

- सुनीळ सामंत

# गोरिला - सांजशकुन -- जी ए कुलकर्णी

विवेचक - व्हीएस वाघोलीकर

1.- जी ए वाचकाला वेगळे प्रदेश दाखवतात.

-2. कथानक - या कथेत मोठे प्राचीन देऊळ आहे. पण चबुतऱ्यावरील मूर्ती भग्न झाल्याने देवूळ वापरात नाही. शिवाय ते दाट अरण्यात असल्याने हिरव्या अंधाराने वेढले गेले आहे. अपघाताने तेथे एक गोरिला येतो. त्याला ती जागा सुरक्षित वाटल्याने तो चबुतऱ्यावर बसतो. फळे खातो. ओला ओंडका दातांनी कुरतडतो. त्यामुळे त्या ओंडक्याला विचित्र आकार येतो.

-3. आता त्या जंगलात एक रानटी जमात दाखवली आहे. शिकार करणारी ,नाचणारी, वाद्य वाजवणारी, रानटी सण साजरे करणारी ,नायक असलेली ही जमात आहे. त्यांना ते देऊळ सापडते. व तो चबुतऱ्यावरील ओंडका त्यांना - त्यांचा देव वाटतो. काही दिवस ते फळांच्या टोपल्या ठेवतात. गोरिलाची चंगळ होते. पण भांडे फुटते. व प्रसादाची फळे गोरीला खात असल्याचे कळाल्यावर ती लढाऊ जमात, गोरीलास पकडते. त्याचा बळी देवून ओंडक्याच्या देवाला रक्ताभिषेक करण्याचा वार्षिक कार्यक्रम ,जमातीचा प्रमुख करतो...

- येथे काही धर्मातील दरवर्षी बकरी बळी देण्याचा सण आठवतो.

-4. दरवर्षी गोरिला पकडून त्याला बळी देण्याचा कार्यक्रम सुरु असतो. पण आता यावर्षी गोरिला मिळत नाही. नायकाच्या सत्तेला आव्हान तयार होते. तेथे एक वृद्ध वादक हातातील चर्मवाद्य ,तालाच्या ठेक्यात ,बेधुंद होवून वाजवत असतो. तो गोरीलासारखा भासतो. नायक त्याचा बळी देतो.

- कथेशेवटी जी ए म्हणतात - "गोरीला आता कायमचा माणसात आला होता."

5.मागोवा - जमातीचा नायक काय, किंवा आताचे उत्तर कोरियातील प्रत्यक्ष हुकूमशहा काय,ते त्यांच्या सत्तेसाठी बळीचा बकरा शोधतात - हे जीएंना सांगायचे आहे. हेच तात्पर्य विदूषक कथेत, हंस व कावळे कथेत आहे. माणसांच्या समुदायात कोणी नेता होतो. इतर अनुयायी होतात. नेत्याला 24 तास आपली सत्ता अनुयायांवर कशी राहील याची कृती - विचार करावा लागतो. जीए हा -समूह मानसशास्त्रीय विचार ललित कथेत दाखवतात. उदाहरणार्थ या कथा पहाव्यात - सर्प, विदूषक, दूत ,स्वामी ,बळी कथेत दुष्काळामुळे अजाण अमाशीचा बळी जातो.

माणसाचा बराचसा इतिहास गुलामगिरीचा आहे. पण हुकूमशहांना या गुलामगिरीला काही तात्वीक मुलामा द्यावा लागतो. समुहमन तयार करावे लागते.

6. मानवी समाजात खरेच असे सत्तेचे खेळ चालू असतात. म्हणून सामान्य माणूस शक्यतो सत्ताधाऱ्यापासून दूर राहतो. मानवी समाजात ,हुकूमशहा हे कधी साम्यवादामध्ये वर्गशत्रूंना नष्ट करायला सांगतात. कधी नाझीवादात ज्यूंना नष्ट करायला सांगतात. काही ,शांततेच्या धर्मात, श्रद्धाहीनांना का xx ठरवून नष्ट करायला सांगतात... याप्रमाणे गुलामगिरी ( व नरबळी ) प्रथा चालू झाली.

सत्तेसाठी चालणाऱ्या या खेळाचे किंवा प्रक्रियेचे रूप या कथेत दाखवले आहे. रूपक व वास्तविक कथा म्हणून, शब्दप्रभू जीएंनी ही कथा साकारली आहे. धन्यवाद.—

- विलास वाघोलीकर

दंडवत सर. अगदी साष्टांग दंडवत.

आफ्रिकेतल्या कुठल्यातरी जंगली जमातीची ही कथा अनेकदा वाचली आणि अगदी कालही नीट वाचली. तिला मानवी प्रवृत्तींचा संदर्भ आहे हे ही जाणलेच कारण जीए काही मनोरंजनासाठी गोरिलाची कथा लिहिणार नाहीत एवढे तर जाणतोच.

पण तुम्ही उदाहरणे देऊन हे अगदी आपल्या आजूबाजूलाही चालते आणि आजही चालते आणि उद्याही चालणार आहे हे जाणवून दिल्यावर जो अंगावर काटा आला तो जीएंची कथा वाचून आला नव्हता.

हे वाचल्यावर आठवले. जगात सुमारे बारा लाख स्पिसिज चे सजीव आहेत. पण एक, फ़क्त एक प्राणी आहे जो आपल्याच स्पिसीजला मारतो.

मानव.

- सुनीळ सामंत

मी गोरिला ही कथा वाचलेली नाही कारण सांज शकुन हे पुस्तक माझ्याजवळ नाही. पण वाघोलीकर सरांनी जे कथासार आणि विवेचन केले आहे त्यावरून एक गोष्ट जाणवली.

कोणत्याही अर्थहीन वस्तू ला संदर्भ ( context) मिळाला किंवा दिला की ती अर्थपूर्ण होते.गोरिला नी कुरतडलेला ओंडका छबूतऱ्याच्या संदर्भामुळे देवाची प्रतिमा होते. माणसाचं मन ओळखीच्या प्रतिमा शोधत असतं, त्या दिसल्या की त्याला बरं वाटतं, आतल्या आत secured वाटतं. जसं आपण लहानपणी

आकाशातील ढगामध्ये पक्षी, हत्ती, परी, राक्षस पाहतो किंवा शोधतो तसेच हे म्हणता येईल.

जेव्हा गोरिला मिळत नाही तेव्हा त्याच्यात व ज्या व्यक्तीत साम्य असेल (इथे साम्य हा संदर्भ, context आहे आणि बेधुंद पणा ही एकसारखी वृत्ती ) अशा व्यक्तीचा बळी दिला जातो.

- विशाखा आपटे

गोरिला एवजी माणसाची बळी म्हणुन निवड होते. तेंव्हा वाद्य वाजवताना देहभान विसरून रममाण झालेला वृद्ध निवडला जातो. मांस खाण्याची चटक लागलेली मानवजात. दरवर्षी मानवाचा बळी ,अशी प्रथा सुरू करते तेंव्हा मनाचा थरकाप होतो.

- दिलिप बडे

विरोधक संपल्यावर बळी देण्यासाठी दुसरा नंबर कलाकारांचा असतो असे तर जीएंना सुचवायचे नाही ना?

- सुनीळ सामंत

# घर कथा - ( पिंगळावेळ ) लेखक -जी ए कुलकर्णी

विवेचक - व्हीएस वाघोलीकर

1 )- जीएंनी लहान गावातील ,हातातोंडाशी गाठ असलेले जीवन जगणारी अनेक माणसे - कुटुंबे त्यांच्या कथांतून दाखवली आहेत. त्यातून , माणसांतील विलगपणा ,विस्कळीतपणा व जीवनातील अव्यवस्था अनुभवायला मिळते. त्या कुटुंबांतील अनेक स्तर त्यांनी दाखववले आहेत. तसेच कुटुंब, ' घर 'कथेत भेटते.

2 )- कथानक - i)इलेक्ट्रिक कंपनीत नोकरी करून निवृत्त झालेले मधूकाका ,सरळ संवेदनशील स्वभावाचे आहेत. ii) पत्नी माई iii ) मोठी मुले रमेश ,शांताराम iv) लग्न झालेली मुलगी मालती परगावी असते.

लहानपणी मधूकाकांचे वडील, श्रीमंत व्यावसायिक होते. ते एका जीवघेण्या संकटात सापडून उध्वस्त होवून, लौकर निधन पावले. नंतर आईही निधन पावली. फक्त जाताना ती मधूकाकांना " आपले घर बांध." अशी इच्छा व्यक्त करून गेली. छोटया मधूने असंख्य लहान नोकऱ्या केल्या. शेवटी इलेक्ट्रिक कंपनीत छोटीशी नोकरी करत ,भाडयाच्या घरात राहून ,स्वतःच्या घराचे स्वप्न पाहात -रहात होते - ( तेव्हा किंवा आताही पत असली तरच घरासाठी कर्ज मिळते. ) त्यामुळे त्यांना संसारातूनच पैसे साठवावे लागत होते. त्याला मुले कंजुषी म्हणत. आता वय झाल्यावर त्यांनी गावाबाहेर घर बांधले असून अक्षय तृतियेला घरात जाण्याच्या विचारात होते.

मधूकाकांनी ज्या हालअपेष्टा लहानपणी सहन केल्या त्याची धग, मधूकाकांइतकीच त्यांच्या मुलांना जाणवणे ही अवघड गोष्ट आहे. आणि त्यामुळे त्यांना मधूकाकांचा घर घेण्याचा हट्ट त्यांना समजणे ही तर फारच दूरची गोष्ट वाटते. त्यामुळे आपल्याला या घराच्या हट्टापायी लहानपण उपभोगता आले नाही, असा त्यांचा मनोमनी पक्का समज होतो. मधूकाकांची बायको खरे तर कर्तबगार आहे. पण तिलाही मनाजोगे काहीही आयुष्यात करता आले नाही. आता तरुणपणी मुलांचे आयुष्य कोळपून जाऊ नये ही तिची धडपड आहे. तिला नवऱ्याबद्दल प्रेम आहे. पण त्यांचा घराबद्दलचा आयुष्यभरचा आग्रह आणि त्यामुळे त्यांनी कुटुंबियांची केलेली फरफट तिलाही पटलेली नाही. मधुकाका आपल्याजागी बरोबर असले तर इतरही चुकीचे नाहीत.

खचवून टाकणारे दु:ख, ही आयुष्यात येणारी बाब आहे.

'कसाब 'कथेत येसूबाई बायको नवऱ्याला म्हणते, " तुमच्या लहानपणाच्या हालांचे आम्हाला सांगू नका " त्याचप्रमाणे येथेही मधूकाका ( व बायको माई )सोडून., त्यांच्या घराचे कोणाला देणेघेणे नसते. ते तसे बोलूनही दाखवतात. त्या अक्षय तृतियेच्या दिवशीही शांताराम व रमेश बाहेरगावी जाणार असतात.

कथा सुरू होते ,त्या दिवशी संध्याकाळी, मधुकाका वास्तुशांतीच्या तयारीच्या विचारात असतात. माई बाहेर गेल्या होत्या.मुले बाहेरच होती. म्हणून ते घराकडे व्यवस्था पहायला चालत जातात. त्यांना पूर्वी एक ॲटॅक येवून गेला होता. अशा सर्व स्थितीत कथेतील दिवस खालीलप्रमाणे ढकलला जातो - -

3 ) यापुढचे कथेतील वर्णन सविस्तरपणे देत आहे. त्यावरून अनिर्वचनीय अनुभव व्यक्त करण्याचे जीएंचे सामर्थ्य लक्षात येईल --

मधुकाकांना उन्ह सोसत नाही. व चालून आल्यावर दमल्यासारखे होते.

- घरातील जिन्यावरून ते सावकाश चढू लागले, तेव्हा छातीतला आवाज वाढू लागला. व आत कुणीतरी कुस्करत असल्याने श्वास तुकडया तुकड्याने येवू लागला.

- - गच्चीत आल्यावर पायाचा कंप कमी झाला. व त्यांना स्थिर वाटले.

- पुन्हा जरा वेळाने त्यांचे हात कापू लागले. व ते तेथील ओबडधोबड बाकावर बसले.

- संध्याकाळ झाली होती. पण उन्ह गच्चीवर होते. ते उभे राहीले तर भोवळल्यासारखे झाले. मग ते तेथेच बाकावर लवंडले व गुडघे वर घेवून आडवे झाले.

- थोड्या वेळाने गावभर त्यांना शोधून ,रमेश मित्रांसह तेथे आला.

- मग मित्रांनी त्यांना उचलून जवळच्या डॉक्टरांकडे नेवून सोफ्यावर बसवले.

- तेव्हा त्यांना धाप लागली होती.

- रमेशचा आवाज कापसाच्या ढिगाऱ्यातून यावा तसा अस्पष्ट ऐकू येत होता.

- त्यांचा सदरा घामाने भिजला होता. व अंगाला वारे लागले की शहारल्यासारखे वाटत होते -

- भोवळ तशीच होती. मग डॉक्टरांनी त्यांना इंजेक्शन दिले.

- तेव्हा झोपलेला माणूस कोणी वेगळा आहे. आपण मात्र डॉकटरांच्या शेजारी उभे राहून पहात आहोत असे त्यांना उगाचच वाटले.

- पूर्वीच्या घटना आठवत होत्या. व मधूनमधून झोप लागत होती.

- डॉक्टरांनी मुलाला खोली बाहेर नेले. त्यांचे काही बोलणे चालले आहे ,हे अस्पष्टपणाने वाटत होते.

- मधूकाकांना गाडीने लांबवरच्या जर्मन मिशन हॉस्पीटलमध्ये नेले व नंतर स्ट्रेचरवर खोलीत आणले. तेथे मधूकाकांना ओळखणारे डॉक्टर देशपांडे होते.ते बोलले व उपचार सुरु केले -

- झोपेतून जागे झाल्यावर ,त्यांना अस्पष्ट ऐकू येत होते. पावसाळयात पाऊस पडल्याचा आवाज येतो. तसा सतत ,अस्पष्ट आवाज येत होता.संध्याकाळ झाल्यामुळे वॉर्डबॉयने पिवळा बल्ब लावला. त्या दिव्याच्या पिवळया प्रकाशाने खोलीत पाणी भरल्यासारखे मधूकाकांना वाटले.

- पुन्हा थकल्यासारखे वाटू लागले. प्रकाश उकळल्यासारखा वाटू लागला. पडणाऱ्या पाण्याचा आवाज वाढू लागला.

- त्यांना अस्पष्टपणे वाटले की, खोलीच्या दरवाज्याबाहेर कोणीतरी आहे. त्यांना तेथे दादा ( वडील) असल्याचा भास झाला. मग त्यांनी जवळ बसलेल्या माईंना कोणी बाहेर उभे आहे का ,असे विचारले. त्यांनी बाहेर जावून पाहिले. तर कोणीच नव्हते.

- बाहेर सतत प्रचंड पाणी पडल्यासारखे वाटू लागले.

- डॉक्टर आले. त्यांनी डॉक्टरांना विचारले, " पाणी सतत पडत असल्यासारखा कसला आवाज येतोय ? " डॉक्टरांनी माईंकडे पाहिले व त्यांना उमजले. ते म्हणाले ," तो होय. वर टाकीत पाणी पडत आहे. "

- माई काही कामासाठी तेथेच थोडा वेळ खोलीबाहेर गेल्या. तेव्हा मधूकाकांना दादा दिसले - भास झाला.

- मधुकाका वेड्यासारखे हसू लागले. त्यांचे डोळे तापल्यासारखे उजळ वाटले. व ते वडिलांशी - दादांशी - बोलू लागले.

- हा प्रसंग सविस्तर देण्याचे कारण यातून मधुकाकांचा शेवट सूचित केला आहे.

4 ) या टप्प्यावर कथेत डॉक्टरांचे जीवन समोर येते. बायको गेल्यावर डॉक्टरांनी मुलीला वाढवलेले असते. पण त्यांची मुलगी उजव्या हाताने अपंग असते.

एवढ्यालाही दुबळ्या उजव्या हाताने नकार दिला होता. तसे नसते तर,आपले घर मिळून गेले असते, तर वयाचा प्रश्न बाजूला ठेवूनही कदाचित आपण धीटपणे संजानाला विचारलेही असते... पण डॉक्टरांना एकदम शरम वाटली व त्यांनी घाईघाईने

सिगारेट पेटवली.या क्षणाची वाट पाहत त्यांनी सारा दिवस ढकलत संपवला होता. पहिल्याच

मोकळ्या काचेत प्रकाश भरत असल्याप्रमाणे भासू लागले. झुरक्याने त्यांना एकदम सैल, सुखाचे वाटले व ते बाकावर ऐसपैस बसले.

तिला एकदा तिचे घर मिळाले की ,मी सुटलो. मग मोडीत निघालेल्या माझ्या ठोकायंत्राची मला भीती नाही. केव्हा का बंद पडेना ते! मग शेजारी सिगारेटचे एक पूर्ण पाकीट असावे. एखादा दरबारी

छबिना चौघडे-तुताऱ्या वाजवत डौलाने यावा, त्याप्रमाणे वाटणारा मालकंस टेपरेकॉर्डरवर तासभर उलगडत असावा. या दरिद्री जनतायुगात निःसंकोच सरदारी दिमाखाने चित्रे आणि लेख छापणारे 'National Geographic' किंवा 'Realities' सारखे एखादे मासिक हातात असावे. मग बोलावणे घेऊन येणाऱ्या, तू कसाही ये. तू दार ठोठावून ये अगर आडदांडासारखा आत शीर. असल्या एका सिगारेटमधून आलास तरी चालेल - नव्हे तू तसाच ये! ते मला देखील फार आवडेल!...

सिगारेट संपली तसा तो सुखाचा क्षण देखील विझला. त्यांनी सिगारेट बाकाच्या लोखंडी पायावर चेंगरली. त्यांनी थोटूक उडवताच ते दिव्याखाली पडलेल्या किड्यांत जाऊन पडले व किड्यासारखे दिसू लागले. डॉक्टर तेथून उठले व ललितच्या उजव्या हाताने त्यांना जरबेने इशारा करून बोलावल्याप्रमाणे, ते आपल्या क्वार्टर्सकडे निघाले.

***मला वाटते की जी ए येथे वाचकांशी थेट प्रत्यक्षच बोलत आहेत.***

- 5 )काही वाक्ये - जेवण समोर आल्यावर लगेच दुवा देवू नये ते पोटात गेल्यावर दुवा द्यावा.

-भिंती उभ्या राहील्या पण त्यात राहणारी माणसे पांगत जाणार.

- काही गोष्टी आपल्या आवाक्याबाहेर असतात. हे डॉक्टरांना जाणवावे. तरी शेवटपर्यंत झुंज देवू अशी ईर्ष्या ही असावी.

- आपण इमारती बांधतो, एवढेच. पण आपले घर कोणते हे इतर कोणी तरी ठरवते.

- संजानाच्या आईला महारोग झाला होता. ते कोणीतरी सांगितले. मग ती महारोग्यांच्या आश्रमात रहायला गेली. तिचे घर असे ठरले. तेथून तिला कोणी हाकलणार नाही. त्या ठिकाणी आपण होवून कुणी येणार नाही.

- ***

6 )जीएंचे दीशादर्शन---अपंगत्व असलेल्या मुलीला स्थळ येत नाही म्हणून मनोमन खचलेले डॉक्टर, आणि आजवर मेहनतीने पैसे साठवून हक्काने बांधलेल्या घराची कुणालाच कशी किंमत नाही ,याचा आपल्या अखेरच्या दिवसात विचार करणारे मधूकाका यांना नियतीने एकत्र आणले आहे.

जीएंच्या कथेत अडकलेल्या माणसांची सुटका अनेकदा मृत्युनेच होते. आणि आपल्या हाती सून्न होणे इतकेच उरते.

7 )अस्तित्वाला अन्न, वस्त्र ,निवारा - म्हणजे घर - त्यात कायमचे घर की, जेथून कोणी हाकलणार नाही - हे लागतात. या कथेत' घर' या वस्तूबद्दल खूप विचार केला आहे. प्रत्येकाचे त्याबद्दल भावविश्व वेगळे आहे. ते समजून घेतले पाहिजे -

मधुकाका, त्यांचे वडिल ,त्यांची आई ,त्यांची बायको, शांताराम, रमेश मुले ,संजाना ,डॉक्टर.प्रत्येकाचे घराबद्दल विचार -भावना विलक्षण आहेत

8 )त्याचप्रमाणे कथेत मृत्यू दाखवले आहेत. ते लक्षणीय आहेत. - - मधूकाका, त्यांचे वडील ,त्यांची आई यांचे मृत्यू दाखवले आहेत. तर डॉक्टर त्यावर खोलवर विचार करत आहेत. प्रत्येकाचे भावविश्व वेगळे आहे व अनिर्वचनीय मृत्यू वचनांत आणण्याचा कलात्मक प्रयत्न जीएंनी केला आहे.

जीएंच्या कथा वाचताना दम लागू लागतो तो अशाच ठिकाणी. कारण त्यावर उत्तर नसते. पण तरीही ही कथा वाचकांनी नेटाने वाचावी. कारण कदाचित या कथेमध्ये जीएंनी (कुणाच्या तरी )चरित्राचे प्रतिबिंब दाखवले आहे.

या कथेवर माझे विचार लिहिले आहेत. त्यासाठी माननीय अतुल ठाकूर व इतरांनी केलेली कथेची समिक्षा, उपयोगी पडली आहे. मी नम्रपणे त्यांना क्रेडिट देतो. धन्यवाद - -

- विलास वाघोलीकर

विलासजी. तुमचे विवेचन नेहमीच डोळे उघडणारे असते. तुमच्या विवेचनाआधी वाचलेली कथा, विवेचनानंतर वाचताना वेगळी होईन जाते. गोरीला

या कथेबाबत तर ते फ़ारच प्रकर्षाने जाणवले. घर ही कथा तशी साधी सरळ आहे. पण तरीही त्यातले खोल संदर्भ तुम्ही उलगडले. मनापासून धन्यवाद.

- सुनीळ सामंत

हा एक प्रकारे तीन पिढ्यांचा प्रेमभावनेने ओथंबलेला कालपटच आहे.

ऐन जेवणाच्या वेळी लहानग्या मधुने मोरपिसाचा हट्ट धरावा व वडिलांनी रणरणत्या उन्हात जाऊन ते घेऊन यावे, मधुनेही ते आयुष्यभर सांभाळावे, इतकेच काय मरताना देखील ते आपल्या जवळच असावे अशी इच्छा मधुकाकांनी करावी हे काय दर्शवते!

आपल्या नव्या घराला मधुकाका वडिलांच्या जुन्या घराची चौकट जाणूनबुजून लावतात.

तर रमेश आपल्या वडिलांना बरे वाटावे म्हणून आपण लग्न मोडले आहे असे खोटेखोटेच सांगतो.

- प्रमोद कुलकर्णी

घर ही तीन पिढ्यांची कादंबरी आहे असे प्रमोदजी म्हणतात. ते खरे आहे. त्याचबरोबर घर ही फ़क्त एका दिवसाची कथा आहे. सकाळी सुरू होते. रात्री संपते. किती काय काय घटना, किती आयुष्ये, डॉक्टर, संजना, दादा, आई, माई, शांताराम, रमेश, ललू आणि कितीतरी. हा नुसता गुंतवळ नाही. एकमेकांशी जोडलेल्या या कथा आहेत. आणि घराशी जोडलेल्या. यात शहाणपणाच्या कितीतरी गोष्टी अगदी सहजपणे सांगितल्या जातात.

प्रत्येक नावापुढे गंध गोळी ठेवावी अशी ती नावे.

चव चहाला नसते तर ती असते जीभेला.

जेवण समोर आले की लगेच दुवा देऊ नये ते एकदाचे पोटात गेले की मग तो द्यावा कारण समोर आलेले अन्न देखील अनेकदा पोटात जात नाही.

नव्या वावटळी वर येणारा कचरा थांबवायची माझी इच्छा नाही. मला ती ताकदही नाही. नशीब माझं, ती माझी जबाबदारी देखील नाही.

ठेवणीतील पितांबर-पैठणीं ना चैत्र उन्हाळा दाखवायला ती जागा ठेवली होती. कितीतरी वर्षात त्या वस्त्रांना उन्ह दिसले नसेल.

दादा जन्मताच भरल्या सुपासारख्या मनाने आले होते. माणसे दुष्ट स्वार्थी देखील असू शकतात हे त्यांना कधी आयुष्यात उमगले की नाही कुणास ठाऊक.

एका भयानक दिवशी नवरात्र उत्सव संपून गेले मध्यरात्रीचा ठोका पडताच गाडी घोड्यांचा भोपळा झाल्याप्रमाणे सगळा मायाबाजार नाहीसा झाला.

त्यांनी आपल्या मरणाला जागा निवडली ती देखील आपल्या स्वभावाप्रमाणेच. आठ नऊशे फूट खाली पडणाऱ्या विक्राळ धबधब्याच्या कडेवरुन त्यांनी खाली उडी घेतली होती.

इजिप्तमध्ये की चीनमध्ये म्हणे माणूस मेल्यावर त्याच्या साऱ्या आवडत्या वस्तू त्याच्याबरोबर पुरण्याची पद्धत होती. शहाणे लोक. स्नेहसंबंध निर्माण झालेल्या वस्तू सोबत आपणच न्याव्यात. आपण आहो तोपर्यंतच त्यांना प्राण. नाही तर त्या मोडीतच की.

त्या(माई) उठल्या व त्यांनी मधु काकांना पुन्हा “एक पेढा हवा का?” असे विचारले. ते जागे होते. त्यांनी डोळे उघडले व नको म्हणून सांगितले. माई मुकाट्याने

परत आल्या. आपण त्यांना पेढा विचारला तो त्यांच्यासाठी नव्हे, तर त्यांनी घेतला असता तर आपणालाही एक खाता आला असता एवढ्यासाठी, हे उमगून त्यांना अतिशय शरम वाटली व त्यांनी डबा झाकून पुन्हा बॅगेत ठेवला.

मीच आता आजपासून घरातली करती झाली असे समज.

या प्रत्येक वाक्यामागे सायकॉलॉजी, संस्कृती, माणसे यांचा बारकाईने केलेला अभ्यास आहे. जीएंचे मोठेपण त्यांच्या कथावस्तूत केवळ नसते तर त्या कथेतील या बारीक बारीक कोरीव नक्षीत असते.

घर ही तीन पिढ्यांचीकादंबरी किंवा एका दिवसाची कथा नाही, ते आपलेच आयुष्य आहे. आरसा आहे. आपण स्वतःमधल्या न पाहिलेल्या, न दिसलेल्या गोष्टी जीए आपल्याला दाखवतात आणि शहाणे करून सोडतात. आपण ते शहाणपण घ्यायचे की केवळ मनोरंजन करून घ्यायचे ते त्यांनी आपल्या वकूबावर सोडले.

ही कथा मी आठ दिवसांपुर्वीच वाचली. अतिशय निराशादायी, दुःखमय आणि पुढे येणाऱ्या दुःखाचीच चाहूल देणारी ही कथा. कालही दुःख, आजही आणि उद्याही दुःखच वाढले जाणार ते आज शिजते आहे. त्यामुळे ही कथा वाचून झाल्यावर निराशा येते. पण त्य्लाही सोनेरी कड आहे ती माईच्या त्या लांबलचक भाषणाची. ते भाषण मात्र मी कालच वाचले, समजले आणि त्याने एक वेगळाच दिलासा दिला.

- सुनीळ सामंत

मधुकाकांच्या प्रतिमेतुन जि.ए.मुर्त्यू समयी कसा माहोल असावा हे लिहितात- शेजारी सिगरेटचे पाकीट असावे.या वेळी एखादा दरबारी छबिना तुतार्या-चौघडे वाजवत डौलाने यावा.टेपरेकॉर्डर वर मालकंस राग वाजत असावा.एखादे दर्जेदार

मासिक सोबत असावे.सिगरेटच व्यसन माणसाला लवकर संपवते.म्हणुन पुढे ते लिहीतात.एखाद्या सिगरेट मधुन ये.येथे सर्वत्र जि.ए.आपली रसिकता व्यक्त करतात.जो वाघोलीकरांचा मुद्धा क्र४ आहे.

दिलिप बडे

प्रत्यक्ष मात्र मृत्यूसमयी त्यांना पाण्याचा आवाज येतो.

त्यांच्या वडिलांनी उंच धबधब्यातून उडी मारून आत्महत्या केलेली असते, त्याचा संदर्भ.

- प्रमोद कुलकर्णी

: 'डॉक्टरांना उमजले ' असे कथेत म्हटले आहे. डॉक्टरांना हा संदर्भ माहित असेल का? किंवा डॉक्टरांचे मेडिकलचे ज्ञान त्यांना काही सूचित करते का? हा भाग विचारणीय आहे. म्हणून लिहित आहे. धन्यवाद.

- विलास वाघोलीकर

Altered senses असं त्यांना वाटलं असेल.

- प्रमोद कुलकर्णी

घर ही कथा साधारणपणे मराठीतील इतर कथाकारांप्रमाणेच मधूकाका ही केंद्रिय व्यक्तीरेखा ठेवून लिहिलेली आहे. जीएंच्या अनेक कथांमधे खास जीए टच असतो जिथे केंद्रीय व्यक्ती कोणी नसते व विविध व्यक्तीमत्वांच्या कथा एकमेकांत गुंफ़लेल्या असतात.

पण जीएंच्या कथेचे दुसरे वैशिष्ट्य मात्र या कथेतही आहे. वरवर पहातानाही कोणतीच व्यक्तीरेखा त्यांनी निगेटिव्ह रचलेली नाही. उलट कथेत अनेकदा फ़ोकस डॉक्टर, संजना, दादा, आई, माई, शांताराम, रमेश, ललू यांवर शिफ़्ट होत असतो. कथेचा अंत तर ललूच्या विहिरीजवळ जाण्याशी सूचकतेने केला आहे.

- सुनीळ सामंत

दोन्ही मुलांमध्ये आणि मधुकाका यांच्यात एक सुप्त परकेपणा आहे... तो मुलेही मधुकाकांना काका चं म्हणतात त्यातून व्यक्त होतो असं मला वाटतं. टोपण नावं बरेचदा असतात (अप्पा, नाना, भाऊ वगैरे )पण वडिलांना काका हाक मारणे थोडं विचित्र वाटलं.कथा वाचताना,आधी एक पुतण्या आहे आणि एक मुलगा असं वाटलं, कथा पुढे गेली तसं लक्षात आलं दोन्ही त्यांची मुलेच आहेत.

- विशाखा आपटे

वडिलांना काका म्हणणे बऱ्याच एकत्र कुटुंब पद्धतीत प्रचलित आहे. आम्ही भावंडे वडिलांना काका म्हणायचो. त्याचे मुख्य कारण आमचे वडील भावंडात सगळ्यात लहान होते. त्यामुळे आमच्या काकांची मुले जी आमच्या आधी जन्मली होती ते सगळे वडिलांना काका म्हणायची मग आम्ही पण तेच म्हणायला लागलो. आजूनही जुन्या पिढीतील म्हणजे आमच्या वयाची पिढीतील बरेच जण वडिलांना तात्या , आबा , आण्णा, काका , आगदी दादा या नावाने ही बोलावतात

- विश्वेश्वर नांदेडकर

होय. तुमचा point बरोबर आहे सर.पण मधू ला भावंडे बहुतेक नसावीत. तसा उल्लेख कथेत दिसला नाही. आणि त्याच्या लहानपणीच त्यांचं एकत्र कुटुंब उध्वस्त झालेलं आहे आणि मोठा वाडा सोडून ते भाड्याच्या घरात राहायला गेले.

- - विशाखा आपटे

घर ही कथा नविन पिढी आणि मधू काका चे जुने संस्कार आहेत त्याची घालमेल आहे. आणि फक़्त दोन ओळी आहेत ते सांगतो.

नव्या वावटळीवर येणारा कचरा थांबवायची माझी इच्छा नाही. मला ती ताकत ही नही. नशीब माझे. ती मझी जवाबदरी देखील नही. पण मी माझ्या पुरते खिडकी दार लावून घेऊ शकतो

.पोरांच्या आयुष्यात खर्ची घातलेले भांडवल फुकट जाणार.

डॉक्टर बद्दल एक वाक़्य - त्यानी तरी असले फिल्मी नखरे करु नयेत.

शेवटी एक जे तुम्ही शंभर दा वाचा पण ध्यान देणार नही. - पण खिडकी लावावी संजणानेच.

- परमजीत सिंग

# चंद्रावळ, -- निळासावळा

# जी ए कुलकर्णी

- विवेचन- यतीन गुळवणी

जीएंची वरील कथा जानेवारी १९५६ साली सत्यकथेत प्रकाशित होऊन जानेवारी १९५९ मध्ये निळासांवळा या कथासंग्रहात समाविष्ट झाली. महाराष्ट्र व कर्नाटक या राज्यांच्या सीमावर्ती भागातील, ग्रामीण बाज असणारी थोडी चाकोरीबाह्य वाटणाऱ्या या कथेत जीएंचा परीसस्पर्श जाणवतो.

कथानायक 'सण्ण्या' व त्याचा भाऊ बाबू ही दोन मुख्य पात्रे आहेत. सण्ण्याचा कबूतरखाना आहे तर आधी तालमीत घूमणारा बाबू मग गांजाच्या आहारी जाऊन 'गांजुड्या बाबू' बनतो. सण्ण्याचे लग्न होते. बायको गौरीवर तो मनापासून माया करतो. पण ती सहा सात महिन्यांत त्याला सोडून एक दिवस शेजारीच असलेल्या बाबूच्या खोलीत बाबूबरोबर रहायला जाते. संतापून सण्ण्या वाशाचा तुकड्याने बाबूला मारण्याच्या उद्देशाने त्याच्या खोलीच्या दारावर लाथा हाणतो. बाबू दार उघडतो व खोकल्याची उबळ थांबल्यावर तो म्हणतो "सण्ण्या, का रे फुकट गुरगुर? का शेपूट हापटतोस? मी तुझ्या या म्हशीला बोलवायला आलो होतो व्हय? जा की घेऊन तिला, ती येणार असेल तर." बाबूच्या मागेच गाठोड्याला रेलून मिजाशीत पसरलेल्या गौरीने बोटे कडाकडा मोडून ती समोर नाचवून तिरस्काराने "खड्ड्यात घाल या जोखमाराला!" असे म्हणून अपमानित केलेले असते. अवसान गळालेल्या सण्ण्याला बाबू समजावतो " या दीड दमडीच्या खोट्या चवल्या. हीच बया उद्या

मला सोडून जाईल एखाद्या न्हाव्याबरोबर! नागिणीवर विश्र्वास टाकावा, पण यांच्यावर? अंहं. थोड्याच! सगळ्याच बेशरम, निर्लज्ज, चवचाल."

नंतर गौरीला रोज पाहून दडपून ठेवलेली कळ जोराने उसणून त्याचा जीव तगमगू लागत असे. आपण ज्याच्यावर मायेचे वस्त्र टाकावे ते असे हिरावून जावे असे आपल्यात अशुभ काय आहे हे त्याला समजत नसते.

अशी गौरी एक दिवस मूलासह मृत होते. गंजुडा बाबू स्मशानात जात नाही की त्याच्या डोळयांत नखभर पाणी येत नाही. गौरीच्या गावचे लोक तीची सोन्याची पाटली खिशात घालून तीला व तीच्या पोराला स्मशानात पोहोचवतात. बाबू खोली स्वच्छ धुतो. गौरीचे फाटके लुगडे तो भिकारणीला देतो व संध्याकाळच्या जेवणासाठी चूल पेटवतो.

एका उपकथानकात गावच्या देवळाच्या जत्रेत बिरादार पाटील व त्याच्या 'चंद्रावळ' नावाच्या नर्तीकेचा खेळ होतो. तीच्या भिंगरीसारख्या नृत्याने सण्ण्यासुध्दा इतर अनेकांप्रमाणे घायाळ होतो. पण तीने सण्ण्याकडून पान आणून घेतल्याच्या रागाने बिरादार पाटलाने चंद्रावळीला मारलेल्या लाथेने कळवळलेल्या चंद्रावळीने सण्ण्याच्या मनात कायमचे घर केलेले असते.

आणखी एका घटनेत एका रखरखीत दुपारी

वाट चुकून आलेले व तहानलेले एक कबूतर सण्ण्याने दाखवलेल्या पाण्याच्या धारेला भुलून त्याच्या हाती लागते. त्या 'टोपेल' पील्लू मादी कबूतराचे नामकरण 'चंद्रावळ' असेच होते. दोन दिवसांत पूर्वायुष्य विसरून चंद्रावळ सण्ण्याच्या कबूतरखान्यात रमते.

या पार्श्वभूमीवर गौरी गेल्याच्या दुसऱ्या दिवशी सकाळी दहाच्या सुमारास मुख्य कथानकास सुरुवात होते. बसवण्णाच्या देवळाच्या कट्ट्यावर सण्ण्या व गंजुडा

बाबू बसलेले असतात. तीसरे पात्र चोवीस बोटांचा बाबू तेथे येतो. सण्ण्या व बाळू बिड्या ओढत चंद्रावळ कबूतराचं कौतुक करत असतानाच बाळू बिरादार पाटलाच्या नर्तीका चंद्रावळीची बातमी देतो. 'तीचा चेहरा देवी येऊन चाळणीसारखा झाला आहे." या बातमीने सण्ण्या अस्वस्थ होतो. 'त्या चेहऱ्याखेरीज चंद्रावळ म्हणजे चंद्रेचे प्रेतच. त्याच्या मनातील एका स्वच्छ कोनाड्यात असलेल्या प्रतिमेवर आता तेलकट मळ चढल्यासारखा झाला. चाळणीला चंद्रेचे धुंद, अफिणी डोळे असल्यासारखे दिसू लागले व त्याचे दुःख आता पुन्हा धुमसू लागले. काल गौरी गेली आणि आज चंद्रावळीची पाळी!'

घटनाक्रमातील चौथ्या व मुख्य पात्राचा प्रवेश होतो. याचे नाव पदमजी. हा सुध्दा कबूतरांचा शौकीन. त्याच्या कबूतरखान्यातील सर्व पाखरे तालेवार असतात. आपले किराणा दुकान फुंकून पदमजीने कबूतरे घेतलेली असतात. दर शनिवार-रविवारी त्याच्या साऱ्या जातिवंत पाखरांचा संच वर उडाला म्हणजे त्यातील अगदी आडदांड कुणबट पाखरूसुध्दा सहासात तासांत पंख स्थिरावत नसे. पदमजीचे पक्षी पंचक्रोशीत सरस असतात. सण्ण्याच्या कबुतरांना तर पदमजी मच्छर समजून हेटाळणीच्या सुरांत सण्ण्याने कबूतर पाळण्याऐवजी कोंबड्या पोसाव्यात असे सांगतो. पदमजीचा तोरा उतरवण्यासाठी बाळू त्याला चंद्रावळीचे दर्शन घडवतो. चंद्रावळ पाहून पक्षीपारखी पदमजी चपापतो. बाळू पदमजीला आव्हान देतो.

चोवीसबोट बाळूच्या आग्रहाला बळी पडून सण्ण्या चंद्रावळीची पदमजीच्या कबूतराबरोबर 'कोणता पक्षी आकाशात जास्त वेळ उडत राहिल' यावर पाच रूपयांची स्पर्धा लावायला तयार होतो.

पदमजी आपला 'सब्जी' आणवतो. बरोबर साडेअकरा

वाजता दोन फेकीत पदमजीचा सब्जी नर व सण्ण्याची चंद्रावळ आकाशात झेप घेतात. चार पाच तास दोन्ही पाखरे विहार करतात. मग पदमजीचा नर खाली उतरतो पण चंद्रावळ वरच असते. पदमजी मुकाट्याने हरलेले पाच रूपये देतो. सण्ण्या व बाळू आनंदाने बेहोश होतात.

इतक्यात चंद्रावळीच्या जवळ गिरक्या घेणारा एक काळा ठिपका दिसतो. तो शिकऱ्या पक्षी असतो. सण्ण्या ओरडून चंद्रावळीला बोलावतो. पण चंद्रावळ आवाजाच्या आवाक्यात नसते. सण्ण्या इतर दोन कबूतरे शिकऱ्याच्या डोंबलावर घालण्यासाठी वर फेकतो. पण ती कबूतरे वर पोहोचत नाहीत. शिकऱ्या भक्ष्य साधतो व चंद्रावळीची पीसे खाली येतात.

जीएंच्या या कथेतील भावनिक वर्णने अतिशय मनस्वी आहेत. उदाहरणार्थ

१ स्पर्धेची सुरुवात

बरोबर साडेअकरा वाजता दोन्ही कबूतरे वर फेकली गेली. चंद्रावळ हातातून निसटताच अंगातून सळक गेल्याप्रमाणे सरळ वर चढली. त्या क्षणीसुध्दा सण्ण्याला वाटले,आपले काळीज कापून वर फेकले. काय होणार कुणास ठाऊक? चंद्रावळीने जाताना पंख अंगाबरोबर दुमडून घेतले. फेकीचा जोर संपताच ती खाली येते की काय अशी त्याला भीती वाटली, व त्याचे मन चिपट्याएवढे झाले, पण लगेच तिने तोल सावरला. एक गिर्रेबाज गिरकी घेऊन ती वर चढली. ती थोड्याच वेळात (पदमजीच्या) सब्जी नराच्या जोडीने तेजाने चमकू लागली. सण्ण्याला अभिमानाने सूपभर लाह्यासारखे झाले. काहीही होवो, चंद्रावळीने लाज राखली. आणि जर--त्याच्या मनाला त्या महत्त्वकांक्षेने पुन्हा हलकेच स्पर्श केला---जर का ती (पदमजीच्या) नरापेक्षा वरचढ ठरली तर पदमजीचे नाकच कापल्यासारखे होईल.

२ स्पर्धेदरम्यान

"सण्ण्या, देऊन टाक मला ती मादी, पाच रूपये देतो. आहे तर बघ!" समजावणीच्या स्वरात पदमजी म्हणाला. पण सण्ण्याचा आनंद शब्दांपलीकडचा होता. त्याचा पसरट, ओबडधोबड, काळया अळूच्या पानासारखा चेहरा ओलसर झाल्यासारखा दिसत होता. आता पाच तास झाले होते व चंद्रावळीने (पदमजीच्या) सब्जी नराबरोबर तितक्याच जोमाने नेट धरला होता. " चंद्रावळ खाली येऊ दे, पदमजी, तिची बत्ताशानं दृष्ट काढतो." डोळे उघडत सण्ण्या म्हणाला. "बघ, तिनं निंब घातला तुझ्या डोक्यात!"

३ स्पर्धा जिंकल्यावर

सण्ण्याने तर टुण्णदिशी उडीच मारली आणि आपला रूमाल उंच हवेत फेकला. तो तरंगत खाली येत असता विजेच्या तारांवर पडला. रूमाल गेला तरी बेहत्तर या अर्थाने सण्ण्याने मांडीवर थाप मारली, आणि खाली दाणे वेचत असलेल्या बुद्रुक गुबगुबीत कबूतरांत तो मोहरममध्ये वाघ नाचवतात तसा एका पायावर दणादण नाचू लागला. त्याने तोंडाने हलगीचा टिकीक गँगँग टिकीक गँगँग असा आवाज सुरू केला.

४ चंद्रावळीचा अंतावेळी

चंद्रावळीच्या भिंगरीसारख्या बिंदूभोवती खूप दूरवर तिच्यापेक्षा बराच मोठा काळा ठिपका गोल फिरू लागला होता. त्याच्या फेऱ्या अद्याप दूर होत्या, पण त्याच्या निःशब्द, निश्र्चल तरंगण्यात काही तरी भीषण होते. सुरी फेकण्यापंर्वी हातात क्षणभर स्थिर धरावी त्याप्रमाणे त्या संथ हालचालीत कोंडलेले क्रौर्य होते.

शिकऱ्याचे पात्यासारखे पंख आता चंद्रावळीजवळ आले. त्या काळ्या भीषण पार्श्र्वभूमीवर तिचा काळापांढरा ठिपका क्षणभर उजळला, व पाण्याने भरलेल्या

डोळ्याप्रमाणे चमकला. नंतर एकदम उफाळून फुटल्याप्रमाणे पांढऱ्या पिसांचा फुलोरा फुलला, व शिळ्या पाकळ्यांप्रमाणे ओघळून नाहीसा झाला.

पुढील सण्ण्याची मानसिक अवस्था

सण्ण्याच्या डोळ्यांत शून्यता भरून राहिली व ते नारळाच्या भोकासारखे दिसू लागले. आपण आपल्या हाताने शिकऱ्याला चंद्रावळीचा घास घातला. डोळ्यांसमोर पाहता पाहता ती नाहीशी झाली आणि आपण ते सारे उघड्या डोळ्यांनी पाहिले. एखाद्या जोखमारासारखे!

आणि त्या शब्दाने त्याच्या जखमा वाहू लागल्या. गौरीभोवती टाकलेले प्रेमाचे वस्त्र, जोखमार; दुधिया कबूतराप्रमाणे नाचणारे चंद्रावळीचे शिंपल्यासारखे पाय, त्यांच्याभोवतालचे घुंगरू, केवड्यासारखे तिचे अंग, आणि त्यात दंश करणारा बिरादार पाटलाचा काळा बूट; चाळणीसारखा चेहरा; दोन काळ्या पंखांवर भीतीने किलकिलणारी मुठीएवढी चंद्रावळ, आणि शेवटी उधळलेली तिची पिसे --- हे सारे धक्का बसलेल्या आकाशदिव्यातील चित्राप्रमाणे वेड्या गोंधळाने भिरभिरू लागले. या साऱ्यांची करवतीचे दात असलेली अत्यंत विषारी काळी ज्योत झाली, तीच्या धगीने उभे केलेले चीड, अभिमान, वयाची जाणीव हे सारे बांध नाहीसे झाले, आणि सण्ण्या

एखाद्या लहान मुलाप्रमाणे अनिर्बंध, निर्लज्जपणे खांदे हलवून हलवून मोठ्याने रडू लागला.

कथाविषय

१ ग्रामीण बाज

२ (दानय्या गारूड्यासारखे) अतिसामान्य व्यक्तीवर अभ्यासपूर्ण लेखन

३ अत्यंत बारकाईने तपशीलवार व मुद्देसूद लेखन

४ चपखल उपमालंकार

५ चाकोरी बाहेरची एक वेगळीच कथा.

या कथेत भाव खाऊन जातो तो निर्विकार गंजुडा बाबू!

त्याचे तत्वज्ञान

"कशातही जीव गुंतवू नको. तीळ तीळ मरशील फुकट."

अनुत्तरीत राहीलेला प्रश्न

गौरी सण्याला सोडून शेजारीच रहाणाऱ्या सण्याच्या सख्ख्या भावाकडे गंजुड्या बाबूकडे का जाते?

मला ही कथा खूप आवडली.

- यतीन गुळवणी

चंद्रावळ -1. माननीय गुळवणीजींनी 'चंद्रावळ ' कथेचे कथानक चांगले सांगीतले आहे. तसेच कथेची वैशिष्टये मुद्देसूद रीतीने नमूद केली आहेत. मला कथा आवडलेली आहे. कथा वाचल्यावर शहरी वाचक हरखून जातो इतके ,वेगळ्या

वातावरणात गेल्यासारखे, वाटते.त्यामुळे शक्यतो पुनरुक्ती टाळून या कथेवर लिहावेसे वाटते.

2.कथेतील गाव लहान आहे. तेथे बहुदा जि.प ची शाळा आहे. जत्रेत दशावतराचे खेळ होतात. अशा गावात कबुतरे पाळण्याचा ,शर्यती लावण्याचा छंद, बऱ्याच जणांचा असतो. जीएंच्या कथांत ,प्राणीसृष्टी ,वनस्पतीसृष्टीचे बारकाईचे अनुभव आहेत. या कथेतील कबुतरांचे अनुभव ज्या बारकाईने येतात ते पाहून वाचक अचंबित होतो. कबुतरांच्या छंदात, सजीवाला पाळण्याचे प्रेम, त्यांची जपणूक करण्याची धडपड, कबूतरे आकाशात उंच उडत असताना, जी वलये होतात- त्यात समरस होण्याची कल्पनाशक्ती, हे सर्व येते. म्हणून कबूतरांचा थवा उडत असताना पाहिल्यास, वेळ कसा भरकन् जातो ते कळत नाही.

3. दिवसातील बराचसा वेळ, रस्त्यावर, पारावर ,मोकळया जागेत घालवणारी माणसे लहान गावात असतात.त्यांचे चित्रण करून जी ए अस्तित्वाचे असंख्य स्तर दाखवतात. एकूण जीवनाच्या भयावहतेची व भंगूरतेची कडा कथेत झळकून जाते. ' मी जे करतो ' असे वाटते ,ते विराट अस्तित्वाच्या - विश्वाच्या अविरत मंथनातून होते, ही जाणीव, ही कथा करून देते. त्यामुळे आपल्या कर्माचे सुकाणू सर्वस्वी आपल्या हातात आहे, असे मानणे व्यर्थ आहे. जो शोक , जे दैन्य आपण लपवतो - ते जीए भडाभडा पण कलात्मकतेने सांगतात. म्हणून ही कथा मैलाचा दगड ठरते.

4.- जाता जाता - १)'लग्न संबंध ' हे कोडे आहे ,जुगार आहे. समाजाने मान्यता दिली म्हणून पुरुष स्त्री लग्न करून, खोपटात - घरात राहतात. पण त्या चार भिंतींच्या आडोशात त्यांचे पटेल ,व किती दिवस पटेल, हे ब्रम्हदेवही सांगू शकत नाही. त्यामुळे गौरी निघून जाते हा कथेतील योगायोग नाही. तर जीएंना त्यातील शोकभाव दाखवायचा आहे. ' जोखमार 'हा ग्रामीण शब्द वापरला आहे.

- २) कथेत,गौरीचा म्रुत्यू, चंद्रावळ नर्तिकेला देवी आजार होवून म्रुत्यूसम स्थिती,चंद्रावळ कबूतराचा म्रुत्यू दाखवून जीए क्षणभंगुर जीवन व अटळ म्रुत्यूकडे लक्ष वेधून घेतात.हे निराशाजनक नसून जीवनाचे अमोल महत्व दाखवणारे आहे.धन्यवाद.

-विलास वाघोलीकर.

विलासजीनी गौरीने सण्ण्याला सोडून बाबूबरोबर रहाण्याविषयी समजावले. मला 'जोखमार' या शब्दाबद्दल उत्सुकता आहे. कथेवर चर्चा होईल तसे खुलासे होतील.

- यतीन गुळवणी

मला एक बाब विवेचनात राहून गेल्याचे जाणवते. मुख्य कथानकं त्या साठीच आहे असे मला वाटते.

सण्ण्या हा कथेचा नायक. जीवनावर माणसांवर मना पासून प्रेम करणारा, वेळ पडल्यास त्या व्यक्ती आथवा सजीव साठी पाहिजे ते करण्यासाठी तयार आसणारा. पण जी ए च कथनकातील अनेक नायक प्रमाणे आयुष्यात सतत नियती समोर हरत जाणारा.

गौरी वर जीव लावतो , ती पुरुष जातीवर सगळयात लांच्चनास्पद दूषण लावून त्याला सोडून त्याच्या घरासमोर भवा कडे जावून राहते.

चंद्रावळ नर्तकी त्याला आवडते तिला देवी येतात आणि ती भेसूर होते. आणि शेवटी चंद्रावळीचा करूण अंत. म्हणजे त्याला नियतीने कोणता आनंद भोगू द्यायचा नाही आसेच ठरवले होते. गौरी आवडली जीवनात आनंद आला आणि ती गेली. चांद्रवळ नर्तकी ने खास त्याच्या कडून पाणी घेतले ती पण भेसूर झाली. आणि शेवटी ज्या कबूतराने गावात मान उंचावली आणि आता काही दिवस तो गावात मान उंचावून चालणार तोच चंद्रवळीला ससाण्याने मारले.

कथेतील खरे मर्म हेच आहे सण्याचे जीवनातील दुर्दैवाचे फेरे

- विश्वेश्वर नांदेडकर

मायबोली च्या link वर जोखमार चा अर्थ मिळाला तो खालील प्रमाणे दिला आहे.

"जोकमार' हा कोकणातील अघोरी पंथीयाचा देव मानला जातो....कर्नाटकात यालाच 'जोखमार' असे नाम असून स्त्रियांच्या दृष्टीने अत्यंत टाकावू [किंवा नाकर्ता] माणसाला या नामाने पुकारतात."

- विशाखा आपटे

मला वाटले की महाराष्ट्र कर्नाटक सीमेवरील बोलल्या जाणाऱ्या

कानडी भाषेतील ग्रामीण बोलीभाषेतील 'जोखमार ' हा शिवीसदृष्य शब्द असावा.

- यतीन गुळवणी

यतीनजी, विलासजी आणि विश्वेश्वरजींच्या पोस्ट्स मुळे ही कथा समजायला बरीच मदत होते आहे. दोघांचेही आभार.

हिंदी सिनेमावर पोसलेल्या रुचीला चंद्रावळ सारखी अभिरुचीपूर्ण कथा समजणे अवघड जाते. माणसांचे वेगवेगळे आतले, खोल मनातले, एकाखालचे एक असे स्तर समजून घेणे, दोन माणसांमधील व्यक्तींमधील एकाच वेळी अस्तित्वात असणारे भिन्नभिन्न भावसंबंध समजून घेण्याची कुवत अनेकात सहसा नसते. त्यातलाच मी एक एक. मला ही कथा समजून घेणे अवघड गेले. गंजुडा बाबु आणि त्याचा भाऊ सण्ण्या यांच्यात एकाच वेळी प्रेम आणि द्वेष, आदर आणि तुच्छता यांचा भाव आपण समजू शकत नाही. त्याच बरोबर नाचणारी चंद्रावळ व बिरादर पाटील यांच्यातील प्रेम आकर्षण आणि भांडण यांचा ताळमेळ आपल्याला समजत नाही. चंद्रावळीसाठी पोलीसाचा मुंडके तोडणारा पाटील, पद्मासाठी चंद्रावळिला सोडून देतो, कबूतर चंद्रावळ सण्ण्याच्या मनामध्ये किती खोलवर रुजली आहे ते आपण समजू शकत नाही. चोविसबोट बाळू सण्ण्याला भरीला पाडतो तेव्हा सण्ण्या सहज बळी पडतो हेही आपण समजू शकत नाही. व्यायाम शाळा घुमवणारा बाबू अचानक गांजेकस का होतो तेही आपल्याला समजत नाही. तसेच संण्ण्याची बायको गौरी सण्ण्याला सोडून त्या गांजेकस बाबु मध्ये काय पाहते तेही आपल्याला समजत नाही. अशाप्रकारे जीएंची ही कथा समजून घेण्यासाठी एका वेगळ्या उच्च पातळीवरच्या समज असण्याची आवश्यकता आहे. ती समज केवळ साहित्यिक नाही तर मानवी संबंधांमधल्या गुंतागुंतीचीही आहे. आणि ती समज आपल्या समाजामध्ये फारशी नसल्यामुळे जीएंच्या कथा फार वाचकप्रिय झाल्या नाहीत हे आपण पाहतो. परंतु ज्यांना जीएंच्या कथांचा लळा लागला ते मात्र इतर कुणाच्याही वाटेला का जात नाहीत तेही आपण समजू शकतो. जीएंच्या प्रारंभिक कथांपैकी ही

एक. जर जी एंना सत्यकथा सारखा पाठीराखा मिळाला नसता तर जीए आपल्यापर्यंत कदाचित पोहोचू शकले नसते.

या कथेतील अनेक सौंदर्यस्थळे विलासजींनी दाखवली आहेत. जीएंची शब्दकळा मोहिनी घालणारीच. निदान मलातरी जीएंच्या कथांच्या मर्मस्थानांची जाणीव होण्यापुर्वी त्यांच्या शब्दकळेनेच आकर्षित केले. चंद्रावळ नर्तकी आणि चंद्रावळ कबूतर यांचे वर्णन करणारे हे दोन खास परिच्च्छेद.

*वर तेजस्वी डोळे भाजणाऱ्या निळ्या रंगाचा घुमट स्वच्छ चमकत होता एक दोन ठिकाणी म्हातारीच्या केसासारखे वीरळ ढगाचे फ़िस्कारे चिकटले होते. जणू आपल्याकडे काहीही लपवून ठेवण्याजोगे नाही असा अबोल शब्द त्या धीम्या विशाल डोळ्यात भरून राहिला होता. अगदी मध्यावर चंद्रावळ तीक्ष्ण धारेच्या गतीने फिरत होती. त्या ढगांच्या जवळ येताच क्षणभर ती त्यांच्या पापणी आड लपत असे. पण लगेच तीची चांदणी पुन्हा चमकू लागे. साऱ्या आभाळाची दृष्टी जणू त्या नाजूक टिकलीवर खिळली होती. त्या अमर्याद विस्तारात एकाकी निर्भय डौलाने तरंगणाऱ्या चंद्रावळी पाहून सण्ण्याला वाळलेल्या गुंजेच्या शिंगे प्रमाणे मोकळे वाटू लागले आणि त्यातून गुंजा प्रमाणे शब्द उघडले "बाळू चंद्रावळ म्हणजे रत्न आहे रत्न."*

*बिरादर पाटलाच्या कंपनीतील चंद्रावळी चे नाव ऐकले की आठ दहा मैलातले लोक जमा होत. निरनिराळ्या जत्रांतून ती सोन्याच्या कमरपट्ट्या प्रमाणे चमकून जात असे. कमरेला लुगड्यात खोवलेला लांब हार घालून चंद्रावळ स्टेजवर आली की बायका तिच्या नावाने बोटे मोडत आणि पुरुष मिश्यांच्या टोकांना मिजास देत. लाल नखांच्या गोऱ्या पायाभोवती चाळ बांधून ती भिंगरी सारखी नाचू लागली की अगदी शेवटच्या रांगेतला बाप्या काड्याची पेटी हलवायला तयार नसे. तिचा एक विशेष गवळण नाच होता. त्यात ती डोक्यावर हात जोडून नाचत असे आणि त्यावेळी*

*मुरडताना दंडात रुतलेली चोळी आणि कमर यामधील गोऱ्यापान केवड्यासारख्या भागावर उन्मादक हालचाली दिसल्या की लोक धुंदीने बेहोश आंधळे होत. ही कोण कुठली कुणास ठाऊक, पण जेथे बिरादर पाटील तेथे त्याची चंद्रावळ. तिच्याशी एक शब्द बोलण्याची कोणाची छाती नव्हती. एखाद्या विशाल क्रूर सर्पाच्या फण्याप्रमाणे पाटलाची छाया सतत तिच्यावर असे. झुंड मिशांचा हा विक्राळ दैत्या सारखा माणूस बूट घालून कृष्णाचे काम करत असे. त्याच्या सारखा भीम गेल्या पंचवीस वर्षात जत्रेत नाचला नाही.*

- सुनीळ सामंत

माननीय सुनीळजी, 1 )आपल्या प्रतिसादाचे लिखाण, नेहमीच आस्वादक, दिशादर्शक असते. ग्रुपमध्ये आपली स्नेहमय कॅप्टनची भूमिका नियमितपणे गरजेची आहे. 2 ) आपण जीएंचे लेखन व सिनेमा, नाट्य सारखी माध्यमे यांची तुलना केली आहे. जीएंच्या कथेचे नाट्यीकरण अवघड वाटते. जास्तीत जास्त ,वेगवेगळ्या आवाजांमध्ये संगीतासह, अभिवाचन होवू शकेल. कारण नाटक सिनेमा, ही समुह कला असल्याने अनेकांचे अनेक विचार होतात.मजकूर गाळणे, भांडवल गुंतवणूक इत्यादी अनेक प्रकार होवू शकतात. चित्रकथा हे पूरक माध्यम होवू शकते. 3 ) आपल्या प्रतिसादात, अनेक मुद्दे समजत नाहीत, असे म्हणून ते अधोरेखित केले आहेत. मी स्पष्टीकरणे देत नाही.पण काही मुद्दे सुचवतो.भावाभावांत लहानपणी प्रेम,मोठेपणी वेगळे हितसंबंध असतात.त्यामुळे त्यांचे संबंध ताणाचे होतात.हे इतर नात्यांत ही घडते,हे आपण आजूबाजूला पाहतो. गांजेकसाची तब्येत नंतर ढासळणार. बिराजदार पाटील हा आसक्तीने जगणारा असल्याने, काहीही अविवेकी कृत्य करू शकतो. कबूतरांच्या छंद - वेडापायी, नोकरीत अनेक दिवस सुट्ट्या घेणारी माणसे मी पाहीली आहेत. गौरीचे वागणे, तिच्या स्वभावपातळीत सुसंगत आहे. 4

)जीएंना पहिल्यांदा' हंस 'च्या अनंत अंतरकर संपादकांनी उत्तेजन दिले. यात त्यांची मर्मदृष्टी होती. तेच नंतर सत्यकथेत गेले. तो काळ वाचनसंस्कृतीचा होता ,हा नियतीयोग. आपल्या प्रतिसादाने मला लिहावेसे वाटले. धन्यवाद.इतरांचेही प्रतिसाद अभ्यासू, हे विचारी आहेत. आभार आणि धन्यवाद.

- विलास वाघोलीकर.

मला ह्या कथेत तिन्ही स्त्रियांविषयी वाईट वाटले. पहिली गौरी, दुसरी चंद्रावळ नर्तकी आणि तिसरी मादी कबुतर चंद्रावळ. तिघींच्या बाह्य सौंदर्य किंवा आकर्षक पणा मुळे त्यांच्या मालक सदृश पुरुषांच्या अपेक्षा वाढलेल्या आहेत आणि त्या पुऱ्या नं झाल्यामुळे त्या पुरुषांना झालेलं दुःख आहे. पण त्यांच्या स्वतः च्या, म्हणजे गौरी आणि दोन्ही चंद्रावळ यांच्या दुःखाचा वा शारीरिक क्लेशाचा विचार ह्या पुरुषांच्या मनाला शिवत नाही.

सणण्याला गौरी विषयी वाटणारे दुःख तेवढ्यापुरतेच आहे, ती असताना दोन घास गिळायला तरी मिळतं होते असं त्याच्या मनात येतं.आणि बाबू तर गौरीला म्हैस, नागीण वं खोट्या चवल्या, विश्वास नं टाकण्याजोगी म्हणतो.

आणि दोन्ही चंद्रावळीना बिरादार पाटील आणि सणण्या स्वतः च्या मालकी हक्काची वस्तू असल्याप्रमाणे वागवतात वं अपेक्षा करतात.यातून स्त्री चे समाजातील स्थान जी ए आपल्याला दाखवत आहेत असे वाटते.

- विशाखा आपटे

चंद्रावळ कथा जीएंच्या पहील्या कथां पैकी एक आहे.जीवन हे अखंड असत ,ते तुकड्या तुकड्यानी जगता येत नाही ,तशाच जीएंच्या कथा आहेत !

सण्या ,गांजुडा बाबु ,....गौरी ,बिरादार पाटील ,चोवीसबोट ,गुरूजी पदमजी , रखरखीत दुपार ,नुकतेच झालेले गौरीचे निधन ,नुकतेच मिळालेले खानदानी कबुतर , कबुतरे ऊडवण्याचा जुगार , ईर्षा , वासना ,अपमान ,आपलीच कबुतरे शिकारी पक्षांसाठी ऊडवण्याची पदमजीची धडपड.....

हे सगळे एका चंद्रावळी भोवती फिरते.

या कथेचा एकसंधपणा फार ऊशिरा लक्षात येतो.

सण्याचे जीवन , चंद्रावळ आणि पाटील कहाणी ,गौरीचे वागणे ,कबुतर ऊडवीणे हे इतके एकमेकात मिसळून गेले आहे की त्यांचे डिसेक्शन करून सेपरेट सेपरेट अस्तित्वच दाखवता येत नाही ,किंवा तसे करायला गेल्यास अर्थहीन होऊन बसते.

आज चंद्रावळीचे अनुभवदान पुन्हा मिळाले.

जीएंना कृतज्ञ प्रणाम 🙏

- वैभव कुलकर्णी

वैभवजी, या कथेचा एकसंधपण उशीरा लक्षात येतो (अनेकांना येतच नाही, त्यातला मी एक) हे अगदी खरे. ही कथाही गुंतवळसारखी एकमेकांशी असंबद्ध वाटते. पण अनेकदा वाचल्यावर हळू हळू त्यातल्या बारिक पण पक्क्या धाग्यांकडे लक्ष जाते.

- सुनीळ सामंत

कॉलेज जीवनात मला त्यांच्या रूपक कथा संजशकून , काजळ माया प्रचंड आवडल्या. पण नंतर मात्र त्यांच्या प्रत्यक्ष आपल्या आयुष्यातील व्यक्ती वरच्या

कथा आणि त्यातील यक्तींचे स्वभाव विशेष यांनी जे भरून टाकले ते आज पर्यंत. दत्तू जोशी सारखी पात्रे आता मरे पर्यंत डोक्यातून जाणार नाहीतच

हिरवे रावें, पारवा , निळा सावळा यातील कथा ना जी ए चे खरे साहित्य म्हणणारे ही अनेकजण मला भेटतात

- विश्वेश्वर नांदेडकर

लिलोनार्डो च्या पेंन्टींगमधे जसे एकात एक चित्रे गुढ रीतीने छपवलेली असतित तसे काहीसे जीए कथेत कथानक टाकतात.

गंजुडा बाबू — अचानक व्यायाम बंद करतो, डिप्रेशन मधे जातो.त्याचा स्त्रीयांशी संबंध आला असावा.

नाहीतर त्याच्या तोंडी जीएनी गौरी विषयी ,स्त्रीयां विषयी अशी वाक्ये दिली नसती.

- वैभव कुलकर्णी

श्री नितीन वैद्य, सोलापूर यांचेकडून-

-----------------

मित्रानो,

मराठी साहित्याचा मानबिंदू असलेल्या ज्या माणसाच्या लिखाणाने माझ्या आयुष्याला वेगळ वळण मिळालेलं आहे त्या जी.ए. कुलकर्णी यांचं एक मोलाचं टिपण खाली देतो आहे. नाना समस्या आणि आव्हानांनी गांजलेल्या माझ्या अर्थहीन पूर्वायुष्यात मनाला पडलेल्या अस्तित्ववाची( Existential ) प्रश्नांच्या उत्तरांच्या शोधात मी ललित साहित्याकडे वळलो. मानवी दुःखाच्या उगम-स्थानाच्या शोधात पुस्तकातून वणवणत असता मी जी.एं. च्या लघुकथातील विविध पात्रांना अडखळलो. यातानामार्गे निघालेले त्यांचे प्रत्येक पात्र 'पडेन पण पडून राहणार नाही' या जिद्दीच्या आधारे टिकून उरलेलं दिसलं. तोच वसा घेऊन मी माझ्या नियतीशी आजवर टक्कर देत आलो आहे! जी.ए. नियतीवादी आहेत या विषयी वाद नाही, पण म्हणून ते निराशावादी आहेत हा अनेकांचा समज निखालस चूक कसा आहे हे दाखवण्यासाठीच मी खालील पोस्ट दिली आहे. आपणात माझ्यासारखे अनेक शोधप्रवासी असतील त्यांना तिचा उपयोग व्हावा ही अपेक्षा! असो!

मनोहर सप्रे

----------------------------

# माझे लघुकथालेखन

## जी.ए. कुलकर्णी

स्वतःविषयी लिहणे अथवा बोलणे सोपे असते. आनंदाचे असते. निदान ते बोलणाऱ्याला तरी आनंदाचे वाटते. पण स्वतःच्या लेखनाविषयी बोलणे मात्र तितकेच अवघड असते. याचे एक महत्वाचे कारण म्हणजे लेखकाचा हेतू आणि त्याने साधलेले लेखन यात, इच्छित आणि प्राप्त यात नेहमीच एक छाया पडते...the shadow falls! तेव्हा माझ्या लेखनाविषयी मी जे बोलणार आहे, ते केवळ माझ्या उद्देशाविषयी, माझ्या प्रयत्नाविषयी. ते मी सारे साध्य करू शकलो आहे, असे मी मानत नाही. असला आत्मविश्वास केवळ अतिश्रेष्ठ अशा कलावंतांनाच शोभून दिसतो. असला उद्धटपणा केवळ उथळ कारागीरातच दिसतो या दोन्ही गोष्टी टाळण्याचा मी प्रयत्न करणार आहे.

मी आतापर्यंत केवळ लघुकथाच लिहिल्या आहेत. याचे एक कारण म्हणजे हा वाङ्गमयप्रकार विशेष आव्हानकारी वाटतो. लघुकथांकडे पाहणार्यांचा एक विशिष्ट दृष्टीकोण असतो. एकंदरीने लघुकथा म्हणजे कादंबरीलेखनाची पूर्वतयारी आहे. ती कादंबरीच्या छायेत जगणारी असून तिला स्वतंत्र मुखत्यारी नाही - एवढेच सामान्यपणे समजण्यात येते. आता मराठीत अनेक थोरांच्या कर्तृत्वाने हा दृष्टीकोण बदलला जात आहे, लघुकथेला कुलीन वाङ्गमयप्रकाराचे स्थान प्राप्त होऊ लागले


आहे, ही आनंदाची गोष्ट आहे. परंतु तिच्याकडे पाहण्याचा माझा दृष्टीकोण थोडा वेगळा आहे. ती एक लहान कथा एवढाच तिचा अर्थ नाही. तिच्यात अनेक पात्रे, अनेक प्रसंग येऊ शकतात. तिचा विस्तारही दीर्घ असू शकतो. पण कितीही वर्तुळे असली, त्यांना छेदणाऱ्या कितीही रेषा असल्या. तरी एखाद्या कोळयाच्या जाळयात ज्याप्रमाणे त्या साऱ्यांचा केंद्रबिंदू एक सजीव प्राणी असतो, त्याप्रमाणे लघुकथेत साऱ्या पात्रांचे. साऱ्या प्रसंगांचे केंद्रीकरण एका जिवंत, दाहक परिमाणात होत असतो. नदीचा उगम आणि तिचे मुख या दोन गोष्टी निश्चित झाल्यावर नदीला स्वातंत्र्य असते. तिच्यात अनेक प्रतिबिंबे दिसतात, गतीत विविधता येते आणि काही वेळा तिचा रंग देखील बदलत्या रुपात कादंबरीदेखील नदीप्रमाणे कादंबरी राहते. पण लघुकथेत मात्र निरनिराळे पैलू असूनही मध्ये दिसणाऱ्या तेजोबिंदूत त्यांची एकता दिस्ते. म्हणजे लघुकथा हा वाङ्गमयप्रकार कादंबरीपेक्षा श्रेष्ठ आहे असला अति आग्रह मला करायचा नाही. तो एक स्वतंत्र प्रकार आहे, त्याची प्रतिज्ञा निराळी, त्याचे कार्य वेगळे एवढेच मला सांगायचे आहे.

रंजकता हे वाङ्गमयाचे लक्षण मला दुय्यम वा क्षुल्लक वाटते व केवळ रंज्क्तेसाठी मी एक ओळ कधी लिहिली नाही. पस त्याचबरोबर काही सामाजिक व राजकीय प्रश्न तात्कालिक महत्त्वामुळे गाजतात ते आज केवळ लोकांच्या नजरेसमोर आहेत एवढ्याचसाठी मी त्यांना माझ्या कथात राबवलेले नाही..commitment हा शब्द हल्लीच्या विमार्शात अनेक वेळा वापरला जातो, व प्रसंगी तर त्याचा निकष म्हणून वापर केला जातो, व प्रसंगी तर त्याचा निकष म्हणून वापर जातो. पण ही बांधीलकी केवळ राजकीय वा सामाजिक प्श्नापुरतीच असू शकते मला मान्य नाही. माणूस समाजात राहत असल्याने त्याच्यापुढे असल्या समस्या अटळपणे असतात व तेवढ्यापुरत्या त्या वाङ्गमयात अनिवार्य आहेत. पण सतत बदलणाऱ्या या रूपाखाली चिरंतन स्वरूपाचे सुखदुःख म्हणा, जे आपणाला सतत जाणवते, त्याचे

बाह्य कसेही असले तरी खरे स्वरूप काल, देश यांच्या ममार्यादांपलीकडचे असते-- ते जीवन मला लेखक या नात्याने भव्य, भीषण, उत्कट, आकर्षक वाटत आले आहे. माणूस आहे, म्हणूनच माणसाला स्वीकारावे लागणारे भोग, दुःखे व आनंद हा माझ्या कथांचा एकंदरीने विषय आहे. जीवनाच्या चक्रव्यूहातून जाताना अकस्मात समोर उभी राहिलेली दुःखे, जेथे आधारासाठी विश्वासाने वळावे तेथेच आढळणारा घात आणि वंचना. फसव्या सुखाचे रूप घेऊन येणारे मायावी दुःख, उत्कट सुख वाट्याला आले तरी त्याची जाणवणारी दाहक क्षणभंगुरता, अशी जीवनाची विविध रूपे मला खुणावतात. आणि मग यातून मानवाला अनंतकाळापासून जाणवत आलेले अनेक प्रश्न नागाच्या फण्याप्रमाणे उभे राहतात : या साऱ्यांचा अर्थ काय? हे दुःख माझीच केवळ शिक्षा आहे की मानवी जीवनाचाच तो एक भाग आहे? याचा अर्थ मानवाला कधी समजेल का? आणि समजला तरी तोच अंतिम अर्थ खरा आहे, हे ओळखायला मनवाजवळ निकष काय आहे? अशी प्रश्नचिन्हे माणसाला भेडसावू लागतात. पण या साऱ्या भोगातही माणूस ज्या जिद्दीने व इर्षेने जगतो. भंगलेला कुंभ पुन्हा सांधून त्यात पाणी भरण्याचा प्रयत्न करतो, प्रेम निष्फळ होऊ शकेल हे माहीत असूनही इतरांवर प्रेम करतो. आयुष्याचे उग्र स्वरूप पाहूनही जगण्याची जिद्द धरतो, ती मानवी प्रेरणा मला जिवंत व अभिमानाची वाटते. पडेन पण पडून राहणार नाही, या अहंकारामुळेच जरी व्याकूळ करणारी दुःखे मानवाला भोगावी लागत असली तरी त्याच अहंभावामुळे त्याच्यात जगण्याची व अर्थ शोधण्याची इर्ष्या निर्माण होत असते. या अहंभावाखेरीज माणसाला आणि लेखनालाही अर्थ नाही.दुःखाच्या विविध व उत्कट दर्शनात हा भाव शोधणे हा माझा प्रयत्न आहे. रेब्रोंटच्या चित्रात छाया आणि प्रकाश यांना जे थोर वजन प्राप्त होते, ते कधी एकदा तरी आयुष्यात माझ्या शब्दांना लाभावे एवढीच माझी प्रार्थना आहे.

पण अशा तऱ्हेचे प्रश्न (ज्यांना एका अर्थानं metaphysical म्हणता येईल) जरी माझ्या काही कथात असले, तरी ते केवळ कोरडे. तात्त्विक राहणार नाहीत असा माझा प्रयत्न आहे. शुद्ध स्वरूपाच्या केवळ विचारांना शास्त्रात कितीही महत्व असले तरी मला ते तसे जिवंत वाटत नाहीत।. माणसांच्या सुखदुःखातूनच ते जाणवले पाहिजेत. जर त्यांना रक्ताची उब नसेल, मांसाचे आवरण नसेल तर ते केवळ बुद्धीचाच खेळ ठरतील. माणूस प्रथम जगतो, व जगण्यामुळे जे प्रश्न निर्माण होतात अस विचार करणारी माणसे प्लेटो-रसेलप्रमाणे प्रतिभाशाली, विचारवंत असली पाहिजेत असे नाही. उलट, माझ्या कथेतली माणसे अगदी सामान्य, काहीवेळा अशिक्षित आहेत. ती इर्ष्येने, उत्कटतेने जगतात, अनेकदा पराभूत होतात. पण धडपडत पराभूत होतात हे विशेष आहे. मी माझ्या एका कथासंग्रहावर Tolstoy चे एक वाक्य बोधवाक्य म्हणून छापले आहे "All happy families are happy in the same way. But unhappy family is unhappy in its own way" या दृष्टीने पाहिले तर कोणताही माणूस मला सामान्य वाटतच नाही. तो नेहमीच असामान्य आहे, त्याच्या सुखदुःखांचे, जिद्दीचे स्वतंत्र निराळे जग आहे; तो जन्मण्याआधी ते नव्हते, तो गेल्यावर अगदी तसलेच निर्माण होणार नाही. हे या माणसाचे जीवन हाच खऱ्या अर्थाने माझ्या कथांचा विषय आहे.

हे अगदी थोडक्यात माझ्या कथांविषयी; माझ्या हेतूंचे निवेदन. सिद्धीविषयी मी काही बोलणे औचित्यास धरून होणार नाही.




जीवन इतके अनंतरुप आहे की अगदी संपूर्णपणे माझ्यासारखेच आयुष्य असलेला माणूस पूर्वी कधी झाला नाही व पुन्हा कधी होणार नाही. त्या दृष्टीने प्रत्येक सामान्य माणूस देखील अद्वितीय असतो. मी गेल्यानंतर एक अव्दितीय भावविश्व पूर्णपणे विरुन जाणार आहे



**जी. ए. कुलकर्णी** हे मराठी साहित्यातले रत्नच. त्यांची प्रत्येक कथा पैलूदार असे. या प्रत्येक पैलूचे नेमके आकलन होणे हे कोणा एका वाचकाला दुरपास्तच.

२०२२-२३ हे जी. ए. यांचे शताब्दी वर्ष होते! या वर्षाचे औचित्य साधून जाणत्या जी.ए.प्रेमी वाचकांनी एक उपक्रम हाती घेतला. आभासी पद्धतीने एकत्रित येऊन त्यांनी जी. ए. यांच्या १४ कथांवर विविधांगाने चर्चा केल्या, अनेक मते, दृष्टीकोन मांडले. संकलित केले. ही संकलने सात खंडांत उपलब्ध आहेत. जी.ए. यांच्या कथावाचनाचा आनंद घेतांना या चर्चा जी.ए.प्रेमी तसेच अभ्यासक-समीक्षकांना निश्चितच उपयुक्त ठरतील. हा मौल्यवान ठेवा आपल्याकडे नक्कीच हवा!